# तृतिय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

## इतिहास अभ्यासपत्रिका क्रमांक-VI

# वस्तुसंग्रहालयशास्त्र आणि पुराभिलेखशास्त्राची ओळख

## विषय कोड : 86581

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व प्रमुख,
मानव्यविद्या आणि सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक आणि संपादक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. अनुराधा रानडे**
प्राचार्या,
आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज,
पडघा, जि. ठाणे

: **डॉ. स्वप्ना हेमंत समेळ**
प्राचार्या,
एस. आय. सी. इ. एस. डिग्री महाविद्यालय,
जांभुळफाटा, अंबरनाथ

: **प्रा. तुळशिदास मोकल**
इतिहास विभाग प्रमुख,
डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व
सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय,
रोहा, जि. रायगड

**एप्रिल, २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पू), मुंबई

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | वस्तुसंग्रहालयशास्त्र | ०१ |
| २. | अभिरक्षकाची भूमिका व कर्तव्ये | १८ |
| ३. | वस्तुसंग्रहालयातील वस्तुंचा संग्रह | ३४ |
| ४. | वस्तुसंग्रहालयातील वस्तुंचे जतन | ४१ |
| ५. | वस्तुसंग्रहालयातील वस्तुंचे संवर्धन | ५७ |
| ६. | वस्तुसंग्रहालयांची बदलती भूमिका | ७५ |
| ७. | पुराभिलेखशास्त्र : अर्थ, व्याप्ती, उद्देश व प्रकार | ९२ |
| ८. | अभिलेखांचे महत्व आणि ऐतिहासिक साधन म्हणुन दस्तऐवजांचे मूल्य | ९९ |
| ९. | अभिलेखांचे वर्गीकरण | १०५ |
| १०. | अभिलेखांचे व्यवस्थापन : जतन व मूल्यमापन | ११२ |
| ११. | अभिलेखांचे संवर्धन | १२४ |
| १२. | अभिलेखांचे पुनरुज्जीवन व डिजिटल अभिलेखागार | १३३ |


❖❖❖❖

# T.Y.B.A. History

## SEMESTER -VI

## Elective Course VI A - Introduction to Museology and Archival Science

Objectives:

1. To inform the students about the role of Museums in the preservation of Heritage.
2. To understand the importance of Archival Science in the study of History.
3. To encourage students to pursue careers in various Museums and Archives in India and abroad.

**Module I: Museology**

(a) Definition of Museology, Museum Movement in India
(b) Role of the Curator
(c) Types of Museums

**Module II: Museums**

(a) Methods of Collection and Conservation of Objects in Museums
(b) Preservation Techniques and Types of Exhibitions
(c) Changing Role of Museums: In-house and Out-reach activities of Museums

**Module III: Archival Science**

(a) Meaning, Scope, Objectives and Classes of Archives
(b) Importance of Archives: Value of Records as Sources of History
(c) Classification of Records

**Module IV: Management of Archives**

(a) Appraisal and Retention of Records
(b) Conservation and Preservation of Records
(c) Digital Archives

**References:**


Balloffet Nelly, Hille Jenny and Judith Reed, *Conservation and Preservation of Records Archives*, American Library Association, Chicago, 2015.

Banerjee, N. R., *Museum and Cultural Heritage of India*, Agam Kala Prakashan, New Delhi, 1990.

Basu Purnendu, *Archives and Records, What are They?* The National Archives of India, New Delhi, 1969.

Cook Michael, *The Management of Information from Archives*, Gower, Hampshire,1999.

Dobreva, Milena and Ivacs Gabriella, *Digital Archives: Management, Use and Access*, Facet Publishing, London, 2015.

Dwivedi V.P, *Museums and Museology: New Horizons*, Agam Kala Prakashan, New Delhi, 1980.

Forde Helen and Rhys-Lewis Jonathan, *Preserving Archives*, Facet Publishing, London, 2013.

Ghose Salien, *Archives in India*, History and Assets, Firma KL Mukhopadhyay, 1963.

Harinarayan Nilam, *The Science of Archives Keeping*, the State Archives, Hyderabad, 1969.

Jenkinson Hilary, *A Manual of Archive Administration*, Oxford, Clarendon Press, London, 1922.

Johnson Charles, *The Care of Documents and Management of Archives*, Society for Promoting Christian Knowledge, London, 1919.

Markham S. F., *The Museums of India*, The Museum Association, London, 1936.

Plenderleith H. J, *The Conservation of Antiquities and Works of Art: Treatment, Repair and Restoration*, Oxford University Press, New York, 1956.

Posner Earnest, *Archives in the Ancient World*, Harvard University Press, 1972.

Sarkar, H, *Museums and Protection of Monuments and Antiquities in India*, Sundeep Prakashan, New Delhi, 1981.

Stielow Frederick J. *Building Digital Archives*, Descriptions, and Displays, Neal-Schuman Publishers, New York, 2003.

Thomson John M.A. and Others, *Manual of Curatorship: A Guide to Museum Practice*, Routledge, New York, 1984.

Wittlin Alma, *Museums : Its History and Its Tasks in Education*, Routledge and K Paul, London, 1949.

# १

## वस्तुसंग्रहालयशास्त्र

**घटक रचना :**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ वस्तुसंग्रहालयाचा अर्थ

१.३ वस्तुसंग्रहालयाच्या व्याख्या

१.४ भारतातील वस्तुसंग्रहालय चळीवळीचा इतिहास

१.५ वस्तुसंग्रहालयाचे प्रकार

१.६ सारांश

१.७ प्रश्न

१.८ संदर्भ

## १.० उद्दिष्ट्ये

१) वस्तुसंग्रहालय म्हणजे काय ते समजावून घेणे.

२) वस्तुसंग्रहालयाच्या व्याख्यांचा अभ्यास करणे

३) भारतातील वस्तुसंग्रहालय चळवळीचा इतिहास अभ्यासणे.

४) वस्तुसंग्रहालयाचे प्रकार जाणून घेणे.

## १.१ प्रस्तावना

भारतामध्ये वस्तुसंग्रहालयाचे स्थान अत्यंत मोलाचे आहे. कारण भारताच्या प्राचीन कलासंस्कृतीचा वारसा जतन करुन ठेवण्याचे काम वस्तुसंग्रहालये करतात. एका पिढीपासून दुसऱ्या पिढीला हा बहुमोल ठेवा व त्याचे ज्ञानप्रसाराचे कार्य वस्तुसंग्रहालये करतात. यामुळेच देशांमध्ये सांस्कृतिक एकता व एकात्मता टिकून राहते . भारतासारखा देश जो विविधतेने नटलेला आहे. त्यामध्ये आपणांस भाषिक, धार्मिक, प्रांतिक, सांस्कृतिक विविधता दिसून येते. तरीसुद्धा या विविधतेमध्ये सुद्धा वस्तुसंग्रहालयामुळेच एकता टिकून राहिली आहे. तीचे संगोपन, संवर्धन व जोपासन करण्याचे श्रेय वस्तुसंग्रहालयानांच द्यावे

लागेल. म्हणूनच 'डॉ. सत्यप्रकाश वस्तुसंग्रहालये' ही सार्वजनिक संस्था आहे असे म्हणतात.

वस्तु संग्रहालये ही लोकशिक्षणाची महत्त्वाची केंद्रे मानली जातात. भारतासारख्या लोकशाही राष्ट्रमध्ये वस्तुसंग्रहालये खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. वस्तुसंग्रहालयाचे विविध प्रकारे वर्गिकरण करता येते. या वस्तुसंग्रहालयाची काळजी व निगा घेण्याचे काम वस्तुसंग्रहालयातील अभिरक्षक घेतात. म्हणूनच अभिरक्षकांची जबाबदारी व त्यांचे संग्रहालयातील स्थान खूप महत्त्वाचे आहे.

## १.२ वस्तुसंग्रहालयाचा अर्थ

वस्तुसंग्रहालये म्हणजे राष्ट्रीय वारसा एकत्र करुन त्याची जपणूक करणारी संस्था होय. वस्तुसंग्रहालयास इंग्रजीमध्ये म्युझियम (Museum) असे म्हणतात. म्युझियम हा शब्द ग्रीक भाषेतून आला आहे. म्युझियम या शब्दाची व्युत्पत्ती मोझेन (Museion) या ग्रीक शब्दातून झाली आहे. प्राचीन काळात ग्रीसमध्ये म्युजेस या ग्रीकांच्या विद्या व कलांच्या देवता होत्या. म्युजेस देवतांची मंदिरे ही मोझेन या नावाने ओळखली जात. ग्रीकांच्या परंपरेनुसार त्याकाळी धर्मसंस्था आणि शैक्षणिक संस्था यांची सांगड घालण्यात येत असे. त्यामुळे ही मंदिरे सर्व विद्या व कलांचे स्फूर्तीस्थान बनले. या मंदिरातून अनेक कलावस्तुंचे जतन केले जाई.

वस्तुसंग्रहालयाचे व्यवस्थापन, संकलन, निगा, कायदे इत्यादीबद्दल माहिती देणारे शास्त्र म्हणजे वस्तुसंग्रहालय शास्त्र होय. या शास्त्रात कला, संस्कृती, विज्ञान, स्थापत्य, संगीत या शाखांचा समावेश होतो. एखाद्या देशात प्राचीन काळापासून अस्तापर्यंत जी निरनिराळी राज्ये होवून गेली त्यांच्या दृश्य स्वरुपातील खुणा संकलीत करणे, कलात्मक वस्तुंचा दर्जा देवून मूल्य ठरविणे, इत्यादींची माहिती या शास्त्रात महत्त्वाची आहे.

## १.३ वस्तुसंग्रहालयाच्या व्याख्या

वस्तुसंग्रहालयाची व्याख्या अनेक तज्ञांनी केली आहे. राष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा जतन करुन ठेवण्याची जागा म्हणजे वस्तुसंग्रहालय होय. "जी संस्था आपल्या भावी पिढ्यांसाठी कलावस्तूंचा संग्रह जतन करुन ठेवते त्याचप्रमाणे लोकांचे मनोरंजन करुन त्याचवेळी लोकशिक्षण ही करते ती संस्था म्हणजे वस्तुसंग्रहालय होय." अशा प्रकारे वस्तुसंग्रहालयाची व्याख्या करता येईल. या व्याख्येनुसार वस्तुसंग्रहालय हे केवळ कलात्मक वस्तू जतन करणारी संस्था नसून ती प्रबोधन आणि लोकशिक्षण करणारी संस्था आहे.

वस्तुसंग्रहालयाची व्याख्या अनेक तज्ञांनी व संस्थांनी चांगल्या प्रकारे केल्या आहेत. त्यापैकी काही पुढील प्रमाणे :-

१) मारखंम यांच्या मते "वस्तुसंग्रहालय ही कोणत्याही समाजाला सेवा देणारी संस्था असून, या सेवांची तीन प्रकारे विभागणी करता येईल.

    १) वस्तुंची जमवाजमव आणि त्यांचे जतन.

२) त्यावर यथार्थ भाष्य करणे (त्यांचा अन्वयार्थ लावणे).

३) शैक्षणिक सेवा.

२) जॉन थॉमसन यांच्या मते आम जनतेला सदैव खुली असलेली व जनतेच्या सेवेसाठी आणि विकासासाठी, जी केवळ नफा मिळवण्यासाठी उभारलेली नाही, अशी कायमस्वरुपी संस्था कार्यरत असते. ती संस्था म्हणजे वस्तुसंग्रहालय होय."

३) वस्तुसंग्रहालयाची लोकप्रिय व्याख्या युनेस्को (UNESCO – United Nations Educational Scientific & Cultural Organization) संयुक्त राष्ट्रासंघटनेच्या शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटनेने केली आहे. ती व्याख्या पुढीलप्रमाणे, "सर्वसाधारण जनतेच्या हितसंवर्धनासाठी, अभ्यासासाठी कलावस्तूंचे जतन करुन ठेवण्यासाठी कायमस्वरुपी यंत्रणा, येथे विविध कलात्मक वस्तू, शास्त्रीय व तंत्रज्ञानविषयक वस्तुंचा संचय करणारी संस्था ज्यात वनस्पती, प्राणी संग्रहालय, मत्स्यालय इत्यादींचा समावेश होतो, तसेच जनतेला शिक्षण व आनंद देणारी वस्तूंचे प्रदर्शन करणारी संस्था म्हणजे वस्तुसंग्रहालय होय."

वरील व्याख्या आधुनिक वस्तुसंग्रहालयाची भूमिका स्पष्ट करतात. वस्तुसंग्रहालये म्हणजे केवळ शोकेस नव्हे तर त्यातील वस्तुंचा वर्तमानाशी संबंध प्रस्थिपित होण्यासाठी वस्तुंचा अभ्यास करुन त्या माहितीचा वापर प्रबोधन व लोकशिक्षणासाठी करणे आवश्यक असते म्हणूनच आधुनिक काळात वस्तुसंग्रहालयाची भूमिका महत्त्वाची मानली जाते.

## १.४ भारतातील वस्तुसंग्रहालय चळवळीचा इतिहास

वस्तुसंग्रहालयाच्या चळवळीची सुरुवात सर्वप्रथम युरोपमध्ये झाली. १५ व्या शतकापासून प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृतीच्या विविध अंगाची त्यामध्ये प्रामुख्याने कला, साहित्य, स्थापत्य, विज्ञान व संस्कृतीच्या नव्याने अभ्यासांची सुरुवात झाली. या काळास प्रबोधन म्हटले गेले.याच काळात वस्तुसंग्रहालयाची निर्मिती मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. या वस्तुसंग्रहालयात श्रीमंत कार्यक्षम व्यक्ती व संस्था प्राचीन व कलात्मक वस्तू जमा करू लागल्या त्यास गॅलरी, कॅबीनेट व स्क्रीटीओ अशा नावाने संबोधले जावू लागले. व पुढे याचे रुपांतर 'म्युझियम' मध्ये झाले. अशाप्रकारे वस्तुसंग्रहालय चळवळीचा प्रसार जगातील इतर सर्व देशांमध्ये झाला.

भारतामध्ये वस्तुसंग्रहालयाच्या चळवळीची सुरुवात शास्त्रशुद्धपद्धतीने ब्रिटिश कालखंडात झाली. भारतात जेव्हापासून उत्खननाला सुरूवात झाली तेव्हापासूनच म्यूझियमची सुरुवात झाली असे म्हणता येईल. कारण भारतातील वस्तुसंग्रहालय चळवळीचा पाया खऱ्या अर्थाने ब्रिटिशांनी घातला त्यांना भारतातील प्राचीन वास्तुंचे अवशेष मंदिरे, कोरीव लेख, नाणी, लेणी कला चित्रे स्थापत्य साहित्य आणि शिल्पाकृतीविषयी मोठे कुतुहल होते. त्यांनी वास्तुंचा अभ्यास करण्यास सुरुवात केली व त्यांनीच पुढे १८१४ मध्ये कलकत्ता येथे पहिले म्युझियम बांधले... प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अवशेषांचा पद्धतशीर अभ्यास करण्यासाठी व संपूर्ण भारतातून कलाकृती जमवून त्यांचे जतन करण्यासाठी या म्युझियमचा उपयोग झाला.

आधुनिक काळात वस्तुसंग्रहालाच्या चळवळीची सुरुवात मानली गेली असली तरी भारतामध्ये याची सुरुवात प्राचीन काळी झालेली दिसून येते. याचे विविध पुरावे भारतीय साहित्यामध्ये आढळतात प्राचीन भारतीय वाङ्मयात चित्रशाळा म्हणजे चित्रांचे प्रदर्शन असलेला दालन असा अनेक वेळा उल्लेख आलेला आहे. परंतु या चित्रदालनाविषयी त्यांचे स्वरूप, त्यांची व्याप्ती या संबंधी फारच थोडी माहिती आपणास मिळते. तसेच बुद्धांच्या पवित्र अवशेषांवर अनेक स्तुप भारतात अनेक ठिकाणी उभारले गेले. याची दालने बौद्ध वाङ्मयात सापडतात. उदा. सांची, बुद्धगया, सारनाथ, अमरावती इत्यादी ठिकाणी स्तुपावर अनेक मूर्ती कोरलेल्या आहेत तसेच त्यांवर आपणांस अनेकवेळा शिलालेख सुद्धा आढळून आलेले आहेत. तेव्हा कदाचित हीच भारतीय वस्तुसंग्रहालयाची प्राथमिक अवस्था आहे असे आपल्याला म्हणता येईल. म्हणूनच वस्तुसंग्रहालयाची सुरुवात १६ व्या शतकात युरोपमध्ये झाली असली तरी खऱ्या अर्थाने वस्तुसंग्रहालयाची सुरुवात भारतातच झाली असे आपल्याला म्हणता येईल.

सर्वात प्राचीन संग्रहालये म्हणजे चित्रशाळा व मंदिरे होत. कारण प्राचीन काळी राजे उत्कृष्ट चित्रकाराच्या आयोजित करत त्यात प्रसिद्ध चित्रकार आपापली चित्रे राजवाड्यातील दालनात आणून लावत. शिल्पकारदेखील आपला कलाकृती, शिल्पे दरबारात सादर करीत म्हणूनच ही दालने चित्रशाळा प्राचीन काळातील वस्तुसंग्रहालये मानली जातात.

मध्ययुगीन भारतातसुद्धा हीच परंपरा पुढे चालू राहिली. तत्कालिन शस्त्रे, शिकारीची आयुधे, पोषाख, दागदागिने, अलंकार, खंजीर, तलवारी, बंदुका इत्यादी गोष्टी निरनिराळ्या राजांच्या वैयक्तीक संग्रहालयात आपले वैभव व शौर्य दर्शविण्यासाठी ठेवत असत. पुढे ब्रिटिशकाळात म्युझियम निर्माण होण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु झाली.

इंग्रजांनी भारतीय वस्तुसंग्रहालयाचा पद्धतशीर अभ्यास सुरु केला व त्याचे सर्व श्रेय सर विल्मस जोन्स व नार्थॅनियल वॅलिच यांना द्यावे लागेल. त्यांनी वस्तुसंग्रहालयाची भारतात सुरुवात केली व या शास्त्राचा विकास केला. म्हणूनच त्यांना भारतीय संग्रहालय चळवळीचे जनक मानले जाते. पुढे जाऊन या शाखेचा विकास इतर त्याच्या सहकार्यांनी केला व ही प्रगती स्वातंत्र्योत्तर काळामध्येही झाली. म्हणूनच भारतीय वस्तुसंग्रहलायाच्या चळवळीचा इतिहास आपणांस पाच विविध कालखंडात करता येईल. ती पुढीलप्रमाणे :

**अ) ईस्ट इंडिया कंपनीच्या कारकीर्दीतील वस्तुसंग्रहालये (१७८४ ते १८५७) :**

ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाल्यानंतर युरोपियन लोक भारतात आले. त्यांना भारतातील मंदिरे, लेणी, कला व स्थापत्य या बद्दल प्रचंड कुतूहल होते म्हणून त्यांनी भारतीय संस्कृतीमध्ये रस घेऊन भारताच्या संस्कृतीच्या विविध अंगांचा पद्धतशीर अभ्यास करण्यास सुरुवात केली. भारताच्या सांस्कृतिक वैभवाचा अभ्यास करण्यासाठी तत्कालीन सुप्रीम कोर्टाचे एक न्यायाधीश सर विल्यम जोन्स यांनी कलकत्ता येथे १५ जाने. १७८४ मध्ये 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल' ची स्थापना केली. 'आशियाची विविध देशांच्या इतिहासाच्या प्राचीन अवशेषांचा, कलांचा, शाखांचा व वाङ्मयाचा अभ्यास व संशोधन करणे हा सोसायटीचा उद्देश होता. या सोसायटीतील सदस्यांनी भारताच्या संस्कृतीशी निगडीत असणाऱ्या विविध कलात्मक वस्तु जमा केल्या. परंतु या जमा केलेल्या वस्तुंचे जतन करुन ठेवण्यासाठी त्यांच्याकडे चांगली जागा नव्हती म्हणून त्यांना जागेची गरज भासू लागली. ही

गरज भरून काढण्यासाठी एशियाटिक सोसायटीने कलकत्ता येथे आपले पहिले वस्तुसंग्रहालय इ.स. १८१४ मध्ये स्थापन केले. या संग्रहालयाचे दोन प्रमुख विभाग होते.

१) पुराणवस्तू, मानववंशशास्त्र व तंत्रज्ञानविभाग

२) भूशास्त्र व प्राणीशास्त्र विभाग

या सोसायटीने सुरुवातीस किरकोळ स्वरुपाची कला व पुराणवस्तू यांचे पुरावे एकत्र करण्याच्या उद्देशाने काम केले. सुरुवातीस हे काम मंद गतीने चालू होते. तसेच भारतातील लोकसुद्धा आपल्या भूतकाळातील वस्तुंचे जतन करण्यास उत्सुक नव्हते. तत्कालिन शासनाने सुद्धा संग्रहालयाच्या विकासासाठी भरीव मदत केली नाही. परिणामी संग्रहालयाची वाढ जलद गतीने झाली नाही. विविध पौराणिक वस्तूंचे संग्रहण, नोंदणी, प्रदर्शन या बाबी पाहिजे तेवढ्या प्रमाणात झाल्या नाहीत. असे असले तरी १८५७ पर्यंत या काळात जवळजवळ एक डझन वस्तुसंग्रहालये सुरु करण्यात आली. त्यापैकी काही प्रमुख संग्रहालये पुढीलप्रमाणे.

१) मद्रास येथे मद्रास सोसायटीने सेंट जॉर्ज या ठिकाणी स्थापन केलेले मध्यवर्ती वस्तुसंग्रहालय.

२) सर विल्यम कॅरे, यांनी कलकत्ता यांनी कलकत्ता येथे स्थापन केलेले कॉलेज संग्रहालय.

३) सिंध येथील आयुक्त सर बिलट फरेर यांनी कराची येथे स्थापन केलेले व्हिक्टोरिया वस्तुसंग्रहालय.

४) बॉम्बे सोसायटी यांनी मुंबई येथे स्थापन केलेले टाऊन बॅरॅक्स वस्तुसंग्रहालय.

अशा प्रकारे १८५७ पर्यंत वस्तुसंग्रहालयाचा भारतात विकास झाला. परंतु १८५७ च्या उठावामुळे भारतीय व ईस्ट इंडिया कंपनी यांच्या मध्ये कटूता निर्माण झाली. याचा परिणाम भारतीय वस्तुसंग्रहालय चळवळीवर झाला.

**ब) व्हिक्टोरियन व संरधानिक राज्यातील वस्तुसंग्रहालय चळवळ (१८५७-१८९८)**

१८५८ च्या राणी व्हिक्टोरियाच्या जाहीरनाम्यानंतर भारत हे पूर्णपणे ब्रिटीश अधिपत्याखाली गेले. या कालखंडात ब्रिटिशांनी वस्तुसंग्रहालय, पुराणवस्तु संशोधन व भारतीय संस्कृतीमध्ये रस घेऊन नवीन वस्तु संग्रहालये स्थापन केली. त्याचबरोबर त्यांनी या शास्त्राचा विकास करण्यासाठी भरीव आर्थिक मदत दिली. पुरातत्त्वविद्या, नाणकशास्त्र, आलेख वस्तुसंग्रहालय शास्त्राचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यासाठी १८६१ मध्ये 'पुरातत्त्व सर्वेक्षण' विभागाची स्थापना केली. याच्या पहिल्या महा निर्देशकपदी अलेक्झांडर कनिंगहॅम यांची नियुक्ती केली. त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी उत्खनने केली. याच कालखंडात त्यांना स्तुप, लेणी, पुराणवस्तु अवशेष नाणी सापडली व या सर्व कलात्मक वस्तुंचे जतन करण्यासाठी वस्तुसंग्रहालयाची स्थापना केली. १८७४ मध्ये मधूरा येथे शासकीय वस्तुसंग्रहालये स्थापन करण्यात आले. याठिकाणी मथुरा येथे कलेक्टर ग्रोवस यांच्या प्रयत्नांमुळे अनेक मुर्त्या व कलात्मक वस्तू जमा करण्यात आल्या १८८८ ते १८९८ या

कालखंडात अनेक संग्रहालये राणी व्हिक्टोरिया यांच्या नावाने सुरु करण्यात आले. त्यापैकी मद्रास येथील व्हिक्टोरिया टेक्नीकल इंस्टिट्यूट प्रमुख संग्रहालय होते. या संग्रहालयामध्ये प्रामुख्याने उत्खनात सापडेल्या वस्तुंचा व संशोधनाचा समावेश होता.

याच कालखंडात वस्तुसंग्रहालय उभारणीमध्ये भारतीय विविध संस्थानिकांनी विशेष रस घेतला होता व त्यांनी आपापल्या संस्थानांमध्ये संग्रहालये स्थापन केली. म्हणून भारतातील संग्रहालय चळवळीस उर्जित अवस्था प्राप्त झालेली होती. त्यांच्या प्रयत्नांमुळेच या कालखंडात स्थापन केलेल्या १६ संग्रहालयापैकी ११ संग्रहालये संस्थानिकांनी स्थापन केली. अशी संग्रहालये बहुतांशी 'महाराजा वस्तुसंग्रहालय' म्हणून ओळखली जातात. त्यातील काही संग्रहालये पुढिलप्रमाणे :

१) त्रावणकोरच्या महाराजांनी स्थापन केलेले त्रिवेंद्रम वस्तुसंग्रहालय.

२) म्हैसुरच्या महाराजांनी स्थापन केलेले बंगलोरचे वस्तुसंग्रहालय.

३) जयपूर, राजकोट, उदयपूर, विजयवाडा येथील संस्थानिकांनी बांधलेली वस्तुसंग्रहालये.

**ब्रिटिश अधिकार्यांच्या काळातील वस्तुसंग्रहालयाची चळवळ (१८९९-१९२८):**

या कालखंडाची सुरुवात लॉर्ड कर्झनच्या (१८९९-१९०५) कारकिर्दीपासून होते. त्यांची व्हाईसरॉय पदी नेमणूक झाल्यानंतर त्यांनी भारतीय संस्कृती, कला व स्थापत्या मध्ये रस घेऊन भारतीय स्मारकाच्या संरक्षणासाठी प्रयत्न सुरु केले. त्यांनी पुरातन सर्वेक्षण विभाग' या खात्यांचा विस्तार केला. १९०२ मध्ये सर जॉन मार्शल यांची पुरातत्व खात्यांचे महानिर्देशक म्हणून नेमणूक करुन भारतातील प्राचीन ऐतिहासिक स्मारकांचे सर्वेक्षण करण्यासाठी संस्था स्थापन केली. त्यांच्याच कारकिर्दीत सिंधू संस्कृतीचा शोध लागला आणि या संस्कृतीच्या महत्त्वाच्या स्थळांचे उत्खनन करण्यात आले. या कालखंडात बऱ्याच महत्त्वाच्या लेणी, मंदिरे, स्तुपे, अवशेष, स्थळे, मुर्त्या, आलेख इत्यादींचा शोध लागला. जेव्हा लॉर्ड कर्झनने इ.स. १९०० मध्ये ताजमहालला भेट दिली तेव्हा तो ते शिल्पवैभव पाहून भारावून गेला. परंतु त्यावेळस ताजमहालची वाईट स्थिती पाहून दु:खी झाला. म्हणून त्यांनी या सर्व लेणी, शिल्पवैभव, स्मारक इत्यादींचे संरक्षण करण्याचा निर्णय घेतला. आणि. इ.स.१९०४ मध्ये 'प्राचीन भारतीय स्मारक संरक्षण कायदा' पास केला. स्मारकाची कोणत्याही प्रकारची हानी करणाऱ्यास कायदेशीर कारवाई म्हणजे दंड किंवा कैद यांची तरतूद या कायद्यात केली होती, लॉर्ड कर्झनच्या कारकिर्दीतच मुंबई येथील लष्करी केद्रांचे रुपांतर वस्तुसंग्रहालयात करण्यात आले आणि त्याचे नावं 'प्रिन्स ऑफ वेल्स वस्तुसंग्रहालय' असे देण्यात आले. आता त्यास 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय' या नावाने ओळखले जाते. १९०६ मध्ये कलकत्ता येथे व्हिक्टोरिया स्मारक संग्रहालयाची स्थापना झाल्याने लॉर्ड कर्झनने उराशी बाळगलेली स्वप्न साकार झाले व त्याचे उद्घाटन १९२१ मध्ये झाले.

याच कालखंडात अनेक वस्तुसंग्रहालये स्थापन झाले त्यातील काही पुढिलप्रमाणे-

१) बारीपाड्याचे वस्तुसंग्रहालय (१९०३)

२) सारनाथचे वस्तुसंग्रहालय (१९०४)

३) आग्राचे वस्तुसंग्रहालय (१९०६)

४) चानरबाचे वस्तुसंग्रहालय (१९०८)

५) दिल्ली किल्यातील वस्तुसंग्रहालय (१९०९)

६) ग्वाल्हेरचे वस्तुसंग्रहालय (१९१०)

७) बिजापुरचे वस्तुसंग्रहालय (१९१२)

८) ग्वाल्हेरचे पुरातत्त्व वस्तुसंग्रहालय (१९२२)

९) लाहोरचे वस्तुसंग्रहालय (१९२८)

**ड) संग्रहालयाच्या चळवळीतील जनतेचा सहभाग ( १९२८ ते १९४७):**

या कालखंडात भारतामध्ये स्वातंत्र्य चळवळ जोरात होती. मात्र संग्रहालय चळवळीचा विकासही जोरात होता. या स्वातंत्र्य चळवळीच्या वेळेतसुद्धा अनेक वस्तुसंग्रहालये स्थापन झाले. या चळवळीत सरकारचा प्रत्यक्ष सहभाग तर होताच परंतु त्याचबरोबर भारतीय संघराज्ये संस्थानिक, स्थानिक स्वराज्य संस्था, विद्वतसंस्था, शिकलेला समाज व महत्त्वाच्या व्यक्ति यांनीसुद्धा या वस्तुसंग्रहालय चळीवळीत मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले.

या कालखंडात मारच्वाम यांची 'ब्रिटिश म्युझियम असोशिएशनच्या' सचिवपदी  हारग्रिव्हज यांची 'भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण' विभागाच्या महानिर्देशकपदी नियुक्ती करण्यात आली. या काळात त्यांच्या व जनतेच्या प्रयत्नाने संपूर्ण भारतामध्ये जवळजवळ १०५ संग्रहालये स्थापन करण्यात आली. मास्खाम आणि हारग्रिव्हज यांनी या सर्व संग्रहालयांचे निरीक्षण करुन एक अहवाल तयार केला. त्यात त्यांनी संग्रहालयाचे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवले जात नाही, संग्रहालयाचे अभिरक्षक प्रशिक्षित नाहीत, फंडाची टंचाई असे निष्कर्ष काढले.

या कालखंडात अनेक संग्रहालये स्थापन झाले त्यातील काही प्रमूख पुढिलप्रमाणे.

१) तक्षशिला वस्तुसंग्रहालय, पंजाब (१९२८)

२) सातारा येथील ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय (१९३०)

३) धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळ (१९३२)

४) श्री चित्रालयम वस्तुसंग्रहालय, त्रिवेंद्रम (१९३४)

५) मंदिर वस्तुसंग्रहालय, श्रीरंगपट्टणम (१९३५)

६) राज-राजा चोळ वस्तुसंग्रहालय, तंजावर (१९३५)

७) राज्य वस्तुसंग्रहालय, गुवाहाटी (१९४०)

तथापी याच कालखंडात १९३९ ते १९४५ या काळात दुसऱ्या महायुद्धामुळे वस्तुसंग्रहालय चळवळीचा विकास थोड्याप्रमाणात थांबला. परंतु मॉर्टीनर व्हिलर यांच्या पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या महानिर्देशकपदी (१९४४-१९४८) नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी या शास्त्राच्या विकासासाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नामुळेच या चळवळीचे पुनरुज्जीवन झाले व त्यांनी स्थळ संग्रहालये ही संग्रहालयाची स्वतंत्र शाखा सुरु केली.

**इ) स्वतंत्र भारतातील वस्तुसंग्रहालयाची चळवळ (१९४७ नंतर...):**

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर भारतीय राज्यघटनेप्रमाणे वस्तुसंग्रहालये ही राज्याच्या अखत्यारीत आली. परिणामी जी संग्रहालये सुरुवातीपासून केंद्र सरकारच्या नियंत्रणात होती ती संग्रहालये सोडून बाकी सर्व संग्रहालये ही राज्य सरकारच्या अखत्यारित आली. परंतु वस्तुसंग्रहालयाच्या चांगल्या संरक्षणासाठी व नियंत्रणासाठी खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात आले.

अ) सरकारी नियंत्रणाखाली असलेली वस्तुसंग्रहालये:

१) राष्ट्रीय स्तर

२) राज्य स्तर

ब) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या नियंत्रणाखाली असलेली वस्तुसंग्रहालये.

क) स्वायत्त संस्थानी चालविलेली वस्तुसंग्रहालये.

ड) व्यक्तिगत मालकीची वस्तुसंग्रहालये

इ) विद्यापीठांची वस्तुसंग्रहालये.

स्वातंत्र्योत्तर काळात अनेक विद्यापीठात प्रथमच वस्तुसंग्रहालयशास्त्र या विषयाचा समावेश करण्यात आला. पुरातत्त्वशास्त्राला जोडविषय म्हणून हा विषय शिकविण्यात येऊ लागला. बडोदा, कलकत्ता व दिल्ली येथे या विषयाचा वेगळा अभ्यासक्रम तयार करण्यात आला. ज्यात वस्तुची मांडणी, आवश्यक प्रकाशयोजना, व एकंदरीत व्यवस्थापन इत्यादी बाबी शिकवल्या जाऊ लागल्या. लोकशिक्षण साधणाऱ्या प्रवृत्तीला स्वतंत्र भारतात चालना मिळाली. बहुजन समाजाला शिक्षण देण्याची भूमिका वस्तुसंग्रहालयाची झाल्यामुळे त्यांची विभागणी वेगवेगळ्या प्रकारामध्ये झाली.
उदा. ग्रामीण वस्तुसंग्रहालये, शहरी वस्तुसंग्रहालये इत्यादी.

स्वातंत्र्योत्तर काळात वस्तुसंग्रहालयाच्या एका नव्या पर्वाला सुरुवात झाली. एक मोठा बदल घडून आला तो म्हणजे संख्यात्मक वाढीपेक्षा संग्रहालयाची गुणात्मक वाढ होऊ लागली. युरोप व अमेरिका या देशात जाऊन वस्तुसंग्रहालय शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी हुशार व होतकरु विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या देण्यात येऊ लागल्या.वस्तुसंग्रह संस्थांच्या संघटना, शासकीय व निमशासकीय संस्था मध्यवर्ती सल्लागार मंडळे यांच्या सभा, संमेलने परिषदा चर्चा कार्यशाळा ठराविक अंतराने भरविण्यात येऊ लागली व तज्ञांच्या विचारांची देवणघेवाण होऊ लागली. १९६५ मध्ये दिल्ली येथे पहिल्यांदाच जागतिक वस्तुसंग्रहालय

मंडळाचे संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यास जागतिक कीर्तीचे वस्तुसंग्रहालय शास्त्रज्ञ, तज्ञ व अभिरक्षक उपस्थित होते. अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तर काळात वस्तुसंग्रहालयाच्या चळवळीचा विकास झाला.

आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीचा कला व स्थापत्यांचे अवशेष व कालप्रवाहात मागे घडणाऱ्या आधुनिक गोष्टींचे जतन करुन ठेवण्याची चळवळ प्राचीन काळी सुरु झाली व तिचा विस्तार ब्रिटिश कालखंडात झाला. आपला सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे व त्याचा सार्थ अभिमान बाळगण्याचे कार्य पुढे प्रत्येक भारतीयांनी केले. त्यामुळे स्वातंत्रोत्तर कालखंडात सरकारबरोबरच प्रत्येक व्यंक्तिनीसुद्धा ही चळवळ वेगाने सुरु ठेवली. श्री. एच. सरकार असे म्हणतात कि, "इतिहासाने दिलेला निर्विवाद धडा हा आहे कि सांस्कृतिक व सामाजिक पुनरुत्थान करण्यामध्ये नुसत्या सरकारचा नव्हे तर लोकांचा पुढाकार असला पाहिजे."

**आपली प्रगती तपासा :**

प्र. भारतातील वस्तुसंग्रहालय चळवळीचा इतिहास थोडक्यात सांगा.

## १.५ वस्तुसंग्रहालयाचे प्रकार

वस्तुसंग्रहालय हे लोकशिक्षणाची महत्वाची केंद्रे मानली जातात. मानवाने केलेल्या प्रगतीचा पुरावा म्हणून वस्तुसंग्रहालये हे लोकशिक्षणाचे एक प्रभावी माध्यम आहे. आधुनिक काळात वस्तुसंग्रहालयाची भूमिका बदललेली दिसून येते. संग्रहालयांच्या उपयोगावरून समाजातील सर्व थरांतील लोकासाठी विविध प्रकारचे वस्तुसंग्रहालय देशाच्या कानाकोपऱ्यात अस्तीत्वात आले आहे. लोकांच्या दृष्टीकोनातून व त्यांच्या आवडी निवडीनुसार वस्तुसंग्रहालयाचे विविध प्रकार पडतात. श्री. विटलीन आल्मा यांच्या मते वस्तुसंग्रहालयाचे पुढील तीन प्रकार सांगता येतील.

१) विद्यार्थ्यांसाठी वस्तुसंग्रहालये

२) सर्वसाधारण जनतेसाठी वस्तुसंग्रहालये

३) लहानमुलांसाठी वस्तुसंग्रहालये

या वरील तीन प्रकारांना अनुसरुन वस्तुसंग्रहालयाचे पुढील प्रमाणे प्रकार करता येतील.

**१) पुरातत्त्व वस्तुसंग्रहालये:**

१७८४ मध्ये कलकत्ता येथे 'ऐशियाटीक सोसायटी ऑफ बंगालची' स्थापना करण्यात आली. या सोसायटीच्या माध्यमातून संपूर्ण भारतामध्ये महत्त्वाच्या स्थळाचे उत्खनन करण्यात आले. यामुळे प्राचीन भारतातील पुराणवस्तुंच्या माध्यमातून विविध संस्कृत्यांचा शोध लागला. पुरातत्त्वीय उत्खननातून प्राचीन काळातील कला स्थापत्य आणि मानवाच्या जीवनातील विकासाच्या टप्प्यांची मौलीक माहिती उपलब्ध झाली. याचा उपयोग अश्मयुग व इतिहासपूर्व कालखंडाच्या अभ्यासासाठी झाला. म्हणूनच भारतीय वस्तुसंग्रहालय चळवळीमध्ये या पुरातत्वीय अवशेषांचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. याच काळात सर जॉन

मार्शल यांनी पहिल्यांदा 'साईट म्युझियम' सुरू केले. या म्युझियममध्ये उत्खननात सापडलेल्या सर्व अवशेषांचा समावेश करण्यात आला.

उदा. अश्म, प्राण्यांची हाडे, मातींची भांडी, खापरे, नाणी, कलात्मक वस्तु, अवजारे, उपकरणे, विविध भाषेतील हस्तालिखिते, सांगाडे, बाँझच्या वस्तु इ.

लॉड कर्झन च्या काळात (१८९९-१९०५) या प्रकारच्या संग्रहालयाचा पाया बळकट करण्यात आला. याठिकाणी देशाच्या ऐतिहासीक व सांस्कृतिक वारसांचे जतन करण्यात आले. अशा प्रकारच्या संग्रहालयाचे अनेक उपविभाग निर्माण करण्यात आले. पुरातत्त्वसंग्रहालये आपणास लोथल, डेक्कन कॉलज, पुणे मथुरा येथील आर्किऑलॉजिकल म्युझियम, नालंदा, विजापूर इ. ठिकाणी सापडतात.

**२) नैसर्गिक इतिहास विषयक वस्तुसंग्रहालये:**

या प्रकारच्या वस्तुसंग्रहालयामध्ये दूर्मिळ वनस्पती व विशिष्ट प्रकारच्या प्राण्यांचा संग्रह जतन करुन ठेवले जातात. विविध देशातील पक्षी व प्राणी यांच्या संग्रहास शैक्षणिक दृष्टीकोनातून अनन्य साधारण महत्त्व आहे. अशा प्रकारची वस्तुसंग्रहालये लहान मुलांना आवडतात. अशा संग्रहालयातून आपणास प्राण्यांची व मानवाची उत्क्रांती कशा प्रकारे झाली याची माहिती मिळते. या प्रकारच्या म्यूझियम मध्ये पक्षी व प्राण्यांच्या हुबेहुब प्रतिकृती आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने व रंगीत फोटोग्राफीच्या माध्यमातून आकर्षक पद्धतीने मांडले जाते. यामुळे प्रेक्षकांना मुळ नमून्यांचा चांगल्या प्रकारे अभ्यास करता येतो.

दार्जिलिंगचे म्युझियम व सात अन्य महाविद्यालयीन म्युझियम केवळ निसर्ग इतिहासाला वाहीलेली आहेत. यातील काही वस्तुसंग्रहालये निसर्ग शिक्षणाचा कार्यक्रम नियमीतपणे राबवतात व त्यातून लोकांना आपल्या परिसराचे निसर्गाचे, प्राणी व पक्षांचे शिक्षण देतात. अशा प्रकारची म्युझियम आपणास दार्जिलिंग व मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या तळ मजल्याच्या आवारात आढळतात.

**कला व हस्तकलांची वस्तुसंग्रहालये:**

प्राचीन काळापासून भारतामध्ये कला व हस्त उद्योगांचा विकास झालेला दिसून येतो. व या सांस्कृतिक वारसाचे जतन कला व हस्तकलांच्या वस्तुसंग्रहालयात करतात. या वस्तुसंग्रहालयाचा एकमेव उद्देश म्हणजे आपल्या विविध कला, भारतीय चित्रांचा अमुल्य ठेवा, मातीच्या भांड्यावरील कला, लाकडावरील कोरीव काम, हस्तीदंताच्या कलाकृती, धातू काम, धातूवरील चढवीलेल्या मुलाम्यांची कामे, मूर्तिकला, विविध प्रकारच्या मणी, अलंकार इत्यादींचा ठेवा जमवीणे व त्यांचे प्रदर्शन करणे हा होय. भारताच्या वैभवशाली सांस्कृतिक इतिहासामध्ये अशा प्रकारची कलाकुसर व सौंदर्यसाधने मोठ्या प्रमाणात सापडतात व त्यांचे जतन व प्रदर्शन कला व हस्तकलांच्या संग्रहाच्या माध्यमांतून केले जाते. उदा. हैदराबाद येथील सालारजंग वस्तुसंग्रहालय, जयपूर येथील लाखेवरील काम केलेले वस्तुसंग्रहालय, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट (नवी दिल्ली) कलकत्ता येथील आशूतोष म्युझियम ऑफ इंडियन आर्ट जम्मु येथील डोग्रा आर्ट गॅलरी इ. बडोदा येथील संग्रहालयातून व चित्र गॅलरीतून आपणास पश्चिमेकडील चित्रांचे उत्कृष्ट नमुने पहावयास मिळतात. कलकत्ता येथील व्हिक्टोरीया मेमोरीयल संग्रहालयात ब्रिटीश कलाकुसरीच्या

कलेची माहिती मिळते. त्रिवेंद्रमच्या संग्रहालयात अजिंठ्याच्या चित्र कलेतील नमुने पहावयास मिळतात. तसेच छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (प्रिंस ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई) येथे चित्रकलांची व विविध कलाकुसरींच्या वस्तुंची दालने आहेत.

कला व हस्तकला वस्तुसंग्रहालयाचा उत्तम नमुना म्हणजे मुंबई येथील डॉ. भानुदाजी लाड म्युझियम होय. दिल्ली येथील क्राफ्ट म्युझियम व कलकत्ता येथील गुरु-सदय मुझियम हस्तकलेसाठी प्रसिद्ध आहेत.

**४) मानववंशशास्त्रीय वस्तुसंग्रहालय:**

अशा प्रकारच्या वस्तुसंग्रहालयामध्ये मानवाने आपल्या जीवनात कशा प्रकारे प्रगती केली आहे. याचा अभ्यास करता येतो. यामुळे आपणास प्राचीन लोकांच्या सांस्कृतिक कालानुक्रम समजण्यास मदत होते. आदिमानवापासून ते आधुनिक मानवामध्ये रुपांतर होण्याच्या जीवनक्रमाच्या प्रदर्शनाच्या माध्यमातून अभ्यास करता येतो. यामुळे आपणास मानवाची वर्गवारी सामाजिक व सांस्कृतिक गटांमध्ये करता येते. अशा प्रकारच्या वस्तुसंग्रहालयाचा उपयोग पुरातत्त्व शास्त्रज्ञांना मानववंशशास्त्रांचा अभ्यास करण्यासाठी होता.वेगवेगळ्या वन्य जमाती, त्यांची राहणी, त्यांची संगीतसाधने, हत्यारे, दागिने यांचा संग्रह जतन करणे हे भावी पिढीसाठी अत्यावश्यक ठरते. अशा प्रकारच्या संग्रहालयातून मानवाच्या विविध वंशाची माहिती त्यांच्या कवट्या, हाडे, मणका, शवपेट्या, दफनाचे विविध प्रकार यातून मिळते. मानववंशशास्त्रीय वस्तुसंग्रहालये आपणास रांची, लखनऊ, गुवाहाटी, मद्रास, नागपूर, बडोदा व मुंबई येथे सापडतात.

**५) खाजगी किंवा व्यंक्तिच्या नावे काढलेली संग्रहालये:**

खाजगी वस्तुसंग्रहालये भारतामध्ये मोठ्या प्रमाणात स्थापन केलेली आहेत. यांची मालकी खाजगी असली तरी या संग्रहालयाचा उपयोग त्या व्यंक्तिची माहिती मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात होते. अशा प्रकारची वस्तु संग्रहालये भारतांतील महत्त्वाच्या व्यक्तिच्या नावानी मरणोत्तर काढलेली असतात. त्यांचे बऱ्याचवेळेस राष्ट्रीय स्मारक म्हणून गणना केली जाते. भारतात अशा प्रकारच्या संग्रहालयाची सुरुवात स्वातंत्र्योत्तर काळात झालेली दिसून येते. ज्या व्यक्ति एखाद्या क्षेत्रात आदर्श असतात. त्यांच्या वस्तुंचे जतन आणि स्मृती कायम आठवणीत राहाण्यात म्हणून त्यांच्या नावाने संग्रहालये काढली जातात. या संग्रहालयातून त्यांची विचारसरणी, निधर्मवाद व राष्ट्रीय एकात्मता यांना चांगली चालना मिळते.

उदा - गांधी स्मारक निधीतून भारतातल्या वेगवेगळ्या ठिकाणी त्यांचे विचार तत्त्वे, सत्याग्रह, स्वातंत्र्य लढ्यातील योगदान व संदेश यांचा प्रचार करण्यांसाठी अनेक संग्रहालये स्थापन झालेली आहेत. या प्रकारच्या संग्रहालयात नेहरू स्मारक संग्रहालय, नवी दिल्ली, लालबहादूर शास्त्री संग्रहालय दिल्ली, मनीभवन संग्रहालय मुंबई, नेताजी सुभाषचंद्र बोस संग्रहालय, कलकत्ता, छत्रपती शिवाजी संग्रहालय, सातारा, सरदार पटेल संग्रहालय, सुरत, रवींद्रनाथ टागोर संग्रहालय, शांतीनिकेतन, महात्मा गांधी साबरमती आश्रम अहमदाबाद इत्यादींचा समावेश होतो.

**६) नाणकशास्त्र विषयक वस्तुसंग्रहालये :**

भारतामध्ये प्राचीन काळापासून नाणी मोठ्या प्रमाणात वापरात होती इ.स.पू. ६व्या शतकात भारतात सर्वप्रथम चांदीच्या आदम नाण्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत होता. पुढे नाण्यांचा चलन म्हणून सुद्धा वापर सुरु झाला. प्राचीन व मध्ययुगीन काळातील प्रमुख राज्यांनी व घराण्यांनी नाणी जारी केले. ही नाणी सोने, चांदी, ताम्र, कास्य, लोह व शिसे या धातूंची बनविली जात होती. या नाण्यावरुन जारी केलेल्या राजांची माहिती तसेच त्या काळाची विश्वसनीय माहिती मिळते यांचा वापर प्राचीन भारताच्या आर्थिक, राजकिय, धार्मिक, भौगोलिक, सामाजिक इतिहासाच्या अभ्यासासाठी होतो.

भारतातील नाण्यांचा विकास व जगातील इतर महत्त्वाच्या देशातील नाण्यांचा अभ्यास करण्यासाठी ही नाणी वस्तुसंग्रहालयामध्ये जतन करतात. अशाप्रकारचे बरीच वस्तुसंग्रहालये भारतातच सापडतात. त्यामध्ये प्रामुख्याने आर.बी.आय चे नाणीविषयक वस्तुसंग्रहालयाच्या मुंबई, दिनेश मोदी, न्युमिसमॅटीक म्युझियम, मुंबई, आंजनेरी नाशीक येथील नाणक शास्त्र अभ्यास केंद्र इत्यादींचा समावेश होतो .

**७) सामुद्रिक इतिहासविषयक वस्तुसंग्रहालये :**

भारताने प्राचीन काळापासून सामुद्रिक विकासावर लक्ष केंद्रित केलेले होते हे दिसून येते. भारताला मोठा सागरी किनारा लाभलेला आहे आणि या किनाऱ्यावर मोठमोठी व्यापारी केंद्रे अस्तित्वात आहेत. ही बंदरे सुरुवातीपासूनच भारताच्या व्यापार व दळवळणात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. याचे पुरावे प्राचीन वाङ्मयातसुद्धा आढळतात. यामुळे अशा नोंदीचे जतन करण्यासाठी भारतातील नावीक दल तसेच इतर संस्था यांनी सामुद्रिक इतिहासविषयक वस्तुसंग्रहालये स्थापन केलेली आहेत. यामध्ये मॅरीटाईम हिस्टरी म्युझियम, न्हावा शेवा मुंबई यांच्या समावेश होतो.

**८) विज्ञान व तंत्रज्ञान विषयक वस्तुसंग्रहालये :**

स्वातंत्र्यानंतर भारताने विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रात अधिक महत्त्व देऊन भारताचा अवकाश आण्विक, उर्जा, अभियांत्रिकी, शास्त्र इ. क्षेत्रात भरीव प्रगती केली. या क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेण्यासाठी भारतामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानविषयक संग्रहालये स्थापन केलेली आहेत. परंतु अशाप्रकारची संग्रहालये फार खर्चिक असतात. त्यामुळे ती उभारण्यासाठी श्रीमंत उद्योगपतींनी सहकार्य केलेले दिसून येते. छोट्या शहरामध्येच ही चालवून भागत नाही तर लोकशिक्षणासाठी व शास्त्र व तंत्रज्ञान लोकप्रिय करण्यासाठी फिरती पथके कार्यरत ठेवणे आवश्यक ठरते. त्यामुळे सामान्य जनतेलासुद्धा विज्ञान व तंत्रज्ञानाची माहिती मिळाली. भारतामध्ये फिरत्या संग्रहालयाची संकल्पना आज वाढत आहे व अशा प्रकारची जवळजवळ ३० म्युझियम्स आहेत. याचा उद्देश सामान्य लोकांना वैज्ञानिक तत्त्वे व तंत्रज्ञान सोप्या पद्धतीने समजावून सांगणे हा होता. यांची सुरुवात बंगलोर येथील विश्वेश्वर येथील विज्ञान व तंत्रज्ञान म्युझियममधून झाली.

अशा प्रकारच्या वस्तुसंग्रहालयामध्ये कलकत्ता येथील बिर्ला औद्योगिक व तंत्रज्ञानविषय संग्रहालय तसेच मुंबई येथील नेहरु सायन्स सेंटर नवी दिल्ली इंजिनियरींग म्युझियम, नवी

दिल्ली येथील एन. पी. एल. सायन्स म्युझियम, पिलानी येथील सेट्रंल म्युझियम इत्यादींचा समावेश होतो.

**९) शेतीविषयक संग्रहालये :**

भारत हा शेतीप्रधान देश असल्यामुळे भारतातील शेतीचा विकास कशाप्रकारे झाला हे समजावून घेण्यासाठी शेतीविषयक वस्तुसंग्रहालये अत्यंत उपयुक्त आहेत. या प्रकारची वस्तुसंग्रहालयामधून प्राचीन काळामध्ये शेती कशाप्रकारे केली जात होती व पुढे तिचा विकास कशाप्रकारे झाला शेतकर्यांनी कोणत्या प्रकारची बी-बियाणे, अवजारे, उपकरणे, तंत्रज्ञान वापरले याचे ज्ञान मिळते. शेतीविषयक संग्रहालयामध्ये यंत्रे, फुलबाग, रेशीम उत्पादन, पिकांच्या विविध जाती, खते आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित विभाग तंबाखू लागवड, मच्छीमारी, इत्यादींचा समावेश होतो. भारतामध्ये या संग्रहालयाचा उपयोग मोठ्या प्रमाणात सामान्य शेतकऱ्याच्या कल्याणासाठी होतो व त्यांना त्यांच्याच गावात, जिल्ह्यांत, प्रदेशात हे ज्ञान मिळावे यासाठी फिरती संग्रहालये निर्माण केली आहेत. संग्रहालयातील अधिकारी शेतकर्यांना प्रात्यक्षिकाद्वारे शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कशा प्रकारे करावा याचे प्रशिक्षण देतात. कोईमतूर येथे शेतीच्या मातीचे विविध नमुने मोठ्या प्रमाणावर संग्रहित केलेले दिसतात. रेशीम व ज्यूट या व्यवसाय प्रशिक्षणासाठी देखील स्वतंत्र संग्रहालये आहेत. त्यामुळे सर्वसामान्य शेतकर्यांना या उद्योगाच्या उत्पादनाची माहिती मिळते.

**१०) जंगलविषयक संग्रहालये**

भारतामध्ये जंगलाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. जंगलाचा वापर मानवाने स्वत:च्या विकासासाठी कशा प्रकारे केला, त्याचप्रमाणे जंगलाचे हळूहळू मानवी वस्त्यामध्ये रुपांतर कशाप्रकारे झाले याचे ज्ञान जंगलविषयक संग्रहालयातून मिळते. मानवाने प्रागैतिहासिक काळामध्ये त्यानंतर जंगलाचा वापर शिकारीसाठी, रेशीम उत्पादनासाठी तसेच लाकडांचा वापर शेतीसाठी, घरांसाठी व महालांसाठी केला. अशाप्रकारची संग्रहालये भारतामध्ये बऱ्याच ठिकाणी सापडतात. त्यामध्ये प्रामुख्याने फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट म्युझियम डेहरादून, गास, फॉरेस्ट इनिस्ट्यूट म्युझियम, कोईमतूर, फॉरेस्ट स्कूल इन्स्टिट्यूशन म्युझिअम शिवपूरी इत्यादींचा समावेश घेतो.

**११) संगित संग्रहालये :**

आधुनिक भारतामध्ये संगित संग्रहालये हे महत्त्वाचे आकर्षण ठरले आहे. जुन्या काळातील वाद्ये, ग्रामोफोन, जुन्या ध्वनिमुद्रिका, कॅसेटस तबकड्यांचा संग्रह संगित संग्रहालयात सापडतो. यातून हरवलेल्या सुरांचे आधुनिक काळामध्ये जतन करता येते. संगिताशी निगडित असलेल्या रेकॉर्डिंग कॅसेट्स व सीडी यासारख्या वस्तूंचा खजिना अशा प्रकारच्या संग्रहालयात सापडतो. अशा प्रकारच्या संग्रालयातून आपल्या प्राचीन काळापासून ते आधुनिक काळातील वाद्ये, संगितवस्तू व गायकांच्या वेगवेगळ्या रागांची संगिताची माहिती मिळते. उदा. सोलापुर श्रीराम पुजारी संगित संग्रहालय.

**१२) भूगर्भशास्त्रीय वस्तुसंग्रहालये:**

भूगर्भशास्त्र म्हणजे जमिनीच्या खाली असलेल्या सर्वप्रकारच्या वस्तुंचा अभ्यास होय. यामध्ये निरनिराळे खडकांचे नमुने, वाळू, माती, इत्यादींचा समावेश होतो. त्यांच्या नमुन्यांचा संग्रह भुगर्भशास्त्रीय वस्तुसंग्रहालयात केला जातो. याचा उद्देश मानवाला भूगर्भाबद्दल सर्व प्रकारचे ज्ञान उपलब्ध करुन देणे हा आहे. यात भुकंपाचा लाव्हा दगड, पाषाण दगड (मूर्ती), प्राचीन काळातील विविध प्रकारच्या म्हणजेच प्रागैतिहासिक ते ताम्रपाषाण युगीन कालखंडातील उत्खननात सापडलेल्या दगडांचा समावेश होतो. या दगडांच्या आधारेच त्या काळातील मानवांचा अभ्यास करता येतो. अशा प्रकारची वस्तुसंग्रहालये भारतात लखनऊ व दार्जिलिंग येथे आहे. तसेच महाराष्ट्रात नाशिकजवळ गारगोटींचे म्युझियम आहे. या मुझियमध्ये रत्न, खडे अशा मौल्यवान दगडांचासुद्धा समावेश होतो. भुगर्भशास्त्रातील स्तरशास्त्राचा सिद्धांत प्रत्यक्ष उत्खननात विविध काळातील मानवी वसाहतींच्या अभ्यासात अत्यंत उपयुक्त ठरला आहे. अशाप्रकारच्या वस्तुसंग्रहालयामुळे प्राचीन पुरातत्त्वविद्याचे ज्ञान प्राप्त होते.

**१३) बालकांसाठीची वस्तुसंग्रहालये :**

स्वातंत्र्यानंतर संग्रहालय चळवळ भारतातील शाळेतील मुलापर्यंत पोहोचली नाही. ही खेदाची बाब असली तरी आता भारतामध्ये विविध ठिकाणी बालकांसाठी खास वस्तु संग्रहालये निर्माण केली आहेत. ह्या प्रकारच्या म्युझियममध्ये निरनिराळ्या विषयांची माहिती त्या त्या वयोगटातील मुलांना समजावून सांगण्यासाठी वेगवेगळ्या मॉडेल्स, तक्ते, नकाशे, वस्तु वापरल्या जातात तसेच विज्ञान व तंत्रज्ञानाचे ज्ञान लहान मुलांना छोट्या छोट्या गोष्टीतून सांगितले जाते. कारण वस्तुसंग्रहालयाचा मुख्य उद्देश म्हणजे आजच्या पिढीचा वारसा व संस्कृती या पुढच्या पिढींना समजावणे हा असतो. त्यामुळे अशा प्रकारची वस्तुसंग्रहालये लहान मुलांच्या विकासामध्ये व जडणघडणमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. अशाप्रकारची वस्तुसंग्रहालये भारतात अनेक ठिकाणी आढळतात. लखनऊ येथील मोतीलाल नेहरु बालसंग्रहालय नवी दिल्ली येथील बालभवन, अमरेली येथील श्री गिरीशभाई बालसंग्रहालय, मुंबई येथील नेहरु सायन्स सेंटर इत्यादी ठिकाणी बालकांसाठीची संग्रहालये आहेत. या म्युझियममध्ये लहान मुलांसाठी निरनिराळ्या प्रकारच्या कार्यशाळा घेतल्या जातात, भारताच्या प्रगतीच्या व विकासाच्या टप्प्यांचा अभ्यास चांगल्यापद्धतीने शिकविला जातो व यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होतो.

**१४) संरक्षणखात्याची संग्रहालये :**

संरक्षण सेवेतील इतिहासाची साथ देणारी ही संग्रहालये लढाईत वापरलेल्या वस्तुंची आठवण देतात व आपल्या दैदिप्यमान लष्करी कारवायांची आठवण करुन देतात. अशा प्रकारच्या संग्रहालयामध्ये प्रशिक्षणासाठी, लढायांसाठी व संशोधनासाठी वापरलेल्या शाखांचा समावेश होतो. तसेच संग्रहालयात संरक्षण विषयक अनेक गोष्टींचा उदा. युद्धसामुग्री, निरनिराळ्या प्रकारच्या बंदुका, तोफा, रणगाडे, बॉम्ब, तलवारी, दारुगोळा, मिसाईल, क्षेपणास्त्र, हत्यारे इत्यादींची माहिती मिळते. अशी संग्रहालये म्हणजे लोकांसाठी एक चैतन्यमय संख्या असते. त्यातून लोकांध्ये आपल्या संरक्षणाविषयी माहिती मिळते. तसेच देशाप्रेमाविषयी भावनाही चेतावली जाते. देशरक्षणासाठी ज्यांनी आपल्या प्राणांचे

बलिदान केले आहे अशा हुतात्म्यानांही ती एक मानवंदना ठरते. अशा प्रकारची संग्रहालये ही आकर्षणाची प्रमुख केद्रें आहेत. यामध्ये नावीकदल, वायुसेना व जलसेना या दलातील शस्त्रास्त्रांची माहिती मिळते. युद्धामध्ये वापरलेला शस्त्रास्त्रांच्या प्रदर्शनामुळे त्या आठवणी पुन्हा नव्याने जाग्या होतात व नागरिकांमध्ये राष्ट्राभिमान निर्माण करतात. अशा प्रकारची संग्रहालये खडकवासला (पुणे) येथील नॅशनल डिफेन्स ॲकडमी, दिल्ली येथील एअर फोर्स वस्तुसंग्रहालये व दार्जिलिंग येथे आढळतात.

**१५) आरोग्य व शरीरशास्त्रविषय संग्रहालये :**

लोकशिक्षण हे वस्तुसंग्रहालयाचे प्रमुख उद्देश आहे. यामुळेच भारतामध्ये मोठ्या प्रमाणात आपल्याला आरोग्य व शरीरशास्त्रविषयक संग्रहालये सापडतात. याचे फिरते प्रदर्शनसुद्धा खेडोपाड्यामध्ये व ग्रामीण भागामध्ये भरविले जाते. त्यामुळे ग्रामीण जनतेला मूलभूत स्वच्छता, विविध प्रकारचे आजार, व त्यावरील उपाय, लसीकरण, विविध प्रकारची औषधे, शास्त्रज्ञ व त्यांनी शोधलेल्या लसी व औषधे, कुटुंबनियोजन इत्यादींची माहिती मिळते. अशा प्रकारच्या संग्रहालयामुळे ग्रामीण जनतेचे अज्ञान, अंधश्रद्धा दूर होतात. उघडी व फिरती संग्रहालये सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचतात व त्यांच्या आरोग्यासाठी मदत देत असतात. त्यामुळे अशाप्रकारच्या संग्रहालयाचे महत्त्व वाढलेले आहे. अशा प्रकारच्या वस्तुसंग्रहालयामध्ये प्रामुख्याने लखनऊ येथील प्रॉव्हिन्शियल दायलिन इंस्टिट्यूट म्यूझियम, बडोदा येथील हेल्थ म्युझियम, गुवाहाटी येथील मेडिकल कॉलेज म्युझियम, नवी दिल्ली येथील लेडी हर्डिग्ज कॉलेज म्युझियम, गुंतुर येथील मेडिकल कॉलेज म्युझियम तसेच मद्रास येथील स्टैन्ले कॉलेज म्युझियम इत्यादींचा समावेश घेतो.

**१६) मंदिर संग्रहालये :**

प्राचीन काळापासूनच भारताची संस्कृती ही विविधतेने नटलेली आहे. या संस्कृतीमधील कला व स्थापत्य हा घटक खूप महत्त्वाचा आहे. जगातील प्रसिद्ध कलाकृती या मंदिराच्या स्वरुपाने भारतात निर्मिल्या आहेत. वस्तुत: सुरुवातीच्या मंदिरानांच संग्रहालयाचे रुपांतर देण्यात आले होते. कारण याठिकाणी विविध पवित्र वस्तुंचा संग्रह केला जात होता. भारतामध्ये उत्तर भारतापासून ते दक्षिण भारतापर्यंत हजारो प्राचीन मंदिरे सापडतात. या मंदिरातून प्राचीन काळातील मुर्तीकला, स्थापत्य मंदिररचना, देवदेवता यांच्या विषयी भरपूर माहिती मिळते. याचा विकास मध्ययुगीन तसेच आधुनिक कालखंडात सुद्धा झालेला दिसून येतो. त्यामुळेच भारतातील काही मंदिरांना युनेस्कोने 'जागतिक वारसा' म्हणून घोषीत केला आहे. अशा प्रकारच्या संग्रहालयात तिरुपती येथील श्री व्यंकटेश्वर म्युझियम,बिर्ला मंदिर म्युझियम, भोपाळ, मदुराई येथील मिनाक्षी टेंपल म्युझियम इत्यादींचा समावेश होतो.

संग्रहालयाच्या वरील प्रकाराशिवाय भारतामध्ये रोगनिदान वस्त्रोद्योग, काच तंत्रज्ञान, पुस्तके, कार्डे, तिकिटे अशा वैशिष्ट्यपूर्ण विषयांना वाहून घेणारी संग्रहालये सुद्धा अस्तित्वात आहेत. यामुळे संग्रहालये लोकशिक्षणाचे कार्य चांगल्या पद्धतीने करत आहेत. त्याच प्रमाणे वरील प्रकारावरुन संग्रहालयाच्या वाढलेल्या व्याप्तींची सुद्धा माहिती मिळते. डॉ. सत्यप्रकाश यांच्या मते, संग्रहालये ही लोकशाही बळकट करण्यासाठी प्रभावी लोकशिक्षणाचे काम करतात. त्यांच्या मते, संग्रहालयाचे प्रकार हे विद्यार्थ्यांच्या सोयीकरीता

करावेत. आजच्या काळातील संग्रहालये ही खूप विविध प्रकारामध्ये विभागलेली आहेत असे वरील विवेचनावरून दिसून येते.

**आपली प्रगती तपासा**

प्र. वस्तु संग्रहालयांचे विविध प्रकार सांगा

## १.६ सारांश

अशा प्रकारे लोकशिक्षणाचे एक प्रमुख केंद्र म्हणून वस्तुसंग्रहालयाकडे पाहिले जाते. त्यांचे विविध प्रकार खऱ्याअर्थाने लोकांसाठी केलेले दिसून येतात. वस्तुसंग्रहालय चळवळ आता प्रभावी चळवळ झालेली आहे. लोकांच्या मनोरंजनासाठी व भारतीय संस्कृतीच्या विविध छटांचा अभ्यास करण्यासाठी वस्तुसंग्रहालये खूप उपयोगी पडतात. भारताच्या विविध क्षेत्रातील प्रगतीचा आढावा तसेच भारताचे प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत विविध क्षेत्रातील योगदानाची माहिती वस्तुसंग्रहालयामुळेच मिळते. म्हणून संग्रहालये सांस्कृतिकदृष्ट्या खूप महत्त्वाची मानली जातात.

## १.७ प्रश्न

प्र.१) वस्तुसंग्रहालय म्हणजे काय ? वस्तुसंग्रहालयाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

प्र.२) भारतातील वस्तुसंग्रहालय चळवळीच्या इतिहासावर सविस्तर टीप लिहा.

प्र.३) वस्तुसंग्रहालयाची व्याख्या करा. वस्तुसंग्रहालयाचे प्रकार सांगा.

प्र.४) टीपा लिहा

अ) वस्तुसंग्रहालय चळवळीचा इतिहास.

ब) वस्तुसंग्रहालयाचे प्रकार.

## १.८ संदर्भ


1. ThoratB.R., Principles of Museology, Archaeology, Archival &Library Science, Himalaya Publishing House, Mumbai-4
2. Banerjee, N. R., Museum and Cultural Heritage of India, Agam Kala Prakashan, New Delhi, 1990.
3. Dwivedi V.P, Museums and Museology: New Horizons, Agam Kala Prakashan, New Delhi, 1980.
4. Markham S. F., The Museums of India, The Museum Association, London, 1936.
5. Plenderleith H. J, The Conservation of Antiquities and Works of Art: Treatment, Repair and Restoration, Oxford University Press, New York, 1956.

6. Sarkar, H, Museums and Protection of Monuments and Antiquities in India, Sundeep Prakashan, New Delhi, 1981.

7. Thomson John M.A. and Others, Manual of Curatorship: A Guide to Museum Practice, Routledge, New York, 1984.

8. Wittlin Alma, Museums : Its History and Its Tasks in Education, Routledge and K Paul, London, 1949.

9. प्रा. डॉ. निशांत शेंडे, वस्तुसंग्रहालये , अथर्व पब्लिकेशन

10. कठारे अनिल , पाटील गौतम, पुरातत्वविद्या वस्तुसंग्रहालय आणि पर्यटन, विद्या बुक्स, औरंगाबाद.

11. देव शा. भा. , पुरातत्वविद्या

❖❖❖❖

# २

## अभिरक्षकाची भूमिका व कर्तव्ये

**घटक रचना :**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ वस्तुसंग्रहालयाचे वर्गीकरण

२.३ अभिरक्षकाची किंवा व्यवस्थापकाची भूमिका

२.४ अभिरक्षकाचे प्रशिक्षण व मूलभूत पात्रता

२.५ अभिरक्षकाच्या जबाबदाऱ्या किंवा कर्तव्ये

२.५.१ वस्तुसंग्रह करणे

२.५.२ वस्तुंच्या नोंदी ठेवणे

२.५.३ वस्तुंचे जतन व संवर्धन करणे.

२.५.४ वस्तुंचे प्रदर्शन

२.५.५ नैतिकता, तत्वनिष्ठा व एकात्मता

२.५.६ सहकार्यांबरोबरील संबंध

२.५.७ समाजाबरोबरचे संबंध

२.५.८ संशोधन कार्य

२.६ वस्तुसंग्रहालयाच्या व्यवस्थापनाच्या कार्यातील शासनाची भूमिका

२.७ सारांश

२.९ प्रश्न

२.१० संदर्भ

## २.० उद्दिष्ट्ये

१) वस्तुसंग्रहालयाच्या वर्गीकरणाचा अभ्यास करणे.

२) अभिरक्षकाची पात्रता जाणून घेणे.

३) अभिरक्षकाची कर्तव्ये किंवा जबाबदाऱ्या कोणत्या आहेत ते समजून घेणे.

४) वस्तुसंग्रहालयाच्या व्यवस्थापनाच्या कार्यातील शासनाची भूमिका अभ्यासणे.

## २.१ प्रस्तावना

भारत स्वतंत्र झाल्यानंतर वस्तुसंग्रहालयाकडे अधिक लक्ष देण्यात आले. प्राचिन भारतीय संस्कृती व त्याचा वारसा जपण्याच्या दृष्टिकोनातून वस्तुसंग्रहालयास अधिक महत्त्व देण्यात आले. त्यास लोकशिक्षणाचे एक प्रभावी माध्यम मानण्यात आले. त्यामुळे वस्तुसंग्रहालयाच्या योग्य नियंत्रणासाठी त्यांचे वर्गीकरण करण्यात आले. या सर्व वस्तुसंग्रहालयाची काळजी व निगा घेण्यासाठी प्रशिक्षित अभिरक्षकाची नेमणूक करण्यात आली. संग्रहालय अभिरक्षकास विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. शासनानेसुद्धा वस्तुसंग्रहालयाच्या योग्य व्यवस्थापनासाठी वेळोवेळी महत्त्वाची पावले उचलली आहेत. त्यामुळे आजच्या काळात वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व अधिक वाढलेले आहे असे दिसून येते.

## २.२ वस्तुसंग्रहालयाचे वर्गीकरण

१९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर वस्तुसंग्रहालयाची जबाबदारी पूर्णपणे भारतीयांवर आली. भारतीय संविधानानुसार वस्तुसंग्रहालये हा विषय राज्याच्या अखत्यारीत आला. सुरूवातीला स्थापन झालेली वस्तुसंग्रहालये केंद्र सरकारच्या नियंत्रणात व इतर संग्रहालये राज्य सरकारच्या अखत्यारीत आली. संग्रहालयांच्या योग्य नियंत्रणासाठी खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले.

अ) सरकारी नियंत्रणाखाली असलेली वस्तुसंग्रहालये

१) राष्ट्रीय पातळीवरील

२) राज्य पातळीवरील

ब) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियंत्रणाखाली असलेली वस्तुसंग्रहालये

क) स्वायत्त संस्थानी चालविलेली वस्तुसंग्रहालये

ड) व्यक्तिगत मालकीची वस्तुसंग्रहालये

इ) विद्यापीठांची वस्तुसंग्रहालये.

पुढील पानावरील तक्त्याद्वारे वस्तुसंग्रहालयाचे वर्गीकरण उदाहरणासहित अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट होईल.

**आपली प्रगती तपासा**

प्र. वस्तुसंग्रहालयाचे वर्गीकरण कशाप्रकारे करतात ते सांगा.

## २.३ अभिरक्षकांची किंवा व्यवस्थापकाची भूमिका

वस्तुसंग्रहालयात अभिरक्षकाची किंवा व्यवस्थापकाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. कोणत्याही वस्तुसंग्रहालाचे यश पूर्णत: आभिरक्षकांवर अवलंबून असते. वस्तुसंग्रहालय पूर्णत: अभिरक्षकाच्या ताब्यात असते. तेव्हा वस्तुसंग्रहालयाचे यशापयश व कलात्मकताही पूर्णत: अभिरक्षकाच्या योग्यतेवर आधारित असते. भुतकाळातील वारसा सांगणारी साधने त्यांची जपणूक करण्यासाठी संग्रहालचे महत्त्वाची असतात. वस्तुंच्या स्वरुपावरुन व त्यातील माहितीच्या आधारे वस्तुसंग्रहालयाची विविध प्रकारे वर्गीकरण करता येते. अशा विविध प्रकारच्या संग्रहालयाची काळजी घेणारा म्हणजे अभिरक्षक होय. वस्तुसंग्रहालयाची जबाबदारी सांभळणाऱ्यास अभिरक्षक किंवा व्यवस्थापक असे म्हटले जाते. या शब्दाची व्युत्पत्ती लॅटिन शब्दापासून झाली आहे. याचा अर्थ पालक किंवा काळजी घेणारा असा होतो. वस्तुसंग्रहालयाच्या आधारे मानवाची कला, संस्कृती, इतिहास, वारसा व त्याचे योगदान त्यांनी मागे ठेवलेल्या दृश्य वस्तुरूपी पुराव्यावरुन समजतो. अशा वस्तुंची काळजी घेणारा म्हणजे अभिरक्षक होय.

अभिरक्षकास वस्तुसंग्रहालयाचा व्यवस्थापक या नात्याने ही ओळखले जाते. त्याच्या नेमणूकीची सुरुवात युरोपमध्ये झाली. त्या वेळस त्यास विविध देशात विविध नावाने ओळखले जात होते. इंग्लंडमध्ये त्यास 'किपर ' (Keeper) तर फ्रान्समध्ये त्यास 'कॉनझरवेटर' (Conservatior) असे संबोधले जात होते. भारतामध्ये सुद्धा व्हॉइसरॉय लॉर्ड रिपनच्या कारकिर्दीत मेजर एच.एच.कोल यांच्या सर्वप्रथम नेमणुकीने अभिरक्षकपदाची सुरुवात झाली. आधुनिक काळात वस्तुंच्या बदलत्या स्वरुपामुळे अभिरक्षकाचे स्वरुपही बदलेले दिसून येते. विविध व्यवस्थापकाच्या नावामध्ये भिन्नता आढळत असली तरी संग्रहालयाच्या बाबतीत ती व्यक्ती संपूर्ण संग्रहालयाची प्रमुख असते. संपूर्ण संग्रहालयाचे भवितव्य, त्यांचे यशापयश पुर्णत: ती स्त्री असो वा पुरुष असो, त्या व्यक्तिच्या व्यक्तिमत्वावर, क्षमतेवर व पात्रतेवर अवलंबून असते. कारण संग्रहालयाचे प्रमुख या नात्याने त्यास अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यासाठी त्यांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी स्विकारण्याची तयारी, प्रशासकीय कौशल्य, त्यागी व समंजस वृत्ती व या क्षेत्रातील कुशलता अधिक महत्त्वाची असते म्हणूनच अभिरक्षकाला वस्तुसंग्रहालयाचा पालनकर्ता व 'संरक्षण कर्ता' असे म्हणतात. त्यामुळे अभिरक्षकाची भूमिका छोट्या संग्रहालयापासून ते मोठ्या संग्रहालयाच्या उन्नती व प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

## २.४ अभिरक्षकाचे प्रशिक्षण व मूलभत पात्रता

वस्तुसंग्रहालयाचे यश पूर्णत: अभिरक्षकाच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असते. आधुनिक काळात वस्तुसंग्रहालयाची व्याप्तीही वाढलेली आहे असे दिसून येते. तसेच संग्रहालयाचे विविध प्रकारात वर्गीकरण केले जाते. त्यामुळे वस्तुसंग्रहालयाच्या योग्य व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून अभिरक्षकाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. वस्तुसंग्रहालयाच्या विविध शाखेचे सखोल ज्ञान त्यासाठी लागणारी चिकित्सक वृत्ती व्यवस्थापकास असायला हवी. कारण वस्तुसंग्रहालयाचे यशापयश हे अभिरक्षकाच्या शैक्षणिक पात्रता, त्याचे प्रशिक्षण, विविध विषयांतील ज्ञान, प्रशासकीय कौशल्य, त्याची कलात्मकता, त्यागी वृत्ती, सहकार्याची भावना इत्यादी प्रमुख गोष्टीवर अवलंबून असते.

भारताचे मेजर एच. एच. कोल यांची सर्वप्रथम अभिरक्षक पदी नेमणूक व्हाईसरॉय लॉर्ड रिपन यांनी केली होती. परंतु नंतरच्या काळात संग्रहालयाच्या योग्य व्यवस्थापनाकरिता प्रशिक्षित अभिरक्षकाची नेमणूक करण्याची गरज भासली त्या अनुषंगाने ब्रिटिश कालखंडात वेळोवेळी विविध पावलेही उचलली गेलीत. कारण याच कालखंडात भारतामध्ये विविध ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारची वस्तुसंग्रहालये स्थापन झाली होती.

इ.स. १९०७ मध्ये कलकत्ता येथे झालेल्या पहिल्या अखिल भारतीय वस्तुसंग्रहालय परिषदेत व्यवस्थापकांस योग्य प्रशिक्षण द्यावे असे सुचवण्यात आले होते. परंतु कालांतराने त्यासाठी ठोस उपाययोजना केल्या गेल्या नाहीत. तर पुन्हा इ.स. १९१२ मध्ये झालेल्या दुसऱ्या अखिल भारतीय संग्रहालय परिषदेत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. प्रांतिक वस्तुसंग्रहालयातील विविध शाखेचे ज्ञान तसेच संग्रहालयाचे योग्य नियोजन, प्रदर्शन, वस्तुंचे ज्ञान व योग्य प्रशिक्षण असणाऱ्या व्यंक्तिची नेमणूक संग्रहालयात व्हावयास हवी अशा सुचना या परिषदेत करण्यात आल्या परंतु त्यांच्या अमंलबजावणीसाठी कोणत्या प्रकारच्या योजना आखण्यात आल्या नाहीत. अशीच परिस्थिती पुढे काही काळ कायम राहिली. परंतु पुढे सर मॉर्टिमर व्हिलर यांच्या प्रयत्नामुळे पहिल्यांदा इ.स. १९४४ मध्ये 'इंडियन स्कूल ऑफ फिल्ड आर्कियोलॉजी' या संस्थेच्या माध्यमातून अभिरक्षकास प्रशिक्षण दिले गेले. तसेच इ.स. १९५९ पासून 'वस्तुसंग्रहालयच' या क्षेत्रात पदव्युत्तर शिक्षणाची सोय केली. त्यानंतर हा विषय भारतातील काही विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर पातळीवर सुरू करण्यात आला. बडोदा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठाने इ.स. १९५२ मध्ये सर्वप्रथम या शाखेत कोर्स सुरु केला. त्यामुळे प्रशिक्षित व्यवस्थापक तयार झाले. त्यांच्या मागोमाग कलकत्ता विद्यापीठ, बनारस हिंदू विद्यापीठ, अलिगढ मुस्लिम विद्यापीठ, बिर्ला इंस्टिट्यूट ऑफ सायन्स ॲण्ड टेकनोलॉजी, पिलानी, भोपाळ येथील बिर्ला वस्तुसंग्रहालय इ. यांनी व्यवस्थापकाच्या प्रशिक्षणाचे कोर्सेस विविध पातळीवरील (पदव्युत्तर व पदविका) सुरु केले.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारत सरकारने विविध संस्थाची उभारणी केली व अस्तित्वात असलेल्या संस्थांना मोठ्या प्रमाणात आर्थिक हातभार लावला. प्रांतामधील सरकारनेसुद्धा विविध संस्थांची उभारणी केली. विद्यापीठांनीसुद्धा प्रशिक्षण वर्ग सुरू केले. हुशार विद्यार्थ्यांना वस्तुसंग्रहालयातील प्रगत व अद्ययावत प्रशिक्षण घेण्यासाठी युरोप व अमेरिकेस पाठविले. इ.स. १९६४ मध्ये युनेस्कोने भारतातील वस्तुसंग्रहालयाचा अभ्यास व स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी श्री रावसन यांस पाठविले होते.

इ.स. १९६५ मध्ये पहिल्यांदा दिल्ली येथे वस्तुसंग्रहालयावर आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यात आली व त्यास जगभरातील प्रसिद्ध संग्रहालयशास्त्रज्ञ हजर होते.

इ.स. १९७९ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून दिल्ली येथील राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाने एक कार्यशाळा आयोजित केली होती. त्यामध्ये व्यवस्थापकाचे अद्ययावत प्रशिक्षण संग्रहालयाची बदलती भूमिका व शैक्षणिक महत्त्व या विषयांवर अधिक लक्ष देण्याची सुचना केली होती. आज प्रशिक्षणाचे अनेक अभ्यासक्रम सुरु झालेले आहेत. त्यामुळे योग्य प्रशिक्षण घेतलेल्या व्यंक्तिची नेमणूक संग्रहालायमध्ये होत आहे. त्यामुळे वस्तुसंग्रहालायाची भूमिकाही बदललेली दिसून येत आहे. ही केंद्रे आता लोकशिक्षणाची प्रमुख केंद्र म्हणून उदयास आलेली आहेत. याचे सर्व श्रेय व्यवस्थापकांनाच द्यावे लागेल.

**अभिरक्षकाच्या मूलभूत पात्रता पुढीलप्रमाणे**

अ) अभिरक्षक हा कला किंवा विज्ञानाच्या क्षेत्रातील पदव्यूत्तर असावा. विशेषत: पुरातत्त्वविद्या, मानववंशशास्त्र आणि कला या विषयांना प्राधान्य देण्यात यावे.

ब) व्यवस्थापकाचा वस्तुंसग्रहालयशास्त्राची पदवी अथवा पदविका उपयुक्त ठरते.

क) व्यवस्थापकाजवळ प्रशासन कौशल्य असणेही आवश्यक आहे.

ड) वस्तुसंग्रहालयाशी निगडित असलेल्या विषयांपैकी किमान एक किंवा अधिक विषयांचे सखोल ज्ञान असावे.

इ) या व्यतिरिक्त व्यवस्थापकाला आपल्या विषयासंबंधी प्रेम असावे आणि आपल्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान व प्रेम असावे.

अशा प्रकारे वरील पात्रता पूर्ण करण्याऱ्या व्यक्तिला वस्तुसंग्रहालयाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाते. असे प्रशिक्षण घेतलेल्या व्यवस्थापकांमुळेच संग्रहालयाचा विस्तार योग्य पद्धतीने होत आहे व वस्तुसंग्रहालयाचा मूळ उद्देश म्हणजे लोकशिक्षण हा पूर्ण होताना दिसून येत आहे.

## २.५ अभिरक्षकाच्या जबाबदाऱ्या किंवा कर्तव्ये

वस्तुसंग्रहालयाचा प्रमुख म्हणून अभिरक्षकास विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. संग्रहालयाचा पालक म्हणून संग्रहालयाच्या कार्याची दिशा व उद्दिष्टे त्याला निाश्चित करावी लागतात. तसेच वस्तुसंग्रहालयाची व्याप्ती व उद्देश पाहून तसेच वस्तुसंग्रहालयाच्या प्रकारावरुन अभिरक्षकास आपल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. संग्रहालयाचे स्वरुप जितके लहान तितकीच अभिरक्षकाच्या जबाबदारीची व्याप्ती ही प्रचंड असते. कारण अशा छोट्या संग्रहालयाच्या प्रत्येक विभागाविषयी ज्ञान असणे आवश्यक आहे. यासाठी अभिरक्षकास संग्रहालयाच्या विविध प्रकारची व विभागाची माहिती तसेच प्रशिक्षण असणे जरुरीचे आहे.

अभिरक्षकाची भूमिका ही पालकत्वाची असावी. डॉ. बनर्जी ह्यांनी व्यवस्थापकाच्या जबाबदाऱ्या आपल्या पुस्तकात नमूद केल्या आहेत त्या पुढील प्रमाणे.

१) वस्तुसंग्रहालयासाठी कलावस्तु मिळविणे.

२) त्यांची नोंदी करणे.

३) त्या साठवून ठेवणे अथवा प्रदर्शनात ठेवणे.

४) कलावस्तुंचे संवर्धन करणे.

५) कलावस्तुंचा अन्वयार्थ लावण्यासाठी त्यांचा अभ्यास आणि संशोधन करणे.

६) संशोधनाचा अहवाल तसेच संग्रहालयाविषयी माहिती पुस्तके, मार्गदर्शक पुस्तके, छायाचित्रे इत्यादी साहित्य लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करणे.

७) वस्तुसंग्रहालयातील सर्व कलावस्तुंची तालिका म्हणजे यादीपुस्तक प्रसिद्ध करणे, जेणेकरुन संशोधकाना त्यांचा लाभ घेता येईल.

८) कोणत्याही धोक्यापासून कलावस्तूंची हानी न होईल आणि त्या सुरक्षित राहतील यांची काळजी घेणे.

९) संग्रहालयाच्या प्रेक्षकांना त्यातील प्रदर्शन विषयक मार्गदर्शन करणे.

१०) संग्रहालयाच्या प्रशासनाचा भार सांभाळणे.

११) विविध तर्हेच्या प्रदर्शनातून लोकशिक्षण देणे.

अभिरक्षकाची भूमिका पालकासारखी म्हणजे सांभाळकर्ता असावी. पालक ज्याप्रमाणे आपल्या पाल्याबाबत जागृत असतो त्याचप्रमाणे अभिरक्षकाने वस्तूंच्या संवर्धनासंबंधी जागरुक असावे. अती प्रसंग व मोहाचे क्षण टाळण्यासाठी तो कडक व तत्वनिष्ठ हवा व संग्रहालयात अतीदक्षता घ्यायला हवी. अभिरक्षक हा सर्वसमावेशक वृत्तीचा असणे आवश्यक आहे. म्युझियमचा सर्वांगिण विकास अभिरक्षकावर अवलंबून असतो त्याला आपल्या जबाबदारीची जाणीव हवी. त्याला नेमलेल्या वस्तुसंग्रहालयाच्या प्रकारानुसार वस्तुसंग्रहालयाचा उद्देश व व्याप्ती ठरवावी व आपल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात. त्याच्या जबाबदाऱ्या पुढील प्रमाणे.

१) वस्तुसंग्रह करणे.

२) वस्तुंच्या नोंदी ठेवणे.

३) वस्तूंचे जतन व संवर्धन करणे.

४) वस्तूंचे प्रदर्शन

५) नैतिकता, तत्त्वनिष्ठा, व एकात्मता

६) सहकार्यांबरोबरील संबंध

७) समाजाबरोबचे संबंध

८) संशोधन कार्य

**२.५.१ वस्तुसंग्रह करणे :**

अभिरक्षकाने आपल्या वस्तुसंग्रहालयाची व्याप्ती आणि उद्दिष्ट लक्षात ठेऊन संग्रहालयासाठी वस्तू मिळवल्या पाहीजे. अभिरक्षकाचे वस्तुसंग्रह करणे हे अत्यंत महत्त्वाचे काम मानले जाते. भारतामध्ये प्राचिन कलावस्तूंचा खजिना आहे असे मानले जाते. अशावेळी तारतम्य बुद्धिने वस्तुंचा संग्रह करणे ही अभिरक्षकाची खूप महत्त्वाची जबाबदारी असते. या वस्तु पुराणवस्तु असल्याने लवकर नष्ट होण्याची शक्यता असते. त्यामुळे वस्तुची निवड करताना काळजी घेणे गरजेचे असते. वस्तुंच्या संग्रहाबाबत निश्चित धोरण आखून त्वरित निर्णय घ्यावा कारण वस्तु जमविण्याकरीता अभिरक्षकाचे अंदाज आणि निर्णय हे अत्यंत महत्त्वपूर्ण

ठरतात. वस्तुंचे शाश्वतपण टिकवून त्याचा भावी पिढ्यांकडे वारसा सुपूर्द करण्याची जबाबदारी ही त्याचीच आहे. अभिरक्षकाच्या कौशल्यावर हे अवलंबून असते. संग्रह करण्यासाठी आणलेल्या वस्तु अधिकृतपणे आणलेल्या असाव्यात. वस्तू गोळा करीत असताना विलंब होता कामा नये. वस्तू भेट म्हणून मिळालेल्या असोत अथवा कर्ज म्हणून किंवा वस्तुंची खरेदी केलेली असेल अभिरक्षकाने वस्तु खात्रीपूर्वक योग्य आहेत कि नाही याची पारख करुन घेऊन चुकीचा संग्रह, संग्रहालयाच्या व्याप्तीबाहेरील, वस्तु टाकाव्यात.

संग्रहालयाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या व कलात्मक वस्तुंचाच संग्रह करावा. केवळ वस्तू मोफत मिळतात म्हणून वस्तुसंग्रहासाठी घेऊ नये. तसेच वस्तुचे महत्त्व ओळखून कमी महत्त्वाच्या वस्तूंना शेवटी क्रम देणे गरजेचे असते. व्यक्तिगत संग्रह न करता संग्रहालयाचे हित लक्षात घेऊन काम करावे लागते. कोणत्याही वस्तूचा संग्रह करताना लोकांच्या आवडी निवडीचा विचार करावा.

संग्रहालयात जमा केलेल्या वस्तुबद्दलची माहिती शासनाला देणे गरजेचे असते कारण सर्व अभिरक्षकांवर कायद्याचे बंधन असते. वस्तुंच्या हातळणीसंबंधीचे वस्तूंच्या मालकीसंबंधीचे अथवा कलावस्तूंच्या अदलाबदला संबंधीचे नियम त्याला पूर्णपणे ठाऊक असावेत. प्रत्येक छोट्या मोठ्या वस्तुंचे कागदपत्र तयार करणे हे अत्यंत जरुरीचे असते. म्हणजेच वस्तुसंग्रहालयाची सर्व कायदेशीर जबाबदारी त्यांच्यावर असते. प्रत्येक वस्तूंचे सविस्तर कागदपत्र तयार करणे हे पुढिल गोष्टींसाठी अत्यंत गरजेचे आहे.

१) वस्तुंच्या संग्रहाचे प्रभावी व्यवस्थापन तसेच स्टोरेज सुरक्षितता, ऑडिटींग आणि विमा उतरविण्यासाठी.

२) वस्तूंची व्याप्ती आणि मर्यादा लक्षात घेऊन वस्तूविषयक धोरण ठरविण्यासाठी.

३) वस्तूवर संशोधन घेण्यासाठी व त्यांच्या प्रसिद्धीसाठी.

अशातर्हेने व्यवस्थापकाने वस्तुसंग्रहविषयक धोरण हे मार्गदर्शक तत्त्वानुसाराच असावयास हवे कारण वस्तुसंग्रहाबाबतची संपूर्ण जबाबदारी अभिरक्षकाची असते.

### २.५.२ वस्तुंच्या नोंदी ठेवणे (Documentation)

वस्तुसंग्रहालयात विविध माध्यमातून वस्तु आणल्यानंतर वस्तुसंग्रहालयात असलेल्या प्रत्येक वस्तूंची नोंदणी करणे हे अभिरक्षकाची दुसऱ्या क्रमांकाची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्याला वस्तूंचे प्रकार करुन त्यांची नोंद वही किंवा रजिस्टरमध्ये करावी लागते. याचा फायदा वस्तुसंग्रहालय योग्य तर्हेने चालवण्यासाठी तर होतोच परंतु त्याचबरोबर सरकारी तपासणीच्या (ऑडिटिंग) वेळेस सुद्धा होतो. कारण वस्तुसंग्रहालयातील सर्व वस्तूंना तो जबाबदार असतो म्हणून त्यास सर्व संग्रहालयातील अभिरक्षकांना कायद्याचे बंधन असते. वस्तुसंग्रहालयात वस्तूची नोंद करणे, वस्तूची मालकी किंवा अदलाबदल यासंबंधीची सर्व माहिती व कायदे अभिरक्षकास ज्ञात असणे आवश्यक आहे. संग्रहालयातील वस्तूंचा मालकी हक्क, वस्तुंची देवघेव व प्रत्येक लहान सहान वस्तुंची नोंद घेणे अत्यंत महत्त्वाचे असते म्हणून त्यास नोंदवही ठेवावीच लागते. या नोंदवहीत वस्तुंविषयी सविस्तर माहिती लिहिलेली असावी अन्यथा गोंधळ निर्माण होऊ शकतो. वस्तुंची नोंदी करताना सुद्धा

काळजी घ्यावी लागते. एकाच प्रकारच्या वस्तुंची दोनवेळा नोंद होऊ नये यासाठी अभिरक्षकास खबरदारी घ्यावी लागते. या नोंदीचा वापर वस्तुसंग्रहाचे प्रभावी व्यवस्थापन, स्टोरेज, सुरक्षितता, ऑडिटिंग आणि विमा उतरविण्यासाठी तसेच वस्तूंची व्याप्ती व वस्तूंना संशोधन करण्यासाठी प्रामुख्याने घेतो. संग्रहालयातील हजारो वस्तुंची रोज गणती करणे शक्य नाही म्हणून सुरुवातीस वस्तुंच्या संग्रहानंतर वस्तूंची नोंद वहीमध्ये केली जाते. जेणेकरुन ते संग्रहालयाच्या दृष्टिकोनातून उपयोगाचे ठरते.

व्यवस्थापक आपले संग्रहालय सतत वाढवण्याचा प्रयत्न करित असतो. परंतु वस्तुसंग्रहालयाच्या व्याप्तीनुसार संग्रहालयातील सर्व कलात्मक वस्तूंच्या नोंदवह्यामध्ये सुव्यवस्थित नोंदी असणे महत्त्वाचे आहे. हे काम अभिरक्षकाला अत्यंत जबाबदारीने पार पाडावे लागते. याचा वापर अभ्यासक संशोधनासाठी मोठ्या प्रमाणात करतात. शीला स्टोन यांच्या मते, "प्रकाशन व वस्तुंचे योग्य सादरीकरण हे वस्तूंचे प्रदर्शन व शैक्षणिक कार्याचे मूल्य हे पूर्णत: वस्तूंच्या योग्य नोंदणीकरणाशी संबंधीत असतात.

### २.५.३ वस्तुंचे जतन व संवर्धन करणे (Preservation):

वस्तुसंग्रहालयात वस्तुंचा संग्रह व नोंदी झाल्यानंतर त्या सर्व वस्तूंची काळजी, जतन व संवर्धन करणे ही अभिरक्षकाची महत्त्वाची जबाबदारी आहे. अभिरक्षक किंवा व्यवस्थापक हा संग्रहालयाचा सर्वेसर्वा असतो. त्यामुळे संग्रहलायाची सर्व तर्हेची सुरक्षितता राखण्याची जबाबदारी त्यालाच पार पाडावी लागते. प्राचिन भारतीय संस्कृती व तिचा कलात्मक स्वरूपातील वारशांचा जतन करण्याचे काम व्यवस्थापकाचे असते. संग्रहालयात कलावस्तू आल्यानंतर त्यांची नोंद केल्यानंतर संग्रहालयात त्यांची योग्य व्यवस्था लावण्यापूर्वी त्या वस्तूंवर विविध प्रकारच्या प्रक्रिया करुन त्यांचे योग्य पद्धतीने जतन करण्याची जबाबदारी अभिरक्षकावर असते. यासाठी तो विविध शाखेतील तज्ञ व्यंक्तिची मदत घेऊ शकतो. वस्तूमधील कापडाचे आणि इतर नाशवंत वस्तूंचे सर्व नमुने हवाबंद पेट्यांमध्ये ठेवले जाते. या सर्व वस्तूंचे नियमित निरीक्षण करणे व वस्तुंची काळजी घेणे हे व्यवस्थापकाचे काम आहे. काही वेळा एकाच तर्हेच्या वस्तुचे एकापेक्षा अधिक नमूने असतात असे अतिरिक्त नमुने कुलुपबंद ठेवावेत. सेंद्रिय प्रकारच्या वस्तुंची झीज अधिक झपाट्याने होत असल्याने त्यांची अत्यंत काळजीपूर्वक व्यवस्था लावणे अत्यंत गरजेचे असते. विशेषत: जीवाश्म, कापडी वस्त्रे आणि इतर नाशवंत वस्तु हवाबंद अवस्थेत ठेवाव्या लागतात. संग्रहालयातील वस्तुंना जर हानी पोहचली असेल तर अशा वस्तुंच्या सविस्तर नोंदी ठेवणे अत्यंत आवश्यक असते. आपले संग्रहालय अद्ययावत ठेवणे हे काम अभिरक्षकाचेच आहे. अभिरक्षकाची भूमिका ही पालकत्वाची असावी. ज्याप्रमाणे पालक आपल्या पाल्याबद्दल जागृत असतो. त्याचप्रमाणे अभिरक्षकाचीही भूमिका पालकत्वाची म्हणजेच वस्तुंच्या सांभाळकर्त्यांची असावी. अभिरक्षकाने या वस्तुंच्या निगेसंबंधी, सवर्धनासंबंधी काम करावे लागते. वस्तुसंग्रहालयात काम करत असताना अनेक मोहाचे क्षण निर्माण होतात. कारण भारतीय वस्तू या अत्यंत मौल्यवान असतात. त्यामुळे अशा वस्तूंची चोरी होण्याचा, तस्करी होण्याचा संभव असतो. कारण अशा वस्तुंची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भरपूर मागणी असते व या वस्तूंची किंमत खूप असते. त्यामुळे अभिरक्षक हा कडक, तत्त्वनिष्ठ व कठोर शिस्तीचा हवा तसेच वस्तुंचे संवर्धन व जतन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची संरक्षण व्यवस्था अभिरक्षकाने विकसित करायला हवी. अभिरक्षकाने सतत खबरदार राहिले

पाहिजे. बनावट वस्तूंपासून सतत सावध व दूर राहिले पाहिजे. यासाठी विविध तज्ज्ञांचा समावेश असलेली "कला समिती" नेमण्यात आली आहे.त्यात अनेक आर्ट एक्सपर्ट असतात. ते बनावट वस्तू व खरी वस्तू ओळखतात तसेच ते प्रत्येक अमूल्य व दुर्मिळ वस्तुबद्दल सतत दक्ष असतात. त्यामुळे अभिरक्षकाने सतत आपल्या वस्तूंची काळजी घेऊन वेळोवेळी तपासणी केली पाहिजे. यामुळे अभिरक्षकास चोरी, तस्करी, आग इत्यादी धोक्यापासून आपल्या संग्रहालयाची काळजी घ्यावी लागते.

संग्रहालयातील वस्तूंना जर हानी पोहचली असेल तर अशा वस्तुंच्या सविस्तर नोंद ठेवणे अत्यंत आवश्यक असते. शिवाय त्या वस्तूच्या हानीचे कारण व ती हानी दूर करण्यासाठी केलेल्या उपाययोजना ही नोंदवहीत लिहून ठेवणे आवश्यक असते. अशाप्रकारे संग्रहालयात अभिरक्षकाची भूमिका संवर्धनाच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्वाची आहे. आपले संग्रहालय ज्या दर्जाचे असेल त्याप्रमाणे राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय दर्जाचे मापदंड असा दर्जा कायम राखणे ही जबाबदारी अभिरक्षकाची आहे. वस्तुचे संवर्धन करण्याच्या विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पद्धतीचा अभ्यास करुन त्यांचा उपयोग करुन तसेच स्वत:च्या अनुभवातून वस्तुंची काळजी घेण्याची पद्धती विकसित करणे ह्या प्रमुख जबाबदाऱ्या त्यांस पार पाडाव्या लागतात.

### २.५.४ वस्तुंचे प्रदर्शन (Exhibition)

वस्तुचा संग्रह व नोंदी केल्यानंतर विविध कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन करणे ही प्रमूख जबाबदारी अभिरक्षकास पार पाडावी लागते. कारण संग्रहालयातील कलाकृतीचें केवळ जतन करुन ठेवणे हा संग्रहालयाचा उद्देश नसतो तर वस्तूंच्या माध्यमातून भारतीय कला, स्थापत्य, प्राचिन वारसा, यांचा वापर लोकशिक्षणासाठी त्या वस्तूंचे प्रदर्शन करणे हा प्रमुख उद्देश संग्रहालयाचा असतो. या वस्तू आपापल्या संस्कृतीचे निदर्शक असतात. त्यांचे जर प्रदर्शन योग्य प्रकारे होऊ शकत नसेल तर 'संग्रहालये ही शिक्षण देणारी संस्था' असा उद्देश निरर्थक ठरतो. म्हणूनच वस्तूंचे योग्यरित्या प्रदर्शन करणे हे संग्रहालयाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे आणि ती पूर्ण करण्याची जबाबदारी अभिरक्षकाची आहे.

वस्तुसंग्रहालयाचे पारंपारिक स्वरूप बदलून आता ती ज्ञान देण्याच्या संस्था म्हणून नावारुपास आल्या आहेत. त्यामुळेच वस्तुंच्या प्रदर्शनाद्वारे लोकशिक्षण अशा स्वरुपाची भूमिका वस्तुसंग्रहालयांना बजावावी लागते. ही भूमिका बजावण्याची जबाबदारी अभिरक्षकास पार पाडावी लागते. ही जबाबदारी व्यवस्थित पार पाडण्यामागील कारण म्हणजे कलावस्तूंचे योग्य प्रदर्शन संग्रहालयातील दालनात लावणे आवश्यक आहे. यासाठी अभिरक्षकाच्या अंगी वस्तूंचे योग्य प्रदर्शन करण्याविषयीचे कौशल्य असावे लागते. वस्तुंचे प्रदर्शन करण्यामागील त्याच्या कल्पना अत्यंत साध्या व सुस्पष्ट असल्या पाहीजेत.

अमेरिकन म्युझियम संघटनेने आपल्या संग्रहालय शास्त्रविषयक मार्गदर्शक तत्त्वामध्ये नमूद केले आहे कि, "संग्रहालयातील वस्तुंचे प्रदर्शन हे अत्यंत सुस्पष्ट आणि योग्य रितीने करावे, प्रदर्शनाखालील त्यांचा हेतू शुद्ध आणि सुस्पष्ट असावा शिवाय या प्रदर्शनातून म्युझियमचे उद्दिष्टही साध्य झाले पाहिजे." शिवाय प्रदर्शन कौशल्य हे अभिरक्षकाच्या यशाचे द्योतक आहे. अशा वस्तुंच्या प्रदर्शनाच्या माध्यमातून लोकशिक्षण अभ्यासकांसाठी संशोधनाच्या संधी उपलब्ध होतात. प्रदर्शनाच्या माध्यमातून कोणत्याही राजकिय, सामाजिक अथवा

आर्थिक गटांचे किंवा त्यांच्या विचारसरणीचे होत नसल्याची खबरदारी अभिरक्षकाने घेतली पाहिजे. त्यामुळे कोठे काय प्रसिद्ध करायचे वा प्रदर्शित करायचे याचे भान व्यवस्थापकाने ठेवायला हवे. निश्चित आणि समतोल साधणारे प्रदर्शन जनतेला फायद्याचे ठरते. अशा प्रदर्शनामूळे लोकशिक्षणाच्या हेतू साध्य होतो.

संग्रहालयातील कलावस्तूंचे दालनात सादरीकरण करत असताना अभिरक्षकाने दालनामध्ये वस्तुंची गर्दी होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. कारण यामुळे प्रदर्शन बघावयास येणाऱ्या प्रेक्षकांना वस्तुंचे महत्त्व समजत नाही. तसेच ज्या वस्तु प्रदर्शनात ठेवायच्या आहे व त्यांनी योग्य ते लेबल व माहितीपत्रके लावणे आवश्यक आहे. चित्रे, नकाशे, यांच्या वापराबरोबर (दृकश्राव्य साधने, वॉकी टॉकी, टिव्ही यांच्या साहाय्याने प्रदर्शन अधिक आकर्षक करता येते.

वस्तुंचे प्रदर्शन अभिरक्षक दोन प्रकारे करू शकतो. १) कामयस्वरुपी प्रदर्शन २) तात्पुरते प्रदर्शन. दोन्ही प्रकारचे प्रदर्शन भरविताना अभिरक्षकास काही गोष्टींची काळजी घ्यावी लागते. ती पुढिलप्रमाणे.

१) वस्तुंच्या खाली योग्य ते लेबल व आवश्यक ती माहीती द्यावी.

२) विविध वस्तुंचे गट बनवून त्यांचे प्रदर्शन करणे.

३) जनतेला वस्तु जवळून व स्पष्टपणे पाहता येतील याची काळजी घेणे.

४) प्रत्येक वस्तूची माहिती जनतेला पुरविणे.

५) कलावस्तूचे प्रदर्शन कलात्मक दृष्टिकोनातून उभारावे.

६) प्रत्येक वस्तूंना विचारपूर्वक शिर्षक देणे.

अशा प्रकारे वस्तूंचे योग्य तर्हेने प्रदर्शन भरविणे ही अभिरक्षकाची जबाबदारी आहे. यामूळे 'प्रदर्शनाद्वारे लोकशिक्षण' ही भूमिका वस्तूसंग्रहालये प्रशिक्षित अभिरक्षकामुळे पार पाडत आहेत.

### २.५.५ नैतिकता, तत्वनिष्ठा व एकात्मता (Ethics and Integrity):

वस्तुसंग्रहालयात अभिरक्षकाने नैतिकता जपणे ही त्यांची खूप महत्त्वाची जबाबदारी आहे. त्याला आपल्या जबाबदारीची जाणीव असली पाहिजे व वस्तुसंग्रहालयातील काम पाहताना त्यांनी आपली नैतिकता, तत्त्वनिष्ठा व एकात्मता जपली पाहिजे. नैतिक मुल्यांना अधिक महत्त्व देऊन संग्रहालयाच्या व्यवस्थापनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार व कार्यपद्धतीनुसार संग्रहालयाचे कामकाज चालवावे लागते. आपल्या संग्रहालयाची व्याप्ती आणि उद्दिष्टे लक्षात ठेवनूच संग्रहालयासाठी योग्य वस्तु मिळवल्या पाहिजेत. जरी तो हुशार व ज्ञानी असला तरी सर्वच विभागामध्ये तो प्रविण असेल असे नाही त्यामुळे त्यांनी वेळोवेळी तज्ञांचा सल्ला घेणे हिंतकारक असते ह्याची जाणीव त्याला असावी. अभिरक्षकाने संग्रहालयाचा प्रमुख या नात्याने संपूर्ण संग्रहालयाची जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडावी. त्यांस कोणत्याही माध्यमातून जबाबदारी टाळता येत नाही. तो सर्व समावेशक

वृत्तीचाही असणे आवश्यक असते. कारण आपली जबाबदारी पार पाडताना त्याचा हरघडी विविध तर्हेच्या स्वभावाच्या लोकांशी संबंध येतो. ह्या सर्वांशी त्याला योग्य तर्हेने संपर्क ही ठेवता आला पाहिजे. कारण संग्रहालयात विविध धर्माचे, जातीचे, समुदायाचे लोक येत असतात अशावेळी कोणत्याही प्रकारचे पूर्वग्रह मनात न ठेवता त्याने सर्वांशी चांगला संबंध प्रस्थापित केला पाहिजे. वस्तुंची खरेदी व विक्री करताना त्याने कोणत्याही प्रकारे गैर मार्गांचा अवलंब केला नाही पाहिजे. तसेच कोणत्याही स्वरुपाच्या अनैतिक संबंधामध्ये त्याने अडकू नये कारण संग्रहालयाचा प्रमुख या नात्याने त्याने त्याची प्रतिमा अगदी स्वच्छ ठेवायला हवी, ही त्याची नैतिक जबाबदारी आहे.

वस्तुसंग्रहालयाचा फायदा करुन देण्यासाठी तसेच नुकसान टाळण्यासाठी त्याने मेहनत घेतली पाहिजे. एखाद्या व्यक्तिला आपल्याजवळील कलात्मक वस्तु विकायची असेल तर तिची योग्य किंमत ठरवणे, तिची दुर्मिळता आणि महत्त्व तपासून पाहणे आवश्यक असते. तसेच त्यासंबंधित सर्व माहिती वस्तूविक्रेत्या व्यक्तिस दिली पाहिजे. वस्तु विकत घेताना त्याने विक्रेत्यांची कधाही दिशाभूल करु नये. वस्तुची विश्वसनियता पारखून वस्तुंची खरेदी करणे व त्यासंबंधीचे योग्य निर्णय घेणे तसेच संग्रहालयाचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घेणे ही अभिरक्षकाची जबाबदारी आहे. त्याचप्रकारे अभिरक्षकाने भारताची एकता, अखंडता व एकात्मता जपण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. संग्रहालयातील प्रशासनामध्ये सुद्धा मीच सर्वत्र आहे अशा भूमिकेचा त्याग करुन एकात्म शासन व्यवस्थेचा पुरस्कार केला पाहिजे. त्याने आपल्या सहकार्यामध्ये सहकार्याची, नैतिकतेची व एकात्मतेची भावना निर्माण केली पाहिजे व स्वत:सुद्धा चारित्र्यसंपन्न राहून एक आदर्श व्यक्ति म्हणून समाजात वावरणे ही अभिरक्षकाची जबाबदारी आहे.

### २.५.६ सहकाऱ्यांबरोबरील संबंध (Relationship with colleagues)

वस्तूसंग्रहालयाचे यशापयश हे संपूर्णत: अभिरक्षकावर अवलंबून असते. त्याने आपल्या सहकार्यांबरोबर चांगले संबंध प्रस्थिपित केले पाहीजे. कारण वस्तुसंग्रहालयाची व्याप्ती व आवाका मोठा असल्याने त्या ठिकाणी अनेकजण विविध स्वरुपाची कामे करत असतात. अशावेळी कोणत्याही सहकार्यांस स्वत:चा मी पणा किंवा गर्व दाखवला नाही पाहिजे. याउलट संग्रहालयातील कर्मचाऱ्यामध्ये खेळीमेळीचे आणि एकोप्याचे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी अभिरक्षकाची आहे. त्याने त्यांच्याबरोबर सौहार्दाने वागले पाहिजे. त्यांच्याबरोबर चांगले संबंध ठेवून त्यांचा विश्वास संपादन करणे वस्तुसंग्रहालयाच्या दृष्टीकोनातून खूप महत्त्वाचे असते. सहकार्यांबरोबर त्यांने कोणत्याही प्रकारचा दुजाभाव किंवा गटबाजी करु नये तसेच सर्वच वर्गाच्या किंवा स्तराच्या कर्मचार्यांबरोबर चांगले वर्तन ठेवले पाहिजे. कर्मचार्यांमध्ये काही तणाव किंवा संघर्ष निर्माण झाल्यास नि:स्वार्थीपणे तणावाची कारणे जाणून घेऊन सलोख्याचे वातावरण निर्माण केले पाहीजे. सहकार्यांशी प्रेमाने व सहकार्याने वागण्याबरोबरच आपल्या वरीष्ठ अधिकाऱ्याबरोबरसुद्धा त्याने चांगले संबंध प्रस्थापित केले पाहिजे. व्यावसायिक संघर्ष टाळता आले पाहिजेत व वरिष्ठांचा विश्वास संपादन केला पाहिजे. संग्रहालयातील सहकार्याबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करताना त्यांना त्यांच्या कामाबद्दल आदर निर्माण केला पाहिजे तसेच तो कोणत्याही मार्गाने अनैतिक प्रकारात गुंतणार नाही याची काळजी घेतली पाहिजे, संग्रहालयांतर्गत संघर्ष बाहेर येऊ न देण्याचीसुद्धा जबाबदारी अभिरक्षकास पार पाडावी लागते. संग्रहालयाच्या

क्षेत्राव्यक्तिरिक्त त्याने इतर संग्रहालयातील कर्मचार्यांसोबत सुद्धा चांगले सौहार्दाचे संबंध निर्माण केले पाहिजे. आपल्या समव्यावसायिकांशी आणि इतर संग्रहालयाच्या अभिरक्षकांशी सुद्धा चांगले संबंध प्रस्थापित केले पाहिजेत.

अशाप्रकारे संग्रहालयाच्या विकास कार्याच्या क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे अडथळे निर्माण होणार नाहीत व संग्रहालयातील वातावरण चांगले राखणे ही अभिरक्षकाची जबाबदारी आहे. कारण शेवटी वस्तुसंग्रहालयाचा मूळ हेतू म्हणजे लोकशिक्षण हा अभिरक्षक व त्यांचे इतर सहकारी यांच्या संबंधावर अवलंबून असते. संग्रहालयाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे यश हे सर्वस्वी अभिरक्षक आणि संग्रहालयातील त्याचे इतर सहकारी यांचे सांघिक कार्य असते. ही सांघिकता टिकवून ठेवण्याची जबाबदारी अभिरक्षकांची असते.

### २.५.७ समाजाबरोबरचे संबंध (Relationship with the Public):

वस्तुसंग्रहालये ही लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यमं मानली जातात. वस्तुसंग्रहालयातून प्राचिन कला, संस्कृती, स्थापत्य व वारसांचे जतन लोकांसाठी केले जाते. त्यामुळे सांस्कृतिक वारसा कलात्मक वस्तुंच्या माध्यमातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे दिला जातो. यामुळे समाजाच्या विकासाची दिशा निश्चित करता येते. संग्रहालयाचा प्रमुख या नात्याने अभिरक्षकांस समाजातील प्रत्येक व्यक्तिबरोबर चांगले संबंध प्रस्थापित केले पाहिजे. कारण त्यांची संग्रहालये ही लोकांसाठीच असतात. समाजात विविध प्रकारची, समुदायाची, वंशाची, जातीची, धर्माची, जमातीची, भाषेची लोक राहत असतात. त्याच्या विरुद्ध मनामध्ये कोणत्याही प्रकारचा दुजाभाव न ठेवता त्यांनी मदत केली पाहिजे कारण समाजाचे व अभिरक्षकाचे नाते हे कधीही न तूटणारे असते. त्यामुळे त्यांची जबाबदारी खूप महत्त्वाची आहे म्हणूनच अभिरक्षकास वस्तुसंग्रहालय व समाज या दोन संस्थातील दुवा मानला जातो.

समाजाच्या आवडीनिवडी, गरजा, ठिकाण लक्षात घेऊन अभिरक्षकास संग्रहालयाची उभारणी करावी लागते. त्यामुळे समाजाच्या विविध अंगाचा सखोलपणे अभ्यास अभिरक्षकास करावा लागतो. त्यास आपल्या संग्रहालयामध्ये अधिकाधिक समाजभिमूख कार्यक्रमाचे आयोजन करावे, बैठका आयोजित कराव्यात, चर्चासत्र आयोजित करून त्यांच्या शंकेचे निरसन करावे. संग्रहालयाच्या विविध शाखेचा अभ्यास करण्यासाठी जनतेस प्रोत्साहित करावे तसेच त्यांच्यामध्ये लोकशाही सामाजिक सौहार्द व जातीय सलोखा निर्माण करावे अशा अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या अभिरक्षकास पार पाडाव्या लागतात.

समाजाचा एक घटक म्हणून अभिरक्षकास स्वत:चे सुद्धा चारित्र्य स्वच्छ व निर्भय ठेवायला हवे. कारण त्यांचेच अनुकरण पूर्ण समाज करित असतो. त्यामुळे त्याने समाजातील कोणत्याही व्यक्तिची दिशाभूल करु नये व संग्रहालयात खेळीमेळीचे वातावरण निर्माण करावे. बऱ्याच वेळेस लोक अभिरक्षकाच्या चारित्र्यावरुन आपल्या जवळील दुर्मिळ कलात्मक वस्तु संग्रहालयास भेट म्हणून देतात.

यामुळे ज्या व्यक्ति ऐतिहासिक किंवा कलात्मक वस्तूंची विक्री किंवा देणगी देऊ शकतील अशा व्यक्तीबरोबर त्याने चांगले संबंध ठेवायला पाहिजे. त्याने खुल्या लिलावाच्या धोरणाचा अवलंब करुन जनतेची कोणत्याही प्रकारे दिशाभूल न करता पूर्ण प्रामाणिक माहिती

जनतेपर्यंत पोहोचवली पाहिजे. जनतेचा विश्वास त्यांने संपादन केला पाहिजे त्यामुळे अनेक सामाजिक संबंध, संघटना व श्रीमंत व्यक्ति संग्रहालयाच्या विकासासाठी देणगी अथवा मदत देतात हे सर्वस्वी अभिरक्षकाच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असते. त्याने आपले संबंध वस्तुसंग्रहालयाच्या बाहेरसुद्धा लोकांशी चांगल्या प्रकारे ठेवावेत कारण त्याचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध संग्रहालयाशी असतो. समाजाच्या शिक्षणाकडे त्याने अधिक लक्ष पुरविले पाहिजे. कारण अशिक्षित लोकांना शिक्षित करण्याचे माध्यम म्हणून वस्तुसंग्रहालयाकडे पाहिले जाते. त्यामुळे आजच्या काळात अभिरक्षकाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. म्हणूनच त्यांची भूमिका ही बदलती आव्हाने पेलणाऱ्या शिक्षकांप्रमाणे असावी.

अशाप्रकारे अभिरक्षकास समाजाबरोबर खूप चांगले संबंध प्रस्थापित करावे लागतात. कारण लोकांसाठीच तर खऱ्या अर्थाने वस्तुसंग्रहालये असतात. त्यांनी पुन्हा पुन्हा संग्रहालयात यावे यासाठी त्यांच्या दृष्टीने अभिरक्षकास वस्तूंचे प्रदर्शन करावे लागतात. ज्यावेळी लोक संग्रहालयात येऊ शकत नाहीत. त्यावेळी अभिरक्षक फिरत्या वस्तुसंग्रहालयाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचतात. म्हणूनच अभिरक्षकाची ही जबाबदारी खूप महत्त्वाची आहे.

### २.५.८ संशोधन कार्ये (Research Work):

वस्तुसंग्रहालयात अभिरक्षकास विविध जबाबदाऱ्या पार पाडत असताना संशोधनाचे कार्य सुद्धा करावे लागते. वस्तुसंग्रहालयातील वस्तुंचा अन्वयार्थ लावणे व त्यांचा सखोल अभ्यास करुन सामान्य लोकांना समजेल अशा स्वरुपात माहिति पुरविणे ही त्यांची प्रमुख जबाबदारी आहे. यासाठी तो खऱ्या अर्थाने संशोधक असला पाहिजे. वस्तुंच्या प्रदर्शनाबरोबर त्या वस्तूंच्या अन्वयार्थ लावणे हे संग्रहलायाचे मूख्य उद्दिष्ट असते. यामुळे वस्तूंची ऐतिहासिक माहिती लोकांना समजण्यास मदत होते यासाठी संशोधनवृत्ती अभिरक्षकाने विकसित करायला हवी. यशस्वी अभिरक्षक हा संशोधनाच्या माध्यमातून संग्रहालय विकसित करीत असतो. संग्रहालयातील विविध वस्तू त्यांच्या संशोधनाची प्रमुख साधने असतात. त्यामुळे संग्रहालयातील वस्तुंचा आपल्या संशोधन कामात जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यासाठी अभिरक्षक प्रयत्नशील असतो. त्यासाठी आधुनिक संग्रहालयाचे एक उत्तम शैक्षणिक केंद्र ठरण्यासाठी एक आदर्श ग्रंथालयही संग्रहालयात निर्माण केले पाहिजे.

वस्तूंच्या उत्तम प्रदर्शनासाठी व संग्रहालयाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून त्याने सतत संशोधन करायला पाहिजे. संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व समावेशक ग्रंथालयाची उभारणी करुन अधिकाधिक संशोधन त्याने केले पाहिजे. तसेच प्रेक्षकांच्या उपयोगासाठी वाचनालयाची व्यवस्था करणे ही सुद्धा अभिरक्षकाची जबाबदारी आहे. अभिरक्षकाने केलेल्या संशोधनाचा उपयोग सामान्यजनांना झाला पाहिजे. त्याचे विविध क्षेत्रातील शोधनिबंध, सामान्य लोकांना समजण्यासाठी साध्या भाषेत त्याने प्रकाशित केले पाहिजे. तसेच त्याने त्याच्या संशोधनकार्याची नोंद ठेवली पाहिजे. संग्रहालयाचा वार्षिक अहवाल, संग्रहालयाविषयी माहितीपत्रके, मार्गदर्शक पुस्तके, कलात्मक वस्तूंबद्दलची माहिती, प्रदर्शनाविषयीची माहिती इत्यादींचे प्रकाशन नित्यनेमाने केले पाहिजे. संग्रहालया बाबतीची माहिती व इतर त्यासंबंधीची छोटी पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध करावे व शाळा, कॉलेजेसनां

हे साहित्य सवलतीच्या दराने उपलब्ध करून द्यावे कि जेणेकरुन ही पुस्तके वाचून विद्यार्थी संग्रहालयास भेट देतील. अशी माहितीपत्रके अभिरक्षकाने संशोधन करुन तयार केले पाहिजे. आधुनिक संग्रहालयातील अभिरक्षक संशोधनाचे कार्य मोठ्या जोमाने करत आहेत.

अशा प्रकारे अभिरक्षकास वस्तुसंग्रहालयामध्ये काम करत असताना वरील जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी त्यास संग्रहालयाचे व त्याच्या विविध शाखेचा अभ्यास शास्त्रशुद्ध पद्धतीने घेऊन प्रशिक्षण घ्यावे लागते . कारण या जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतरच वस्तुसंग्रहालयाची उद्दिष्टे अभिरक्षक योग्य तर्हेने पार पाडू शकतो व लोकशिक्षणाची चळवळ योग्य तर्हेने राबवू शकतो. संग्रहालयाचे स्वरुप जितके लहान तितकीच व्यवस्थापकाच्या जबाबदारीची व्याप्तीही प्रचंड असते. कारण अशा छोट्या संग्रहालयाच्या प्रत्येक विभागविषयी ज्ञान असणे आवश्यक आहे. अभिरक्षकाने जर वरील जबाबदाऱ्या योग्य पद्धतीने पार पाडल्या तर वस्तुसंग्रहालयाचा विकास होतो व लोकशिक्षणाची चळवळ यशस्वी होते.

**आपली प्रगती तपासा**

प्र. अभिरक्षकाच्या जबाबदाऱ्या सांगा.

## २.६ वस्तुसंग्रहालयाच्या व्यवस्थापनाच्या कार्यातील शासनाची भूमिका

वस्तुसंग्रहालयाच्या योग्य व्यवस्थापनासाठी ज्याप्रमाणे अभिरक्षकाची भूमिका महत्त्वाची असते. त्याचे नियोजन कौशल्य, व्यवस्थापकीय कौशल्य त्याचे विषयातील सखोल ज्ञान, संग्रहालयाच्या विविध शाखांचा माहिती इ. त्याचप्रमाणे शासनाची भूमिकासुद्धा खूप महत्त्वाची असते. संग्रहालयाचा लोकरंजन आणि लोकशिक्षण हे हेतू शासनाच्या माध्यमातून राबविता येतात. संग्रहालये निर्माण करणे व त्यानंतर ती सांभाळणे ही अत्यंत खर्चीक बाब आजच्या काळामध्ये झालेली आहे. त्यामुळे शासनाच्या योग्य सहभागाशिवाय हे शक्य नाही. भारतात बऱ्याच वेळेस निधिच्या कमतरतेमुळे व शासनाच्या दुर्लक्षतेमुळे बरीच वस्तुसंग्रहालये बंद पडलेली दिसून येतात.

वस्तुसंग्रहालयाच्या चांगल्या व्यवस्थापनासाठी शासनाने योग्य व्यक्तिची नेमणूक अभिरक्षक म्हणून करायला हवी. त्याची शैक्षणिक पात्रता, प्रशिक्षण, अनुभव, संशोधन, आवड व संग्रहालयाच्या विविध शाखेचे ज्ञान पाहूनच शासनाने त्यांची नेमणूक करायला पाहिजे. अयोग्य व्यक्तिची नेमणूक जर त्या जागेसाठी केली तर संग्रहालयाची जबाबदारी ती व्यक्ति व्यवस्थितपणे पार पाडू शकणार नाही व संग्रहालयाचा विकास होऊ शकणार नाही.

भारताने सुरुवातीपासूनच याविषयी वेळोवेळी योग्य पावले उचलली नाहीत. बऱ्याच वेळेस योग्य पात्रता, प्रशिक्षण, संग्रहालयाचे ज्ञान न पाहता त्यांची नेमणूक अभिरक्षक या पदावर केल्यामुळे तसेच त्यांना वेतनसुद्धा योग्य न दिल्यामुळे अभिरक्षकांनी आपल्या जबाबदाऱ्या योग्यपद्धतीने बजावलेल्या नाहीत असे दिसून येते. अभिरक्षकाबरोबर इतर कर्मचार्यांचीसुद्धा नेमणुक केंव्हा केंव्हा अशाच प्रकारे केली जाते. त्यामुळे अभिरक्षकास संग्रहालयाचे मूळ उद्दिष्ट साध्य करता येत नाही, संग्रहालयाचा विकास होत नाही व अशा कर्मचार्यांच्या मदतीने अभिरक्षकास संग्रहालयाचे व्यवस्थापन बघावे लागते. त्यामुळे शासनाने संग्रहालयातील कर्मचार्यांची निवड करताना योग्य ती काळजी घेतली पाहिजे.

भारतातील वस्तुसंग्रहालयाचे व अभिरक्षकाच्या भूमिकेचा अभ्यास करुन श्री शिवराम मूर्ती ह्यांनी अभिरक्षकाची व्यथा पुढिलप्रमाणे मांडली आहे. त्यांच्या मते "अभिरक्षक म्हणजे संग्रहालयातील चैतन्याचा स्त्रोत असतो. तो अतिशय ज्ञानी असला पाहिजे आणि त्याने अत्यंत कार्यक्षमतेने संग्रहालयाचे कामकाज पाहिले पाहिजे. अशी त्याच्याकडून अपेक्षा असली तरी तो स्वत: मात्र सर्वतर्हेने दुर्लक्षिलेलाच राहतो. भारतातील संग्रहालयातल्या अभिरक्षकांएवढी उपेक्षा दुसऱ्या कोणत्याही देशात होत नसेल. यामुळे शासनाने योग्य ती पावले उचलून अभिरक्षकांस योग्य ती मदत व दिशा देऊन संग्रहालयाचा विकास साधला पाहिजे.

## २.७ सारांश

वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की संग्रहालयाची ध्येये व उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी संग्रहालयातील अभिरक्षकाची व शासनाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. प्राचिन सांस्कृतिक वारसा व कलावस्तुंचे जतन करताना अभिरक्षकास खूप महत्त्वाची भूमिका बजवावी लागते. शासनाससुद्धा पात्र योग्य व प्रशिक्षित अभिरक्षक व त्यांच्या सहकार्यांची नेमणूक करावी लागते. अशिक्षित व्यंक्तिनासुद्धा प्रशिक्षित करण्याचे ठिकाण म्हणजे वस्तूसंग्रहालय या नात्याने लोकशिक्षणाची खूप महत्त्वाची जबाबदारी अभिरक्षकावर असते. संग्रहालयाचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी त्यास अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. संग्रहालयाच्या योग्य व्यवस्थापनाकरिता संग्रहालयाचे योग्य पद्धतीने वर्गीकरण करणे गरजेचे असते. वर्गीकरण केल्यानंतर अभिरक्षकांस संग्रहालयाच्या प्रकारानुसार वस्तुंचा संग्रह, नोंदी, प्रदर्शन व सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांचे जतन करणे आवश्यक असते. त्यासाठी या पदावर प्रशिक्षित अभिरक्षकाची नेमणूक शासनाने करायला हवी. ही शासनाची जबाबदारी आहे. अशा प्रकारे वस्तुसंग्रहालये लोकशिक्षणाचे काम अभिरक्षक व शासनाच्या माध्यमातून करत असतात.

## २.८ प्रश्न.

प्र.१) अभिरक्षकाची पात्रता व कार्ये स्पष्ट करा.

प्र.२) अभिरक्षकाच्या पात्रता सांगून त्यांच्या जबाबदार्यांचे वर्णन करा.

प्र.३) अभिरक्षकाची पात्रता व कर्तव्ये स्पष्ट करा.

प्र.४) अभिरक्षकाची कर्त्यव्ये आणि जबाबदाऱ्या स्पष्ट करा.

प्र.५) टिपा लिहा.

अ) वस्तुसंग्रहालयाचे वर्गीकरण.

ब) अभिरक्षकाची पात्रता व प्रशिक्षण.

क) अभिरक्षकाची कर्तव्ये.

ड) अभिरक्षकाच्या जबाबदाऱ्या.

## २.९ संदर्भ


1. ThoratB.R., Principles of Museology, Archaeology, Archival &Library Science, Himalaya Publishing House, Mumbai-4
2. Banerjee, N. R., Museum and Cultural Heritage of India, Agam Kala Prakashan, New Delhi, 1990.
3. Dwivedi V.P, Museums and Museology: New Horizons, Agam Kala Prakashan, New Delhi, 1980.
4. Markham S. F., The Museums of India, The Museum Association, London, 1936.
5. Plenderleith H. J, The Conservation of Antiquities and Works of Art: Treatment, Repair and Restoration, Oxford University Press, New York, 1956.
6. Sarkar, H, Museums and Protection of Monuments and Antiquities in India, Sundeep Prakashan, New Delhi, 1981.
7. Thomson John M.A. and Others, Manual of Curatorship: A Guide to Museum Practice, Routledge, New York, 1984.
8. Wittlin Alma, Museums : Its History and Its Tasks in Education, Routledge and K Paul, London, 1949.
9. प्रा. डॉ. निशांत शेंडे, वस्तुसंग्रहालये , अथर्व पब्लिकेशन
10. कठारे अनिल , पाटील गौतम, पुरातत्वविद्या वस्तुसंग्रहालय आणि पर्यटन, विद्या बुक्स, औरंगाबाद.
11. देव शा. भा. , पुरातत्वविद्या


❖❖❖❖

# ३

# वस्तुसंग्रहालयातील वस्तुंचा संग्रह

**घटक रचना :**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ वस्तुसंग्रहाच्या पद्धती

३.२.१ पुरातत्वीय संकलन

३.२.२ खरेदी

३.२.३ देणगीस्वरूपात मिळालेल्या वस्तू

३.२.४ वस्तूंची देवघेव

३.२.५ कर्जावू स्वरुपात वस्तू मिळविणे

३.२.६ अचानक मिळालेला साठा/खजिना

३.२.७ भेटीदाखल मिळालेल्या वस्तू

३.३ सारांश

३.४ प्रश्न

३.५ संदर्भ

## ३.०. उद्दिष्ट्ये

१. वस्तुसंग्रहाच्या विविध पद्धतींचा अभ्यास करणे.

## ३.१. प्रस्तावना

भारतामध्ये वस्तुसंग्रहालय हे लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम मानले जाते. प्रचीन कलात्मक वस्तू व सांस्कृतिक वारशांचे जतन करण्याचे काम वस्तुसंग्रहालये करीत असतात. आताच्या काळात वस्तुसंग्रहालयातील वस्तुसंग्रहाची व्याप्ती फारच वाढलेली दिसून येते. विविध प्रकारच्या वस्तू केवळ लोकांच्या मनोरंजनाच्या दृष्टीकोनातून संग्रहीत केल्या जात नाहीत तर त्या वस्तूंच्या मागील असलेली परंपरा, इतिहास, वारसासुद्धा समजावण्याचे काम संग्रहालये करीत आहेत. वस्तुसंग्रहालयाचे विविध प्रकार पडतात. या सर्व प्रकारच्या संग्रहालयाचे नियोजन आणि प्रशासन विविध पातळीवरील संस्था व शासकीय व्यवस्था

करत आहेत. राष्ट्रीय पातळीपासून ते गावपातळीपर्यंत प्रशासकीय नियोजन योग्य रितीने शासन व इतर संस्था करताना दिसून येतात.

वस्तुसंग्रहालयाचे प्रकार त्यातील असलेल्या वस्तूंच्या आधारे करता येते. संग्रहालयामध्ये वस्तुसंग्रह करण्याच्या विविध पद्धती आहेत. संग्रहालयाचे यश त्यात ठेवलेल्या वस्तूच्या प्रदर्शनावर अवलंबून असते. त्यामुळे वस्तुंचा संग्रह करताना व्यवस्थापकास योग्य ती काळजी घ्यावी लागते.

## ३.२ वस्तुसंग्रहाच्या पद्धती (METHOD OF COLLECTION)

वस्तुसंग्रहालयात मानवाच्या गतइतिहासाच्या साक्ष देणाऱ्या अनेक भौतिक वस्तू मिळवल्या जातात. वस्तुसंग्रहालयात वस्तूंचा संग्रह करण्याच्या विविध पद्धती अस्तित्वात आहेत. अर्थात हा संग्रह करण्यामागे संग्रहालयांचे सुस्पष्ट असे हेतू असतात. तसेच त्यांच्या संग्रहावर ही विशिष्ट मर्यादा असतात. वस्तुसंग्रह हा अखंडपणे चालत असतो. वस्तुसंग्रहालयाला अंत माहीतच नसतो. आणि म्हणूनच संग्रहालयांनी आपल्या वस्तूसंग्रह हा काळजीपूर्वक करावा आणि आपल्या उद्दिष्टांना पाठपुरावा होईल अशाच तर्हेने करावा अशी त्यांच्याकडून अपेक्षा असते.

वस्तु संकलनाच्या पद्धती :

### ३.२.१. पुरातत्वीय संकलन :

१. उत्खननाद्वारे आलेली संपत्ती

२. अन्वेषण करून आलेली संपत्ती

१. पहिल्या पद्धतीत अनेक शतके पृथ्वीच्या पोटातील वस्तू जेव्हा बाहेर काढल्या जातात. त्यावेळी त्या वस्तुसंग्रहालयात जमा केल्या जातात.

२. दुसऱ्या पद्धतीत, आपल्या आसपास जुन्या काळातील वस्तू पडलेल्या असतात त्या वस्तू नागरिकांनी गोळा करून त्या वस्तुसंग्रहालयाकडे जमा कराव्यात हा अलिखीत नियम होता. पण तो पुढे लिखित झाला. अन्वेषण करताना जो पुरातत्व शास्त्रज्ञ आहे त्याला या गोष्टी चटकन दिसतात.

### ३.२.२. खरेदी :

वस्तुसंग्रहालयातील बहुसंख्य वस्तू या प्रमुख्याने खरेदीच्या स्वरूपात मिळवलेल्या असतात. मात्र बहुतेक वेळा त्यासाठी लागणाऱ्या पैशाचा तुटवडा असतो. अशावेळी त्यांच्या विविध प्रतिनिधीच्या द्वारे त्यांना पैसा उपलब्ध करून दिला जातो व त्याद्वारे ते वस्तूंची खरेदी करू शकतात. अशा कार्यालये पुढीलप्रमाणे आहेत-

१. द नॅशनल आर्ट ट्रेजर्स फंड

२. केंद्र आणि राज्यसरकारांचे वस्तुसंग्रहालय खाते

३. कलाकृती खरेदी समिती

४. शास्त्रीय सर्वेक्षण समिती

शासकीय वस्तुसंग्रहालयात वस्तूंची खरेदीही एखाद्या समितीकडून केली जाते. या समितीची नेमणूक सरकारने केलेली असते. यात वेगवेगळ्या तज्ञ व्यक्तींचा समावेश असतो व आपापल्या क्षेत्रातील वस्तूंच्या खरेदीच्या निर्णयाच्या अधिकार हा त्यांना दिलेला असतो.

खाजगी संग्रहालयामध्ये हा अधिकार संस्थेच्या अध्यक्षाला अथवा म्haग्rस्aह कडे असते. कोणत्याही संग्रहालयांमध्ये सांस्कृतिक परंपराची जपणूक केली जात असल्याने अशा ठिकाणी सुयोग्य वस्तुसंग्रहालयाला अत्यंत महत्तपूर्ण स्थान असते. हा वस्तुसंग्रह करण्याची पद्धत ही व्यावसायिक स्वरूपाची व वास्तववादी असते. वस्तू खरेदी करण्याच्या अनेक पद्धती आहेत. बहुधा त्यामुळेच वस्तुसंग्रहालयाचे वस्तू खरेदी करण्याच्या पद्धती आहेत. बहुधा ह्यामुळेच वस्तूसंग्रहालयांचे वस्तू खरेदी करण्याचे काम हे अत्यंत कठीण व गुंतागुंतीचे झाले आहे. त्याचवेळी वेगवेगळ्या प्रकारचे नियम अंमलात आणणे हे ही वस्तूखरेदीच्या बाबतीत वास्तववादी होऊ शकत नाही. त्यामुळे वस्तू खरेदीच्या बाबतीत अनेक प्रकारची काळजी घेतली जाते. ती पुढीलप्रमाणे -

१. ज्या वस्तूंमुळे संग्रहालयाचे मूळ उद्दिष्ट सफल होत असेल अशाच वस्तू खरेदी कराव्यात.

२. स्थितीजन्य खरेदीच्या बाबतीत वस्तुंच्या मालकाची मुलाखत घेतली जाते.

३. तस्करी किंवा अयोग्य मार्गाने येणाऱ्या वस्तू तसेच नोंदणी न केलेल्या वस्तू आणि पूर्व इतिहास माहिती नसलेल्या वस्तूंची खरेदी करणे टाळावे.

४. वस्तुखरेदी करताना वस्तूंच्या विक्रेत्यांकडूनही वस्तू वैध मार्गांनी विक्रीसाठी झालेली आहे की नाही ह्याची संग्रहालयाच्या संबधित अधिकार्यांनी शहानिशा करून द्यावी. त्याचबरोबर अशी वस्तू खरेदी करताना वस्तूच्या मालकाशी औपचारिकरित्या खरेदी खत (करार) करावे. त्याचबरोबर त्या वस्तूंचा मालकी हक्कही (Copy Right) संग्रहालयाने मिळविण्याचा प्रयत्न करावा.

अशी खरेदी केंद्रीय सांस्कृतिक खात्याच्या आत होत असते.

### ३.२.३ देणगीस्वरूपात मिळालेल्या वस्तू :

कित्येकदा काही उद्योजक कुटुंब हे आपल्या मागच्या पिढ्यांचे वस्तू सांभाळायला असमर्थ असतात तसेच त्यांची पुढची पिढीही असमर्थ असते. अशा वेळेला घरांच्या वस्तू ते संग्रहालयांना दान करतात अथवा देणगी देतात. यात एक अट आहे. ती म्हणजे ज्या वस्तूदान केल्या आहेत. त्या वस्तूंच्या दालनात त्या कुटुंबाचे नाव किंवा स्वतःचे नाव द्यावे. त्यामुळे त्यांची स्मृती चिरंतर राहावी. अशा प्रकारच्या वस्तुंमुळे वस्तू संग्रहालयाची संपत्ती वाढते. कारण त्या वेळेला उद्योजकाने त्या त्या वस्तू करवून घेतल्या जातात. ते चित्रकला शिल्पकलेचा उत्तम नमुना असू शकतील. उदा. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये रतनटाटा कलेक्शन आहे. दान (देणगी) या स्वरूपांमध्ये कित्येक मुझियम धनवान होऊ शकतात.

उदा. कॅलिफोर्नियातील संग्रहालयात काही मिनीएचर पेन्टींग आहेत. हे कलेक्शन म@न्डी ॲगी म्युझीयममध्ये आहे. हे भारतीय लघुचित्राचं संग्रह 'एडवी बीनी'चे आहे.

### ३.२.४ वस्तूंची देवघेव :

ही पद्धत आंतरराष्ट्रीय राजनैतिक संबंधावर अवलंबून आहे. उदा. आपल्या राजनैतिक संबंधावर अवलंबून आहे. उदा. आपल्या देशाचे कोणत्या देशाची चांगले सांस्कृतिक संबंध आहेत. यावर ही पद्धत अवलंबून आहे. म्हणजे तिकडच्या वस्तू इकडे आणि इकडच्या वस्तू तिथे अशा प्रकारे वस्तूंची देवघेव चालते. ही तात्पुरती असते. उदा. नटराजची मूर्ती देवघेव करताना त्या वस्तूंची आंतरराष्ट्रीय किंमती काढल्या जातात. दोन वस्तूंची देवघेवीत किंमतीची समानता हवी यासाठी आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमतीची माहिती संचालकाला हवी. यात आपण तर आपल्या संस्कृतीची प्रितक तिकडे पाठवले तर दुसर्यांच्या संस्कृतींची प्रितक आपल्याला मिळाले पाहिजे, ही पद्धत देशादेशात चालते. त्याचप्रमाणे राज्याराज्यात चालू शकते. उदा. राजा केळकर वस्तुसंग्रहालय.

### ३.२.५ कर्जावू स्वरूपात वस्तू मिळविणे :

कित्येकदा २ म्युझियममधील व्यवहार हा कर्जाच्या स्वरूपात होतो. ही विशेषतः मोठ्या पातळीवरचा म्युझियम जर लहान पातळीवरील म्युझियमला कर्जाऊ रक्कम देत असेल तर ते कर्ज वसूल होईपर्यंत लहान म्युझियममधील वस्तू मोठ्या म्युझियमच्या पदरात असतात.

कर्जाऊ स्वरूपात वस्तू मिळवणे ही संग्रहालयांमध्ये सरसकट पडलेली प्रथा आहे. अशा कर्जात वस्तू दोन प्रकारे मिळवता येतात.

### १. कायमस्वरूपी कर्जावू वस्तू :

संग्रहालयातील बहुतेक वस्तूंचा पुरातत्व खात्यांकडून जे उत्खनन होते. त्यातून मिळणाऱ्या वस्तू असतात. अशा वस्तू पुरातत्वे खाते हे राष्ट्रीय दर्जाच्या संग्रहालयांना कायमस्वरूपी देणगी म्हणून देऊन टाकीत. अशा वस्तूंची मालकी ही ज्या वस्तू ज्या संग्रहालयांना देणग्या येतात त्यांच्याकडे सोपवलेली असते. तरीही ह्या वस्तू संग्रहालयामध्ये कायमस्वरूपांच्या म्हणून आलेल्या असतात.

### २. मर्यादित कालावधीच्या कर्जावू वस्तू :

काही वेळा संग्रहालयातून काही विशिष्ट विषयांचे प्रदर्शन भरविण्यासाठी इतर संग्रहालयांतून त्या विषयाशी संबंधित अशा कलाकृती वस्तू ह्या काही मर्यादित काळासाठीच ठेवून नंतर त्या परत कराव्या लागतात. ह्या वस्तूंची संग्रहालयाशी होणाऱ्या देवाणघेवाणीची अत्यंत काळजीपूर्वक नोंद करावी लागते.

कर्जावू स्वरूपाच्या वस्तू मिळविण्याच्या बाबतीत एक अडचण निर्माण होऊ शकते. कारण एखादा एखादे संग्रहालय अशा कर्जावू वस्तू देते म्हटल्यावर अशा स्वरूपाच्या वस्तूंच्या प्रदर्शन भरवण्यासाठी सतत मागण्या होऊ शकतात. अशा मागण्यांना सतत उत्तेजन देणे योग्य नाही. मात्र एखाद्या वस्तूची मालकी जर खाजगी असेल तर अशा मालकाला तात्पुरत्या प्रदर्शनासाठी वस्तू वापरण्याची मुभा देण्यासाठी उत्तेजन द्यावे.

**३.२.६. अचानक मिळालेला साठा/ खजिना :**

कोणत्याही तर्हेचे खोदकाम करताना एखादेवेळी अचानकपणे काही वस्तू सापडतात. उदा. नाणी, भांडी, सोन्याचांदीच्या वस्तू इ. अशा सापडलेल्या वस्तू ह्या सरकारकडे जमा केल्या जातात. त्यानंतर सरकार ह्या वस्तू संग्रहालयाकडे पाठवत असे.

असा खाजिना सापडल्यावर एक काळजी घेणे आवश्यक आहे. ती म्हणजे खजिना सापडताच त्यातील वस्तूंची छायाचित्रे काढून घेणे व वस्तूंची सविस्तर नोंद करणे हे आवश्यक आहे. तसे केल्याने तज्ञ लोकांना अशा वस्तूंचा अभ्यास करून त्या किती विश्वसनीय आहेत त्यांचे परिक्षण करता येईल.

असा साठा सापडला असेल तर प्रत्येक देशात त्यासंबंधी वेगवेगळे नियम आहेत. तो साठा संग्रहालयात किंवा गव्हर्नरला दिला जातो. हा साठा जवळच्या सरकारी कचेरीत द्यावा यासाठी नागरिकाला त्या वस्तूची जाण असावी. स्वार्थी लोक असल्यास तो साठा वंचित होत असेल तरी इतरांनी त्याची माहिती द्यावी.

**३.२.१. भेटीदाखल मिळालेल्या वस्तू :**

संग्रहालयात भेटीदाखल मिळणाऱ्या वस्तूही असतात. अशा वस्तू बहुधा खाजगी व्यक्तींच्या असतात. काही वेळा राजवाड्यात श्रीमंतांकडे अनेक वस्तू असतात. ज्यावेळी ह्या वस्तू त्यांच्या मालकांना नकोशा होतात. त्यावेळी ते ह्या वस्तू संग्रहालयांना भेटीदाखल देत असतात.

काही वेळा जागेची अडचण, आपल्या वस्तू नीट सांभाळल्या जातील या विश्वासाने ह्या वस्तू संग्रहालयाला भेटी म्हणून दिल्या जातात. अशा भेटीदखल दिलेल्या वस्तूमागे दात्याच्या भावनाही दडलेल्या असतात. आपण दिलेल्या भेटी ह्या प्रदर्शनीय असाव्यात असे वाटत असते. त्यामुळे आपल्या वस्तू भेट देण्यापूर्वी ते काही अटी टाकतात. त्यामुळे अशा वस्तू ह्या कायमच्या प्रदर्शनीय ठेवण्यात याव्या अशी अट टाकतात. अर्थातच अशा अटी मान्य करणे हे संग्रहालयाच्या विकासास अडचण ठरू शकते. अशा अटी लादलेल्या वस्तू स्वीकारणे शक्यतो टाळावे. वस्तूंची संपूर्ण व सुयोग्य नोंद ठेवणेही अत्यंत आवश्यक आहे.

वरील विवेचनावरून स्पष्ट होते की संग्रहालयामध्ये ठेवण्यात येणाऱ्या वस्तूंची निवडही वेगवेगळ्या पद्धतीने होत असते. अमूक एकाच पद्धतींनी वस्तू मिळवाव्यात. असे संग्रहालयावर बंधन नसते. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की कोणतेही संग्रहालय चैतन्यमय राखण्यासाठी तेही संग्रहालय पाहायला लोक आवडीने येऊ शकतील असे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. शिवाय लोकांच्या अभिरूचीप्रमाणे हे वातावरण निर्माण केल्यास संग्रहालयाचे उद्दिष्ट तर पूर्ण होईलच शिवाय त्यांचा विकासही होईल. संग्रहालयाचे चैतन्य राखण्यासाठी त्यांना सतत नवनवीन कलाकृतींच्या शोधात राहून आपल्या संग्रहालयाच्या अभिरूचीप्रमाणे आपल्या वस्तुसंग्रहालयात भर घातली पाहिजे.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न. वस्तुसंग्रहाच्या विविध पद्धती सांगा.

## ३.३ सारांश

अशाप्रकारे वस्तुसंग्रहालयाची व्याप्ती आधुनिक काळात खूप वाढलेली दिसून येते. संग्रहालयाचा आवाका फक्त पुरातत्वीय किंवा प्रचीन वस्तूंचा संग्रह आणि जतन एवढाच उरलेला नसून अनेक प्रकारच्या वस्तू व वारशांचे जतन करणे हे संग्रहालयाचे मुख्य काम झालेले आहे. या विविध प्रकारच्या संग्रहालयाचे नियोजन व प्रशासन उत्तमरितीने केंद्र सरकार, राज्य सरकार व इतर संस्था करताना दिसून येत आहेत. वस्तुसंग्रहालयामध्ये सुद्धा वस्तू जमा करण्याच्या योग्य त्या पद्धती वापरल्या जात आहेत.त्यामुळे संग्रहालयाची भूमिका लोकाभिमुख झालेली आहे, असे वरील विवेचनावरून दिसते.

## ३.४ प्रश्न

प्र.१. वस्तुसंग्रहालयाचे नियोजन विविध पातळीवर कशाप्रकारे केले जाते ते स्पष्ट करा.

प्र.२. वस्तुसंग्रहालयात वस्तुसंग्रहाच्या कोणत्या पद्धती वापरल्या जातात ते स्पष्ट करा.

प्र.३. वस्तुसंग्रहालयाची व्याप्ती सांगून संग्रहालयात वस्तु गोळा करण्याच्या पद्धती कोणत्या आहेत ते वर्णन करा.

प्र.४. टिपा लिहा.

(अ) वस्तुसंग्रहाची व्याप्ती

(ब) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालये

(क) राज्यस्तरीय वस्तुसंग्रहालये

(ड) संग्रहालयातील वस्तू गोळा करण्याच्या पद्धती

(इ) वस्तुसंग्रहाच्या पद्धती

## ३.५ संदर्भ

1. ThoratB.R., Principles of Museology, Archaeology, Archival &Library Science, Himalaya Publishing House, Mumbai-4

2. Banerjee, N. R., Museum and Cultural Heritage of India, Agam Kala Prakashan, New Delhi, 1990.

3. Dwivedi V.P, Museums and Museology: New Horizons, Agam Kala Prakashan, New Delhi, 1980.

4. Markham S. F., The Museums of India, The Museum Association, London, 1936.

5. Plenderleith H. J, The Conservation of Antiquities and Works of Art: Treatment, Repair and Restoration, Oxford University Press, New York, 1956.

6. Sarkar, H, Museums and Protection of Monuments and Antiquities in India, Sundeep Prakashan, New Delhi, 1981.

7. Thomson John M.A. and Others, Manual of Curatorship: A Guide to Museum Practice, Routledge, New York, 1984.

8. Wittlin Alma, Museums : Its History and Its Tasks in Education, Routledge and K Paul, London, 1949.

9. प्रा. डॉ. निशांत शेंडे, वस्तुसंग्रहालये , अथर्व पब्लिकेशन

10. कठारे अनिल , पाटील गौतम, पुरातत्वविद्या वस्तुसंग्रहालय आणि पर्यटन, विद्या बुक्स, औरंगाबाद.

11. देव शा. भा. , पुरातत्वविद्या

❖❖❖❖

# ४

## वस्तुसंग्रहालयातील वस्तुंचे जतन

**घटक रचना :**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ संग्रहालयाबाबतची काळजी व सावधानता

४.२.१ चोरी

४.२.२ तस्करी

४.२.३ विध्वंसक प्रवृत्ती

४.२.४ बेकायदेशीर उत्खनन

४.३ भारताच्या सांस्कृतीक मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी योजण्यात आलेल्या कायदेशीर उपाययोजना

४.३.१ ब्रिटिश सरकारने केलेले प्रयत्न

४.३.२ स्वातंत्र्यानंतरचे भारत सरकारचे प्रयत्न

४.३.३ युनेस्कोचे प्रयत्न

४.४ कलाकृतींचा नाशापासून प्रितबंध करण्यासंबंधी आणि काळजी घेण्यासंबंधीची मूलभूत तत्त्वे

४.४.१ पर्यावरणीय संर्वधन

अ - वस्तुंची हाताळणी, वेष्टनबंद आणि साठवून ठेवताना घेण्यात येणारी काळजी

ब - हवामानापासून वस्तुंची झीज न होण्यासाठी घेतलेली काळजी

४.५ सारांश

४.६ प्रश्न

४.७ संदर्भ

## ४.० उद्दिष्ट्ये

(१) वस्तुसंग्रहालयात वस्तुंची काळजी कशाप्रकारे घेतली जाते ते अभ्यासणे.

(२) वस्तुसंग्रहालयात वस्तुंबाबत कोणत्या प्रकारची सावधानता घेतली जाते ते जाणून घेणे.

(३) भारताच्या सांस्कृतीक मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी योजण्यात आलेल्या कायदेशीर उपाययोजना अभ्यासणे.

(४) कलाकृतींच्या नाशापासून प्रितबंध करण्यासंबंधी आणि काळजी घेण्यासंबंधीची मूलभूत तत्त्वे अभ्यासणे.

(५) वस्तुंचे पर्यावरणीय संवर्धन कशाप्रकारे केले जाते ते जाणून घेणे.

## ४.१ प्रस्तावना

वस्तुसंग्रहालयामध्ये विविध प्रकारच्या वस्तुंच्या संग्रह केला जातो. त्या वस्तूंचे प्रदर्शन संग्रहालयामध्ये भरविले जाते त्यातून आपणांस आपला प्रचीन इतिहास व सांस्कृतीक वारसा समजण्यास मदत होते. या कलात्मक वस्तू म्हणजे राष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा असतात. यामुळे अशा प्रकारच्या वस्तूंबाबत खूप सावधानता बाळगणे गरजेचे असते. चोरी, तस्करी, विध्वसंक प्रवृत्ती, बेकायदेशीर उत्खनन, अशा अनेक प्रकारच्या समस्यापासून बचाव करणे गरजेचे असते व योग्य ती काळजी घ्यावी लागते. याच दृष्टिकोनातून सुरुवातीला ब्रिटिश सरकारने व स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने भारताच्या सांस्कृतीक मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी अनेक कायदेशीर उपाययोजना केलेल्या आहेत. युनेस्कोने सुद्धा जागतिक पातळीवर अनेक कठोर कायदे पास केले आहेत. विविध प्रकारच्या कलात्मक वारशांचे जतन संग्रहलायमध्ये केले जाते त्यामुळे संग्रहालयाच्या पातळीवर सुद्धा अशा कलाकृतींच्या नाशापासून प्रितबंध व बचाव करण्यासाठी योग्य ती काळजी घेतली जाते. यामध्ये प्रमुख्याने पर्यावरणीय संवर्धन व संग्रहालयातील वस्तुंचे संवर्धन यांचा समावेश होतो.

## ४.२ संग्रहालयाबाबतची काळजी व सावधानता (CARE AND CAUTION)

भारत हा एक खंडःप्रय देश आहे. भारताला फार संपन्न असा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. भारतात आढळून येणारे किल्ले, मंदिरे, राजवाडे, थडगे, मोठे दरवाजे, हस्तलिखिते, चित्रे (Paintings), वेगवेगळे वस्त्रांचे नमुने, शिल्पे धातुकामाच्या वस्तु इ. सर्व वस्तु सांस्कृतिक मालमत्ता ह्या नावाने ओळखल्या जातात. भारताच्या गतकाळातील तांत्रिक आणि कलात्मक कौशल्यांची साक्ष देणारे हे अमर साक्षीदार आहेत. राष्ट्राचा अभिमानास्पद वारसा असल्याने त्यांची जपणूक करणे हे आवश्यक आहे. देशाचा हा वारसा सरकारने, संग्रहालयांनी आणि देशाच्या नागरिकांनीच जपावयाचा आहे. अशा वारसाचा आदर करून त्यांना नाश होण्यापासून वाचवणे व त्यांचे चिरंतन जतन करणे हे आवश्यक असते. तरीही त्यात दुर्दैवाची गोष्ट अशी की, अशा अभिमानास्पद सांस्कृतिक वारसाचे जतन करण्यात

अनेक अडचणी येत असतात. त्यातही काही नैसर्गिक घटक कारणीभूत असतात तर काही मानवी कृती देखील त्यास कारणीभूत ठरतात. त्यातही मानवी कृती ह्याच जास्त अडचणी निर्माण करतात त्यात प्रमुख्याने पुढील प्रकार येतात.

(१) चोरी (Theft)

(२) तस्करी (Smuggling)

(३) विध्वंसक प्रवृत्ती (Vandalism)

(४) बेकायदेशीर उत्खनन (Illicit Excavation)

### ४.२.१ चोरी (Theft)

सांस्कृतिक वारसा ठरेल अशा दुर्मिळ कलाकृतींची चोरी होण्याचा मोठा धोका असतो. अनेक वेळा संग्रहालयामधून अशा वस्तूंची चोरी झाल्याची उदाहरणे आहेत. अशा दुर्मिळ कलाकृतींना परदेशात खूपच मागणी असते. प्रचंड भावाने अशा वस्तु विकल्या जातात. त्यामुळे अशा दुर्मिळ वस्तु प्रचंड भावाने विकून पैसे मिळविण्यासाठी मोहापायी अशा छोट्या मोठ्या वस्तु संग्रहालयामधुन चोरून त्या परदेशी विकण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती कमी नसतात. शिवाय अशा वस्तू चोरणारे काही पोटाची खळगी भरण्यासाठी चोऱ्या करणारे गरीब चोरच असत नाहीत, तर ज्यांचे परदेशी ग्रहकांशी संबंध आहेत व चोरलेल्या वस्तु विक्रीस जाण्याची खात्री असणारे काही श्रीमंत, खानदानी लोकही अशा प्रकारच्या चोऱ्या करण्याच्या मोहाला बळी पडतात. हे लोक स्वतः चोऱ्या न करता भाबड्या गरीब लोकांना प्रलोभन दाखवून त्यांच्याकडून चोऱ्या करवून घेतात त्यामुळे जर चोरी पकडली गेली तर हे गरीब पकडले जातात व श्रीमंत लोकमात्र साळसूदपणाचा आव आणून गप्प बसतात.

वरील प्रकारे चोरीस जाणाऱ्या वस्तूंमध्ये बहुधा कलाकृती, पुराणवस्तु नाणी, शिल्पे, दुर्मिळ कपड्यांचे प्रकार इ. वस्तूंचा समावेश होतो. अशा वस्तू फक्त संग्रहालयातूनच चोरीस जातात असे नाही तर मंदिरे, चर्च अथवा संरक्षित अथवा असंरक्षित अशा जागांमधून चोरीस जातात. चोरी होऊ नये म्हणून बंदोबस्त केलेला असूनही अनेक वेळा वस्तू चोरीस जातात. अशा तर्हेच्या काही चोर्यांची नोंद घेतली आहे. त्या पुढीलप्रमाणे -

(अ) इ.स. १९६२ व १९६७ मध्ये बिहारमधील नालंदा येथील पुरातत्व विभागाच्या वस्तुसंग्रहालयातून जवळजवळ चौदा मुल्यवान ब्रॉझ (कांस्य) धातूच्या मूर्तीची चोरी झाली होती.

(ब) इ.स. १९६६ मध्ये (दिल्लीच्या) नॅशनल म्युझियमधून मध्ययुगीन कालखंडातील सुवर्णनाण्यांची चोरी झाली होती.

(क) इ.स. १९७० मध्ये चंदिगढ वस्तू संग्रहालयातून दोन अत्यंत मूल्यवान (Miniature) भित्तीचित्रांची चोरी झाली होती. ही चित्रे चोरणारे चोर तर वस्तुसंग्रहालयात लपून बसले होते. त्यांनी ही चोरी केली.

(ड) दिल्लीच्या लाल किल्ल्यात पुरातत्व विभागाचे वस्तुसंग्रहालय आहे त्यातही चोरी होऊन त्या बंदुकीची दारू, भोंगे, उत्तम कशिदाकरी केलेली किंमती वस्त्रे इ. वस्तु चोरीस गेल्या होत्या.

(इ) या व्यतिरिक्त मोठी वस्तूसंग्रहालये उदा. सालारजंग संग्रहालय, प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय इ. चोरीच्या धोक्यापासून बचावलेली नाहीत. तेथेही अनेकवेळा चोऱ्या झालेल्या आहेत. तर इ.स. १९६९ ते १९७३ पर्यंत वेगवेगळ्या संग्रहालयामध्ये आणि जवळजवळ १६४० वेळा चोऱ्या नोंदल्या गेलेल्या आहेत.

अशा तर्हेच्या चोर्यांचा तपास करणे हे अत्यंत कठीण काम असते. काहीवेळा चोरलेल्या वस्तू परदेशी ग्रहकांना विकल्या गेल्यावर उघडकीस येतात. उदा. मथुरा येथून चोरलेले बुद्धाचे एक दुर्मिळ शिल्प स्वीत्झर्लंडमधील दलालाला विकले गेले होते. हे शिल्प जहाजातून भारताबाहेर नेले गेले होते. त्या दलालाने या शिल्पाचा सौदा बर्लिनमधील भारतीय मानववंश (Ethnology) विभागाच्या संग्र्रहालयांशी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले त्यावेळी हा पुतळा मथुरेतून चोरला गेलेला आहे हे उघडकीस आले.

अशा तर्हेने संग्रहालयातून अनेक दुर्मिळ वस्तू चोरीस जातात परंतु त्या वस्तूंचा तपास लावणे हे अत्यंत गुंतागुंतीचे काम होते. शिवाय बहुसंख्यवेळा चोर्यांचा तपास लागत नाहीत.

### ४.२.२ तस्करी (Illicit Trade or Smuggling):

वर नमूद केल्याप्रमाणे चोरीचा प्रकार आणि तस्करी ह्यात अत्यंत साम्य आहे. दुर्मिळ वस्तूंच्या चोऱ्या करून वस्तूंची परदेशात अवैध मार्गानी तस्करी करणे हाच तर चोरीमागचा हेतू असतो. ह्याचे कारण अगदी उघड आहे हे म्हणजे दुर्मिळ कलाकृती पदेशात प्रचंड भावाला विकल्या जातात व त्यातून चोरांना प्रचंड नफा कमावता येतो त्यामुळेच अनेक सभ्य समजले जाणारे लोकही अशा प्रकारच्या चोऱ्या करण्यासाठी उद्युक्त होतात.

अशा प्रकारे चोऱ्या करणार्यांची एक मोठी साखळीच असते. त्यात स्वतः वस्तु चोरणारा चोर, त्याच्याकडून वस्तू ताब्यात घेणारी व्यक्ती, मध्यस्थ, भारतीय दलाल व परकीय दलाल जो अशी वस्तू विकत घेऊ इच्छित आहे अशी ती साखळी असते. या संबंधात १९७८ मध्ये सेन आणि उपाध्याय अहवाल प्रिसद्ध झाला असून तो पुढीलप्रमाणे आहे.

"आतापर्यंतच्या विविध राज्यांच्या अहवालांवरून आणि घडलेल्या चोरींच्या घटनांवरून असे सिद्ध होते की, उत्तर भारतात साखळी पद्धतीने अथवा सामुहीक पद्धतीने चोरी करण्याचे प्रमाण अत्यंत वाढलेले असून ह्या पद्धतीने चोरल्या गेलेल्या वस्तूंची पुनर्विक्री करण्यातही मोठमोठ्या संघटित टोळ्या सामील झालेल्या आहेत. अशा तर्हेच्या वस्तू विकत घेणारे दलाल हे मोठमोठ्या प्रेक्षणीय केंद्राच्या ज्या ठिकाणी (उदा. मुंबई, कलकत्ता, दिल्ली, जयपूर इ.) आपले बस्तान बसवून असतात व त्यांचे परदेशी ग्रहकांशी लागेबांधे असतात. छोट्या शिल्पापासून मोठ्या कलाकृतींपर्यंत तसेच सहज नेता येणाऱ्या छोट्या ते मोठ्या लहानप्रतिकृती, चित्रकलेची अल्पाकृतिशाखा पर्यंत विविध प्रकारच्या वस्तू चोरीस जात असतात."

असे असले तरीही अशा तर्हेचा अवैध तस्करीच्या मार्गाने करण्यात येणारा वस्तूंचा व्यापार करण्यात फार मोठी जोखीम असते. शिवाय वस्तूची मालकी अवैध मार्गांनी बनविणे, दुर्मिळ वस्तूंना मागणी आहे हे पाहून अनेक वेळा नकली वस्तूदेखील बनवल्या जाऊन त्यांचाच खोटा व्यापार होतो. अनेकवेळा भारतीय आणि परदेशी दलालांचीही दुर्मिळ वस्तू खरेदी-विक्रीच्या बाबतीत फसवणूक झालेली आहे. चित्रकलेची अस्सल नमुने म्हणून नकली नमूने विकणे, अस्सल प्रचीन नाण्याऐवजी तशीच दिसणारी नकली नाणी विकणे अशासारखी फसवणूक अनेकवेळा होते. अशातर्हेच्या नकली वस्तूंची विक्री झाल्याचे उदाहरण पुढीलप्रकारे आहेत. अशातर्हेची फसवणूक ही देशाच्या प्रितमेला काळीमा लावते.

इ.स. १९५६ मध्ये तामिळनाडूमधील तंजावर येथे शिवपूरम मंदिरात एक उत्कृष्ट असा नटराजाचा ब्राँझचा पुतळा सापडला. हा पुतळा मंदिराच्या विश्वस्त मंडळाच्या सुपूर्त करण्यात आला होता. पुढे १९५६ सालच्या अखेरीस ह्या पुतळ्याची साफसफाई व डागडुजी करण्यासाठी तो एका ताबंटाकडे दिला परंतु साफसफाई करून विश्वस्त मंडळाकडे तो पुतळा परत आला तेव्हा असे लक्षात आले की, तो पुतळा अस्सल नसून हुबेहुब त्या पुतळ्याची नक्कल आहे. अस्सल पुतळा केवळ ५००० रूपयांना एका व्यक्तीला विकला गेला होता. त्या व्यक्तीने तो पुतळा मद्रासमधील एका परदेशी कंपनीला १७००० रूपयाला विकला. पुढे इ.स. १९६४ मध्ये त्या पुतळ्याची दुसऱ्या एका २५००० रू. किमतीच्या ब्रॉझ पुतळ्यासाठी अदलाबदल झाली. इ.स. १९८६ मध्ये तो मूळ पुतळा परत ५ लक्ष रूपयांना विकला गेला. पुढे १९७० मध्ये पुतळा अमेरिकेतील नॉर्दन सायमन या एका खाजगी संग्रहकाने विकत घेतला आणि आजच्या घडीला त्या पुतळ्याची किंमत अक्षरसः लक्षावधी डॉलर्स (कोट्यावधी रूपये) झालेली आहे.

त्याने हा पुतळा इंग्लंडमध्ये दुरूस्तीसाठी पाठवलेला असतानाच ही चोरी प्रथम हिंदुस्थानी अधिकाऱ्याच्या प्रथमच नजरेस आली. त्यावेळ स्कॉटलंड यार्डच्या (इग्लंडचे पोलीस दल) मदतीने भारत सरकारला या मूर्तीचा ताबा परत मिळवता आला व श्री. सायमन आणि भारत सरकार करार होऊन ही मूर्ती भारतात परत आणण्यात आली.

### ४.२.३ विध्वंसक प्रवृत्ती (Vandalism):

राष्ट्रीय कलेच्या वारश्यांची जपणूक करण्यामध्ये अनेक तर्हेचे धोके उद्भवतात. त्यातील प्रमुख धोका म्हणजे वस्तूंची नासधूस होणे हा कधीकधी जाणूनबुजून केलेला असतो तर कधी कधी अशी नासधूस ही अजाणतेपणे झालेली असते. कशाही प्रकारची असली तरी त्याने वस्तूंचा नाश होतो हे खरे.

वस्तूंची नासधूस ही अनेक कारणांनी होत असते. उदा. अनेकवेळा मजेखातर ते अनेक उत्कृष्ट शिल्पांच्या चीपेला छिन्नविछिन्न करतात, दगडी शिल्पाची तड़ाखा उत्सूकतेपोटी करतात, त्यावर तेलकटपणाची पुटे चढवतात त्यांच्या भक्कमतेचे परिक्षण करण्यासाठी त्यावर ओरखडे उमटवतात तर कधी कधी अशा शिल्पांवर, भिंतीवर, खांबावर, गुफांवर आपण भेट दिल्याची आठवण रहावी म्हणून आपली नावे कोरून ठेवतात. कधी कधी अशा ठिकाणी थुंकून ते ही जागा खराब करत असतात तर कधी अशा जागांना नैसर्गिक विधींचे ठिकाण बनवतात.

अजाणतेपोटी अशा मूर्खपणाच्या गोष्टी ह्या लोकांपासून घडणे एकवेळ समजू शकतो. परंतु सुशिक्षित अधिकारी, आधुनिक नगर रचनाकार आणि शासकीय संस्थाकडून जेव्हा अशा तर्हेचा विध्वंस घडतो तेव्हा काय म्हणावे? अशा लोकांची उदाहरणे पुढीलप्रमाणे -

(१) गतकाळातील इतिहासाचे अवशेष भारतातून इंग्लंडमध्ये जहाजाद्वारे नेताना मोईराचे अर्ल यांनी जराही अपराधीपणा वाटत नसेल? हे तर सुशिक्षित, इंग्लंडचे अधिकारी होते. त्यांनी शहाजहानच्या राजवाड्यातील संगमरवरी चौथ्या किंगजॉर्जना भेट म्हणून दिला होता. त्याचप्रमाणे प्रचीन काळातील कलेच्या वैभवाची साक्ष देणाऱ्या अमरावती येथील बौध्द स्तूपाच्या कलाकूसरीचा भाग काढून इंग्लंडला नेणाऱ्या मेकेन्झी ह्यांना काय म्हणावे? म्हणावे तर हे दोघेही इंग्लंडचे उच्चशिक्षित, राजनैतिक वर्तुळातील लोक होते. त्यांनाही ह्या तर्हेने भारताचा सांस्कृतिक वारसा लुटताना काही वाटले नाही? शिवाय ही संपत्ती काही त्यांच्या देशाची नव्हती. बहुधा म्हणूनच ती लूटताना त्यांना काहीच वाटले नसावे. हीच जर त्यांच्या स्वतःच्या देशातील संपत्ती असती तर  कदाचित त्याचे रक्षण करावे असे त्यांना वाटले असते. ही झाली परकीयांची उदाहरणे. परंतु खुद्द भारतातील नगर रचनाकार आणि शासकीय संस्था ह्यांनी अशा तर्हेचा सांस्कृतिक वारसा नष्ट करताना काही वाटत नाही असे दिसते. हे लोक अनेकवेळा असे प्रकार करत असतात.उदा. एखादा नवीन रेल्वेमार्ग बनवत असताना जर एखादी रस्त्याचे रूंदीकरण करत असताना, एखादा नवीन औद्योगिक वसाहत उभी करताना तर पाणी पुरवठ्यासाठी योजना अमलात आणंत असताना अशा तर्हेचा सांस्कृतिक वारसा नष्ट होत असतो. (उदा. प्रचीन शहर विजयपुरीचे अवशेष नागार्जुन सागर धरणाखाली गेले ते द्यावे)

संग्रहालयांतील वस्तूंचा देखील अनेकवेळा नाश होत असतो. असा नाश प्रमुख्याने जेव्हा अमूल्य मूर्ती अयोग्य मार्गांनी हाताळताना, त्यांची वाहतुक करताना अथवा अयोग्य ठिकाणी साठा, संचय केल्याने होत असतो. कधी कधी तर त्यावर निष्काळजीपणे रासायनिक प्रक्रिया केल्यामुळे त्या उत्खनन होण्याऐवजी आणखीच हानी होत असते.

### ४.२.४ बेकायदेशीर उत्खनन (Illicit Excavation):

भारताला अतिशय प्रचीन असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. खंडःप्रय अशा देशामध्ये पुरातत्वीय झालेल्या जागा आहेत. अशा ऐतिहासिक दृष्ट्या सर्वच जागा संरक्षित असे नाही. तर अशा जागा नेमक्या हेरून त्या जागी अवैध उत्खनने करून तेथील विविध प्रकारच्या मूल्यवान वस्तू मिळवून त्या विकून त्यातून पैसा मिळवण्याचा प्रयत्न करणारे अनेक जण असतात. शिवाय अनेकवेळा काही कारणांनी जमीनींचे खोदकाम करताना अचानकपणे गुप्तधन अथवा वस्तूंचा ठेवा उपलब्ध होतो. अशावेळी स्थानिक अशिक्षित लोकांना ह्या वस्तूंचे महत्व आणि मुख्य माहीती नसल्याने ते अशा वस्तू मध्यस्थामार्फत दलालाला थोड्याशा किंमतीत विकून टाकून पैसा मिळवतात. अशा वस्तूंचे सांस्कृतिक महत्व ह्या लोकांच्या अडाणीपणामुळे त्यांना कळत नसते त्यांचा फायदा हे मध्यस्थ व दलाल घेऊन थोड्या किंमतीत ह्या वस्तू विकत घेतात व भरमसाठ किंमतीत त्याची विक्री करत असतात. हे सर्व व्यवहार अवैध असतात. कसेही असले तरी ह्या सर्व बाबींमुळे भारताचा सांस्कृतिक वारसाला हानी पोहचत असते.

**आपली प्रगती तपासा.**

प्र. संग्रहालयातील वस्तुंची काळजी कशी घेतली जाते ते सांगा.

## ४.३ भारताच्या सांस्कृतिक मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी योजण्यात आलेल्या कायदेशीर उपाययोजना

भारतात अनेक मंदिरे, राजवाडे, ऐतिहासिक वस्तू आहेत. यातून अगणित अशी संपत्ती वस्तुंच्या व नाणी, सुवर्ण इ. रूपांत साठवलेली आहे. शिवाय भूमीमध्ये दडवलेल्या संपत्तीचे प्रमाणही प्रचंड आहे. त्यांची मोजदाद करणे अशक्य आहे. त्यामुळे सांस्कृतिक वारसा ठरेल अशा प्रचंड संपत्तीचे जतन करण्यासाठी सरकारला अपरिहार्यपणे कायदे करावे लागले आहेत.

### ४.३.१ ब्रिटिश सरकारने केलेले प्रयत्न :

वस्तूंची हानी, चोरी अथवा नाश होण्यापासून वाचविण्यासाठी त्यांच्यासाठी सुरक्षिततेच्या उपाय योजना करण्याचे प्रयत्न काही आताच सुरू झाले नाहीत, तर ते ब्रिटिशांच्या काळापासूनच सुरू झाले होते. ब्रिटिश सरकारने भारतावर राज्य करताना वेळोवेळी पावले उचलून अशा सांस्कृतिक वारशाची जपणूक करण्याचा प्रयत्न केला. अशा उपाययोजना पुढीलप्रमाणे -

(१) १८१० मध्ये १९ वा बंगालचा नियामक कायदा भारतातील कोणत्याही सार्वजनिक स्मारके इमारती अथवा ऐतिहासिक अवशेषांची हानी करण्यास कायदेशीर बंदी घालण्यात आली.

(२) १८१३ मध्ये भारताचे ग.ज. मार्क्विस ऑफ हेस्टींग्जचे फत्तेपूर-सिक्री, रामबाग, आणि सिकंदरा येथील ऐतिहासिक वस्तूंचे संरक्षण करण्याचे आदेश दिले.

(३) १८७३ मध्ये देशातील केंद्रसत्तेने प्रांतिक सरकारांना उद्देशून एक परिपत्रक काढले यानुसार देशातील ऐतिहासिक आणि स्थापत्यकलेच्या दृष्टिकोनातून महत्वाच्या असणाऱ्या वस्तूंच्या जतन करण्याचा आदेश प्रतीक सरकारांना देण्यात आला.

(४) इ.स. १८७८ मध्ये लॉर्ड लिटनच्या कारकिर्दीत The Treasure Act सापडलेला खजिना संबंधित कायदा संमत करण्यात आला. यावेळेस लॉर्ड सॅलिसबरी हे भारतमंत्री होते. सरकारी नोकरांनी पुरातत्वीय व ऐतिहासिक महत्वाच्या जागा व वस्तु लुटण्यासाठी (rifling) जी वृत्ती होती तिस आळा घातला ह्या कायद्यातील तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) कायद्यानुसार १००० पेक्षा अधिक मूल्य असलेल्या वस्तू जर सापडल्या तर त्यांचा ताबा मिळविण्याचा अधिकार सरकारला राहील.

(ब) एखाद्या व्यक्तीला जर गुप्त धनाचा ठेवा हाती लागला अथवा सापडला तर त्वरीत अशा खजिन्याचा अहवाल देण्यात यावा. सरकारने अशी खजिन्यांची नोंद घेतल्यावर ते ज्या व्यक्तीला तो सापडला आहे त्याला परत द्यावयाचा की सरकारी ताब्यातच ठेवायचा याचाही

निर्णय सरकारच घेईल. यावेळेस लॉर्ड स@लिबरी हे भारतमंत्री होते. सरकारी नोकरांची पुरातत्वीय व ऐतिहासिक महत्वाच्या जागा व वस्तू चोरण्याची जी वृत्ती होती तिचा निषेध केला.

(५) लॉर्ड कर्झन सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी जरी कायदेशीर उपाय योजना आखल्या गेल्या तरीही त्या विशेष प्रभावी ठरल्या नाहीत. भारतातील दुर्मिळ कलाकृतींच्या अवस्थेविषयी लॉर्ड कर्झनने आपले असमाधान पुढील शब्दात व्यक्त केले आहे, "परिपूर्ण पात्रतेच्या सल्लागार तज्ञ मंडळाच्या अभावी भारतातील सुंदर आणि प्रसिद्ध इमारती विनाशाच्या गर्तेकडे चालल्या आहेत. शिवाय अशा स्मारकाची दुरूस्ती कशी करावी, त्यांचे संवर्धन कसे करावे ह्याबाबत कोणत्याही तर्हेची तत्त्वे किंवा एकवाक्यता नाही. प्रचीन ऐतिहासिक वस्तूंच्या संरक्षणाच्या दृष्टीने आणखी एक पाऊल उचलले गेले या कायद्यानुसार भारतातील संरक्षित अशा ऐतिहासिक महत्वाच्या जागा ह्या केंद्रसरकारच्या ताब्यात (अखत्यारीत) आल्या तर असंरक्षित अशा ऐतिहासिक महत्वाच्या जागा ह्या केंद्रसरकारच्या ताब्यात दिल्या गेल्या. इ.स. १९०४ मध्ये The Ancient Monuments and Preservation Act 'प्रचीन स्मारके व संरक्षण कायदा' हा कायदा समंत करण्यात आला. प्रचीन वस्तूंचे जतन करण्यासाठी, त्यांची तस्करी रोखण्यासाठी अवैध मार्गानी होणाऱ्या उत्खननावर बंदी घालण्यासाठी आणि काही विशिष्ट प्रकरणा मध्ये अशा ऐतिहासिक वस्तूंचा आणि दुर्मिळ कलाकृतींचा संरक्षण व ताबा मिळविण्यासाठी हा कायदा करण्यात आला होता. अद्याप कायद्यात देखील काही त्रूटी होत्या. उदा. सौंदर्य विध्वंसासाठी अथवा चोरीसाठी गुन्हेगारास ५००० रूपये पर्यंत दंड किंवा ३ महिने कैद अथवा ५००० रू दंड आणि ३ महिने गुन्ह्यासाठी शिक्षांचे प्रमाण मामूली होते.

कोणतीही व्यक्ती अथवा खुद्द एखाद्या दुर्मिळ वास्तूचा अथवा कलाकृतींचा मालक, त्याने जर अशा वास्तूंचा नाश करण्याचा प्रयत्न केला, अथवा कलाकृती जागेवरून हालविण्याचा प्रयत्न केला तर अशा व्यक्तीस रूपये ५००० पर्यंत दंड अथवा ३ महिने तुरुंगवास अथवा दंडासह ३ महिने तुरुंगवासात टाकले जाईल.

(१) मॉर्टिमर व्हिलर सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने भारत स्वतंत्र होईपर्यंत काही कायदेशीर प्रयत्न केले गेले नाहीत. परंतु १८ एप्रिल १९४८ ला दुर्मिळ कलाकृतींच्या तस्करीवर बंदी घालण्यासाठी डायरेक्टर जनरल श्री. मा. व्हीलर यांनी 'प्रचीन कलाकृती निर्माण नियंत्रण कायदा' समंत केला.

### ४.३.२ स्वातंत्र्यानंतरचे भारत सरकारचे प्रयत्न :

भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने प्रचीन कलात्मक वस्तुंच्या संरक्षणाच्या दृष्टिकोनातून अनेक कायदे पास केले. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे (Ancient monument and Archaeological Sites and Remains Act १९५८)

भारताच्या स्वातंत्र्याप्रप्तीनंतर भारताची बदलती परिस्थिती लक्षात घेऊन भारताचा सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या उद्देशाने Ancient monument and Archaeological Sites and Remains Act १९५८ कायदा संमत करण्यात आला.

देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बदलत्या परिस्थितीला अनुसरून पुराण वस्तूसंवर्धनाच्या दृष्टीने नवीन कायदे करणे आवश्यक होते. विशेषतः नवीन इमारती बांधणे, नवीन नगरे बसवणे, अशासारख्या घटना घडू लागल्या होत्या. अनेकवेळा ह्या नवीन इमारती अथवा नवीन नगरे ही प्रचीन वास्तूंच्या हानीची झळ पोहोचत होती. या शिवाय मूळ ब्रिटिशांच्या काळात झालेले कायदे (सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने) हे ही आता भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार बदल करणे आवश्यक होते. त्यासाठी इ.स. १९५८ मध्ये हा कायदा संमत करण्यात आला. ह्या कायद्यामध्ये सर्व तर्हेच्या मालमत्ता जतन करण्यासाठी प्रयत्न केले गेले. त्यातही विशेषतः १०० वर्षापेक्षा जूनी कोणतीही ऐतिहासिक वास्तू ही शासकीय अखत्यारीत आणली गेली. त्यासाठी या कायद्याच्या प्रस्तावना पुढील तीन तत्त्वांचा समावेश करण्यात आला :-

१. प्रचीन आणि ऐतिहासिक स्मारक आणि सांस्कृतिक दृष्ट्या व पुरातत्वीयदृष्ट्या महत्वाच्या जागांना राष्ट्रीय महत्व देण्यात यावे.

२. कोरीव शिल्पे आणि तत्सम कलाकृतींना संरक्षण देण्यात यावे.

३. पुरातत्वीय उत्खननाचे नियमन करण्यात यावे.

(नवीन कायद्यानुसार) केंद्र सरकारकडे संरक्षित जागा व महत्वाच्या दुर्मिळ कलाकृतींचा ताबा दिला गेला. परंतु आश्चर्यांची गोष्ट म्हणजे ह्या कायद्यावरून मार्गदर्शक तत्वांमध्ये प्रचीन कलाकृती ह्या शब्दाचा समावेश केला नव्हता तरीही Antiquity ह्या अर्थाचे वर्णन मात्र सविस्तर केले होते आणि विशेषतः Antiquity (exports control) Act of १९४७ च्या कायद्याप्रमाणे Antiquity ह्या शब्दाचे वर्णन त्यात होते.

**The Antiquities and Art Treasures Act of 1972 :-**

देशातील सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी जरी कितीही कायदेशीर उपाययोजना करण्यात आल्या तरी १९६० च्या दशकभरात दुर्मिळ कलाकृतींच्य चोऱ्या अवैध्य मार्गानी तस्करी वगैरे प्रमाण फार वाढले आहे. दुर्मिळ कलाकृतींचा अवैध मार्गांनी व्यापार करून त्यातून पैसा कमाविण्याचे प्रमाण तर फारच वाढले आहे. मोठ्या प्रमाणावर दुर्मिळ शिल्पे, चित्रे, पैसा, प्रचीन नाणी व इतर वस्तू चोरीस जाऊ लागल्या. ह्य चोऱ्या संग्रहालये, मंदिर पुरातत्वीय जागा आणि खाजगी अखत्यारीतील वस्तूंच्या होत होत्या ह्या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार होऊन इ.स. १९७२ मध्ये "The Antiquities and Art Treasures Act of 1972" हा कायदा संमत करण्यात आला. ह्या कायद्यात दुर्मिळ कलाकृती ह्या संकल्पनेची व्याख्या अत्यंत सुस्पष्टपणे सांगितली गेली. ती पुढीलप्रमाणे :-

**१.** (अ) कोणत्याही स्वरूपाची नाणी, शिल्पे, चित्रे कोरीव लेख अथवा कलेचे अणि कलाकृतीचे नमुने हे म्हणजे Antiquity.

(ब) कोणत्याही गुंफेतील अथवा / ऐतिहासिक / वास्तूतील कोणतीही वस्तू किंवा अवशेष.

(क) गतकालीन विज्ञान, कलाकृती, वाड्मय, धार्मिकदृष्ट्या, नैतिकदृष्ट्या, पारंपारीकदृष्टया अथवा राजकीयदृष्ट्या महत्वाची वाटणारी अशी कोणतीही वस्तू.

(ड) ऐतिहासिक महत्व प्राप्त झालेली कोणतीही वस्तू.

(इ) (कायदेशीर राजपत्राद्वारा) केंद्र सरकारने (सूचित) केलेली कोणतीही वस्तू .

**२.** वैज्ञानिक, ऐतिहासिक, वाड्मयीन अथवा सौदर्यात्मक मूल्य असलेले कोणतेही हस्तलिखिते, नोंदी अथवा इतर कागदपत्रे जी साधारणपणे ७५ वर्षापेक्षा अधिक जुनी आहेत ती सर्व कागदपत्रे होत.

**३.सापडलेला खजिना किंवा ठेवा, संपत्ती (Art Treasure):**

"कलेचा खजिना म्हणजे सौंदर्यात्मक मूल्य असलेली कोणतीही स्वरूपातील मानवी कारागिरी अथवा कला ते म्हणजे हस्तोद्योग आणि विज्ञान नव्हे." शिवाय आता तस्करी रोखण्यासाठी प्रत्येक कलाकृतीची नोंद करणे अनिवार्य करण्यात आले. शिवाय नवीन कायदे अंमलात आणता यावेत म्हणून आणि त्या वेळोवेळी बदलत्या परिस्थितीनुसार बदल घडवून आणता यावेत ह्यासाठी तरतुदी देखील करण्यात आल्या.

**४.३.३ युनस्कोचे प्रयत्न :**

तस्करीचे प्रितबंध, निवारण करण्यासाठी विशेषतः सांस्कृतिक कलाकृतींची व अवैध मार्गांनी होत असणारी आयातनिर्यात अथवा त्यांची मालकी हक्क हस्तांतरणावर बंदी घालण्यासाठी ळर्प्एण्ध् ने इ.स. १९७० मध्ये एक कायदा संमत केला. १९७४ मध्ये त्यास सांस्कृतिक कलाकृतींची आतंरराष्ट्रीय देवाण घेवाण कायदा घडवून आणण्यासाठी काही शिफारशी करण्यात आल्या. यानुसार पुढील अटी ठरविण्यात आल्या -

१. राष्ट्राराष्ट्रांतील परस्पर सहकार्याला महत्व देण्यात आले व एखाद्या देशातील अशी एखादी दुर्मिळ कलाकृती जर अवैध मार्गानी देशाबाहेर गेली तर तो देश योग्य त्या कागदपत्रांच्या नोंदी दाखवून ती वस्तू ज्या देशात गेली आहे, त्या देशातून ती हस्तगत करू शकतो.

   तसेच ह्या कायद्यानुसार असे लक्षात घेतले गेले की, सर्व देशांची सांस्कृतिक मालमत्ता ही फक्त त्या देशाचीच नव्हे तर संपूर्ण मानवजातीचाच सामाईकपणे सांस्कृतिक वारसा आहे आणि त्या वारशाचे संरक्षण करणे ही फक्त एखाद्या देशाचीच नसून सर्वच सभासद राष्ट्रांची ती जबाबदारी आहे, असे स्पष्ट करण्यात आले.

२. सभासद राष्ट्रांनी अशा सांस्कृतिक कलाकृतींची आंतरराष्ट्रीय देवाणघेवाण, मग ती कोणत्याही स्वरूपाची असो उदा. कर्जाऊ स्वरूपाच्या विक्री व दान तथा सर्वसंमत होतील अशा तर्हेने करावी. परंतु अवैध मार्गानी होणाऱ्या व्यापारांस थारा देऊ नये.

**बिगर शासकिय संस्थेचे कार्य :-**

याशिवाय इतरही बिगर शासकिय संस्था ह्या तर्हेच्या सांस्कृतिक वारसा करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत आहेत. ह्या संस्था म्हणजे -

1. International Commission of Monuments and Sites (ICOMOS)

2. The International Council of Museums (ICOM)

अशा तर्हेने सांस्कृतिक वारशाचा अवैध व्यापार होऊ नये अथवा त्यांना हानी पोहोचू नये ह्यासाठी वेळोवेळी कठोर उपाययोजना करण्यात आल्या. परंतु तरीही त्यात कितीही त्रूटी राहीलेल्या आहेतच. विशेषतः खाजगी अखत्यारीतील कलाकृतींचा ताबा मिळावा म्हणून योग्य असे कायदे संरक्षण मिळेल असेही बहुव्याप्ति कायदे नाहीत, वाढते प्रदूषण (ज्यामुळे ऐतिहासिक वास्तूंना धोका उद्भवू शकतो उदा. ताजमहाल) रोखण्यासाठी अजूनही नीटशा झालेल्या नाहीत. नवीनवीन औद्योगिक वसाहती निर्माण करताना त्यामुळे ऐतिहासिक वास्तूंचा धोका उद्भवू नये यासाठी काही निश्चित मार्गदर्शक तत्वाचा अवलंब केला गेला नाही. शिवाय ह्याबाबतीत घडणाऱ्या गुन्ह्यांना कठोर शिक्षेला देखील कारवाई करण्यात येत नाही. अशा तर्हेच्या अनंत अडचणी ह्या देशाच्या सांस्कृतिक मालमत्तेचे जतन करण्याच्या कामामध्ये अडथळे निर्माण करीत आहेत.

खरे म्हणजेच कठोर कारवाईचे पालन हे फक्त केंद्रसरकारने करावयाचे नसून ते पोलीस खात्याने शिवाय भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, जकात खात्याने राज्य सरकारच्या पुरातत्त्व विभागाचे तसेच संग्रहालये, ग्रंथालये आणि पुराभिलेख विभाग ह्या सर्वांनी मिळून करणे अत्यंत गरजेचे आहे. कलाकृती अथवा इतर महत्वाच्या वस्तू चोरी आणि तस्करीपासून वाचविण्यासाठी त्यावर करडी आणि गुप्तनजर ठेवणे ही आवश्यक आहे. सामान्यपणे असंरक्षित जागांहून यामध्ये उत्खनन केलेल्या जागा, राजवाडे इ. अशा वस्तूंची चोरी होते म्हणून विशेष कायदे तयार करायला हवेत. यासाठी यांच्याशी निगडीत असलेल्या स्वतंत्र न्यायालये व शिवाय वस्तूंची अवैध तस्करी, चुकीच्या नोंदी इ. प्रकरणे हाताळण्यासाठी जकात खात्याला योग्य ते अधिकार दिले पाहिजेत आणि अशा गुन्ह्यांसाठी अत्यंत कठोर शिक्षाही दिल्या पाहिजेत.

अशातर्हेने विविध धोक्यांपासून मानवाचा सांस्कृतिक वारसा कलाकृती जपण्यासाठी प्रत्येक देशाने प्रयत्न करणे अगत्याचे आहे. देशांच्या सरकारने आणि लोकांनाही आपल्या सांस्कृतिक वारसाचा आदर राखून त्याच्या जपणुकीचे प्रयत्न करणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे असे मानले पाहीजे. शिवाय या सांस्कृतिक वारसाचा आदर करून त्याच्या जपणूकीचे काम हे फक्त एका देशाचे अथवा देशातील लोकांचेच नाहीतर ते अखिल मानवजातीचीच जबाबदारी आहे. कारण हा सांस्कृतिक वारसासुद्धा सर्व मानवजातीचाच असतो.

**आपली प्रगती तपासा**

प्र. भारताच्या सांस्कृतिक मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी योजण्यात आलेल्या कायदेशीर उपाययोजना सांगा.

## ४.४ कलाकृतींचा नाशपासून प्रितबंध करण्यासबंधी आणि काळजी घेण्यासंबंधीची मूलभूतत्त्वे (BASIC PRNCIPLES - PREVENTION AND CARE)

देशाच्या आणि मानवजातीच्या सांस्कृतिक वारसा ठरेल अशा सर्वच वस्तूंचे रक्षण करणे हे आवश्यक असते. या संबंधी श्री. सारा स्टेनीफर्थ यांच्या मते, "वस्तूंची योग्य सुरक्षितता ठेवण्यासाठी उपाय योजणे आणि त्या वस्तूंची योग्य पुनर्रचना करणे अथवा पुनःर्स्थापन करणे ह्याकडे लक्ष देणे म्हणजेच वस्तूंचे रक्षण करणे हे होय." अशाप्रकारच्या वस्तू ह्या अनेक वेळा वेगवेगळ्या कारणांनी खराब होण्याची शक्यता असते त्याचे रक्षण करण्यात वेगवेगळ्या तर्हेच्या अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे अशा वस्तूंचा नाश होण्यापासून वाचवले पाहिजे. या संदर्भात त्यांचे दोन प्रमुख योजना पुढीलप्रमाणे आहेत. वस्तूंचा नाश हा सामान्यपणे पर्यावरणीय कारणामुळे होत असतो. त्यामुळे नाश थांबवण्यासाठी काही उपाययोजना केल्या जातात. त्याचे दोन प्रकार पुढीलप्रमाणे.

१. पर्यावरणीय संवर्धन (Environmental Conservation)

२. वस्तूसंग्रहालयातील वस्तूंचे संवर्धन (Conservation of Musuem objects)

वस्तुसंग्रहालयातील वस्तुंचे पर्यावरणीय संवर्धन कशाप्रकारे केले जाते हे पाहूया.

### ४.४.१ पर्यावरणीय संवर्धन (Environmental Conservation):

पर्यावरणीय संवर्धनामध्ये प्रमुख्याने हवामानाचा कोणताही परिणाम होऊ नये म्हणून अनेक प्रकारची काळजी घेतली जाते. अशी काळजी प्रमुख्याने वस्तू हाताळताना, वस्तूंची ने आण करताना (Travelling) वस्तू संरक्षक वेष्टनात बंद करताना (Packing) आणि वस्तूंचे नमुने साठवून ठेवताना (Storing) घेतली जाते. उत्खननानंतर सापडलेल्या वस्तूंवर रासायनिक प्रक्रिया झाल्यामुळे हळूहळू त्या नष्ट होतात. पर्यावरण हे वस्तूंच्या संवर्धनामध्ये मोठी भूमिका बजावत असतो. स्थिर अशा वातावरण (ज्यात फार बदल होत नाही अशा) जर वस्तू ठेवल्या तर त्यांचे सवर्धन हे चांगल्या तर्हेने होऊ शकते. शिवाय वस्तंूची झीज कमी होऊन त्या अधिक काळ टिकू शकतात. अनेक वस्तू ह्या उत्खननातून आपण बाहेर काढतो. त्यावेळी त्यावर वातावरणाचा परिणाम होऊ लागतो. अशा प्रकारच्या परिणामास 'सूक्ष्म पर्यावरणीय परिणाम' (Micro-environment) असे म्हणतात. शिवाय बराच काळ त्या मातीत पुरल्या गेल्या असल्याने अशा वस्तू नाजूक होतात आणि म्हणूनच अशा वस्तू बाहेर काढताना व त्यांचे सवर्धन करताना प्रत्येक टप्प्यात त्याची अत्यंत काळजी घेणे आवश्यक असते.

अ वस्तू हाताळणी, (Packing) वेष्टनबंद आणि साठवून ठेवताना (Store) घेण्यात येणारी काळजी :-

- **वस्तूंची हाताळणी :**

संग्रहालयातील वस्तूंची झीज / हानी ही प्रमुख्याने भौतिक आणि शारिरीक घटकांमुळे होत असते. वस्तूंची हाताळणी योग्य तर्हेने झाली नाही. तर वस्तूंना हानी पोहचू शकते. म्हणून

वस्तू हाताळताना हातात सुती हातमोजे घालून अथवा सुती वस्त्राच्या सहाय्याने ती वस्तू हाताळावी, तसेच जरूरीप्रमाणे वस्तूंची हाताळणी चिमट्यांनी (Foreceps) करावी. वस्तूची ने-आण करताना हातातून नेण्याऐवजी त्या तबकामधून (tray) नेण्यात याव्यात. वस्तूंची साफसफाई करताना अत्यंत मऊ अशा ब्रशचा वापर करावा. वस्तू जर मोठ्या असतील (उदा. मोठमोठ्या दगडी मूर्ती, अवजारे इ. तर त्या तेथून दुसरीकडे नेताना पुरेशा लोकांनी मिळून हळूवारपणे उचलून न्यावी. एकट्या दुकट्या व्यक्तीला अशा वस्तू उचलता येणे अशक्य असते.)

- **वस्तूंचे वेष्टनबंद (Packing) करताना घेण्यात येणारी काळजी :-**

वस्तू वेष्टनबंद करताना वेष्टनासाठी जे साहित्य वापरले जाते ते अचल असावे आणि वस्तूंची हानी होणार नाही अशा स्वरूपाचे असावे. रिकामे प्ला@स्टिकचे डबे, वस्तू वेष्टनबंद करण्यासाठी विशिष्ट स्वरूपाचे बनलेले डबे, शिंप्याकडून शिवून घेतलेल्या विशिष्ट पिशव्या यांचा वापर करण्यात येणे आवश्यक असते. शिवाय वस्तू डबाबंद करण्यापूर्वी वस्तूंवर मऊ गादीच्या थराचे संरक्षक असे गुंडाळणे आवश्यक आहे. आणि सुस्पष्ट आणि कार्यक्षम नोंदी लावणे ही आवश्यक असते. या तर्हेची काळजी घेऊन वस्तूंचे संरक्षण चांगल्या तर्हेने करता येते.

- **वस्तूंची ने-आण करताना घेण्यात येणारी काळजी (Transporting) :-**

वस्तुची सर्वात जास्त काळजी वस्तूंची ने-आण करताना घेतली जाते. ती वस्तूंची ने-आण करण्याच्या वेळी वस्तू छोटी असो, ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना, लोखंडी पट्ट्यांचे आवरण असलेल्या लाकडी खोक्यांतून नेणे आवश्यक आहे. शिवाय त्याभोवती स्पंजचे अथवा घोंगडीचे आवरणही केले असले पाहिजे. त्यामुळे वस्तूंचे संरक्षण होऊ शकते. वस्तूंच्या संरक्षणाच्या दृष्टीने या गोष्टी मूळ महत्त्वाच्या असतात.

- **वस्तूंचे नमुने साठवून ठेवताना (Store) देखील काळजी घेतली पाहिजे -**

वस्तूंची जर नीट साठवण केली नाही, तर वस्तू हाताळताना, वेष्टनबंद करताना, ने-आण करताना जी काळजी घेतली जाते ती सर्व व्यर्थ ठरते. अशा वस्तू साठवण्यासाठी जागा ही कोरडी आणि स्वच्छ असावी. त्या जागेची आकाररचना चांगली असावी की जेणेकरून ती तसेच पुरातत्वीय उत्खननात सापडलेल्या वस्तू नीट ठेवता येतील, इतपत मोठी असावी. आर्द्रता, तापमान, प्रकाश इत्यादींचे योग्य प्रमाण असावे तरच संग्रहालयातील वस्तुंचे जीवनमान वाढू शकते व ती अधिक काळ टिकून राहू शकते.

### (ब) हवामानापासून वस्तूंची झीज न होण्यासाठी घेतलेली काळजी (Care against Climatic Conditions) :

प्रकाश (light), तापमान (Temparature), आर्द्रता (Humidity) हवेचे प्रदूषण, (घाण आणि धूळ यामुळे होणारे) इत्यादी गोष्टींमुळे वस्तूंची झीज अथवा हानी होऊ शकते. प्रकाश वस्तूंना दोन प्रकारे हानी पोहोचू शकतो. एक म्हणजे, 'रंगीत वस्तू (ज्या नाशवंत आहेत

अशा) उदा. कापड, चित्र इत्यादींचे रंग फिक्कट होण्याची शक्यता असते, दुसरे म्हणजे कापड वगैरे वस्तूंची झीज होऊ शकते.

**(१) प्रकाश (light) -**

थेट स्वरूपाचा आणि रासायनिक मंद स्वरूपाचा प्रकाश हा प्रमुख्याने कागद, कपडे इत्यादी वस्तूंना अत्यंत हानीकारक असतो. त्यामुळे अशा वस्तू ठेवलेल्या ठिकाणी प्रकाश योजना ही वस्तूंना हानीकारक न ठरेल अशा स्वरूपांची केली जाते. वस्तू संग्रहालयातील वस्तूंच्या संरक्षणासाठी उष्णताकिरण शोषून घेऊन प्रकाशकिरण परावर्तीत करणारी (Fluorescent) दिव्याची योजना केली जाते. अशा दिव्याचे तापमान हे ४५००० असते. या व्यतिरिक्त पारदर्शक काचेचे तावदान (Transparent glass pane) चाही विचार होऊ शकतो. ज्या वस्तू अत्यंत संवेदनाशील असतात अशा वस्तूंना पडद्याचे आवरण घालणेही योग्य ठरते. आणि प्रकाशापासून वस्तूंची हानी होऊ न देण्यासाठी संग्रहालय ज्यावेळी लोकांसाठी खुले नसेल अशावेळी तर शक्य असेल तेवढा कमी प्रकाश वस्तूपर्यंत पोहोचवणे अथवा प्रकाश योजना बंद ठेवणेही योग्य ठरते. वस्तू ठेवण्याच्या विभाग शक्यतो अंधारातच ठेवावा.

**(२) तापमान (Temperature) :**

वस्तूंवर सर्वात जास्त हानीकारक परिणाम कशाचा होत असेल तर तो तापमानाचा त्यामुळे वस्तूंचे आयुर्मान कमी होते. तीव्र तापमानामुळे वस्तू भंग पावू शकतात. तर कमी तापमानात त्या सर्व बाजूंनी दाबल्या जातात. हे टाळण्यासाठी समतोल अथवा योग्य ते तापमान ठेवणे आवश्यक असते. जेथे वस्तू प्रदर्शनीयरित्या ठेवलेल्या असतात तेथे सामान्यतः १८ ते २५० सेंटिग्रेड पातळीवरील तापमान योग्य ठरते.

**(३) सापेक्ष आर्द्रता (Relative Humidity) :** सापेक्ष आर्द्रता ही पुढीलप्रकारे मोजली जाते.

हवेतील पाण्याचा अंश

सापेक्ष आर्द्रता = त्या विशिष्ट तापमानात जास्तीत जास्त असू शकणारा पाण्याचा अंश

श्री. प्लेंडरलीथ यांनी वातावरणातील सापेक्ष आर्द्रतेच्या मर्यादा स्पष्ट केलेल्या आहेत. त्यांच्या मते "६०० ते ७००" फरनाईटच्या तापमानात सामान्यपणे ५०... ते ६५... असणारी आर्द्रता ही सापेक्ष आर्द्रता असते.

अशी स्थिती वस्तुसंग्रहालयातील व्यवस्थापनाकरीता समृद्धीकारक असते. सर्व प्रकारच्या साहित्य किंवा वस्तूमध्ये थोडातरी पाण्याचा अंश असतो. कोरड्या हवेत हा पाण्याचा अंश कमी होतो आणि आर्द्र हवेत तो वाढतो. तो ओलसरपणा, बुरशी आणि जीवाणू यांच्या वाढीसाठी कारणीभूत ठरतो. सापेक्ष आर्द्रतेवर ताबा मिळवणे हे वस्तूंच्या संरक्षणासाठी आवश्यक असते. हवेतील आद्र्रतेचा समतोल राखण्यासाठी उपकरणांचा वापर केला जातो. त्यामुळे संग्रहालयात कलाकृती जेथे ठेवल्या आहेत तेथील आर्द्रता कमी होऊ शकते. ह्याशिवाय आर्द्रता नियंत्रणाचा (Humidity Controllers) वापर खोल्याभोवतालची हवा खेळती करण्यासाठी केला जातो. खोल्यांच्या कोपर्यांमध्येही हवा खेळती राहण्यासाठी जलगुरूत्वमापक (hydrometers) यंत्राचा वापर केला जाते. तर सापेक्ष आर्द्रतेचा पूर्णप्रितबंध करण्यासाठी वातानुकूलीत साधनांचा (air-conditioners) वापर केला जातो.

**(४) प्रदूषण, घाण व धूळ (Dirt and Dust) :**

आजकाल देशाचे झपाट्याने शहराचे औद्योगिकरण होत असल्यामुळे प्रदुषण, धूळ (Dust) आणि (Dirt) घाण यांचे प्रमाणही वाढत आहे. ह्या औद्योगिकरणामुळे शहरांमध्ये फारच थोडी जागा धूळ आणि घाणीविरहित असेल. ज्वलन क्रिया, स्वयंचलित गाड्यांमधून निघणारा धूर इत्यादींमुळे संग्रहालयातील वस्तूंवर धुळीची पुटे चढू लागतात. त्यामुळे वस्तूंना हानी पोहोचू शकते व त्यांची झीज होऊ शकते. या समस्या सोडविण्यासाठी वेळोवेळी वस्तूंवरील धूळ साफ करायची व वस्तू धूळविरहित काचबंद अशा शोकेसमध्ये ठेवाव्यात. ह्याशिवाय काही वस्तू हवाबंद ठेवणे शक्य नसते. त्यांची नित्य साफसफाई करावी. प्रदूषण टाळण्यासाठी फिल्टर, वॉटर, स्प्रे इत्यादींचा वापर करावा. प्रदूषण टाळण्यासाठी वातानुकुलीत यंत्राचा वापर करणे हा एक उत्तम उपाय आहे.

**आपली प्रगती तपासा -**

प्रश्न:-पर्यावरणीय संवर्धन कशाप्रकारे केले जाते ते सांगा.

## ४.५ सारांश

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, कलात्मक वस्तूंचा नाशापासून बचाव करण्यासाठी व आपला प्रचीन सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या दृष्टिकोनातून अनेक प्रयत्न स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतरही झाले. परंतु त्यास एवढे यश लाभले असे दिसून येते. वस्तुसंग्रहालयामध्ये वस्तूंची काळजी योग्य पद्धतीने घेण्यासाठी प्रिशक्षित व्यवस्थापक व कर्मचारी यांची नेमणूक केली पाहिजे तसेच सरकारने राष्ट्रीय व राज्य पातळीवर अनेक कठोर उपाययोजना केल्या पाहिजेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर अशा वस्तूंची तस्करी रोखण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. वस्तुसंग्रहालयातील वस्तूंचे पर्यावरणीय संवर्धन योग्यप्रकारे झाले पाहिजे. यामुळे आपल्या देशाचा सांस्कृतिक वारसा योग्य पद्धतीने पुढील पिढीसाठी जतन करून ठेवता येईल. या दृष्टीकोनातून वस्तुसंग्रहालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

## ४.६ प्रश्न

प्र.१. वस्तुसंग्रहालयाबाबतची काळजी व सावधानता यावर सविस्तर टीप लिहा.

प्र.२. भारताच्या सांस्कृतिक मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी योजण्यात आलेल्या कायदेशीर उपाययोजनेचे वर्णन करा.

प्र.३. वस्तुसंग्रहालयातील कलाकृतींचा नाशापासून प्रितबंध करण्यासंबंधी आणि काळजी घेण्यासबंधीची मूलभूत तत्त्वे कोणती ते स्पष्ट करा.

प्र.४. टिपा लिहा.

(अ) संग्रहालयाबाबतची काळजी व सावधानता

(ब) पर्यावरणीय संवर्धन.

## ४.७ संदर्भ

1. ThoratB.R., Principles of Museology, Archaeology, Archival &Library Science, Himalaya Publishing House, Mumbai-4
2. Banerjee, N. R., Museum and Cultural Heritage of India, Agam Kala Prakashan, New Delhi, 1990.
3. Dwivedi V.P, Museums and Museology: New Horizons, Agam Kala Prakashan, New Delhi, 1980.
4. Markham S. F., The Museums of India, The Museum Association, London, 1936.
5. Plenderleith H. J, The Conservation of Antiquities and Works of Art: Treatment, Repair and Restoration, Oxford University Press, New York, 1956.
6. Sarkar, H, Museums and Protection of Monuments and Antiquities in India, Sundeep Prakashan, New Delhi, 1981.
7. Thomson John M.A. and Others, Manual of Curatorship: A Guide to Museum Practice, Routledge, New York, 1984.
8. Wittlin Alma, Museums : Its History and Its Tasks in Education, Routledge and K Paul, London, 1949.
9. प्रा. डॉ. निशांत शेंडे, वस्तुसंग्रहालये , अथर्व पब्लिकेशन
10. कठारे अनिल , पाटील गौतम, पुरातत्वविद्या वस्तुसंग्रहालय आणि पर्यटन, विद्या बुक्स, औरंगाबाद.
11. देव शा. भा. , पुरातत्वविद्या

❖❖❖❖

# ५

# वस्तुसंग्रहालयातील वस्तुंचे संवर्धन

**घटक रचना :**

५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्तावना

५.२ वस्तुसंग्रहालयातील वस्तुंचे संवर्धन

५.३ वस्तुंचे विविध प्रकार

५.३.१ सेंद्रिय (Organic) स्वरूपाच्या वस्तू

५.३.२ असेंद्रिय (Inorganic) स्वरूपाच्या वस्तू

५.३.३ आपली प्रगती तपासा

५.४ वस्तुसंग्रहालयातील वस्तु सादरीकरणाचे तंत्रे

५.४.१ वस्तुसंग्रहालयाची इमारत

५.४.२ प्रकाशयोजना

५.४.३ खेळती हवा

५.४.४ आपली प्रगती तपासा

५.५ वस्तुसंग्रहालयातील वस्तुप्रदर्शनाचे प्रकार

५.५.१ कायमस्वरुपी प्रदर्शन

५.५.२ तात्पुरत्या स्वरूपाचे प्रदर्शन

५.६ सारांश

५.७ प्रश्न

५.८ संदर्भ

## ५.० उद्दिष्ट्ये

(१) वस्तुसंग्रहालयातील वस्तुंचे संवर्धन कशाप्रकारे केले जाते ते अभ्यासणे.

(२) वस्तुंचे विविध प्रकार जाणून घेणे.

(३) सेंद्रिय आणि असेंद्रिय स्वरुपाच्या वस्तुंचे संवर्धन कशाप्रकारे केले जाते ते अभ्यासणे.

(४) वस्तुसंग्रहालयातील वस्तुंच्या सादरीकरणाची तंत्रे समजूण घेणे.

(५) वस्तुसंग्रहालयामधील प्रदर्शनाचे प्रकार अभ्यासणे.

## ५.१ प्रस्तावना

भारताच्या संस्कृतीचा कलात्मक वारसा जतन करण्याचे काम वस्तुसंग्रहालये करतात. वस्तुसंग्रहालयातील विविध वस्तुंचे संवर्धन अनेकप्रकारे सग्रंहालये करीत असतात. कलाकृतींचा नाशापासून प्रितबंध करण्यासाठी आणि त्यांची काळजी घेण्यासाठी संग्रहालयांनी अनेक उपाययोजना केलेल्या आहेत. वस्तुंचे विविध प्रकारात म्हणजेच सेंद्रिय आणि असेंद्रिय असे वर्गीकरण करता येते. या वस्तुंचे संवर्धन करणे ही खूप मोठी जबाबदारी संग्रहालये पार पाडीत असतात. लोकशिक्षणाचे काम करीत असताना वस्तूंचे ज्ञान सामान्य लोकांना सहजरित्या समजण्यासाठी संग्रहालये सादरीकरणाची विविध तंत्रे अवलंबतात. यामुळे अनेक गोष्टींची माहिती सामान्यलोकांना समजते व त्यांचा प्रचीन सांस्कृतीक ठेवा समजण्यास मदत होते. वस्तुसंग्रहालयाचे यश संपूर्णतः त्यांच्या वस्तूंच्या प्रदर्शनावर अवलंबून असते. वस्तुंचे योग्यरित्या प्रदर्शन मांडणे ही मोठी जबाबदारी संग्रहालये पार पाडतात. वस्तुसंग्रहालयातील वस्तूंच्या प्रदर्शनाचे अनेक प्रकार आहेत त्यातील महत्वाचे म्हणजे कायमस्वरूपी प्रदर्शन आणि तात्पुरत्या स्वरूपाचे प्रदर्शन अशाप्रकारे वस्तुसंग्रहालये प्रदर्शनाच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे भरीव कार्य करीत असतात.

## ५.२ वस्तुसंग्रहालयातील वस्तूंचे संवर्धन

उत्खननातून मिळालेल्या वस्तूंची काळजी घेऊन त्यांचे जतन करणे म्हणजे वस्तुसंग्रहालयाचे वातानुकुलित वस्तुंचे संवर्धन होय. सेंद्रिय आणि असेंद्रिय वस्तूंचे आर्युमान वाढविण्यासाठी त्यांची साफसफाई करणे व त्यांचे जतन करणे म्हणजेही संवर्धन होय.

उत्खननाच्या जागी जेव्हा वस्तू मिळतात तेव्हा त्यांची प्रथमिक पहाणी करून त्यांची जुजबी सफाई करणे आवश्यक असते. हे उत्खननाच्या साईटवरील (Camp) प्रयोगशाळेत केले जाते. पुढे वस्तु पूर्ण साफ करून मग त्याचे संग्रहालयात जतन केले जाते. उत्खननातून मिळालेल्या वस्तूंची काळजी घेऊन त्यांचे जतन करणे म्हणजेही वस्तुंचे संवर्धन होय. सेंद्रिय आणि असेंद्रिय वस्तूंचे आयुर्मान वाढविण्यासाठी त्यांची साफसफाई करणे व त्यांचे जतन करणे म्हणजेही संवर्धन होय. वस्तूंची साफसफाई करणे हे अत्यंत कौशल्याचे काम आहे. वस्तूंची सरसकट साफसफाई करण्यामुळे वस्तूंना इजा पोहचू शकते. एलिझाबेथ पे ह्यांच्या शब्दात सांगायचे झाले तर वस्तूंचा नाश अथवा हानी पोहोचणे हे साफसफाईचे हेतू नसून मूळ वस्तू जशा होत्या तशा स्पष्ट दिसण्यापर्यत आणणे हे होय. म्हणूनच वस्तूंच्या साफसफाईचे काम करण्यासाठी प्रिशक्षित अधिकार्यांची नियुक्ती करण्यात यावी. वेगवेगळ्या विभागांच्या साफसफाईसाठी वेगवेगळे अधिकारी नेमले जावेत. व एकाच अधिकार्याकडे सर्व विभागांची साफसफाई देऊ नये. वस्तूंचे संवर्धन करण्याच्या बाबतीत दिवसेंदिवस नवनवीन संशोधन होत असल्याने त्याचे प्रिशक्षण ह्या साफसफाईच्या अधिकार्यांना देण्यात यावे. त्यासाठी छोट्या किंवा एकदिवसीय कार्यशाळा आयोजन कराव्यात व त्यांना अत्याधुनिक ज्ञान द्यावे.

पुनर्स्थापना किंवा वस्तूंची जर आधीच झीज झालेली असेल तर त्यांना आणखी झीज होण्यापासून वाचवून, त्यांच्यात दुरुस्ती  करून त्या शक्यतो मूळ पदाला आणण्यासाठी

प्रयत्न करावेत. काही वेळा वस्तूंचे काही भाग हे नष्ट झालेले असतात. त्यामुळे त्यांचा आधार नष्ट होऊन त्यामुळे इतरही काही भाग निखळून पडणे शक्य असते अशावेळी जे भाग नष्ट झालेले असतील त्यांची दुरुस्ती करून त्या वस्तूना प्रदर्शनीय रूप देण्याचा प्रयत्न करावा.

## ५.३ वस्तूंचे विविध प्रकार

वस्तूसंग्रहालयामध्ये विविध वस्तूंचा संग्रह केलेला असतो. वस्तूंचे स्वरूप ज्याप्रकारचे असेल त्याप्रमाणे त्यांची काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी वस्तूंचे सामान्यपणे दोन प्रकारे वर्गीकरण केले जाते.

१. सेंद्रिय (Organic) स्वरूपाच्या वस्तू

२. असेंद्रिय (Inorganic) स्वरुपाच्या वस्तू

### ५.३.१. सेंद्रिय (Organic) स्वरूपाच्या वस्तू:

लाकूड, बांबू, कागदी, कापडी, चामडे, कातडी इ. वस्तू, हाडे, हस्तिदंती, हाडांचे सापळे, जनावरांची शिंगे, छापील प्रत आणि चित्रे, झाडांची पाने, अन्नपदार्थांचे अवशेष इत्यादी वस्तूंचा समावेश हा सेंद्रिय प्रकारात मोडतो. असेंद्रिय वस्तूपेक्षा सेंद्रिय वस्तूंची झीज लवकर होत असल्याने त्यांचे आयुर्मान कमी असते.

**(अ) लाकडी आणि बांबूपासून बनवलेल्या वस्तू :-**

अत्यंत प्रचीन काळापासून मानवाने वस्तू बनविण्यासाठी लाकडाचा उपयोग केलेला आहे. कारण लाकूड मानवाला सहजरित्या अवतीभोवती उपलब्ध होते. लाकूड हे झाडापासून मिळवलेले असते आणि ते सेंद्रिय प्रकारात मोडते. त्यावर जीवशास्त्रीय अथवा रासायनिक प्रक्रिया झाली तर त्यांची झीज अधिक तीव्रतेने होऊ लागते. ह्याशिवाय बुरशी हा तर लाकडी वस्तूंचा मोठा शत्रू आहे. त्यात अनेक जंतूही जाऊ शकतात. अशा वस्तूंकडे जर सुरुवातीपासून लक्ष पुरवले नाही तर त्यांचे तुकडे होऊ शकतात. म्हणून या वस्तूंचे जतन करण्यासाठी त्यांची अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी अनेक पद्धतींचा अवलंब करण्यात येतो त्यापैकी काही पुढीलप्रमाणे :-

(i) जंतूपासून बांबू व लाकडी वस्तूंचा बचाव करण्यासाठी हायड्रोसायनिक (HCN) कार्बन डायसल्फाईड (CS2) (Vapour) धुके किंवा वाफ, तसेच केरोसिन आणि कुड क्रियोसोट द्रावणचा उपयोग केला जातो. हायड्रोसायनिक वायू हा विषारी असल्याने त्याचा संग्रहालयामध्ये प्रमुख्याने वापर केला जातो म्हणजे लाकूड आणि बांबूतील जंतू मारले जातात.

(ii) बांबूपासून आणि लाकडापासून बनविलेल्या वस्तू जर वाईट अवस्थेत असतील तर त्या वस्तू ओल्या स्वरुपात ठेवतात की जेणेकरून त्यांचे तुकडे होऊ नयेत.

(iii) या बहुधा कापडामध्ये गुंडाळून मग त्या पॉलिथिन मध्ये गुंडाळून (Damp) ठेवल्या जातात म्हणजे त्यांचा जंतूपासून बचाव होऊ शकतो.

(iv) अशा वस्तू, ग्लिसरीन अथवा विनिल एसिटेट अथवा अल्कोहोलच्या सहाय्याने कोरड्या (सुकवल्या) केल्या जातात. मात्र ही प्रक्रिया अत्यंत मंद गतीने व्हावयास हवी.

(v) जंतूपासून बचाव होण्यासाठी लाकडी वस्तूंवर मेण गरम करून त्याचा थर देणे ही पद्धत देखील अंमलात आणली जाते.

(vi) ग्लू अथवा जिलेटिन यांचा वापर लाकडी वस्तूंमधील छिद्रे किंवा रंध्रे (Pores) भरून काढण्यासाठी केला जातो. त्यामुळे लाकडाचा टिकावूपणाही वाढतो.

**(ब) कागदी वस्तू :**

संग्रहालयामध्ये अनेक वस्तू अशा असतात की त्या कागदापासून बनविल्या जातात. अशा वस्तू विशेषतः कागदापासून बनविलेल्या वस्तुमध्ये हस्तकला वस्तू, मोठमोठी चित्रे, रंगविलेली चित्रे इत्यादींचा समावेश होतो. अशा कागदी वस्तू या सेंद्रिय प्रकारात मोडत असल्याने त्या अधिक नाशवंत असतात. त्याप्रमाणे झुरळे, किडे, मुंग्या, वाळवी, पुरूची किडे इ. पासून कागदी वस्तूंना फारच धोका असतो. विशेषतः चाई यांची वाढ झपाट्याने होत असल्याने त्यांच्या पासून सावध असणे भाग आहे. कागदीवस्तूंचा बचाव करण्यासाठी पुढील उपाय योजना केल्या जातात.

(i) तापमान व सापेक्षा आर्द्रता हे योग्य प्रमाणात ठेवण्यासाठी प्रयत्न केले जातात त्यासाठी सापेक्ष आर्द्रतेचे ५०... आणि ६०... मध्येच राहील अशी काळजी घेतली जाते. तसेच वातानुकुलित (एअरकंडीशनर) बसविला जातो.

(ii) दालनांमध्ये प्रदूषणरहित हवा ठेवण्यासाठी हवा गाळून घेतली जाते. त्यासही एअर फिल्टरर्सचा वापर करण्यात येतो.

(iii) नियमितपणे सर्व वस्तूंची पाहणी केली जाते आणि धुरी देऊन शुद्ध केले जाते.

(iv) लाकडी कपाट ह्यातील खण, पुस्तकांसाठीचे शेल्फ, इत्यादींवर डि.डि.टी (D.D.ऊ.) सारखे जंतूनाशक फवारे मारले जातात.

(v) अशा वस्तूंचा जंतूपासून बचाव करण्यासाठी तंबाखूची पाने, कापराच्या वड्या इत्यादी पुस्तकांच्या पानांमध्ये आणि वरती-खालती कापराच्या वड्या वापरल्या जातात. तसेच आजूबाजूस फिनेल शिंपडले जाते.

(vi) जलरंगातील चित्रे, छपाईची कामे व नुसतीच चित्रकामे यांच्याबाबतीत नियमित साफसफाई केली जाते. त्यामुळे त्यांचे रंग खराब होऊ नये म्हणून अशा वस्तूंची नियमितपणे सफाई केली जाते. त्यावरील धुळ ब्रशच्या सहाय्याने काळजीपूर्वक साफ केली जाते. तसेच कापडाच्या सहाय्याने अल्कोहोल लावले जाते. तसेच बेंनझिन व पेट्रोल यांच्या सहाय्याने त्यावरील ग्रीसचे ठिपके काढले जातात अथवा छायाचित्रांच्या प्रती व वॉटर प्रुफ शाईने पुढेच चढविली जातात.

**(क) जनावरांच्या हाडांपासून अथवा कातडीपासून बनविलेल्या वस्तूंची काळजी :**

अनेक वस्तू या प्रण्यांच्या शरीराच्या कापडी व हाडांपासून बनविलेल्या असतात. त्यात प्रमुख्याने गाय, घोडा इ. पासून मिळविल्या जातात. या प्रण्यांच्या कातडीस रॉ. (Raw) असे म्हणतात किंवा हाइड (Hide) प्रण्यांच्या कच्च्या कातडीपासून वस्तू बनविणे मात्र काही वेळा अशा कातडीवर काही प्रक्रिया करून मग त्यापासून वस्तू बनविल्या जातात. त्याला क्युरिंग (Curing) असे म्हणतात. तर कातडी मिळविल्यानंतर ती पूर्णपणे कमावणे झाल्यावर त्या पासून वस्तू बनविणे याला प्रेसिसिंग असे म्हणतात.

कातडी वस्तू या देखील नाशवंत असतात. कातडी वस्तू सांभाळून ठेवणे हे फार कठीण काम आहे. विशेषतः कातडी वस्तूंना सूक्ष्म जंतूपासून अत्यंत धोका असतो त्यामुळे जनावरांपासून कातडी मिळवून त्यापासून वस्तू बनविणे यासाठी कातडीवर अनेक प्रक्रिया केल्या जातात. त्या प्रक्रियेत कातडीला योग्य रंग देणे, त्याचप्रमाणे आम्लांचा वापर करणे. तसेच वातावरणातील ऑक्सीडेशनमुळे धोका पोहचण्याची शक्यता असते. अशावेळी वस्तूंचा बचाव करण्यासाठी पुढील उपाय योजना केल्या जातात.

(i) वातावरणातील आर्द्रतेचे संतुलन करणे.

(ii) कार्बन-डाय-सल्फाईड सारख्या बुरशीनाशकांचा वापर करणे.

(iii) ६०... एरंडेल तेल व ४०... अल्कोहोल मिसळून २४ तास ठेवून त्यापासून बनलेल्या द्रावणाची कातडी वस्तूंवर थर देणे व रंग देणे.

(iv) ५... प्रमाणे असलेल्या कार्बोलिक साबणाच्या द्रावणामध्ये चांगल्या कातडी वस्तूंचे पाणी शोषून घेणे.

**(ड) कापडी वस्तू (वस्त्रोद्योग) Textiles :**

नैसर्गिक धागे हे प्रणीजन्य व वनस्पतीजन्य अशा दोन स्वरूपांचे असतात. मात्र उत्खननात अशा स्वरूपाची वस्त्रे फारच क्वचितच मिळालेली आहेत. जेव्हा अशा स्वरूपाची वस्त्रे मिळतात त्यावेळी त्याची अवस्था अत्यंत नाजूक अशी असते. शिवाय उत्खननातून अशा वस्तू मिळाल्यानंतर त्यावर हवा, तापमान, आर्द्रता, धुळ इ. वस्तूंचा परिणाम होत असतो. याशिवाय वातावरणातील विविध वायूंशी त्याचा संयोग झाल्यामुळे त्यावर रासायनिक प्रक्रिया घडून येऊ शकतात. शिवाय जिवाणू व बुरशी सारख्या सूक्ष्म जंतूपासूनही कापडाला धोका असू शकतो. संग्रहालयातील कापडी वस्तूंना या सर्व गोष्टींपासून धोके उद्भवू शकतात. त्यापासून त्यांचा बचाव करण्यासाठी पुढील उपाययोजना केल्या जातात :-

(i) पावसापासून मिळविलेले शुद्धपाणी अथवा निर्जंतुक केलेल्या पाण्यात अशा कापडी वस्तू धुवून काढल्या जातात.

(ii) अशा वस्तूंवर पडलेले तेलकट डाग काढण्यासाठी वस्तू बेंझिन अथवा पेंट्रोल मध्ये बुडवून ठेवल्या जातात स्टबॉर्न धाग्याच्या बाबतीत एसिटोन या रसायनाचा वापर केला जातो.

(iii) जुने गालिचे व पडदे साफ करण्यासाठी व ते अधिक चांगले दिसण्यासाठी ते व्हेक्युम क्लिनरने अथवा ब्रशने साफ केले जातात.

(iv) काही वेळ विशिष्ट वस्तूंच्या बाबतीत पाण्याच्या वापर करून साफसफाई करता येत नाही तसे केल्याने त्यांना धोका असतो. त्यामुळे त्यांच्या बाबतीत ड्रायक्लिनची पद्धत अंमलात आणली जाते.

काही विशिष्ट वस्तूंबाबत ड्रायक्लिन आणि पाण्याने धुण्याची पद्धत यात दोन्हीही वापरता येत नाही. त्यावेळी वस्तूंची साफसफाई वाफेच्या साहाय्याने करण्याची पद्धत अंमलात आणली जाते.

सुरकुतलेल्या व घड्या असलेल्या कापडी वस्तू या काचेच्या अथवा पॉलिथिनच्या मोठमोठ्या  तुकड्या पसरून ठेवल्या जातात. म्हणजे अशा घड्याच्या ठिकाणी फाटण्याचा धोका उद्भवत नाही.

सूक्ष्म जंतूपासून रेश्मी किडे कापडी वस्तूंची बचाव करण्यासाठी काही विशिष्ट जंतूनाशकांचाही उपयोग केला जातो.

(इ) हाडे, हस्तीदंत आणि राख शिपल्यांपासून बनविलेल्या वस्तू :

अशा वस्तू या प्रणीजन्य असल्याने त्याची झीज होणे अपरिहार्य असते. विशेषतः अशा वस्तू कालांतराने ठिसूळ होऊन त्यांचे तुकडे पडण्याची शक्यता असते. बरेच वेळा अशा वस्तू उत्खननात मिळतात. मिळाल्यानंतर अशा वस्तूंची सफाई घेतली जाते अशा वस्तूंचे संरक्षण करण्यासाठी पुढील उपाय योजना अंमलात आणल्या जातात :-

उत्खननातून मिळविलेल्या हाडांच्या, हस्तीदंताच्या अथवा शंख शिपल्यांच्या वस्तू या ब्रशच्या सहाय्याने साफ केल्या जातात.

अशा वस्तू साफ करण्यासाठी शक्यतो साबण व पाणी टाळला जातो.

मिथिलयुक्त मद्य किंवा शेलंक अथवा उल्कोहोल मध्ये काचेच्या कांड्या पाणी मिसळून सौम्य केलेल्या विनिल ॲसिटेटचा थर अशा वस्तूंवर दिला जातो की जेणे करून वस्तूंची झीज होण्याची प्रक्रिया मंदावतो.

काही वेळा उत्खननात मानवी अथवा प्रण्यांचे सांगाडे मिळतात. अशावेळी त्यांच्या कवटीच्या आतील बाजू ही क्रिओसोटच्या पातळ द्रावणाच्या १-२ थेंबात कापड बुडवून साफ केली जाते.

काही वेळा घरे किंवा हस्तीदंताच्या वस्तू या तुटलेल्या स्वरूपातच उत्खननात हाती लागतात. अशावेळी मेणाचा वापर करून त्या त्वरीत जोडल्या जातात.

अशा वस्तूंची झीज कमी होण्यासाठी व त्यांचे तुकडे न होऊ देण्यासाठी तापमान, आर्द्रता आणि प्रकाश हा योग्य प्रमाणात राखणे हे  देखील तितकेच महत्वाचे आहे.

**५.३.२ असेंद्रिय स्वरुपाच्या वस्तू (Inorganic) :**

असेंद्रिय स्वरुपाच्या वस्तूमध्ये प्रमुख्याने दगडी वस्तू, विटा, सोने, तांबे, चांदी, कांस्य, शिसे, लोखंड, विटा, पोलाद इत्यादी धातूंच्या वस्तू, मातीच्या वस्तू, मडके, मातीची

रंगवलेली खापरे इत्यादी वस्तू या असेंद्रिय स्वरुपाच्या असतात. ह्या वस्तूंची झीज मंद गतीने होते परंतु त्या वस्तू फुटण्यापासून त्यांचा बचाव करावा लागतो. या प्रकारच्या वस्तुंचे जतन पुढीलप्रमाणे करता येईल.

**(अ) धातू (Gold) :**

असेंद्रिय पदार्थांमध्ये प्रमुख्याने धातूंच्या वस्तूंचा समावेश होतो. धातू हे अनेक प्रकारचे असतात. फार प्रचीन काळापासून धातूंचा उपयोग करून वस्तू बनविणे हे मानवाला ज्ञात आहे. उत्खननातून आपणास अनेक  वस्तू मिळालेल्या आहेत. त्या प्रमुख्याने सोने, चांदी, तांबे, शिशे, टिन, लोखंड, जस्त, कथिल, कांस्य इत्यादी होय. सामान्यपणे हे सर्व धातू मानवाने खाणींमधून मिळविले आहेत. मूलत: हे धातू अशुद्ध स्वरुपात असतात. मात्र त्यापासून शुद्ध स्वरूपाचा धातू मिळविण्यासाठी त्यावर अनेक प्रकारच्या प्रक्रिया केल्या जातात. या वस्तूंवर इलेक्ट्रोकेमिकलचा परिणाम होतो. त्यामुळे अशा विविध धातूच्या वस्तूंचे जतन करण्यासाठी विविध पद्धती वापरावयाच्या असतात. काही वेळा विविध धातूंपासून एखादी वस्तू बनविली जाते. त्यामुळे अशा वस्तूंचे जतन करण्यासाठी गुंतागुंतीची प्रक्रिया केली जाते. विविध प्रकारच्या धातूंवर ही प्रक्रिया कशाप्रकारे केली जाते ते पाहुया.

**(i) सोन्याच्या वस्तू (Gold) :**

उत्खननात अनेक वेळा सोन्याच्या वस्तूही मिळतात. नवाश्मयुगातील लोकांनाही सोन्याचा वापर माहित होता. उदा. कर्नाटकातील टेक्कलकोटा येथे नवाश्मयुगीन  (Neolithic) लोक सोन्याचे दागिने वापरीत असत असा पुरावा मिळालेला आहे. सिंधु संस्कृतीचे लोकही सोन्याचे दागिने वापरीत असत. माहेंजोदडो येथील उत्खननात असे अनेक सोन्याचे दागिने मिळाले आहेत. सोन्याचे सर्वप्रथम नाणी प्रचीन कालखंडामध्ये इंडो. ग्रीक राजांनी पाडली होती त्यानंतर कुषाण पराक्रमांच्या राजांनी सुद्धा सोन्याच्या नाणी जारी केली होती. असे दिसून येते. इ.स. पूर्व ७ व्या व ८ व्या शतकातील महाराष्ट्रातील महाश्मयुगीन (Megalithic) लोकही सोन्याचे उत्कृष्ट दागिने वापरत असत. ऐतिहासिक काळातील गुप्त राजांनी तर आपली नाणीच सोन्याची पाडली होती. दक्षिणेमध्ये सोन्याच्या नाण्याची टाक सुद्धा उत्खननात आलेल्या आहेत. रोमन साम्रज्य अशा तर्हेने उत्खननात अनेक सोन्याच्या वस्तू हाती लागतात तेव्हा त्यांचे जतन करण्यासाठी त्या वस्तुसंग्रहालयाकडे येतात.

शुद्ध सोन्यावर गंज येत नाही परंतु काही वेळा त्यांवर डाग पडतात, अशा वस्तु साबण व गरम पाण्याच्या साहाय्याने धुतल्या जातात. तर नायट्रीक ॲसिडच्या सहाय्याने सोन्याच्या वस्तूंवरील काळे डाग काढले जातात. ह्यासाठी ९० भाग पाणी व १० भाग अमोनिया असे द्रावण तयार करून त्या पाण्याने सोन्याची वस्तू धुतली जाते तर हे डाग अधिक प्रकारच्या स्वरूपाचे असले तर ते तीव्र हायड्रोक्लोरिक ॲसिडने घालवता येतात.

**(ii) लोखंड (Iron) :**

प्रचीन काळापासून मानवाने विविध कारणांसाठी लोखंडाचा वापर केला. या वस्तू नष्ट झाल्या. उत्खननात व इतरत्रही लोखंडाच्या निरनिराळ्या वस्तू उदा. विविध प्रकारची शस्त्रे जसे तलवार, भाला, बाण, सुरे इ. सापडतात. उबदार व दमट हवामानात त्या फार

झपाट्याने गंजून जातात. त्या स्वच्छ आणि शुद्ध करणे जरूरीचे असते. मात्र ही प्रक्रिया गुंतागुतींची असल्याने त्या साफ करण्याचे काम तज्ञ व्यक्तींकडे सोपवावे लागते. शिवाय ह्या वस्तू उत्खनित जागेतून काढतानाही अत्यंत काळजी घ्यावी लागते कारण ह्या गंजामुळे त्यांचे तुकडे पडण्याची दाट शक्यता असते.

जास्त गंजलेल्या वस्तू साफ करण्यासाठी जस्त आणि कॉस्टिक सोडा यांचे मिश्रण वापरतात. ह्या मिश्रणामुळे लोखंडी वस्तूतील घातक क्लोराईडस् नष्ट होतात. वस्तूंवरील गंज हा अगदी कमी असेल तर तो काढण्यातही पोटॅशियम-बाय-ऑक्झेलेटचे मिश्रण वापरावे. तुटलेल्या लोखंडी वस्तूवर तात्पुरता मेणाचा थर अथवा प्लास्टर ऑफ पॅरीसचा थर दिला जातो.

**(iii) चांदी (Silver):**

चांदी हा एक नरम स्वरूपाचा धातू आहे. उत्खननात जरी चांदीच्या वस्तू फारशा आढळत नसल्या तरी चांदीची नाणी मात्र प्रचीन ऐतिहासिक कालापासून मध्ययुगीन कालापर्यंत अनेक ठिकाणी सापडली आहेत. शिवाय मध्ययुगात तर चांदीच्या अनेक कलाकृती घडवलेल्या आढळून येतात. अशा प्रकारच्या नाणी अथवा इतर कलावस्तूंचे जतन करणे आवश्यक असते. मात्र शुद्ध चांदी ही कालांतराने - काळी पडते त्यामुळे हा काळपटपणा घालवण्यासाठी ती वस्तू सौम्य अमोनिया अथवा सौम्य फॉर्मिक ॲसिड मध्ये ठेवून नंतर ती स्वच्छ पाण्याने धुवून तिच्यावर मेथिल मिथॉयुलेट व टोलयूईन एसिटोनाचे मिश्रण लावावे. म्हणजे ती पुन्हा काळी पडत नाही. व तिचे दीर्घकाल जतन होते. त्या बाबत आणखीही एक पद्धती वापरली जाते ती म्हणजे चांदीची वस्तू जस्ताच्या पाण्यात गुंडाळून ॲसेटिक ॲसिडचे काही थेंब टाकलेल्या पाण्यात काही तास लोंबकळत ठेवावी.

काही वेळा चांदीत तांबे मिसळले असेल अशा तर्हेचे धातू प्रमुख्याने नाण्यांसाठी वापरलेला असतो. उदा. स्कंदगुप्ताची नाणी. अशी नाणी कालांतराने डागाळलेली होतात. हे डाग काढण्यासाठी १०... सिल्व्हर नायट्रेट अथवा सलपाेयुरिक ॲसिड वापरतात. डाग निघून गेल्यावर ह्या वस्तू पुन्हा पाण्याने स्वच्छ धुवून काढाव्यात.

**(iv) तांबे व कांस्य (Copper and Bronze) :-**

भारतात इतिहासपूर्व कालखंडापासूनच तांबे व कांस्यचा वापर होत असे. प्रचीन भारतात ताम्रपाषाण युगामध्ये मानवाने सर्वप्रथम तांबे या धातुचा वापर केला. सिंधुसंस्कृतीचे लोक आपल्या कुर्हाडी, मासेमारीचे गळ, बांगड्या, पुतळे इत्यादी विविध वस्तू तांबे व ब्रॉन्झपासून बनवत असत. पुढे ऐतिहासिक कालखंडात तर तांब्यापासून नाणी ही बनवली जाऊ लागली अशी हजारो नाणी व इतर वस्तूही आजपर्यंत उत्खननात सापडलेली आहे. या सर्व वस्तू स्वच्छ करण्याच्या विविध पद्धती आहेत. अर्थात एखाद्या वस्तूवर गंजाचे किती प्रमाण आहे त्यावर ती पद्धत अवलंबून असते. काही पद्धती पुढीलप्रमाणे :-

१. गंजामुळे अगदी आतपर्यंत ठिसूळ झालेली वस्तू आणि तिचे ऐतिहासिक मूल्य खूप असेल तर ती १०... सोडियम (सेस्की) कार्बोनेटच्या मिश्रणात १५ दिवस बुडवून ठेवावी.

२. तांब्याच्या वस्तूवर पक्का थर बसलेला असेल तर तो १०... सोडियम मेटाफॉस्फेट मिश्रण वापरून दूर करता येतो.

३. तांब्याच्या आणि तांबे असलेल्या मिश्रधातूंच्या वस्तूवर बराच गंज असेल तर तो काढण्यासाठी १ भाग टार्टरिक ॲसिड, कॉस्टिक सोडा १ भाग व पाणी १० भाग या द्रावणात गंज संपूर्ण निघेपर्यंत ठेवतात. त्यानंतर वस्तूला शुद्ध तांब्याचा तांबडा रंग आल्यावर शुद्ध पाण्यात बरेच वेळा धुवावी. त्यातील क्लोराईडस निघून गेल्यावर वस्तूवर १०... व्हिनाईल एसिटेटच्या द्रव लावावा.

४. तांब्याच्या वस्तू साफ करण्यासाठी दुसरीही पद्धत आहे. ती म्हणजे वस्तू आधी सायट्रीक ॲसिडने धुवून नंतर सलफ्युरिक ॲसिडने धुतात. त्यानंतर ॲसिडचा परिणाम निघून जावा म्हणून अमोनिया किंवा कोणत्याही दुसऱ्या अल्कलीने त्यावर प्रक्रिया केली जाते. त्यानंतर स्वच्छ पाण्याने ते वारंवार धुतले जाते व त्या पाण्यातून सर्व क्षार निघून गेल्याची पॉलिव्हिनाईल ॲसिटेट लेप देणे या क्रमाने प्रक्रिया कराव्यात. याप्रकारे वस्तूसंग्रहालयातील प्रयोगशाळेत तांबे व कांस्य वस्तूचे संरक्षण व संवर्धन केले जाते.

**(v) शिसे (Lead) :**

शिसे हा देखील एक नरम प्रकारातील धातू आहे. अशा वस्तूही उत्खनित केल्या जातात. भारतात दक्षिणेत शिशाची प्रमुख्याने नाणी आढळून आली आहेत. महाराष्ट्रात सातवाहनांनी सर्वप्रथम शिशाची नाणी जारी केले होते. अनेक ठिकाणी नाणी ही विपूल प्रमाणावर मिळालेली आहेत. ही नाणी साफ करण्यासाठी ॲसेटिक ॲसिडचे सौम्य द्रावण अथवा जस्त व कॉस्टिक सोडा यांचे मिश्रण वापरावे. त्यानंतर नाणे पूर्ण कोरडे झाल्यावर त्याच्यावर मेथिल मेथॉक्रिलोट अथवा क्लिनाईल ॲसिटेटचा पातळ लेप दिला जातो.

साफ केलेल्या शिशाच्या वस्तूंचीही काळजी घ्यावी लागते ह्या वस्तू हवाबंद डब्यात अथवा काचेच्या बंद पेटीत ठेवाव्या लागतात. नाहीतर त्यावर पुन्हा हवामानाचा परिणाम होऊ लागतो.

**(ब) दगडी वस्तू (Stone) :-**

भारतामध्ये पाषाणयुगातून मानवाने दगडाची हत्यारे, (पाटा-वरवंटा, जातं, इ.) वापर केलेला दिसून येतो. दगडाचे अनेक प्रकार असतात. उत्खनीत दगडी मूर्ती, भांडी विविध उपकरणे वगैरेचीही काळजी घेणे आवश्यक असते. सामान्यतः ह्या दगडी वस्तूंवर काही वेळा क्षाराचे किरण घट्ट बसलेले आढळून येते. तो क्षार नायट्रिक अथवा हायड्रोक्लोरीक ॲसिडने काढता येतो. तसेच दगडी वस्तूंवरील धूळ वगैरे पाण्याने धुवून काढता येते.

वस्तू ह्या संगरमरवरासारख्या वैशिष्ट्यपूर्ण प्रकारच्या दगडाच्या असल्यास त्यांच्या सफाईचे काम हे तज्ञ व्यक्तींकडून द्यावे.

उत्खननातील दगडी वस्तू जर भंग पावलेल्या असतील तर त्यांना विशिष्ट रसायनांच्या सहाय्याने चिकटवता येणेही शक्य असते.

**(क) काच (Glass) :-**

उत्खननात काचेचा विविध तर्हेच्या म्हणजे उदा. काचेचे मणी, बांगड्या, पेले इ. वस्तूही सापडतात. काचेचे विविध प्रकार आढळून आलेले आहेत. या काचेच्या वस्तूंची सफाई व जतन करण्याचे काम अत्यंत कौशल्याचे असल्याने ते तज्ज्ञ व्यक्तींकडेच सोपवले जाते. दक्षिण भारतात व महाराष्ट्रात नेवासे, कोल्हापूर येथे उत्कृष्ट रोमन काचेच्या वस्तूही (उदा. रोमन काचेचे मद्यकुंभ जे ॲम्फोर नावाने ओळखले जातात.) सापडलेल्या आहेत.

क्षोर्ष यांच्या मते काच जर चांगल्या स्थितीत असेल तर त्यावर खूप मोठ्या प्रमाणात सफाई करावी लागत नाही तर फक्त साबणाच्या पाण्याने धुवून काढली व पुसून घेतली तरी ती काच चांगल्या पद्धतीने संरक्षित राहू शकते. प्रचीन भारतीय बनावटीच्या काचेत बुडबुडे असल्याचे आढळून येत, तसेच अशी काच क्षारयुक्त जमिनीत राहिलेली असल्याने तिच्यावर एक प्रकारचा रंगबदल दिसून येतो. बरेच वेळा अशी काच जमिनीतून बाहेर काढल्यावर तिच्या रंगात बदल होतो. हे टाळण्यास उपाय करता येत नाही. मात्र उकृष्ट दर्जाची रोमन काच मात्र बहुधा मूळ स्वरूपात राहू शकते. काचेच्या वस्तू सफाईसाठी व तिचे जतन करण्यासाठी प्रयोगशाळेत तज्ज्ञांकडेच पाठवल्या जातात तेथे तिच्यावरील क्षार काढले जातात व तिचे योग्य तर्हेने जतन केले जाते.

**(ड) एनॅमल :-**

एनॅमल हाही काचेचाच एक प्रकार असून त्यावर नक्षिदार काम केलेले असते. अशा एनॅमलच्या वस्तू सामान्यतः गरम पाण्याने धुतल्या जातात मात्र गरजेनुसार साबण आणि पाणी यांचा वापर करून त्या स्वच्छ केल्या जातात त्यावर जर डाग पडले असतील तर पेट्रोल आणि बेंझिनचा वापर करून ते डाग काढले जातात.

**(इ) मातीच्या वस्तू (Clay) :**

उत्खननात मोठ्या संख्येने मातीची भांडी (मृदूभांडी) सापडतात. मातीच्या भांड्याचे कच्च्या मातीची व भाजलेल्या पक्क्यामातीची असे प्रकार असतात. पुरातत्त्वीय संशोधनात मृद भांड्यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. त्यांच्या महत्वामुळेच त्यांना 'पुरातत्त्वाची मुळाक्षरे' असे म्हटले जाते.

मातीची भांडी क्षारविरहित पाण्याने धुवावीत तर नुसती माती व धूळ ही तर मऊ केसाच्या ब्रशने साफ केली जाते. ठिसूळ अथवा दुर्मिळ वर्गातील खापरे साफ करून ती बैडॅक्रिल अथवा १०... सुल्युलॉईडच्या द्रावणाचा लेप देऊन टणक केली जातात.

क्षारयुक्त पाण्याचे खापरे अथवा मडकी धुवू नये कारण त्यामुळे क्षाराचा लेप खापरांवर बसून त्यावरील मूळचे रंगकाम अथवा रंगीत नक्षी नष्ट होण्याची भीती असते. रासायनिक प्रक्रियेने हे क्षारांचे प्रकार ओळखता येतात. ज्या जमिनीत ही मातीची भांडी बराच काळपर्यंत गाडून राहिलेली असतात, त्या जमिनीतही क्षार असू शकतात त्यामुळे अशा ठिकाणाची गाडलेली भांडी काढली तर भांड्यांवरील क्षारांचा थर हा कोणत्या प्रकारचा आहे. ते रासायनिक प्रक्रियेच्या मदतीने ओळखून मगच त्याच्या सफाईसाठी कोणती प्रक्रिया करावयाची आहे हे ठरवता येते.

सर्वसाधारणपणे क्षारविरहीत पाण्याने मातीची भांडी काळजीपूर्वक व वरचेवर धुतल्यास ती स्वच्छ होतात जी खापरे साध्या पाण्याने स्वच्छ होऊ शकत नाहीत त्यांसाठी टिपॉल हे द्रव पाण्यात मिसळून वस्तू धुण्यासाठी वापरले जातात. तसेच रंगीत खापरे ही तर हायड्रोक्लोरिक अथवा नायटिक ॲसिड सौम्य प्रमाणात मिसळून त्या पाण्यात बुचकळून काढावी. नाजूक व ठिसूळ अशी मातीची भांडी पूर्णपणे सावलीतच वाळवावी, उन्हात ठेवल्यास त्यातील आर्द्रता नष्ट होऊन त्यांचे तुकडे पडण्याची शक्यता असते. एका मृदूभांड्याचे अनेक तुकडे सापडले तर ते धुवून ते जोडले जातात का याची शक्यता अजमावली जाते. जोडल्या जाऊ शकत असणाऱ्या खापरांच्या आतील भागावर साध्या पेन्सिलीने खुणा करून ते तुकडे ड्युरोफिक्स (Durofix) अथवा ॲरल्डाईट (Araldite) ने जोडून मऊ रेतीने किंवा लाकडाने भरलेल्या भुशाच्या घमेल्यात रोवून ठेवली जातात म्हणजे ती वाळून पक्की जोडली जातात. सिंधू संस्कृतीच्या उत्खननात मिळालेली मातीची अशी अनेक भांडी व मोठमोठ्या दगडी रांजणांचे तुकडे मिळाले होते. त्यांची ही अशातर्हेची जोडणी करून ते पूर्ण स्वरूपात आता मुंबईतील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम मध्ये सिंधू संस्कृतीच्या दालनात ठेवली आहेत.

कच्च्या मातीच्या वस्तू मात्र कधी पाण्याने धुवू नयेत त्या सावलीत वाळवून मग त्यावर १०... व्हिनाईल ॲसिटेंट (Vinylacetate) लेप लावावा. किंवा पेरेफिन वॅक्स (Parafin Wax) वितळून गरम व पातळ असतानाच लावावे.

कच्च्या मातीच्या मुद्रा वा टाक सापडल्यास, त्या प्रयोगशाळेतील नियंत्रित तापमानाच्या भट्टीत भाजून टणक केल्या जातात.

अशाप्रकारे वरील वस्तुंच्या व्यतिरिक्त इतर सेंद्रिय व असेंद्रिय स्वरूपाच्या वस्तू आहेत त्यांच्यावर सुद्धा अशाच प्रकारच्या प्रक्रिया कराव्या लागतात त्यामुळे वस्तूचे आर्युमान वाढते व आपल्याला भारताच्या प्रचीन सांस्कृतिक वारसांचे जतन व संवर्धन करणे शक्य होते. अशा तर्हेने वस्तुसंग्रहालयांमध्ये येणाऱ्या विविध स्वरूपांच्या वस्तूंची विविध तर्हेने काळजी घेतली जाते आणि त्यांचे जतनही केले जाते.

**आपली प्रगती तपासा.**

प्र. वस्तुसंग्रहालयातील वस्तुंच्या विविध प्रकारांचे संवर्धन कसे केले जाते ते सांगा.

## ५.४ वस्तुसंग्रहालयातील वस्तू सादरीकरणाचे तंत्रे

संग्रहालयातील कलादालने म्हणजे विविध कलावस्तू केवळ एकत्रित ठेवण्याची जागा नव्हे, तर लोकांशी संवाद साधण्याचे ते एक उपयुक्त माध्यम आहे. यासाठी अर्थातच कला दालनात वस्तूंचे कलात्मक प्रदर्शन करण्याची आवश्यकता असते. संग्रहालयातील बहुसंख्य वस्तू ह्या आपणांस विविध तर्हेची माहिती देत असतात. ह्या वस्तूंची मांडणी जर योग्य पद्धतीने केली नाही तर चांगल्या कलावस्तू ही उठावदार दिसत नाहीत. त्यांचे कलात्मक प्रदर्शन करणे तर आवश्यक आहेत परंतु त्याचबरोबर प्रेक्षकांना त्या वस्तूंचे रसग्रहण सहजपणे करणे शक्य झाले पाहिजे व त्यातून काही शिकता आले पाहिजे. संग्रहालयांना आपण वस्तुसंग्रह वाढवता आला पाहिजे अर्थात ही वाढ अथवा वस्तुसंग्रहालयाचा विकास

हा योग्य तर्हेनेच व्हावयास हवा त्यानंतर वस्तूंचे संवर्धन करणे हे देखील संग्रहालयाची मोठीच जबाबदारी आहे. वस्तू जमवणे आणि त्यांचे संवर्धन करणे यानंतर संग्रहालयाची मोठी जबाबदारी म्हणजे त्यांचे योग्यतर्हेने प्रदर्शन करणे. कोणतीही कल्पना व विषय प्रेक्षकांना सहज समजण्यासाठी व त्यांचे योग्य आकलन होण्यासाठी संग्रहातील विविध दालनाची वास्तवपूर्ण उभारणी विशेष उपयोगी पडते. वस्तूंच्या वैशिष्ट्यपूर्ण मांडणीमुळे वस्तूंची खरी कल्पना व स्वरूप प्रेक्षकांच्या पुढे नीट उभे राहते. त्यामुळे त्या वस्तूंचे व विषयांचे ज्ञान चटकन होते आणि वस्तू प्रदर्शनाचा मूळ उद्देश साध्य होतो. अशातर्हेने वस्तूंचे योग्य व पद्धतशीर प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी कलात्मक मांडणीबरोबरच इतरही काही मूलभूत गरजा असतात त्या पूर्ण करणे हे संग्रहालयाच्या यशासाठी आवश्यक असते.

### ५.४.१ वस्तुसंग्रहालयाची इमारत :

एखादे चांगले वस्तुसंग्रहालय उभारण्यासाठी त्याच्या इमारतीचा आराखडा हा अत्यंत उत्कृष्ट आणि दोषरहीत असावा. बरेचवेळा आपणास असे आढळून येते की राजवाडे, मंदिरे त्याचप्रमाणे मोठमोठ्या सार्वजनिक इमारतीचे रूपांतर वस्तुसंग्रहालयांमध्ये झालेले आहे. क्वचित काही वेळा वस्तूसंग्रहालयाची स्थापना करून स्वतंत्र इमारती ही बांधलेली आढळून येते. संग्रहालय म्हणून जर इमारत मुद्दाम बांधली असेल तर ती इमारत भव्य आणि वस्तूसंग्रहालयाच्या गरजा पुऱ्या करणारी असते.

आदर्श वस्तुसंग्रहालय हे खालील बाबी पूर्ण करावयास लागते :-

१) वस्तुसंग्रहालय हे सार्वजनिक ठिकाणी असावे की जेथे लोकांची वर्दळ असेल.

२) वस्तुसंग्रहालयासाठी जागेची निवड करताना आजूबाजूस मोकळी जागा, बगीचा असतील अशा जागेची निवड करावी.

३) वस्तुसंग्रहालयातील कलादालनामध्ये छोट्यात छोट्या आणि मोठ्यात मोठ्या वस्तूचे योग्य तर्हेने प्रदर्शन मांडता येईल अशा तर्हेची दालने बांधण्यात यावी.

- संग्रहालयात एक सभागृह ही असले पाहिजे जेथे विविध विषयांवरील व्याख्याने अथवा चित्रफितींचे प्रदर्शन फिल्म शो, सभा इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करता आले पाहिजे.

- संग्रहालय बघण्यासाठी येणाऱ्या लोकांना मार्गदर्शन करणारे एक विशेष कक्ष ही असला पाहिजे.

- प्रेक्षकांसाठी एक आरामगृह असायला हवे.

- संशोधनकार्य करणाऱ्या संशोधकांसाठी एक ग्रंथालय तसेच प्रेक्षकांसाठी वाचनालय.

- संग्रहालयाची उभारणी करतानाच या गोष्टीची पूर्तता केली पाहिजे तसेच इतरही काही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक असते. त्या म्हणजे संग्रहालयाचा सेवा विभाग त्यात.

- दैनंदिन कामकाजासाठी प्रशासकिय कार्यालय असले पाहिजे.
- वस्तूंच्या संग्रहासाठी एक कोठीची खोली ही असणे आवश्यक आहे.
- गॅस, पाणी, पुरवठा आणि वीजपुरवठा यंत्रे ठेवण्यासाठी मोठी कार्यशाळा असली पाहिजे.
- वस्तूंच्या संवर्धनासाठी विविध प्रक्रिया करण्यासाठी एक प्रयोगशाळा असणे आवश्यक आहे.
- विद्युतप्रवाह खेळण्यासाठी आणि वातानुकूल यंत्राचे नियंत्रण करण्यासाठी एक मेकॅनिकल रूम असणे आवश्यक आहे.

### ५.४.२ प्रकाश योजनाः

संग्रहालयामध्ये वस्तूप्रदर्शन करताना योग्य प्रकाश योजना हा अत्यंत महत्वाचा घटक ठरतो. या प्रकाश योजनांचा वस्तू प्रदर्शनाच्या वेळी प्रेक्षकांच्या भौतिक आणि मानसिक गरजा पुरवणे आवश्यक असते. प्रदर्शन तंत्रामध्ये योजनेच्या विविध पद्धती अवलंबिल्या जातात.

**नैसर्गिक प्रकाश योजना :**

ज्या वस्तू नाशवंत नसतील उदा. दगड व सूर्यप्रकाशामुळे ज्या वस्तूंना हानी पोहचणार नाही अशा वस्तूंचे प्रदर्शन करताना नैसर्गिक प्रकाश योजना केली जाते.

**सुयोग्य खिडक्या :**

सुयोग्य खिडक्यांचे आयोजन असणे त्याचप्रमाणे तेथे जरूर असले तेथे कंदिलांचा मंद प्रकाश, आकाशी रंगाची प्रकाश योजना यांचा अवलंब करणे वस्तुसंग्रहालयात कमी वीज जळेल अशा स्वरूपाचे पोलुरोसंट दिवे वाढत्या प्रमाणात वापरले जात आहेत.

वस्तुसंग्रहालयातील एखाद्या वस्तूचे विशिष्ट वेगळेपण प्रेक्षकांच्या नजरेत आणून द्यावयाचे असेल तर विशिष्ट रंगसंगती साधणारी प्रकाशयोजना केली जाते त्यामुळे असे वेगळेपण असणाऱ्या वस्तूंकडे प्रेक्षकांचे त्वरीत लक्ष जाते.

### ५.४.३ खेळती हवा (Ventilation):

वस्तुसंग्रहालयातील हवा सतत खेळती रहाणे आवश्यक असते कारण उबदार, कोंदट व अधिक आर्द्रता असलेल्या हवेत नाशवंत वस्तूंना बुरशी अथवा वाळवी लागण्याची शक्यता असते. त्यामुळे संग्रहालयातील हवा अत्यंत खेळती रहाणे तसेच येथील आर्द्रतेवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. अशी नियंत्रित हवा असण्यासाठी पुढील गोष्टींची गरज आहे.

- खिडक्या, दरवांजावरील शटर वगैरे गोष्टींमुळे संग्रहालयातील हवा ही नैसर्गिक खेळती राहू शकते. त्याचप्रमाणे नैसर्गिक प्रकाश संग्रहालयात येण्यासाठी ही त्यांचा उपयोग होतो.

- एक्झॉस्ट पंखे, छतांवरील पंखे इत्यादी गोष्टींचा उपयोग कृत्रिम रितीने हवा खेळवण्यासाठी केला जातो.

- वातानुकूलीकरण ही संग्रहालयांतर्गत हवामानावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वोत्कृष्ट अशी योजना आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की ही योजना अत्यंत खर्चिक असल्याने तिचा सर्वत्र उपयोग करणे शक्य होतोच असे नाही.

वस्तुसंग्रहालय बांधण्यापूर्वी वरीलपैकी बहुसंख्य गोष्टींची पूर्तता होणे हे अतिशय आवश्यक असते तरच नंतर व वस्तूंना प्रदर्शनात योग्य जागा मिळू शकेल व प्रेक्षकांनाही वातावरणात वस्तू प्रदर्शनाचा लाभ घेता येईल.

**आपली प्रगती तपासा**

प्र. वस्तुसंग्रहालयातील वस्तुसादरीकरणाची तंत्रे सांगा.

## ५.५ वस्तूप्रदर्शनांचे प्रकार

आधुनिक काळातील वस्तूसंग्रहालये ही शिक्षणाची माध्यमे बनलेली आहेत. अशा वस्तूसंग्रहालयापासून अनेक वस्तू एकत्र जमवता येतात. विविध विषयांच्या कलावस्तूंचे संग्रह या ठिकाणी असतात. अशा ठिकाणी विविध प्रकारच्या वस्तू एकत्र आणून त्यांच्या विशिष्ट हेतूसाठी उपयोग केला जातो. एखादी योजना किंवा प्रयोग यशस्वीकरण्यासाठी विविध ठिकाणच्या वस्तूंचे नमुने संग्रहालयात एकत्र आणले जातात. विविध ठिकाणच्या वस्तू गुण आपणास एकाच ठिकाणी अभ्यासता येतात. त्यांची उत्कृष्ट मांडणीही करता येते त्यामुळे कलेला वाव मिळतो त्या प्रदर्शनाद्वारे ज्ञान व मनोरंजनही होते. उदा. वस्त्रांचे विविध प्रकार आणून त्या ऐतिहासिक कालखंडाचा व्यवस्थित अभ्यास करता येतो. अशा विविध कालखंडाचा अभ्यास करून मानवी विकासातील टप्पेही आपण ज्ञात करून घेऊ शकतो. संग्रहालयातील वस्तूंचे सुयोग्य व सुबक तसेच विषयावर नेटके प्रदर्शन करण्याचा संग्रहालये प्रयत्न करत असतात. विविध वस्तूंचे प्रदर्शन करण्यामागे व्यवस्थापकाचा एक विशिष्ट हेतू असतो तो म्हणजे या प्रदर्शनीय वस्तुंमधून इतिहास अथवा इतर विषयांचा आणि प्रेक्षकांचा आपसुकपणे संवाद साधला गेला पाहिजे. त्यासाठी प्रदर्शनांची आवश्यकता असते. वस्तुसंग्रहालयातील कलावस्तूंच्या प्रदर्शनाचे अनेक प्रकार पडतात त्यातील दोन महत्वाचे प्रकार आहेत ते म्हणजे -

१. कायमस्वरूपी प्रदर्शन,

२. तात्पुरते प्रदर्शन

### ५.५.१ कायमस्वरूपी प्रदर्शन (Permenant Exhibition) :

संग्रहालयातील अत्यंत कलापूर्ण आणि अत्यंत सुंदर कलावस्तूंचे कलात्मक प्रदर्शन करणे आणि त्याद्वारे लोकशिक्षणाचा हेतू सफल करणे हा कायमस्वरूपी प्रदर्शनाचा मूळ हेतू असतो. अशा प्रदर्शनातून त्या संग्रहालयाचे वैभव आपल्या दृष्टीस पडत. कायमस्वरूपी प्रदर्शनात वस्तूंची निवड ही अत्यंत काळजीपूर्वक आणि विशिष्ट कालखंडानुसार आणि वैशिष्ट्यांनुसार केली जाते. अशा वस्तूंच्या प्रदर्शनासाठी -

१. पद्धतशीर मांडणी,

२. सुयोग्य प्रकाश योजना

३. आकर्षक प्रदर्शन इत्यादी गोष्टींची आवश्यकता असते.

कोणतीही वस्तू प्रदर्शनात ठेवण्यासाठी त्या वस्तूविषयी सखोल माहिती मिळविणे आवश्यक असते. वस्तूंविषयी कधीही चूकीची माहीती प्रेक्षकांना दिली जाणार नाही याचीही खबरदारी घेतली पाहिजे. जर त्या प्रेक्षकांना चुकीची माहिती दिली गेली तर तो कलावस्तूंचा आणि स्मारकांचा अवमान आहे असे समजले जाते.

प्रदर्शनामध्ये वस्तूंची कोणत्याही तर्हेची गर्दी होऊ नये म्हणून काळजी घेतली पाहिजे. वस्तूच्या मूळ वर्गीकरणाला तडा जाऊ न देता त्यांची रचना, मांडणी इ. मध्ये वेळोवेळी बदल घडवून आणणे वास्तूचे नूतनीकरण करणेही आवश्यक असते. त्यामुळे संग्रहालयाचे दोन फायदे होतात ते म्हणजे

१. संग्रहालयाची रचना वारंवार बदलल्याने प्रेक्षकांना नवीन रचना नवीन मांडणी बघण्यासाठी वरचेवर संग्रहालय बघण्यासाठी यावेसे वाटते.

२. संग्रहालयातील कोठी घरात असलेल्या राखीव वस्तूंवर नजर जाऊन प्रदर्शनाच्या कामी त्यांचाही उपयोग केला जाऊ शकतो. वरचेवर जर ही रचना बदलली नाही तर ही शक्यता कमी होते.

### ५.५.२ तात्पुरत्या स्वरूपाचे प्रदर्शन (Temporary Exihibition) :

या प्रकारच्या प्रदर्शनात दोन प्रकारांचा अंतर्भाव होतो. ते म्हणजे

१. फिरते प्रदर्शन आणि

२. वेगवेगळ्या संस्थामध्ये सहज वाहून नेता येणाऱ्या वस्तूंचे प्रदर्शन, अशी प्रदर्शन ही केवळ काही कालावधीसाठी किंवा महिन्यासाठी भरवण्यात येते तर बऱ्याच वेळेस ते काही वर्षासाठी सुद्धा असू शकतात. या मागे दोन कारणे असू शकतात ती म्हणजे त्या प्रदर्शनांना मिळणारा भरघोस प्रितसाद अथवा एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रदर्शनातील कलावस्तू नेण्यासाठी आर्थिक चणचण भासणे.

तात्पुरत्या स्वरूपाचे प्रदर्शन हे विशिष्ट संकल्पना हाती घेऊन त्यानुसार ते भरवण्यात येते. उदा. विविध उत्सव, लोककला, बाहुल्या, संगीत वाद्ये इत्यादींचे प्रदर्शन हे तात्पुरत्या प्रदर्शनाचा विषय ठरतात. त्याद्वारे समाज आणि समाजाची काही वैशिष्ट्ये यांविषयी लोकांना

माहिती उपलब्ध करून दिली जाते. अशा स्वरूपांच्या प्रदर्शनाद्वारे लोकशिक्षण करण्याची मोठीच संधी प्रप्त झालेली असते तात्पुरते प्रदर्शन हे संग्रहालयानांही फार उपयुक्त ठरते बरेच वेळा संग्रहालयांना जागे अभावी आपल्या सर्व वस्तूंना कला दालनांमध्ये स्थान देणे शक्य नसते अशावेळी त्यांच्या जवळ असलेल्या राखीव कलावस्तूंचा साठा ते या प्रदर्शनाद्वारे उपयोगात आणू शकतात. अशा स्वरूपाची तात्पुरती प्रदर्शने ही केवळ देशात अनेक ठिकाणी आयोजित केली जात. नमुने आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील अशा तात्पुरत्या प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. उदा. गेल्या काही वर्षांमध्ये जगातील अनेक देशांमध्ये उदा. अमेरिका, फ्रान्स इ. ठिकाणी भारत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. तेथे भारतीय वस्तूंचे प्रदर्शन ही आयोजित करण्यात आले होते. यामुळे भारतीय सांस्कृतिक वारसा व इतर कलाकृतींचे दर्शन परकिय राष्ट्रांना मिळाले.

फिरत्या प्रदर्शनांमुळे संग्रहालयातील कलावस्तूंचे अधिक प्रिसद्धी मिळते. त्यामुळे अशा फिरत्या संग्रहालयाचे आयोजन अत्यंत काळजीपूर्वक केले पाहिजे. फिरत्या संग्रहालयातील वस्तूंच्या वाहतुकीसाठी सुयोग्य प्रकारचे वाहन वापरले जाते व वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रदर्शनासाठी नेली जाते.

तात्पुरती संग्रहालये ही ग्रमीण भागात विशेष लोकप्रिय होतात असेही आढळून आले आहे. ग्रमीण लोकांना शहरी भागातील संग्रहालये येऊन बघणे शक्य होतेच असे नाही त्यामुळे अशा फिरत्या प्रदर्शनांना भेट देणे त्यांना आवडते. मात्र ग्रमीण भागातील लोक बऱ्याच वेळेस अशिक्षित असतात त्यामुळे त्यांना वस्तूंची माहीती वाचता येईलच असे नाही त्यामुळे त्यांच्याशी तोंडी संवादच साधावा लागतो.

डॉ. बॅनर्जी यांच्या मते कायमस्वरूपाची अथवा तात्पुरते प्रदर्शन त्याचप्रमाणे पारंपारिक किंवा आधुनिक प्रदर्शन भरविण्यासाठी डॉ. बॅनर्जी यांनी सांगितलेली पुढील मार्गदर्शक तत्त्वे लक्षात ठेवणे आवश्यक आहेत :-

१. प्रदर्शन बघावयास येणाऱ्या प्रेक्षकांच्या मनात कल,

२. ज्या वस्तूंचे प्रदर्शन भरावयाचे आहे त्याची सुस्पष्ट संकल्पना,

३. सर्व सामान्य प्रेक्षकांचे मनोरंजन होईल अशा वस्तू ठेवणे ज्ञानकारक वस्तूंचे प्रदर्शन करणे.

४. प्रदर्शनीय वस्तूंसमोरील माहीतीपत्रक हे प्रेक्षकांच्या नजरेच्या टप्प्यात येईल असेच असले पाहिजे.

५. वस्तूंचे प्रदर्शन हे ही नजरेच्या टप्प्यातच असले पाहिजे वस्तू अतिशय जवळ अथवा अतिशय दूर असू नये. तसेच सर्व वयोगटाच्या प्रेक्षकांना सहजतेने प्रदर्शन बघता येईल अशातर्हेने त्याची मांडणी असली पाहिजे.

६. संग्रहालयातील प्रकाश योजनेमुळे प्रदर्शनातील कोणत्याही वस्तूंची हानी अथवा झीज होऊ नये अशा तर्हेची काळजी घेतलीच पाहिजे.

१. वस्तूंच्या पाठीमागे उत्कृष्ट आणि उठावदार पार्श्वभूमी तयार केलेली पाहिजे त्यामुळे एक विशिष्ट वातावरण तयार होऊन प्रेक्षकांना जुन्या ऐतिहासिक काळात गेल्याचा अनुभव मिळतो.

२. वस्तूंची गर्दी होऊ न देणे. कारण असे झाल्यास प्रेक्षकांच्या मनात वस्तूविषयी संभ्रम निर्माण होऊ शकतो.

३. वस्तूंचा दर्जा हा तर उत्तम आणि प्रितनिधिक असला पाहिजे शिवाय त्यात विविधता आणि आकर्षकता असली पाहिजे जेणे करून प्रेक्षकांना त्याविषयी रूची निर्माण होईल.

४. अशा तर्हेने कलावस्तूंचे प्रदर्शन होईल ही वस्तूसंग्रहालयातील कामकाजामध्ये अत्यंत महत्वाची आणि कौशल्याची बाब आहे. प्रदर्शनामागे विशिष्ट उद्देश असतो आणि साध्य व्हावा ह्यासाठी व्यवस्थापक आणि त्याच्या सहाकार्यांनी सर्वोतोपरी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक असते.

## ५.६ सारांश

वरील माहितीवरून असे दिसून येते कि, वस्तुचे योग्यपद्धतीने संवर्धन करण्यासाठी संग्रहालये खूप प्रयत्न करीत असतात. संग्रहालयामध्ये वस्तुंच्या विविध स्वरूपाच्या प्रकारावरून त्यावर योग्य ती प्रक्रिया करून त्यांचा संग्रह आणि जतन केले जाते. वस्तुसंग्रहालयातील वापरण्यात येणाऱ्या विविध स्वरुपाच्या सादरीकरणाच्या तंत्रामुळे सामान्य लोकांना वस्तुंची पार्श्वभूमी इतिहास व संस्कृती समजण्यास मदत होते. वस्तूंच्या योग्य स्वरुपात होणाऱ्या प्रदर्शनामुळे सर्व स्तरातील लोकांना त्यांच्या प्रचिन सांस्कृतिक वारशांचा आस्वाद घेता येतो व आपल्या जवळील ठेवा पुढील पिढीकडे देता येतो. त्यामुळे वस्तुसंग्रहालये ही सांस्कृतिक ठेवा व वारसा जतन करण्याची केंद्रे मानली जातात.

## ५.७ प्रश्न

प्र.१) वस्तुसंग्रहालयामध्ये वस्तूंचे संवर्धन कशाप्रकारे केले जाते ते स्पष्ट करा.

प्र.२) वस्तुसंग्रहालयातील वस्तू सादरीकरणाची तंत्रे कोणती आहेत ते स्पष्ट करा.

प्र.३) वस्तुसंग्रहालयातील वस्तूप्रदर्शनाच्या प्रकाराचे वर्णन करा.

प्र.४) सेंद्रिय व असेंद्रिय स्वरुपाच्या वस्तूंचे जतन किंवा संवर्धन वस्तुसंग्रहालयात कशाप्रकारे केले जाते याचे परिक्षण करा.

प्र.५) टिपा लिहा.

अ) वस्तुसंग्रहालयातील वस्तूंचे संवर्धन

ब) सेंद्रिय (Organic) स्वरुपाच्या वस्तू

क) असेंद्रिय ( Inorganic) स्वरुपाच्या वस्तू

ड) वस्तुसंग्रहालयातील वस्तूप्रदर्शनाचे प्रकार

इ) संग्रहालयातील वस्तू सादरीकरणाची तंत्रे

## ५.८ संदर्भ


1. ThoratB.R., Principles of Museology, Archaeology, Archival &Library Science, Himalaya Publishing House, Mumbai-4
2. Banerjee, N. R., Museum and Cultural Heritage of India, Agam Kala Prakashan, New Delhi, 1990.
3. Dwivedi V.P, Museums and Museology: New Horizons, Agam Kala Prakashan, New Delhi, 1980.
4. Markham S. F., The Museums of India, The Museum Association, London, 1936.
5. Plenderleith H. J, The Conservation of Antiquities and Works of Art: Treatment, Repair and Restoration, Oxford University Press, New York, 1956.
6. Sarkar, H, Museums and Protection of Monuments and Antiquities in India, Sundeep Prakashan, New Delhi, 1981.
7. Thomson John M.A. and Others, Manual of Curatorship: A Guide to Museum Practice, Routledge, New York, 1984.
8. Wittlin Alma, Museums : Its History and Its Tasks in Education, Routledge and K Paul, London, 1949.
9. प्रा. डॉ. निशांत शेंडे, वस्तुसंग्रहालये , अथर्व पब्लिकेशन
10. कठारे अनिल , पाटील गौतम, पुरातत्वविद्या वस्तुसंग्रहालय आणि पर्यटन, विद्या बुक्स, औरंगाबाद.
11. देव शा. भा. , पुरातत्वविद्या


❖❖❖❖

# ६

# वस्तुसंग्रहालयांची बदलती भूमिका

**घटक रचना :**

६.० उद्दिष्ट्ये

६.१ प्रस्तावना

६.२ संग्रहालयांची बदलती भूमिका (Shift of Emphasis from Object to Community)

६.३ लोकशिक्षणावर भर (Emphasis on Learning)

६.४ संग्रहालयातील अंतर्गत उपक्रम (In-house Activities)

६.४.१ प्रदर्शने

६.४.२ माहितीपत्र गोष्टी

६.४.३ व्याख्याने

६.४.४ प्रत्यक्षिके

६.४.५ प्रकल्प योजना

६.४.६ विशेष प्रदर्शने

६.५ संग्रहालयांचे बाह्य उपक्रम (Out-reach Activities)

६.५.१ शालेय व महाविद्यालयीन उपक्रम

६.५.२ संग्रहालयाच्या ग्रमीण भागातील सेवा

६.५.३ शहरी सेवा

६.५.४ परदेशांतील प्रदर्शने

६.६ सारांश

६.७ प्रश्न

६.८ संदर्भ

## ६.० उद्दिष्ट्ये

१. वस्तुसंग्रहालयाची बदलती भूमिका जाणून घेणे.

२. वस्तुसंग्रहालये लोकशिक्षणावर कशाप्रकारे भर देतात ते अभ्यासणे.

३. वस्तुसंग्रहालयातील अंतर्गत उपक्रम जाणून घेणे.

४. संग्रहालयातील बाह्य उपक्रम अभ्यासणे.

## ६.१ प्रस्तावना

आधुनिक काळात वस्तुसंग्रहालयाची भूमिका पूर्णपणे बदलेली दिसून येते कारण स्वातंत्र्यानंतर वस्तुसंग्रहालये ही केवळ कलात्मक व सांस्कृतिक वारशांचे जतन करण्याचे ठिकाण म्हणून वापरले जाते असे नाही तर वस्तुसंग्रहालये आता त्यांच्या विविध उपक्रमामार्फत लोकशिक्षणाचे एक प्रभावी माध्यम बनलेले आहे. आपल्या काळात संग्रहालये लोकशिक्षणावर अधिक भर देत आहेत. तसेच संग्रहालयातील व्यवस्थापक विविध उपक्रम राबवत आहेत त्यामुळे संग्रहालयाची भूमिका अधिक लोकाभिमूख झाली आहे. संग्रहायलयामध्ये विविध अंतर्गत व बाह्य उपक्रमाच्या माध्यमातून संग्रहालये आपली भूमिका बजावत आहेत. यासाठी राज्यसरकार व केंद्रसरकारची मदतही मोठ्या प्रमाणात त्यांना मिळत आहे. अशा उपक्रमाच्या माध्यमातून संग्रहालये आपला प्रचीन सांस्कृतिक वारसा जपण्याचे महत्वाचे काम करत आहेत.

व्हेरीम बोहान यांनी वस्तुसंग्रहालयाचे महत्व काय आहे हे शास्त्रशुद्धपद्धतीने विषद केले आहे. त्यांच्या मते, वस्तुसंग्रहालये हे फक्त वस्तुसाठी नसावेत तर ते लोकांसाठी व समाजासाठी असावेत.

## ६.२ संग्रहालयांची बदलती भूमिका (SHIFT OF EMPHASIS FROM OBJECT TO COMMUNITY)

आधुनिक काळात समाजाच्या विकासाठी वस्तुसंग्रहालयांची खूपच गरज असते हे आता सांगावयास नको. संपूर्ण जगभर वस्तुसंग्रहालयाची चळवळ आता पसरत आहे. भारतात तर वस्तुसंग्रहालये आपल्या पारंपारिक भूमिकेची (म्हणजे केवळ कलावस्तू जमवणे व त्यांचे जतन करणे ही भूमिका) कात टाकून नवीन भूमिकेचा वेश परिधान करून जनतेशी संवाद साधण्यास सिद्ध झालेली आहेत, असे आपण म्हणू शकतो. संग्रहालये आपल्याजवळ असलेल्या कलावस्तूंच्याद्वारे लोकशिक्षण घडवून आणण्याचे प्रयत्न करू लागली आहेत. आधुनिक काळात संग्रहालयांनी शिक्षणाचे एक उपयुक्त व प्रभावी माध्यम म्हणून किर्ती संपादन केली आहे. संग्रहालयांचे पारंपारिक स्वरूप हे आता केवळ संख्यात्मक दृष्ट्याच विकसित झालेले नसून त्यांना तेवढाच प्रबळ असा गुणात्मक दर्जाही प्रप्त झालेला आहे. हा गुणात्मक दर्जा म्हणजे वस्तुसंग्रहालयांनी आधुनिक काळात स्वीकारलेली लोकशिक्षणाची जबाबदारी होय. संग्रहालये ही विविध उपक्रमांद्वारे लोकशिक्षणाचा हेतू साध्य करत असतात. अर्थातच त्यासाठी ते लोकांशी, समाजांशी संवाद साधण्याचे उपक्रम हाती घेत

असतात. यावरून आपल्याला असे दिसून येते की आधुनिक संग्रहालये व पारंपारिक संग्रहालये यामध्ये खूप फरक आहे. वस्तुसंग्रहालयांची आधुनिक काळात बदलेली भूमिका समजावून घेण्यापूर्वी पारंपारिक संग्रहालयांचे स्वरूप आणि उद्देश अभ्यासणे महत्वाचे आहे.

**पारंपारिक संग्रहालये (Traditional Museums):**

युरोपातील पुनरूत्थान चळवळीत लोकांना विविध कलावस्तू, दुर्मिळ वस्तूंचा संग्रह करण्याविषयी आवड निर्माण झाली. सुरवातीच्या काळात वस्तुसंग्रहालयांचा उपयोग वस्तू गोळा करून ठेवण्यासाठी होत असे. अर्थातच काही वेळा त्यांचा उपयोग माहिती जमवण्यासाठी व संशोधनासाठीही होत असे. काही वेळा मोठेपणा आणि प्रिसद्धी मिळवण्यासाठीही संग्रहालयांचा उपयोग होत असे.

(नंतरच्या कालावधीत वस्तुसंग्रहालयांचा अधिक विकास होऊन त्यांचे स्वरुपही बदलू लागले. विशेषतः वस्तुसंग्रहालयांतील वस्तूंच्या मांडणी व रचनेच्याबाबतीत अधिक पद्धतशीरपणा आणि कलात्मकता आली.)

पारंपारिक संग्रहालये ही केवळ कलाकृती साठविण्याची गोदामे होती असे म्हटले तर ते वावगे ठरू नये हा कलावस्तूंचा संग्रह बऱ्याचवेळा खाजगी मालकीचा असे. त्यामुळे त्याचे प्रदर्शन करून तो इतरांना दाखवला पाहिजे अशा दृष्टिकोनाचा अभाव होता. 'वस्तुसंग्रहाद्वारे लोकशिक्षण साधावे' हा पारंपारिक संग्रहालयांचा हेतू कधीच नव्हता. त्यामुळे कलावस्तुंच्या संग्रहाद्वारे संशोधनासाठी काही वावच नव्हता. पारंपारिक संग्रहालयांमध्ये अत्यंत दुर्मिळ आणि मौल्यवान वस्तूंचा संग्रहही असे. परंतु योग्य त्या काळजी अभावी ह्या वस्तुसंग्रहालयातील नाशवंत वस्तूंची झीज होत असे. व इतर वस्तूंनाही हानी पोहोचण्याची शक्यता असे. वस्तुसंग्रहालयांची अवस्था अशी शोचनीय होती. पारंपरिक संग्रहालयात क्वचित कधीतरी वस्तूंचे प्रदर्शन केले जाई.

याशिवाय पारंपारिक संग्रहालयांमध्ये खालील प्रकारच्या उणिवा होत्या.

१. वस्तूंचे प्रदर्शन केले असल्यास वस्तूंपुढे त्या वस्तूंची माहिती लिहिली जात नसे.

२. संग्रहालयाच्या प्रेक्षकांना तेथील वस्तुंविषयक माहिती मिळेल अशी माहितीपत्रके, मार्गदर्शक पुस्तके इ. चा अभाव वास्तविक 'पुरातत्वीय कलावस्तू' हा वस्तूसंग्रहालयांचा केवळ एक भाग आहे.

३. प्राचिन कलाकृती गोळा करून ठेवणे हा जरी पारंपारिक संग्राहलयाचा उद्देश असला तरी पुरातत्वीय वस्तूंनाच संग्रहालयात प्रधान्य मिळत असे. परंतु पारंपारिक संग्रहालयांमध्ये विज्ञान, मानववंशशास्त्र, भूगर्भशास्त्र, उद्योगधंदे, जीवशास्त्र इ. विभागांना फारच कमी महत्व दिले जाई.

पारंपारिक संग्रहालयांच्या विकासातील एक मोठा अडथळा म्हणजे त्यांना भासणारी आर्थिक चणचण याशिवाय पारंपारिक संग्रहालयांनी लोकशिक्षणाचा हेतू कधीच बाळगला नाही. कारण तसा दृष्टिकोन तत्कालीन सरकारच्या वा लोकांच्या मनात रूजलाच नव्हता.

त्यामुळे संग्रहालय बघावयास आलेल्या लोकांपुढे एक एक वस्तू केवळ बघण्याशिवाय दुसऱ्या दालनात काही पर्यायच उरलेला नव्हता.

थोडक्यात पारंपारिक संग्रहालयांमधून 'लोकशिक्षण' आणि 'लोकांशी संवाद' ह्या दोन्ही गोष्टी साधल्या जात नसत.

**आधुनिक संग्रहालये (Modern Museums):**

मात्र आधुनिक काळात संग्रहालयांनी आपल्या पारंपारिक भूमिकेचा त्याग केला आहे आणि नवीन आव्हाने स्वीकारलेली आहेत. आधुनिक संग्रहालयात केवळ कलावस्तूंचाच नव्हे तर विविध विषयांच्या, विविध प्रकारच्या वस्तूंचाही संग्रह केला जातो. वस्तूंचे विषयवार विभाग केले जातात. पारंपारिक संग्रहालयात वस्तूंचा संग्रह केवळ प्रदर्शनापुरता केला जाई. मात्र आधुनिक काळात ह्या कलावस्तूंद्वारे लोकशिक्षण व लोकसंवाद कसा साधता येईल याचाही विचार केला जातो. त्यामुळे संग्रहालयातील वस्तू, त्यांची मांडणी त्यांचे उद्दिष्ट इ. बाबतीत फारच बदल झाला आहे की जेणेकरून मनोरंजनाबरोबरच ज्ञानार्जनही व्हावे.युनेस्कोने तर वस्तुसंग्रहालयांच्या उद्दिष्टांबाबत तीन महत्वाचे दृष्टिकोन सांगितले आहेत ते म्हणजे -

१. वस्तूंचा संचय करणे.

२. वस्तूंची रचना (मांडणी) करणे.

३. वस्तूंचे कलात्मक प्रदर्शन भरवणे.

'रॉयल स्कॉटिश म्युझिअम'चे सेवानिवृत्त व्यवस्थापक श्री. इयान फिनले यांच्यामते वस्तुसंग्रहालयाचा विधायक हेतू म्हणजे - सर्वसामान्य व्यक्ति संग्रहालयाचा पे्रक्षक म्हणून येते त्यावेळी तिला संग्रहालय बघून आनंद मिळाला पाहिजे. तिच्यात उत्सुकता निर्माण झाली पाहिजे. त्याचप्रमाणे निसर्ग आणि मानवाच्या कामगिरीबद्दल आदरयुक्त दराराही वाटला पाहिजे. त्यातूनच त्याची वृत्ती ज्ञानपिपासू झाली पाहिजे. आणि मार्गदर्शनास उपयुक्त झाली पाहिजे.

वस्तुसंग्रहालयांना सर्वसामान्य प्रेक्षकांपर्यत पोहचवण्यासाठी संग्रहालयाचे नियोजन हे पद्धतशीरपणे केले जाते. त्यासाठी आधुनिक संग्रहालये आपल्यापुढे २ सुनिश्चित ध्येये ठेवतात. एक अंतर्गत ध्येय असते, तर दुसरे बाह्य स्वरूपाचे असते.

**अंतर्गत ध्येये :-**

वस्तूंचा संग्रह त्याची कलात्मक मांडणी आणि प्रदर्शन करणे, कलावस्तूंसंबंधी योग्य प्रकारच्या नोंदी ठेवून ते दस्ताऐवज सांभाळणे, त्याचप्रमाणे कलावस्तूंसंबंधी पूरक अशी माहिती तयार करून ती विविध साधनांद्वारा माहितीपत्रके, मार्गदर्शक पुस्तके इ. प्रेक्षकांपर्यंत पोहचविणे इ. गोष्टी या संग्रहालयांच्या अंतर्गत धोरणांपैकी होत. वस्तुसंग्रहालय देशातील विविध विभागात प्रचंड विषयांची माहीती पुरविण्याचे काम करतात.

बहुउद्देशीय संग्रहालये, विज्ञानविषयक संग्रहालये तसेच औद्योगिक व शेतकी विषयक संग्रहालये इ. ना आधुनिक युगामध्ये कलावस्तूंच्या संग्रहालयाएवढेच महत्व प्राप्त झाले आहे. आधुनिक संग्रहालये ही ढोबळ मानाने पुढील विभागांमध्ये विभागली जातात उदा. -

- कलासंग्रहालये,
- पुरातत्त्व संग्रहालये,
- निसर्ग इतिहासविषयक संग्रहालये,
- मानववंशशास्त्र विषयक संग्रहालये,
- विज्ञान व तंत्रज्ञान विषयक संग्रहालये

अर्थातच या विभागाचेही आणखी उपविभाग पडतात.

**संग्रहालयांची बाह्य किंवा विशाल ध्येये :-**

आधुनिक संग्रहालयांचा दृष्टिकोण हा संकूचित नसून अधिक विशाल असतो. म्हणून आधुनिक संग्रहालये केवळ अंतर्गत उपक्रम राबवत नसून अधिक विशाल क्षेत्रांमध्ये म्हणजे बाह्य पातळीवरही उपक्रम राबवत असतात.

विविध संग्रहालयांनी आपल्या अंतर्गत व बाह्य उपक्रमांमध्ये विशेष प्रविण्य मिळविण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु केली आहे. त्यासाठी त्यांनी समाजाला 'सर्वसामान्य सेवा' देण्याचा हेतूही ठेवलेला आहे. 'सर्वसामान्य सेवा' ही त्या शब्दातील उल्लेखाप्रमाणे सर्वसामान्य नसून खऱ्या अर्थाने असामान्य आहे, कारण या सर्वसामान्य सेवांमध्ये सतत विविध तर्हेचे उपक्रम हाती घेतले जातात व त्याद्वारे लोकशिक्षणाचा प्रयत्न केला जातो. हे उपक्रम संग्रहालयाच्या इमारतीत, आवारात तसेच संग्रहालयाबाहेरही राबविले जातात. या सर्वसामान्य सेवेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत -

१. संग्रहालयाच्या सेवा या व्यक्तीशः ओळखीवर उपलब्ध करणे अथवा अप्रत्यक्षरीत्या ही देता येतात.

२. सर्वसामान्य सेवांचे स्वरूप हे विद्यार्थी वा शिक्षक शाळा अथवा महाविद्यालये तसेच सर्वसामान्य प्रेक्षकवर्ग या सर्वांना उपयुक्त असले पाहिजे.

३. सेवांचे (उपक्रम) स्वरूप हे औपचारिक असते. औपचारिक उपक्रम Gallery Talks, व्याख्याने मार्गदर्शक भाषणे इ. चा समावेश असतो. तर अनौपचारिक उपक्रमांमध्ये संस्थांच्या बैठकी, बालकांची मंडळे तसेच सुट्टीतील उपक्रम इ. चा समावेश होतो.

४. संग्रहालयाच्या इमारतीत आणि आवारात जे उपक्रम राबविले जातात, त्याचा लाभ संग्रहालयाचे प्रेक्षक घेऊ शकतात. किंबहुना संग्रहालयात येणाऱ्या प्रेक्षकांसाठीच उपक्रम संग्रहालयात राबविले जातात. असे जरी असले तरी संग्रहालय बघण्याची आणि त्यातील उपक्रमांचा लाभ घेण्याची संधी प्रत्येक व्यक्तीला मिळेलच असे नाही.

अशा वेळी संग्रहालयच लोकांपर्यंत जाऊन पोहचण्याचा प्रयत्न करते आणि त्यांना आपल्या उपक्रमांचा लाभ देते. अशा तर्हेने संग्रहालयांची लोकशिक्षणाचा कार्यक्रम घडवून आणण्याची वृत्ती वाढत आहे. ज्ञान संपादनाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना व सर्वसामान्य लोकांनाही वस्तुसंग्रहालये दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरतात.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. वस्तुसंग्रहालयाची बदलती भूमिका सांगा.

## ६.३ लोकशिक्षणावर भर (EMPHASIS ON LEARNING)

आतापर्यंत पाहिल्याप्रमाणे वस्तुसंग्रहालये ही शिक्षणाच्या दृष्टीने एक उपयुक्त माध्यम ठरली आहेत. पुढील पिढीला केवळ मार्गदर्शनाचे काम ती करीत नाहीत, तर विद्यार्थ्यांची जिज्ञासाही जागृत करण्याचे काम ती करत असतात.

वास्तविक संग्रहालये म्हणजे पारंपारिक शैक्षणिक संस्था नव्हते, कारण संग्रहालयाच्या प्रेक्षकांनी प्रदर्शनाद्वारे काही शिकले पाहिजेच असे बंधन त्यांच्यावर नसते. त्याचप्रमाणे त्यांनी ठराविक अभ्यासक्रम वगैरे राबविण्याचीही गरज नसते. थोडक्यात पारंपारिक पद्धतीचा अवलंब  न करताही त्या द्वारे ज्ञानप्राhती होत असते त्यामुळे शिक्षणाचे अनुपम माध्यम असे म्हंटले गेले आहे. ज्या गोष्टी काही वेळा ऐकून वा पाठ करून आपणास समजू शकत नाही, त्या गोष्टी संग्रहालयातील प्रदर्शनाद्वारे चटकन कळू शकतात. संग्रहालयांच्या अशा उपयुक्ततेमुळे शैक्षणिक क्षेत्रात असामान्य महत्व प्रप्त झाले आहे. अर्थात, हे शिक्षण अधिक परिणामकारक होण्यासाठी प्रेक्षक व संग्रहालयातील वस्तू यांच्यात संवाद साधला गेला पाहिजे. हा संवाद साधण्यासाठी त्यांच्यात प्ररभावी दुवा असण्याची गरज आहे. संग्रहालये त्यादृष्टीने आपली ध्येय-धोरणे आखत असतात. ही ध्येये धोरणे आखताना संग्रहालये आपल्या कार्यक्षमतेच्या गोष्टींचाही समावेश होतो. कोणत्याही संग्रहालयात त्यांनी आपली ध्येये धोरणे ठरविताना पुढील बाबींचा विचार केला पाहिजे.

१. आपल्या संग्रहालयाचे किती मर्यादेपर्यंत ज्ञानदान करावयाचे ठरविले आहे?

२. आपल्या संग्रहालयाने कोणत्या मर्यादेपर्यंत मनोरंजनाचा लाभ द्यायचा आहे?

३. आपल्या संग्रहालयाने कोणत्या प्रकारच्या प्रेक्षक वर्गाला ज्ञानदानाचा लाभ द्यावयाचा आहे आणि हे लाभार्थी कोण आहेत?

४. संग्रहालयाने आपली ध्येय धोरणे आखून त्यांची परिणामकारक अमंलबजावणी कशी करता येईल ते बघणे.

या सर्व बाबींचा विचार करूनच संग्रहालये आपल्या ध्येय-धोरणांची निश्चिती करत असतात. आपल्या मर्यादा आखून घेतल्या असल्याने त्यांच्या कार्यात फारशा समस्या उद्भवत नाहीत. दुर्देवाने भारतातील आजच्या शिक्षणपद्धतीत अनेक उणीवा वा दोष आहेत. या शिक्षणपद्धतीत व्याख्यानाद्वारे शिक्षण देण्यावर भर असतो. त्यात प्रत्यक्षिकाला विशेष महत्व दिले जात नाही. त्यामुळे अशा शिक्षणाची परिणामकारकता ही कमी आहे. व्यावहारिक जीवनातही अशा शिक्षणाचा फारसा उपयोग होत नाही. म्हणूनच अलीकडे शिक्षणतज्ज्ञाचा,

कृतीशील शिक्षणाला चालना देण्यावर भर असतो. अशावेळी वस्तुसंग्रहालयातील विविध रचना, तेथील प्रयोग, विज्ञान तंत्रज्ञानाचे विविध नमुने इ. गोष्टींचे प्रदर्शन पाहून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या रचनात्मक विचारशक्तीला चालना  तर मिळतेच शिवाय अंगच्या कलागुणांना वावही मिळतो. त्यांची जिज्ञासा, जागृत केली जाते. ज्याप्रमाणे प्रदर्शनाद्वारे ऐतिहासिक परंपरेचे ज्ञान होते, त्याच्याप्रमाणे विज्ञानाच्या शाखा आणि उपशाखांतील प्रदर्शने, विद्यार्थ्यांची शास्त्रीय बैठक तयार होऊ शकते.

ज्ञानसंपादनाच्यादृष्टीने वस्तुसंग्रहालये ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरतात. त्यातील वस्तू प्रयोग, रचना, प्रदर्शने याद्वारे विद्यार्थ्यांना अनेक गोष्टींची प्रिचती येते. तसेच संग्रहालयातील दृक श्राव्य साधनांद्वारा दिलेले शिक्षण अत्यंत परिणामकारक होऊ शकते. म्हणून अलीकडे संग्रहालयाद्वारे मिळणाऱ्या शिक्षणालाही जरी ते अनौपचारिक असले तरी महत्व प्रप्त झाले आहे.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९६० मध्ये दिल्ली येथे भारताचे राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाच्या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी वस्तुसंग्रहालयाचे महत्व विषद केले होते. त्यांच्या मते, वस्तुसंग्रहालय हे फक्त विविध वस्तु साठवण्याचे ठिकाण किंवा आपले घर नसून संग्रहालये भारतातील शैक्षणिक व्यवस्था व सांस्कृतिक कार्यक्रमाचा महत्वाचा आरसा आहेत आणि ते खऱ्या अर्थाने लोकशिक्षणाचे केंद्रे आहेत.

प्रे. कबीर यांच्या मते, सर्व सोयी, सुखसोयी, सुविधांनी सज्ज असलेली वस्तुसंग्रहालये कि ज्यामध्ये दृक श्राव्य तंत्रज्ञान सर्व प्रकारच्या ज्ञानाचा प्रसार सर्व वर्गातील व वयोगटातील समूहास करतात. यावरून असे सिद्ध होते की वस्तू फक्त सग्रंहालयात शोभेच्या वस्तू नसून ते लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम आहेत. आधुनिक काळात जे विषय शाळा व महाविद्यालय सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना देऊ शकत नाही. ते ज्ञान वस्तूसंग्रहालये सर्व विषयातील ज्ञान पुरवतात. त्यामुळे वस्तुंसंग्रहालयाचे महत्व वाढलले आहे.

प्रे. कबीर इ. सारख्या मान्यवरांनीही आधुनिक वस्तुसंग्रहालयांची लोकशिक्षणासाठी असणारी गरज मान्य केली आहे. अशातर्हेने आधुनिक वस्तुसंग्रहालयांनी वस्तुंचा संचय करण्यापुरता मर्यादित असलेला आपला दृष्टिकोन अधिक समाजाभिमुख केलेला आहे. संग्रहासाठी सामान्य जनतेच्या दृष्टिकोनातून विविध शैक्षणिक उपक्रम हाती घेतले आहेत त्याचे दोन प्रमुख भाग पडतात. ते पुढीलप्रमाणे -

## ६.४ संग्रहालयातील अंतर्गत उपक्रम (IN-HOUSE ACTIVITIES)

संग्रहालयातील जे उपक्रम असतात त्यामध्ये संग्रहालयीन इमारतीतील प्रदर्शने तसेच संग्रहालयाच्या आवारात भरवण्यात येणारे वेगवेगळे उपक्रम इ. चा अंतर्भाव होतो हे सर्व उपक्रम प्रेक्षकांना ज्ञान व मनोरंजनाचा लाभ व्हावा या दृष्टीने आखलेले असतात. संग्रहालयातील विविध तर्हेचे उपक्रम पुढीलप्रमाणे असतात :-

### ६.४.१ प्रदर्शनेः

संग्रहालये प्रदर्शने करवून लोकशिक्षण साधीत असतात. दृक-श्राव माध्यम नेहमीच अधिक परिणामकारक असल्यामुळे संग्रहालयांतर्गत उपक्रमांमध्ये त्यांना प्राधान्य देण्यात येते.

वस्तुंचे प्रदर्शन बघत असताना सर्वसामान्य प्रेक्षक त्यांच्याशी अबोलपणे संवाद साधत असतात. तेथे प्रदर्शनातील कलावस्तूंना फार महत्व असते. त्यामुळे लोकांशी संवाद साधू शकतील अशा निवडक वस्तूंचेच प्रदर्शन करणे हे संग्रहालयाचा हेतू साध्य करण्यासाठी जरूरीचे असते. प्रदर्शनात वस्तूंची निवड करताना पुढील ३ बाबी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

अ) प्रेक्षकांना प्रदर्शनाचा योग्यरीतीने आस्वाद घेता येईल असे ते असावे.

ब) प्रदर्शन करताना वस्तू प्रेक्षकांच्या दृक शक्तीप्रमाणे योग्य अंतरावर ठेवणे व त्यांची कलात्मक मांडणी करणे हे ही अतिशय महत्वाचे आहे.

क) प्रदर्शनातील मांडणी व त्यातील वस्तूंची निवड अशी असली पाहिजे की प्रदर्शनाद्वारे प्रेक्षकांची जिज्ञासा जागृत झाली पाहिजे.

या प्रमुख बांबी बरोबरच प्रदर्शन आयोजित करताना आणखीही काही गोष्टींचा विचार करावा लागतो. त्या म्हणजे एखाद्या कलावस्तूंची मांडणी करताना लागणारी जागा परिणामकारक अशी रंग व प्रकाशयोजना त्या कलावस्तूला योग्य अशी पार्श्वभूमी, इ. सर्व बाबींचा गंभीरपणे विचार करावा लागतो. कारण, अशाच प्रदर्शनांचा ठसा सर्वसामान्य प्रेक्षकांच्या मनावर खोलवर रूजत असतो.

### ६.४.२ माहितीपत्र गोष्टी (Explanatory Devices):

प्रेक्षकांशी संवाद साधण्याच्या आधुनिक तंत्रांनी आजच्या युगात फारच छाप पाडलेली आहे. शिवाय वस्तूसंचयाकडून समाजाभिमुख अशी भूमिका संग्रहालयांनी स्विकारली असल्याने प्रेक्षकांशी संवाद साधण्याऱ्या विविध घटकांना अतिशय महत्व प्राप्त झाले आहे ते पुढीलप्रमाणे

- प्रदर्शनात प्रत्येक वस्तूंसमोर तिचा इतिहास, तिची माहिती व त्या वस्तूंचे महत्व इ. विषयीचे माहितीपत्रक असणे अत्यंत महत्वाचे असते. अन्यथा, प्रेक्षकांना त्या वस्तूविषयी योग्य माहिती कळणार नाही आणि तिचे महत्वही कळणार नाही. तसेच माहितीच्या अभावी प्रेक्षकांना आपल्या सांस्कृतिक वारशाविषयी अभिमान वाटणार नाही. ही माहितीपत्रके वस्तूंविषयी विस्तृत माहिती सांगणारी मोठमाठी वा अपुरी माहिती सांगणारी त्रोटक अशी नसावी, वस्तु पाहताना या माहितीपत्रकांवरून प्रेक्षकांची उत्सुकता तर चाळवली जातेच पण शिवाय त्याच्या ज्ञानाची तहानही भागते. अशी माहितीपत्रके अभ्यासुवृत्तीच्या काही प्रेक्षकांना घरी नेण्यासाठीही हवी असतात. ती जर प्रेक्षकांसाठी उपलब्ध करून दिली तर त्याचा अधिक फायदा होऊ शकतो.

- वस्तूंची पार्श्वभूमी : काही विशिष्ट प्रकारच्या वस्तूंना वास्तववादी पार्श्वभूमीची गरज असते. उदा. विविध तर्हेचे पोषाख, फर्निचर, घरगुती वस्तू इ. चे वास्तववादी प्रदर्शन म्हणजे नैसर्गिक पार्श्वभूमीवर उभारणी केल्यास शालेय विद्यार्थ्यांना त्यातुन अधिक चांगल्यारीतीने माहिती मिळू शकते. शिवाय, तत्कालीन जीनस-संदर्भ स्पष्ट हुबेहुब प्रत्यक्षदर्शी कलाकृती अशा नमुन्यांद्वारे (Life-Size Models) तर विद्यार्थ्यांना वस्तूंचे व आशयाचे संदर्भसहित स्पष्टीकरण होत असते. विशेषत : Life Size Models मुळे

तर प्रेक्षकांना एखाद्या वस्तुंच्या विषयाचे 'त्रिमिती दर्शन' होत असल्याने त्यांना ती कल्पना अधिक स्पष्ट होत असते.

- संग्रहालयातील कलावस्तूंची तालिका इत्यादी प्रकाशित करणे, त्यांची पोस्ट कार्ड आकाराची विविध छायाचित्रे तसेच मार्गदर्शक पुस्तक वगैरे छापून घेऊन त्यांची नाममात्र किंमतीस विक्री करणे इ. बाबींकडे लक्ष देणं महत्वाचे ठरते

- आधुनिक वस्तुसंग्रहालयांमध्ये विविध माध्यमे म्हणजे दृक श्राव माध्यमे उपलब्ध असतात ह्यात टेप, कॅसेट, टेपरेकॉर्डर, स्लाईड, कॉम्प्युटर्स, चित्रफिती इ. समावेश असतो. या माध्यमांद्वारा प्रेक्षकांना संग्रहालयाविषयीची अधिक सखोल माहिती मिळू शकते व विविध संग्रहालये संग्रहालयातील वस्तूंच्या चित्रफीती बनवून विद्यार्थ्यांना आणि इतर प्रेक्षकांना त्याचा लाभ करून देत असतात. शिवाय विविध ठिकाणच्या प्रदर्शनामध्ये प्रदर्शनाविषयीची माहिती टेपरेकॉर्डरच्या सहाय्याने लोकांना देऊ शकतात अशा तर्हेच्या माहितींचा अंध व्यक्तींना विशेष उपयोग होतो.

- प्रबोधनपर प्रदर्शने - आधुनिक संग्रहालयामध्ये अशा तर्हेची आता सरसकट रूढ झालेली आहेत यामध्ये एकाच तर्हेच्या कलावस्तू न ठेवता विभिन्न प्रंतातील विविध कला वस्तूंचे चांगले दर्शन होऊ शकते. त्यातूनच आपल्याला विकासातील अनेक टप्प्यांचा सविस्तर अभ्यास करता येतो. आजकाल वस्तूंच्या प्रदर्शनांना अतिशय महत्व प्रप्त झाले आहे. पारंपारिक वस्तुसंग्रहालयात  वस्तूप्रदर्शन करण्याच्या तांत्रिक बाबींचा विचार केला जात नसे मात्र आजकाल तो विचार केला जात आहे.

### ६.४.३ व्याख्याने:

संग्रहालयांतर्गत उपक्रमांमध्ये व्याख्याने आणि प्रत्याक्षिकांचा ही समावेश होतो. ही व्याख्याने व प्रत्याक्षिके प्रेक्षकांसाठी आयोजित केली जातात. वस्तुसंग्रहालयातील वाचनालयात सार्वजनिक सभागृहात इ. ठिकाणी त्यांचे आयोजन केले जाते. साहित्य, सभा, विशेष परिषदा इ. चे ही विशेष प्रसंगी आयोजन केले जाते आणि त्याद्वारे पे्रक्षकांना संग्रहालयाची आणि त्यातील कलावस्तूंची माहिती दिली जाते. याचा अर्थ संग्रहालयांमध्ये येणाऱ्या प्रेक्षकांना संग्रहालयातील माहिती देण्यासाठी एका विशेष व्यक्तीची नेमणूक केलेली असते. प्रेक्षकांच्या शंकांचे निरसन करणे, प्रेक्षकांना वस्तू विषयी माहिती पुरवणे इ. बाबी या व्यक्तीला बघाव्या लागतात.

अनेक वेळा प्रश्नोत्तरे, चर्चासत्रे इ. चे आयोजनही केले जाते. अर्थातच त्यातून संग्रहालय आणि प्रेक्षक यांच्यामध्ये अधिक सुसंवाद साधला जातो. अशा चर्चासत्रांमधून गोळा केलेली माहिती ही केवळ प्रेक्षकांना उपयोगी पडत नाही तर ती संग्रहालयाच्या प्रशासकांनाही संग्रहालयाचा दर्जा उंचावण्यासाठी उपयोगी पडत असते.

### शिक्षकांचे प्रिशक्षण सत्र :

संग्रहालये शिक्षकांसाठी ही प्रिशक्षण आयोजित करीत असतात. शिक्षकांना प्रिशक्षण मिळाल्यावर ते आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनाही ते ज्ञान देऊ शकतात.

वस्तुसंग्रहालयातील व्यवस्थापकाच्या मार्गदर्शनाखाली वस्तूसंग्रहालय संघटना निर्माण झालेली असते. त्या संघटनेद्वारा आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्याचा प्रयत्न संग्रहालयामध्ये होत असतो.

**६.४.४ प्रात्यक्षिकेः**

प्रत्यक्षिकांद्वारा ही प्रेक्षकांना बरेच ज्ञान मिळत असते. शिवाय आधुनिक काळातील विकासाचा आणि प्रगतीचा मागोवा घेणे ही प्रात्यक्षिकांमधून शक्य होते . उदा. शेतकी क्षेत्रातील प्रगती ही शेतकी विषय प्रदर्शनामार्फत लोकांपर्यत पोहचविणे शक्य असते. उदा. गहू, तांदूळ, कापूस इ. च्या सुधारित बी-बियाणांचे प्रदर्शन आयोजित केले जाते. त्या त्या उत्पादनाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी, यांचे रोग, रोगावरची औषधे इ. सर्व गोष्टीविषयक माहिती प्रदर्शने अथवा प्रत्यक्षिके आयोजित केली जातात. जेथे अशिक्षित शेतकर्यांना माहितीपत्रके वाचणे अशक्य असते. तेथे अशा प्रत्यक्षिकांचा फार मोठा उपयोग होतो. कारण वाचना अभावी जे ज्ञान शेतकऱ्याला मिळू शकत नाही ते ज्ञान त्याला प्रत्यक्षिकांद्वारे मिळते.

संग्रहालयांतर्गत उपक्रमांमध्ये वर नमूद केलेल्या उपक्रमाव्यतिरिक्त इतरही काही उपक्रम असतात. नियमित घेण्यात येणाऱ्या चाचण्या, वक्तृत्व स्पर्धा , शिष्यवृत्तीची सोय इ. विविध शैक्षणिक उपक्रम संग्रहालयाद्वारे राबविले जातात. अर्थात या उपक्रमाद्वारे प्रेक्षकांची जिज्ञासु व अभ्यासू वृत्ती वाढीस लागते असे अनुभवांनी लक्षात आले आहे.

**६.४.५ प्रकल्प योजना :**

- अलिकडच्या काळात संग्रहालयांतर्गत उपक्रमांमध्ये विविध प्रकल्प हाती घेण्यात येतात. त्यामध्ये विविध शैक्षणिक उपक्रम म्हणजे चित्रकला वर्ग, रंगकला वर्ग, मातीच्या वस्तू बनवणे इ. सारख्या तर बाहुल्या व खेळणी बनवणे, शिल्पकला, कठपुतळ्या बनवणे वगैरेसारख्या हस्तकलांना प्रेत्साहन देणाऱ्या वर्गाचेही आयोजन केले जाते. कलेचा विकास व्हावा यादृष्टीने तर हे वर्ग आयोजित केले जातातच पण त्यातून सांघिक भावना वाढीस लागून सहकार्याचे तत्व ही विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले जाते. तसेच लेख व निबंध लिहीणे, त्यासाठी कार्यशाळा आयोजणे यातून शैक्षणिक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढीस लागेल या दृष्टीने प्रयत्न केले जातात.

- विद्यार्थ्यांसाठी विविध संकल्पना देऊन विद्यार्थ्यांना ह्या विषयीचे प्रदर्शन आयोजित करण्यासाठी प्रेरित करणे हाही उपक्रम संग्रहालये हाती घेत असतात. यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे स्वाध्याय ही शिक्षणाची सर्वात प्रभावी पद्धत आहे. जर विद्यार्थ्यांना कल्पना देऊन स्वाध्यायाद्वारे प्रदर्शन आयोजित करण्यास सांगितले तर विद्यार्थी त्यावर विचार करून प्रदर्शन भरवत असतात. अर्थातच येथे विद्यार्थ्यांच्या विचार शक्तीला चालना मिळते. बुद्धी कौशल्याचा वापर करता येतो व त्यांच्यातील सुप्त आत्मविश्वास वाढीस लागतो ज्यावेळी विद्यार्थ्यांना इतरांच्या मदतीची गरज लागते. त्यावेळी संग्रहालय ते साध्य करत असते. परंतु शक्य तोवर विद्यार्थी स्वतःच प्रदर्शनाचे काम करत असतात. अशावेळी विद्यार्थ्यांचे दोन गट पाडण्यात येतात एक गट हा प्रदर्शन भरवेल व दुसरा गट प्रदर्शनाचे निरीक्षण करून त्याचे परिक्षणही करेल. परीक्षण करताना त्या प्रदर्शनातील त्रुटी व उणीवा काय आहेत त्याचा निर्णय हा निरीक्षण गट

देतो म्हणजे पुढील प्रदर्शनास या त्रुटी/उणीवा दूर करण्याचा प्रयत्न प्रदर्शक गट करत असतो.

- संग्रहालयांमध्ये नियमित अथवा अनौपचारिक तसेच छोट्या कालावधीचे विविध वर्गही आयोजित केले जातात. त्यात (क्वीझ/ गेमस्) प्रश्नमंजूषा इ. सारखे ही खेळ आयोजित केले जातात. उदा. संग्रहालयातील बाहुल्यांचे प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना नेले असता ते प्रदर्शन पाहिल्यावर त्या विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून, त्यांना क्लू देवून त्यांच्यापासून विविध प्रश्नांची उत्तरे काढून घेणे इ.

उदा. वर नमूद केल्याप्रमाणे प्रदर्शनात विविध देशांच्या बाहुल्या ठेवल्या होत्या हे प्रदर्शन पाहिल्यानंतर विद्यार्थ्यांनी कितपत ज्ञान मिळवले आहे. त्याची परीक्षा घेण्यासाठी आपण पुढील तर्हेचे प्रश्न विचारू शकतो.

१. कोणत्या (प्रकारच्या) देशातील बाहुलीने कोणत्या प्रकारचा ड्रेस घातला?

२. कोणत्या (प्रकारच्या) देशातील बाहुलीचे डोळे मिचमिचे व रंग पिवळा होतो?

याच तर्हेचे वर्ग अथवा उपक्रम विविध विषयांमध्ये म्हणजे खनिज द्रव्य, आकाशातील ग्रह तारे, फुलांचे पक्ष्यांचे प्रकार, वस्त्राचे प्रकार इ. विषयी घेता येतात. अशा तर्हेचे वर्ग वस्तुसंग्रहालयात नियमितपणे छोट्या कालावधीत घेतले जातात. अशा तर्हेच्या वर्गासाठी संग्रहालयातील ग्रंथालयाचाही लाभ घेण्याची प्रेक्षकांना काही वेळा परवानगी दिली जाते.

### ६.४.६ विशेष प्रदर्शने :

संग्रहालये ठराविक कालाने विविध विषयांवर वैशिष्ट्यपूर्ण प्रदर्शने आयोजित करत असतात. ही प्रदर्शने नवीन कल्पना व नवीन ज्ञान लोकांपर्यंत पोचावे म्हणून केले जाते. विविध तर्हेची, विविध विषयांवरील, विविध उद्देशांनी प्रदर्शने आयोजित करण्यात येत असली वा ती तात्पुरती वा कायमस्वरूपी प्रदर्शने असली तरी त्यातून सत्य घटना व सत्य गोष्टी लोकांपुढे आल्या पाहिजेत हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. तरच प्रदर्शनाचा हेतू साध्य होईल. शिवाय प्रदर्शन हे अर्थपूर्ण असले पाहिजे त्यामुळे प्रदर्शनासाठी विषयाची निवड ही अत्यंत काळजीपूर्वक झाली पाहिजे. विषयाची निवड केल्यानंतर प्रदर्शन भरवताना पुढील गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

प्रदर्शन विषयाच्या तज्ञ लोकांचे सामुहिक कार्य, प्रदर्शन आकर्षक होईल असे तंत्र इ.

शिवाय, अशा प्रदर्शनातून लोकांना देण्यात येणारा संदेश हा लोकांपर्यंत पोहचला जाईल यासाठी प्रयत्न करणे.

**आपली प्रगती तपासा.**

प्र. वस्तुसंग्रहालयातील अंतर्गत उपक्रम कोणते ते सांगा.

## ६.५ संग्रहालयांचे बाह्य उपक्रम (OUT-REACH ACTIVITIES)

आधुनिक संग्रहालये आपल्या उपक्रमांना संग्रहालयातच मर्यादित ठेवत नाहीत. तर लोकांपर्यंत जाऊन लोकांना ज्ञानदान करण्याचे काम ते करत असतात. ते पुढीलप्रमाणे-

### ६.५.१. शालेय व महाविद्यालयीन उपक्रम :

- आधुनिक संग्रहालये शाळा व महाविद्यालयांना भेट देऊन त्या संस्थांमध्ये विविध कार्यक्रम आखत असतात. अर्थातच त्यामुळे संग्रहालये व शैक्षणिक संस्था यांच्यात संवाद साधला जातो. संग्रहालयाचा व्यवस्थापक विविध शाळा व महाविद्यालयात व्याख्याने आयोजित करीत असतो. अशा व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांना कितपत ज्ञान झाले आहे. याविषयी तोंडी चाचणी व लेखी परीक्षा घेतली जाते अथवा प्रश्नोत्तरांसारखे कार्यक्रम घेतले जातात.

- संग्रहालये ही विविध संकल्पना विविध विषयांवर शोकेस भाड्यावर देत असतात त्याचप्रमाणे विविध नकाशे, आराखडे, विविध शिल्पाकृतीची, कोरीव लेखांची, नाण्यांची छायाचित्रे इ. तात्पुरत्या वापरासाठी शैक्षणिक संस्थांना देत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना अशा विषयीची नुसती ऐकीव माहिती मिळत नाही तर त्याचे संदर्भासहीत स्पष्टीकरण होते आणि ते त्यांच्या चांगले स्मरणातही राहते. अशा तर्हेची दृक्-साधने शालेय विद्यार्थ्यांना पुरविणे हा संग्रहालयाचा एक उपक्रम झालेला आहे.

- जगातील विविध विषयांवरील माहिती देणारे विशेषतः मासिक व पुस्तकांच्या स्वरूपात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पुरविणे हाही आधुनिक संग्रहालयांचा एक उपक्रम आहे.

- शास्त्रीय व औद्योगिक संस्थांसारख्या ठिकाणी विद्यार्थ्यांना ज्ञान मिळेल अशा स्वरूपाचे प्रदर्शन आयोजित करणे. अर्थातच, येथे ऐकीव माहिती बरोबरच त्या त्या विषयाचे प्रत्यक्षिकही पहायला मिळाल्याने विद्यार्थ्यांना विषयाचे आकलन अधिक चांगल्या तर्हेने होते.

- संग्रहालये, बागकाम, विविध भाज्यांचे उत्पादन घेणे वगैरे गोष्टी शिकविण्यासाठी त्यांचे प्रिशक्षण वर्गही आयोजित करतात. त्याचप्रमाणे काही ठिकाणी प्रत्यक्ष भेट देणे, विशेषतः स्थानिक प्रणीसंग्रहालये वगैरेसारख्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या सहली आयोजित करीत असतात. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अशा सहली आवश्यक असतात कारण विविध पशू-पक्षी यांविषयी त्यांना 'चक्षुर्वेसत्यम' ज्ञान होत असते.

- संग्रहालये ही शैक्षणिक संस्थांसाठी आणखीही विविध उपक्रम राबवित असतात. त्यात खजिन्याची पेटीसारखा उपक्रम असतो. याचा अर्थ विद्यार्थ्यांना एखादा विशिष्ट विषय अभ्यासासाठी दिलेला असतो. उदा. एखादा देश. या देशाविषयी विद्यार्थ्यांनी सर्व माहिती गोळा करावयाची व ती कागदावर लिहून त्या पेटीत टाकावयाची. त्यानंतर ती पेटी उघडली जाते आणि त्यातील माहितीचे संकलन होऊन त्या देशाविषयीच्या सर्व

माहिती चर्चासत्रात चर्चिली जाते. त्यातून शंकाचे निरसन, प्रश्नोत्तरे इ. द्वारा विद्यार्थ्यांना त्या देशाविषयी सखोल ज्ञान प्रप्त होते.

- अंध विद्यार्थ्यांसाठी संग्रहालये विशेष तर्हेचे उपक्रम आखत असतात. यात विशेषतः अंध विद्यार्थ्यांसाठी प्रदर्शन आयोजित करणे इ. उपक्रम संग्रहालये आयोजित करीत असतात. उदा. ऑपरेशनसाठी लागणाऱ्या विविध उपकरणांचे विविध यंत्रसामग्रीचे प्रदर्शन भरवणे इ. याद्वारे वैद्यकीय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना विषयाचे सखोल ज्ञान देणे हा हेतू साध्य होतो.

- विज्ञान प्रदर्शनांचे वार्षिक आयोजन करणे हेही संग्रहालयांकडून विद्यार्थ्यांसाठी केवळ पाहण्यासाठीच नव्हे तर विद्यार्थ्यांनी त्यात सिक्रय भाग घेण्यासाठी भरविले जाते.

अशा उपक्रमांद्वारा संग्रहालये व शैक्षणिक संस्था यांच्यात अधिक जवळीक निर्माण होऊ शकते.

### ६.५.२. संग्रहालयाच्या ग्रमीण भागातील सेवा :

वर उल्लेखिलेल्या बहुतांश उपक्रमांचा लाभ शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नागरी समाजातील प्रेक्षकांना होत असतो. अशा पार्श्वभूमीवर संग्रहालये ही ग्रमीण समाजाशी कसा संपर्क साधतात व कोणत्या उपक्रमांतून ते त्यांच्याशी संवाद साधतात ते बघणे उचित ठरेल. भारताची बहुसंख्य लोकसंख्या ही ग्रमीण भागातील आहे आणि ह्या ग्रमीण लोकांसाठीही संग्रहालये अनेक उपक्रम राबवत असतात. अशा उपक्रमांत ग्रमीण भागातील स्थानिक लोकांच्या गरजांचा अधिक विचार केला जातो. अशा ठिकाणी संग्रहालयांना स्थानिक कला-कौशल्याला वाव मिळेल अशा कला-हस्तकलाविषयक बाबींना प्रधान्य देणे आवश्यक आहे. त्याशिवाय अशा ही उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे की ज्यातून स्थानिक लोकांना आधुनिक विषयांचे ज्ञान मिळेल, उदा. 'जंगल-संवर्धनाचे शास्त्र' (Forestry), शिकार (Hunting), रेशमाच्या किड्यांपासून रेशमाचे उत्पादन घेणे (Sericulture), बागकाम कला व शास्त्र (Horticulture), मासेमारी (Fishing etc.), अर्थातच अशा विविध विषयांचे शास्त्रशुद्ध प्रिशक्षण देण्यासाठी ग्रमीण भागात ठिकाठिकाणी संग्रहालयांची साखळीच तयार होणे आवश्यक आहे.

मोकळ्या मैदानावरील प्रदर्शने (संग्रहालये), फिरत्या गाडीद्वारा कार्यक्रमांचे आयोजन, वार्षिक मेळे इ. विविध उपक्रमांद्वारे संग्रहालये ग्रमीण जनतेला अत्यंत उपयुक्त असे शिक्षण प्रत्यक्षिकांद्वारा देऊ शकतात. अर्थातच असे शिक्षण फारच प्रभावी असते. हे प्रिशक्षण देण्यामागे स्थानिक लोकांना रोजगार मिळण्यास उपयुक्त व्हावे असा दृष्टिकोन असतोच, पण शिवाय आजच्या जगातील प्रगतीचे विविध टप्पे ग्रमीण समाजापुढे मांडावेत हाही हेतू असतो. शास्त्रीय प्रगती, औद्योगिक प्रगती, शेतीची आधुनिक तंत्रे ह्याबरोबरच स्थानिक पातळीवरील लोकांची आरोग्यविषयक तसेच कुटुंब नियोजनाची गरज इ. जाणीवा जागृत करण्याचे कामही ती करत असतात. ग्रमीण भागातील जनजागरणाच्या कार्यक्रमांत ह्या संग्रहालयांचे स्थान अद्वितीय आहे आणि म्हणूनच अशा संग्रहालयांना छायाचित्रांचे प्रदर्शन, चित्रफीतींचे प्रदर्शन तसेच ग्रमीण लोकांचे सांघिक उपक्रम इ. साठी शासनाकडून आर्थिक सहाय्य देण्यात यावे. थोडक्यात म्हणजे ग्रमीण भागातील अशिक्षित लोकांना जरूरीचे असे

ज्ञान देण्याचे कार्य संग्रहालये करत असतात. हे कार्य करत असताना संग्रहालयांनी पुढील बाबी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

१. ग्रमीण भागातील संग्रहालयांनी आपणापुढे एक ध्येय ठेवले पाहिजे. ते म्हणजे कायमस्वरूपी असो अथवा फिरते प्रदर्शन असो कोणत्याही प्रदर्शनाद्वारा लोकांना सहज शिक्षण मिळेल अशा तर्हेचे साधे व सुस्पष्ट असावे.

२. प्रदर्शनाद्वारा लोकांना देण्यात येणारा संदेश हा अत्यंत सुस्पष्ट असावा व तो थेट लोकांपर्यंत जाऊन पोहोचला पाहिजे.

३. संग्रहालयांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये उदा. प्रदर्शनात एखाद्या विशिष्ट विषयाचीच निवड करणे जरूरीचे आहे. शिवाय हे विषय स्थानिक लोकांच्या गरजांप्रमाणे निवडावेत थोडक्यात म्हणजे उपक्रम ज्या लोकांसाठी आहे त्यांच्या कुवतीप्रमाणे आणि गरजेप्रमाणे आखण्यात यावा.

४. एकावेळी एकच सुस्पष्ट उपक्रम आखण्यात यावा, हे तर खरेच, परंतु त्याचबरोबर ग्रमीण अशिक्षित जनतेपर्यंत विविध विषय, विविध संकल्पना पोहोचवणे ही आवश्यक असते. त्यासाठी वेळोवेळी प्रदर्शनांच्या विषयांत बदल करावा.

५. दृक-श्राव्य माध्यमांचा अशा प्रदर्शनांमध्ये जरूर उपयोग करावा कारण त्याद्वारे प्रभावी शिक्षण लोकांना मिळू शकते. एकाचवेळी ज्ञान आणि मनोरंजनाचा लाभ प्रेक्षकांना देण्याचे सामर्थ्य ह्या माध्यमांमध्ये असल्याने प्रेक्षकांच्या (ग्रमीण) नीरस अथवा साचेबंद स्वरूपाच्या जीवनात चैतन्य खेळते.

६. 'समाज-विकास' हा हेतू मनी धरून संग्रहालयांनी त्या दृष्टीने आपल्या कार्यक्रमाचे नियोजन करावे.

### ६.५.३ शहरी सेवा:

संग्रहालयांच्या बाह्य उपक्रमांमध्ये शहरी प्रेक्षकांसाठी ही कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यात प्रदर्शनाच्या (संग्रहलयांतर्गत आणि बाह्य) प्रेक्षकांना माहिती देणाऱ्या व्याख्यानांचा समावेश होतो. काही वेळा प्रेक्षक स्वतःच कार्यक्रम आयोजित करतात. तेथे ही संग्रहालयांच्या अधिकार्यांनी विनंतीनुसार मार्गदर्शक व्याख्याने देणे आवश्यक आहे. मुक्त प्रदर्शने, वार्षिक मेळे, फिरत्या गाडीवरील प्रदर्शनांसारखे कार्यक्रम, सांघिक कार्यक्रम इ. सर्वांचे नागरी प्रेक्षकांसाठी आयोजन करणे जरूरीचे आहे. अर्थातच येथे शहरी लोकांच्या ही जरूरीप्रमाणे विषयांची निवड करावी. उदा. अतिरिक्त लोकसंख्येची समस्या, 'एड्स'ची समस्या, प्रदूषण इ. त्या त्या समस्यांची गंभीरता लोकांपुढे पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावेत.

### ६.५.४ परदेशांतील प्रदर्शने :

संग्रहालये ज्याप्रमाणे देशात शहरी आणि ग्रमीण भागातील लोकांसाठी प्रदर्शन आयोजित करत असतात. त्याप्रमाणे परदेशांतही तेथील लोकांसाठी आयोजित करत असतात. आधुनिक संग्रहालयांनी आपल्या कार्यक्षेत्राची मर्यादा ही देशापुरतीच आखून घेतलेली नाही. तर सर्व दूर अशा देशांमध्ये ही आपल्या नैसर्गिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वैभवाचे

दर्शन घडवावे व त्यातून परदेशातील लोकांना आपल्या देशांविषयी माहिती मिळावी हा त्यामागचा हेतू असतो अशा हेतूने आयोजित केलेली काही प्रदर्शने पुढीलप्रमाणे-

भारत सरकारने जगात अनेक ठिकाणी आपल्या संस्कृतीचे दर्शने घडविण्यासाठी 'भारत महोत्सव' (India Festival) कार्यक्रमांचे आयोजन केले होते. उदा. १९८१ मध्ये लंडन (ग्रेट ब्रिटन) येथे, तर १९८५ मध्ये फ्रान्स, तर १९८५-८६ मध्ये अमेरिका (यू.एस.ए.) इ.

याशिवाय समकालीन भारतीय कलाकारांच्या, चित्रकारांच्या चित्रांचे प्रदर्शन आणि विक्री संग्रहालयातर्फे इंग्लंडमध्ये करण्यात आली. हे प्रदर्शन १२ जून १९९५ रोजी इंग्लंडमधील 'सोथबी' ह्या सुप्रिसद्ध कला-दालनात आयोजित केले होते. आणि त्यात मकबूल फिदा हुसेन, तय्यब मेहता, जोगेन चौधरी, रामेश्वर ब्रुटा, अर्पिता सिंग इ.च्या कलाकृती प्रदर्शित केल्या होत्या.

अशा प्रदर्शन आणि विक्री सारख्या कार्यक्रमांद्वारा परकीयांची भारतविषयक प्रितमा उंचावण्यास मदत होते. त्यांचे भारत, भारतीय संस्कृती, कला, वस्तुकला, भारतीय पाककृती इ. विषयीचे ज्ञान तर सखोल होतेच, परंतु त्यांना त्याविषयी आवड ही निर्माण होते. अनेकदा अशा प्रदर्शनांमुळे भारावून जावून परदेशीयांनी भारतभूमीस भेट ही दिली आहे. अर्थातच भारतास परकीय चलनाचा लाभही होतो. बरेच वेळा असे पर्यटक भारत भेटीस उपयुक्त होतात व परदेशी विद्यार्थीही आपल्या भाषा वगैरे शिकण्यास उपयुक्त होतात असे आढळून आले आहे.

अशा स्वरूपाच्या नानाविध प्रदर्शनांमुळे आधुनिक भारतीय संग्रहालयांचा चेहरामोहराच बदलू लागला. संग्रहालये किती विविध प्रकारचे कार्य करून आपला हेतू साध्य करीत असतात ते ह्यातून दिसून येते. शहरी, ग्रमीण, सुशिक्षित, अशिक्षित अशा सर्व तर्हेच्या लोकांना विविध उपक्रमांद्वारे ज्ञान आणि त्याचबरोबर मनोरंजन ह्या दोन्ही गोष्टींचा लाभ एकाच वेळी देऊन त्यांना शिक्षित करण्याचे महान कार्ये आधुनिक संग्रहालये करीत असतात.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्नः-वस्तुसंग्रहालयाचे बाह्य उपक्रम सांगा.

## ६.६ सारांश

वरील विवेचनावरून संग्रहालयाची बदललेली भूमिका समजते. संग्रहालयाच्या विविध उपक्रमांमुळे त्यांची लोकशिक्षणाची भूमिका समजण्यास मदत होते. आधुनिक काळात संग्रहालये लोकशिक्षणाचे व जनजागरणाचे फार मोठे कार्य करीत आहेत. परंतु भारताची स्थिती अजूनही एवढी समाधानकारक नाही आहे यासाठी सरकारने सकारात्मक प्रयत्न करायला हवेत. श्री. एन. आर. बॅनर्जी यांच्या मते, "विविध पुराणवस्तूंचे जतन करण्यासाठी शासनाने विविध टप्प्यांवर सतत कार्यरत असले पाहिजे तर वस्तुसंग्रहालयाची चळवळ भारतात खऱ्या अर्थाने लोकशिक्षण आणि जनजागृतीचे कार्य करू शकेल."

वस्तुसंग्रहालयांना आपली भूमिका बजावत असताना अनेक प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागते, असे जरी असले तरी वस्तुसंग्रहालयाचे आजच्या काळातील महत्त्व आपल्याला नाकारता येत नाही. वस्तुसंग्रहालयामुळेच देशातील सांस्कृतिक वारशांचे संग्रह आणि जतन करण्याचे काम होत आहे. त्यामुळे संग्रहालयाचे आधुनिक काळातसुद्धा अनन्यसाधारण महत्त्व आहे.

## ६.७ प्रश्न

प्र.१. वस्तुसंग्रहालयाच्या बदललेल्या भूमिकेचे वर्णन करा.

प्र.२. वस्तुसंग्रहालयाची अंतर्गत कार्ये स्पष्ट करा.

प्र.३. वस्तुसंग्रहालयाची बहिर्गत कार्ये कोणती ते स्पष्ट करा.

प्र.४. टिपा लिहा.

(अ) वस्तुसंग्रहालयाची बदललेली भूमिका

(ब) लोकशिक्षणावर भर

(क) वस्तुसंग्रहालयातील अंतर्गत कार्ये

(ड) वस्तुसंग्रहालयाची बहिर्गत कार्ये

(इ) वस्तुसंग्रहालयाचे अंतर्गत उपक्रम

(ई) वस्तुसंग्रहालयाचे बाह्य उपक्रम

## ६.८ संदर्भ

1. ThoratB.R., Principles of Museology, Archaeology, Archival &Library Science, Himalaya Publishing House, Mumbai-4
2. Banerjee, N. R., Museum and Cultural Heritage of India, Agam Kala Prakashan, New Delhi, 1990.
3. Dwivedi V.P, Museums and Museology: New Horizons, Agam Kala Prakashan, New Delhi, 1980.
4. Markham S. F., The Museums of India, The Museum Association, London, 1936.
5. Plenderleith H. J, The Conservation of Antiquities and Works of Art: Treatment, Repair and Restoration, Oxford University Press, New York, 1956.
6. Sarkar, H, Museums and Protection of Monuments and Antiquities in India, Sundeep Prakashan, New Delhi, 1981.

7. Thomson John M.A. and Others, Manual of Curatorship: A Guide to Museum Practice, Routledge, New York, 1984.

8. Wittlin Alma, Museums : Its History and Its Tasks in Education, Routledge and K Paul, London, 1949.

9. प्रा. डॉ. निशांत शेंडे, वस्तुसंग्रहालये , अथर्व पब्लिकेशन

10. कठारे अनिल , पाटील गौतम, पुरातत्वविद्या वस्तुसंग्रहालय आणि पर्यटन, विद्या बुक्स, औरंगाबाद.

11. देव शा. भा. , पुरातत्वविद्या

❖❖❖❖

# ७

# पुराभिलेखशास्त्र : अर्थ, व्याप्ती, उद्देश व प्रकार

**घटक रचना :**

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ अभिलेख म्हणजे काय ?

७.३ अभिलेख शास्त्राची व्याप्ती

७.४ अभिलेख शास्त्राची उद्दिष्टे

७.५ अभिलेखांचे प्रकार

७.६ सारांश

७.७ प्रश्न

७.८ संदर्भ

## ७.० उद्दिष्टे

१. अभिलेख संकल्पना समजून घेणे.

२. अभिलेखशास्त्राची व्याप्ती समजून घेणे.

३. अभिलेखशास्त्राची उद्दिष्टे आत्मसात करणे .

४. अभिलेखांच्या प्रकारांची माहिती जाणून घेणे.

## ७.१ प्रस्तावना

मानवी प्रगतीचा आलेख दर्शविणारी कागदपत्रे म्हणजे अभिलेख. मानवाने आपल्या जीवन प्रणालीला अनुसरून प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक व समकालीन अशा वेगवेगळ्या कालखंडात अभिलेखांची निर्मिती केली. अशा कागदपत्रांतून त्याच्या त्या-त्या कालखंडाला अनुसरून त्या-त्या कालखंडातील मानवाच्या सुसंघटीत जीवनाचा अनुभव प्रकट होतो. म्हणुनच मानवी जीवन व मानवी इतिहासाच्या दृष्टीने कागदपत्रांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

मानवाने वेगवेगळ्या कालखंडात जी कागदपत्रे निर्माण केली आहेत ती कागदपत्रे त्यांनी आपल्या कार्यप्रणालीला अनुसरून निर्माण केलीली आहेत. या कागदपत्रांमध्ये राजकीय,

धार्मिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक, प्रशासकीय स्वरूपाच्या कागदपत्रांचा समावेश आहे.

या प्रकरणात आपण कागदपत्र म्हणजे काय, कागदपत्रांना दस्तऐवजाचे स्वरूप कसे प्राप्त होते, तसेच दस्तऐवजाचे अभिलेखात कसे रूपांतर होते या बाबतची माहिती पाहणार आहोत. या माहिती बरोबरच अभिलेख शास्त्राची व्याप्ती, अभिलेख शास्त्राची उद्दिष्टे व अभिलेखांचे प्रकार या सर्व घटकांची माहिती पाहणार आहोत.

## ७.२ अभिलेख म्हणजे काय?

लॅटिन भाषेतील 'डॉक्युमेंटम' या मूळ शब्दावरून 'डॉक्युमेंट' हा शब्द आला आहे. इंग्रजी भाषेत कागदपत्रांना Document' असे म्हटले जाते. सुरुवातीला या शब्दाचा अर्थ 'उदाहरण', 'प्रत' अथवा 'धडा', असा लावला जात होता. बदलत्या परिस्थितीनुसार या शब्दाच्या अर्थात बदल होत गेला व या शब्दाचा अर्थ काहीतरी लिखित स्वरूपाचे असा लावला जावू लागला. मात्र आधुनिक कालखंडात या शब्दाचा अर्थ असा लावण्यात आला की, "जे कागदावरील लिखान लिखित स्वरुपात आहे किंवा छापील स्वरुपात आहे व त्या लिखानाला अर्थ लावता येवू शकतो, तसेच त्या लिखानाचा वापर पुराव्यासाठी होवू शकतो, असे अर्थपूर्ण लिखान म्हणजे कागदपत्रे किंवा डॉक्युमेंट होय "

वरील माहितीला अनुसरून लिखान, छापील लिखान, चिन्ह, चित्र, नकाशा, फोटो, आराखडा व तक्ता या सर्वच माहितीचा समावेश कागदपत्रांमध्ये करण्यात आला आहे.

कागदपत्रांना दस्ताऐवज असे सुध्दा म्हटले जाते. सर्वसाधारणपणे कागदावरील अर्थपूर्ण व उपयुक्त मजकुराला दस्ताऐवज असे म्हटले जाते. हे दस्ताऐवज सुद्धा हस्तलिखित, टंकलिखित व छापील स्वरूपात असतात. म्हणुनच या कागदपत्रांना दस्तऐवज असे म्हटले आहे. मानवाला अशा दस्ताऐवजांचा उपयोग दैनंदिनी जीवनासाठी, अभ्यासासाठी, संशोधनासाठी व शासन-प्रशासन कार्यासाठी होत असतो.

## ७.३ अभिलेखशास्त्राची व्याप्ती

अभिलेखशास्त्राच्या व्याप्तीचा विचार करतांना आपणांस प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडाचा विचार करावा लागेल. कारण या तिन्ही कालखंडात गरज, कार्य व बदलत्या प्रवाहानुसार अभिलेखशास्त्राला मूर्त स्वरूप प्राप्त झाले.

### ७.३.१ प्राचीन कालखंड:

१. प्राचीन कालखंडात कागद निर्मिती प्रक्रिये अगोदर अभिलेख निर्माण झाले होते. मात्र त्यांचे स्वरूप अत्यंत मर्यादीत होते. सुरवातीला दगड, विटा, प्राण्यांची हाडे, धातूंचे पत्रे, जनावरांची चामडी, झाडाची पाने, झाडांच्या साली आदींवर लिखान केले जात होते.या कालखंडात चिनी लोक बांबूच्या कामट्यांच्या पाट्यांवर लिखान करत होते. तर इजिप्शियन लोक पायरस नावाच्या पदार्थाचा कागदासारखा वापर करून त्यावर लिखान करत होते.

२. प्राचीन कालखंडातील अभिलेखशास्त्राची सुरवात सर्वसाधारणपणे प्राचीन ग्रीक संस्कृती पासून झाली असावी असे मानण्यात येते. यामध्ये अभिलेखाबरोबर इतर साहित्याचा समावेश होता .

३. प्राचीन कालखंडात अभिलेख शास्त्राला विस्तृत व व्यापक स्वरूप देण्याचे काम अथेन्स या प्राचीन नगरीने केले. अथेन्स नगरच्या सार्वजनिक चौकात देवांची मातेचे मंदिर होते. या मंदिरात अथेनियन शासनाची व इतर महत्त्वाची कागदपत्रे ठेवली जात होती. या कागदपत्रात विविध कायदेविषयक, तहविषयक व अहवाल विषयक कागदपत्रांचा समावेश होता. ही सर्व कागदपत्रे व्यवस्थित ठेवली जात होती.

४. प्राचीन कालखंडातील नाईल नदीच्या खोऱ्यातील इजिप्शिअन संस्कृती, तैग्रीस व युफ्रेटीस नद्यांच्या खोऱ्यातील संस्कृती, प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृती व भारतातील सिंधु नदीच्या खोऱ्यातील लोकांनी ऐतिहासिक दस्तऐवज मागे ठेवले आहेत. मात्र या दस्तऐवजावरील लिखान हे सांकेतिक चिन्ह व चित्रात्मक स्वरूपाचे आहे. तत्कालीन कालखंडात यांना अभिलेख म्हटले जात होते. त्या कालखंडातील हे सर्व दस्ताऐवज जास्त प्रमाणात प्रशासकीय, धार्मिक व आर्थिक स्वरूपाचे होते.

प्राचीन कालखंडातील या अभिलेखाबाबत श्री. अर्नेस्ट पॉसनोर यांनी असे म्हटले आहे की प्राचीन ग्रीक आणि टॉलेमी राजघराण्याच्या इजिप्तमधील दप्तरखान्याची संस्था ही खऱ्या अर्थांने आर्किव्हज या संज्ञेस पात्र ठरते.

**७.३.२ मध्ययुगीन कालखंड**:

मध्ययुगीन कालखंडात राजसत्ताक पद्धती मोठ्या प्रमाणात विकसित झाली. त्यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होवून मोठ्या प्रमाणात ऐतिहासिक दस्ताऐवज निर्माण झाली. त्यामुळे अशा दस्तऐवजांचे जतन करण्याचे प्रमाणही वाढले. पुढे स्थानिक संस्थांच्या अखत्यारीत दस्ताऐवज जतन करण्याची जबाबदारी अली. आज मध्ययुगीन कालखंडातील सलतनत, विजयनगर, बहामनी, मोगल, मराठा कालखंडातील दस्ताऐवज देखील मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

**७.३.३ आधुनिक कालखंड** :

१. आधुनिक कालखंडात ऐतिहासिक दस्ताऐवज जतन करण्याचा पहिला प्रयत्न टॉवर ऑफ लंडनमध्ये इंग्लिश राजा प्रथम एडवर्ड यांच्या कारकिर्दीत झाला. त्यांनी स्टेट पेपर ऑफिस स्थापन केले. त्यामुळेच अभिलेख व्यवस्थापनाचा पहिला प्रयत्न आपणांस इंग्लंड मध्ये झाल्याचा दिसतो.

२. फ्रेंच राज्यक्रांतीच्या कालखंडात फ्रांसच्या नॅशनल असेंबलीने जे क्रांतीसाठी प्रयत्न केले होते त्या प्रयत्नासाठी जी कागदपत्रे तयार केली होती ती कागदपत्रे जपून ठेवण्यासाठी आर्किव्हज संस्था स्थापन केली होती. पुढे याच संस्थेला फ्रांसची अधिकृत कागदपत्रे जतन करणाऱ्या संस्थेचे स्वरूप प्राप्त झाले. पुढे याच संस्थेचे स्वरूप व व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली .

३. इंग्लंडमधील पार्लमेंटच्या सत्राच्या कामकाजाच्या अनुषंगाने जी कागदपत्रे तयार होत होती त्यांचे जतन व्हावे या उद्देशाने इंग्लंडमध्ये १४ ऑगस्ट १९३८ मध्ये आर्काइव्हज संस्थेची स्थापना करण्यात आली होती. पुढे या संस्थेस पब्लिक रेकॉर्ड ऑफिस असे नावं देण्यात आले. ही संस्था इंग्लंडमधील कागदपत्रांचे जतन करण्याचे महत्त्वपूर्ण काम करत होती.

४. अमेरिकेमध्ये दस्तऐवजांचे संकलन व जतन करण्यासाठी १९ जून १९३४ मध्ये अशाच प्रकारची नॅशनल आर्काइव्हज स्थापन झाली होती.

५. भारतात ब्रिटीशांची राजवट सुरू असतांना ब्रिटिशांनी भारतातील अभिलेखांचे जतन करण्यासाठी प्रयत्न सुरू केले व या प्रयत्नातून त्यांनी "इम्पिरीअल रेकॉर्ड डिपार्टमेंट", नांवाने संस्था सुरू केली. पुढे भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारत सरकारने इम्पिरील रेकॉर्ड डिपार्टमेंटचा ताबा घेतला व त्याला "नॅशनल आर्काइव्हज ऑफ इंडिया", असे नावं दिले.

## ७.४ अभिलेखशास्त्राची उद्दिष्टे

१. कागदपत्रे संकलित करणे.

२. कागदपत्रांची छाननी करणे.

३. कागतपत्रांचे वर्गीकरण करणे.

४. कागदपत्रांची पडताळणी करणे.

५. कागदपत्रांची संरचनात्मक मांडणी करणे.

६. कागदपत्रांची कालखंड, प्रकार, गुणधर्म, उपयोगिता व महत्त्वानुसार विभागणी करणे.

७. कागदपत्रांचे व्यवस्थापन करणे.

८. कागदपत्रांचे जतन करणे.

९. कागदपत्रांचे भौतिक हानीपासून संरक्षण करणे.

१०. ऐतिहासिक कागदपत्रे संशोधनासाठी उपलब्ध करून देणे.

## ७.५ अभिलेखांचे प्रकार

प्राचीन कालखंडापासून आधुनिक कालखंडापर्यंत व आधुनिक कालखंडापासून समकालीन कालखंडापर्यंत हेतू , कारण, घटना व कार्य अमलबजावणीला अनुसरून अभिलेख तयार झाली आहोत. या अभिलेखांचे स्वरूप व व्याप्ती व्यापक आहे त्यामुळेच ढोबळ मानाने या अभिलेखांचे दोन प्रकार पाडण्यात आले आहेत.

१. अधिकृत शासकीय अभिलेख.

२ . खाजगी अभिलेख.

**७.५.१. अधिकृत शासकीय अभिलेख**.

"जे अभिलेख शासनाच्या दैनंदिन कामकाजाच्या अनुषंगाने निर्माण केले जातात अशा अभिलेखाना  अधिकृत शासकीय अभिलेख असे म्हणतात".

१. असे अभिलेख केंद्रशासन, राज्यशासन व स्थानिक संस्था मोठ्या प्रमाणात निर्माण करतात. शासकीय योजना, शासकीय कार्यप्रणाली व शासकीय आदेश या संदर्भांतील हे अभिलेख मोठ्या प्रमाणात असतात.

२. शासकीय कामकाजाचे प्रतिबिंब या अभिलेखांमध्ये ठळक स्वरूपात उमटलेले असते.

३. या प्रकारच्या प्रत्येक अभिलेखाला स्वतंत्र ओळख असते. एक अभिलेख दुसऱ्या अभिलेखाशी मिळता जुळता नसतो.

४. जर या प्रकारच्या अभिलेखांमध्ये बदल करणे आवश्यक वाटत असेल तर त्याची सुधारीत आवृती निर्माण केली जाते.

५. गुंडाळी, फाईल अथवा गठ्ठे स्वरुपात हे अभिलेख ठेवले जातात.

६. जेंव्हा या अभिलेखांचे कार्यक्षेत्र व व्याप्ती वाढते तेंव्हा या अभिलेखांचे वर्गीकरण केले जाते.

७. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून निमसरकारी संस्था अभिलेखांची निर्मिती करत असतात.

८. निमसरकारी संस्थांच्या कामकाजातून निर्माण होणाऱ्या अभिलेखांना  निमसरकारी अभिलेख असे म्हणतात.

९. निमसरकारी संस्थांमध्ये महानगरपालिका, नगरपालिका विमा कार्यालये, विद्यापीठे, औधगिक संस्था, हवाई वाहतूक कंपन्या अशा विविध संस्थांचा समावेश होतो.

१०. निमसरकारी संस्थाने जरी अभिलेख तयार केले तरी अशा अभिलेखांना अधिकृत सरकारी अभिलेख असेच समजले जाते.

११. निमसरकारी अभिलेख जरी स्वतंत्र निर्माण केलेले असले तरी ते सरकारी कामकाजास धरुन असतात त्यामुळे ते परस्पर पुरक असतात.

१२. शासकीय व निमसरकारी अशा दोन्ही अभिलेखांना पुरावा, अध्ययन, संशोधन व उपयोगीतेच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे.

**७.५.२ .खाजगी अभिलेख**.

"जे अभिलेख एखादी व्यक्ती, एखादे कुटुंब, एखादी खाजगी संस्था अथवा एखादे उधोग-व्यवसाय करणारे घराणे आपापल्या कामानिमित्त व कामाच्या अमलबजावणी निमित्त तयार करतात तेंव्हा अशा अभिलेखांना खाजगी अभिलेख असे म्हटले जाते".

१. खाजगी अभिलेख हे दोन व्यक्ती किंवा दोन संस्थांमधील कराराला अनुसरून तयार होतात.

२. खाजगी अभिलेख हे दोन व्यक्ती किंवा दोन संस्थांमधील पत्रव्यवहाराला अनुसरून तयार होतात.

३. काही खाजगी अभिलेख हे दोन व्यक्ती किंवा दोन संस्थांमधील मालमतेच्या व्यवहाराला अनुसरून तयार होतात.

४. काही खाजगी अभिलेख हे औद्योगिक संस्थांच्या कार्यप्रणालीला तसेच पत्रव्यवहाराला अनुसरून तयार होतात.

एल. जी. रेडस्टोन आणि एफ. डब्लू. स्टोर यांनी अभिलेखांच्या वर्गीकरणाची पध्दत खालील प्रमाणे सुचवली आहे.

अ) भाडेविषयक, न्यायविषयक व जमीनविषयक अभिलेख.

ब) हक्क व अधिकार यांचा पुरावा दर्शविणारे अभिलेख.

क) कौटुंबिक व मालमत्तेसंबंधीचे अभिलेख. कौटुंबिक व मालमत्तेसंबंधीचे अभिलेखांचे उपप्रकार प्रचलीत आहेत.

* संपुर्ण खाजगी स्वरूपाचे कौटुंबिक अभिलेख.

*मालमत्तेसंबंधीचे अभिलेख- सातबारा, भूमापन.

*हिशेबाचे अभिलेख- जमा-खर्च- औद्योगिक ताळेबंद या बाबतचे अभिलेख.

*कायदेशीर अभिलेख.

*औद्योगिक स्वरूपाचे अभिलेख.

*खाजगी कार्यालयांचे अभिलेख.

*धर्मादाय स्वरूपाचे अभिलेख.

*विविध नकाशे.

*विविध आराखडे.

एल.जी.रेडस्टोन आणि एफ.डब्लू. स्टोर यांनी अभिलेखांच्या वर्गीकरणाची सुचवलेली पद्धत जरी योग्य असली तरी अभिलेखांचे वर्गीकरण करताना खालील मुद्द्यांना विचारात घेवून अभिलेखांचे वर्गीकरण केले तर ते योग्य ठरू शकेल.

१. अभिलेख कोठून आलेत व निर्मिती केलेल्या अभिलेखांचा उद्देश काय होता.

२. अभिलेख जेंव्हा जतन करण्यासाठी येतात तेंव्हा त्यांची रचना व हाताळणी सुयोग्य पद्धतींने करावी.

३. अभिलेखांचे गट्ठे तयार केले असतील व त्यातून कामानिमित्त काही अभिलेख काढले असतील तर काढलेल्या अभिलेखांची माहिती चिठ्ठीत लिहून ती चिठ्ठी त्या गठ्याच्या वर ठेवावी.

४. वर्गीकरण करण्यापूर्वी सर्व अभिलेखांचा आढावा घ्यावा.

## ७.६ सारांश

प्रस्तुत प्रकरणात आपण सुरवातीला अभिलेख शब्दाची उत्पत्ती कशी झाली याचा आढावा घेतला. त्याच बरोबर अभिलेख म्हणजे काय, अभिलेख शास्त्राची व्याप्ती कशी होत गेली, अभिलेख शास्त्राची उद्दिष्टे कोणती आहेत तसेच अभिलेखांची निर्मिती, कामाचे स्वरूप, अभिलेखांचे महत्व, अभिलेख निर्मितीचा कालखंड कोणता यावरून अभिलेखांचे प्रकार कसे निर्माण झाले याची माहिती पहिली.

## ७.७ प्रश्न

१. अभिलेख शास्त्र म्हणजे काय ते सांगून अभिलेख शास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.

२. अभलेखांच्या वेगवेगळ्या प्रकारांची माहिती नमूद करा.

## ७.८ संदर्भ

१. खोबरेकर वि. गो.-महाराष्ट्रातील दफ्तरखाने, मुबंई महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती.

२. गोखले शोभना -पुराभिलेखविद्या. पुणे कँटीनेन्टल प्रकाशन.

३. धटावकर भास्कर -महाराष्ट्रातील शासकीय पुराभिलेखागाराची निर्मिती आणि कार्य, मुंबई चेतन प्रकाशन.

४. महाजन शां. ग. दफ्तरखाने आणि वस्तुसंग्रहालय, पुणे: पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन.

५. विचारे द. त. कोल्हापूर दप्तरखाना संक्षिप्त परिचय, नाशिक ज्ञानगंगोत्री.

❖❖❖❖

# ८

# अभिलेखांचे महत्व आणि ऐतिहासिक साधन म्हणुन दस्तऐवजांचे मूल्य

**घटक रचना**

८.० उद्दिष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ अभिलेखांचे वैशिष्ट्ये

८.३ अभिलेखांचे महत्व

८.४ सारांश

८.५ प्रश्न

८.६ संदर्भ

## ८.० उद्दिष्टे

१. अभिलेखांच्या वैशिष्ट्ये समजून घेणे.

२. अभिलेखांचे राजकीय दृष्टीकोनातून महत्व समजून घेणे.

३. अभिलेखांचे सामाजिक दृष्टिकोनातून महत्व समजून घेणे.

४. अभिलेखांचे आर्थिक दृष्टिकोनातून महत्व समजून घेणे.

५. अभिलेखांचे धार्मिक दृष्टिकोनातून महत्व समजून घेणे.

६. अभिलेखांचे सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्व समजून घेणे.

७. अभिलेखांचे प्रशासकीय दृष्टिकोनातून महत्व समजून घेणे.

८. अभिलेखांचे व्यक्तिगत दृष्टिकोनातून महत्व समजून घेणे.

९. अभिलेखांचे संशोधन व संशोधकांच्या दृष्टिकोनातून महत्व समजून घेणे.

१०. अभिलेखांचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून महत्व समजून घेणे .

## ८.१ प्रस्तावना

अभिलेख शास्त्राचा अभ्यास करतांना सुरुवातीला आपण अभिलेख शास्त्र म्हणजे काय? अभिलेख शास्त्राची व्याप्ती, उद्दिष्टे व प्रकार या घटकांची माहिती पहिली या प्रकरणात आपण अभिलेखांची वैशिष्ट्ये व अभिलेखांचे महत्त्व या विषयी माहिती जाणून घेणार अहोत. अभिलेखांची निर्मिती, स्वरूप, अद्वितीयता व काकदपत्रांचे सेंद्रिय स्वरूप या शिर्षकला अनुसरून आपण अभिलेखांची वैशिष्ट्ये अभ्यासणार आहोत तर राजकीय, सामाजिक, प्रशासकीय, संस्कृतिक, धार्मिक, व्यक्तिगत, नागरिकांच्या संशोधकांच्या व ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभिलेखांचे महत्व समजून घेणार आहोत.

## ८.२ अभिलेखांचे वैशिष्ट्ये (Characteristics of Archives)

अभिलेखांची निर्मिती, स्वरूप, अद्वितीयता व कागदपत्रांचे सेंद्रिय स्वरूप या शिर्षकला अनुसरून श्री. पुणेंदु बासू यांनी अभिलेखांची काही वैशिष्ट्ये सांगितली आहेत ती खाली नमुद करण्यात आली आहेत.

### ८.२.१ अभिलेखांची निर्मिती :

अभिलेखांची निर्मिती हे अभिलेखांचे पहिले वैशिष्ट्ये आहे. एखादी व्यक्ती अथवा संस्था कोणत्या ना कोणत्या कामाच्या अनुषंगाने अभिलेखांची निर्मिती करत असते. ती निर्मिती का करण्यात आली आहे, त्याचे कारण काय आहे, कोणत्या कामाच्या अनुषंगाने या अभिलेखाची निर्मिती करण्यात आली आहे, त्या कामाचे स्वरूप काय आहे, त्या कामाची व्याप्ती किती आहे व त्याची उपयोगीता काय आहे या बाबतची माहिती त्या कागदपत्रांच्या निर्मितीवरून समजते म्हणुनच अभिलेखांची निर्मिती हे अभिलेखांचे पहिले वैशिष्ट्ये आहे.

### ८.२.२.अभिलेखांचे स्वरूप :

अभिलेखांचे स्वरूप हे अभिलेखांचे दुसरे वैशिष्ट्ये आहे.एखादया कार्याच्या अनुषंगाने जेंव्हा एखादी व्यक्ती, संस्था अथवा शासन कागदपत्राची निर्मिती करते त्यावरूनच ते कागदपत्र का निर्माण झाले आहे हे स्पष्ट होते.या स्पष्टतेतूनच आपणांस त्या कागदपत्राचा निर्माता, त्या कागदपत्राच्या निर्मितीचे कारण व कागदपत्राचे स्वरूप समजते. म्हणुनच अभिलेखाचे स्वरूप हे अभिलेखांचे दुसरे वैशिष्ट्ये आहे.

### ८.२.३.अभिलेखांची अद्वितीयता :

अभिलेखांची अद्वितीयता हे अभिलेखांचे तिसरे वैशिष्ट्ये आहे. कोणतीही कागदपत्रे व्यक्ती, संस्था अथवा शासन कोणत्या ना कोणत्या हेतूने निर्माण करत असतात. अशा कागदपत्रांची निर्मिती ही गरज, हेतू , कामाचे स्वरूप व महत्त्वाला अनुसरून झालेली असते. परिणामी या कागदपत्रांना अनन्यसाधारण महत्त्व असते. या कागदपत्रांची तुलना इतर कोणत्याही कागदपत्रांशी करता येत नाही. त्यामुळेचं अभिलेखाची अद्वितीयता हे अभिलेखाचे तिसरे वैशिष्ट्ये आहे.

### ८.२.४.अभिलेखांचे सेंद्रीय स्वरूप :

अभिलेखांचे सेंद्रीय स्वरूप हे अभिलेखांचे चौथे वैशिष्ट्ये आहे. कागदपत्रे ही नाशवंत असल्यानें ती सेंद्रिय स्वरुपात मोडतात. त्यांना हवा,पाणी,आद्रता,धुळ व आग या पासून नेहमीच धोका असतो त्यामुळे त्यांचे जतन करणे आवश्यक असते. म्हणुनच हा घटक ही लक्षात ठेवणे गरजेचे असल्याने हा घटक सुद्धा कागदपत्रांच्या वैशिष्ट्यांचा एक भाग बनला आहे. म्हणुनच अभिलेखांचे सेंद्रिय स्वरूप हे अभिलेखांचे चौथे व शेवटचे वैशिष्ट्ये आहे.

## ८.३ अभिलेखांचे महत्व

अभिलेखांची निर्मिती ही वेगवेगळ्या कारणाने झालेली असते. सर्व साधारणपणे राजकीय, सामाजिक, प्रशासकीय, सांस्कृतिक, धार्मिक, वैयक्तिक, संशोधनात्मक व ऐतिहासिक असे ह्या कागदपत्रांचे स्वरूप असते. अशी ही कागदपत्रे त्या त्या प्रकाराला अनुसरून व्यक्ती, संस्था, संघटना, प्रशासन, शासन अभ्यासक व संशोधकांना उपयोगी पडत असतात म्हणुनच अशा कागदपत्रांना अनन्यसाधारण महत्त्व असते. या घटकात आपण या सर्व प्रकारच्या अभिलेखांना काय महत्व आहे याची माहिती पाहणार आहोत.

### ८.३.१.अभिलेखांचे राजकीय दृष्टिकोनातून महत्व :

प्राचीन कालखंडापासून समकालीन कालखंडापर्यंत सर्वाधिक राजकीय अभिलेखांची निर्मिती झाली असल्या कारणाने राजकीय अभिलेखांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या प्रकारच्या अभिलेखांतून आपणांस

राजकर्ते कोण होते, त्यांचे नावे काय होते, त्यांचे कुटुंब कोणते होते, त्यांचे वंश कोणते होते, त्यांचा कालखंड कोणता होते, त्यांचे प्रशासन कसे होते, त्यांचे साम्राज्य कोठे-कोठे पसरले होते, त्यांनी आपल्या कारकिर्दीत कोण कोणते आदेश काढले होते, त्यांनी कोण कोणते विजय मिळविले होते, त्यांच्या राजवटीत कोण कोणत्या प्रकारचे करार झाले होते, त्यांनी केलेल्या सेवा सुविधा कोण कोणत्या प्रकारच्या होत्या, त्यांनी धारण केलेल्या पदव्या व बिरुदे कोणती होती, त्यांच्या कारकिर्दीत कला, स्थापत्य या घटकांचा विकास किती झाला होता आदी बाबतची विश्वसनीय माहिती या अभिलेखांद्वारे मिळण्यास मदत होते. या सर्व माहितीचा विचार करता या अभिलेखांचा सर्व स्तरातील लोक समूहाला उपयोग होतो. त्यामुळेच राजकीय दृष्टिकोनातून या अभिलेखांना अनन्यसाधारण महत्त्व आहे .

### ८.३.२ अभिलेखांचे सामाजिक दृष्टिकोनातून महत्व :

प्राचीन कालखंडापासून समकालीन कालखंडापर्यंत सामाजिक अभिलेखांची निर्मिती झाल्या कारणे सामाजिक स्वरूपाच्या अभिलेखांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या प्रकारच्या अभिलेखांतून आपणांस प्राचीन कालखंडापासून समकालीन कालखंडा पर्यंतची सामाजिक स्वरूपाची माहिती उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. या प्रकारच्या अभिलेखांतून आपणांस या वेगवेगळ्या कालखंडातील लोकांचे वंश, जाती, वेषभूषा, केशभूषा, आहार, अलंकार, तसेच या लोकांचे रहाणीमान रूढी, परंपरा, आचार- विचार व सण-उत्सव आदी बाबतची माहिती मिळण्यास मदत होते. या सर्व माहितीचा विचार करता

या अभिलेखांचा सर्व स्तरातील लोक समूहाला उपयोग होतो. त्यामुळेच सामाजिक दृष्टिकोनातून या अभिलेखांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**८.३.३.अभिलेखांचे आर्थिक दृष्टिकोनातून महत्व** :

प्राचीन कालखंडापासून समकालीन कालखंडापर्यंत आर्थिक स्वरूपाच्या अभिलेखांची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाल्याने असे आर्थिक स्वरूपाचे अभिलेख त्या-त्या देशातील आर्थिक परिस्थिती समजून घेण्याचा दृष्टीने उपयुक्त असल्याने आर्थिक स्वरूपाच्या अभिलेखांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या प्रकारच्या अभिलेखांवरून आपणांस या सर्वच कालखंडातील प्रमुख व्यवसाय कोणते होते, कोण कोणते उधोग व जोड उधोग प्रचलित होते, व्यापाराचे स्वरूप काय होते, व्यापाराचे प्रकार कोणते होते, व्यापारी केंद्रे कोणती होती, व्यापाराचे मार्ग कोणते होते, चलन व्यवस्था कोणती होती, व्यापारविषयक वस्तू कोणत्या होत्या, वजन मापन पद्धती कशी होती , व्यापारी बंदरे कोणती होती, देशांतर्गत व देशबाह्य व्यापार कसा चालत होता आदी बाबतची माहिती उपलब्ध होते.या सर्व माहितीचा विचार करता या अभिलेखांचा सर्व स्तरातील लोक समूहाला उपयोग होतो. त्यामुळेच आर्थिक दृष्टिकोनातून या अभिलेखांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**८.३.४. अभिलेखांचे धार्मिक दृष्टिकोनातून महत्व** :

प्राचीन कालखंडापासून समकालीन कालखंडापर्यंत धार्मिक स्वरूपाच्या अभिलेखांची निर्मिती मोठ्याप्रमाणात झाल्याने असे धार्मिक स्वरूपाचे अभिलेख त्या-त्या देशातील धार्मिक परिस्थिती समजून घेण्याचा दृष्टीने उपयुक्त असल्याने धार्मिक स्वरूपाच्या अभिलेखांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या प्रकारच्या अभिलेखांवरून आपणांस प्राचीन कालखंडापासून समकालीन कालखंडापर्यंत प्रचलित धर्म कोणते आहेत, या धर्माचे प्रमुख कोण आहेत, या कालखंडातील धर्मांचे तत्त्वज्ञान काय आहेत ,या कालखंडातील प्रमुख धर्म स्थळे आहेत, देव-देवता कोण कोणत्या आहेत, आदी बाबतची माहिती मिळण्यास मदत होते.या सर्व माहितीचा विचार करता या अभिलेखांचा सर्व स्तरातील लोक समूहाला उपयोग होतो. त्यामुळेच धार्मिक दृष्टिकोनातून या अभिलेखांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**८.३.५ अभिलेखांचे सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्व** :

प्राचीन कालखंडापासून समकालीन कालखंडापर्यंत सांस्कृतिक स्वरूपाच्या अभिलेखांची निर्मिती मोठ्याप्रमाणात झाल्याने सांस्कृतिक स्वरूपाचे अभिलेख त्या-त्या देशातील परिस्थिती समजून घेण्याचा दृष्टीने उपयुक्त असल्याने सांस्कृतिक स्वरूपाच्या अभिलेखांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.या प्रकारच्या अभिलेखांवरून आपणास त्या कालखंडातील नृत्य, संगीत व वादन कला कश्या होत्या व स्थापत्य कला कोण कोणत्या होत्या, ऐतिहासिक व धार्मिक स्थळे कोणती होती , त्यांच्या रचना कश्या होत्या, त्यांची शैली कशी होती, या कालखंडात कोणत्याही प्रकारचे क्रीडा प्रकार प्रचलीत होते आदी बाबतची माहिती या प्रकारच्या अभिलेखांच्या माध्यमातून मिळण्यास मदत होते. या सर्व माहितीचा विचार करता या अभिलेखांचा सर्व स्तरातील लोक समूहाला उपयोग होतो त्यामुळेच सांस्कृतिक दृष्टिकोनातून या अभिलेखांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

### ८.३.६. अभिलेखांचे प्रशासकीय दृष्टिकोनातून महत्व :

प्राचीन कालखंडापासून समकालीन कालखंडापर्यंत वेगवेगळ्या राज्यकर्त्यांनी संस्थांनी संघटनांनी शासन व प्रशासन व्यवस्थांनी प्रशासकीय स्वरूपाच्या अभिलेखांची निर्मिती मोठ्या प्रमाणात केली आहे. असे प्रशासकी स्वरूपाचे अभिलेख त्या-त्या देशातील प्रशासकीय परिस्थिती समजून घेण्याचा दृष्टीने उपयुक्त असल्याने अशा प्रशासकीय स्वरूपाच्या अभिलेखांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या प्रकारच्या अभिलेखांवरून आपणास त्या-त्या कालखंडातील केंद्रीय, प्रांतिक , स्थानिक व ग्रामीण प्रशासन व्यवस्था कश्या होत्या, त्यांची प्रशासकीय शासन प्रणाली कशी होती, त्यांची आदेश प्रणाली कशी होती, त्यांची कार्य अमलबजावणी कशी होती याची माहिती देण्याचा दृष्टीने उपयुक्त ठरतात व हे सर्व अभिलेख महत्वाचे असल्याने या अभिलेखांचे जतन व संवर्धन करण्याचे काम सुव्यवस्थितपणे केले जाते. त्यामुळे या अभिलेखांची जेंव्हा जेंव्हा संशोधक व अभ्यासकांना गरज भासते तेंव्हा हे अभिलेख उपलब्ध होतात. या सर्व माहितीचा विचार करता या अभिलेखांचा सर्व स्तरातील लोक समूहाला उपयोग होतो त्यामुळेच प्रशासकीय दृष्टिकोनातून या अभिलेखांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

### ८.३.७ अभिलेखांचे व्यक्तिगत दृष्टिकोनातून महत्व :

काही अभिलेख हे व्यक्तीच्या वेगवेगळ्या कामानिमित्त व्यक्तिगत स्तरावर तयार होतात. व्यक्तिगत अभिलेख व्यक्तीच्या जन्मापासून सुरू होतात व व्यक्तीच्या अस्तित्वापर्यंत निर्माण होत राहतात या अभिलेखांमध्ये जन्म दाखला, शिक्षण, विवाह नोंदी ,वारसा हक्क नोंदी, मालमत्ता नोंदी, व्यक्तींच्या कार्याच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या अभिलेखांच्या नोंदी, व्यक्तीने मिळविलेल्या यशाच्या नोंदी, व्यक्तीच्या आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंगांच्या नोंदी आदी बाबींचा समावेश असतो. अशा प्रकारचे अभिलेख एक पुराव्याचे उपयुक्त साधन म्हणुन त्या व्यक्तीला उपयोगी पडतात पण त्याही पेक्षा महत्वाचे म्हणजे व्यक्तीचे कर्तृत्व जर मोठे असेल तर त्या व्यक्तीबद्दल संशोधन करणाऱ्या संशोधकांनाही अशा प्रकारच्या अभिलेखांचा उपयोग होतो या सर्व माहितीचा विचार करता या अभिलेखांचा सर्व स्तरातील लोक समूहाला उपयोग होतो त्यामुळेच व्यक्तिगत व सार्वजनिक दृष्टिकोनातून सुद्धा या अभिलेखांना अनन्यसाधारण महत्त्व.

### ८.३.८ अभिलेखांचे संशोधन व संशोधकांच्या दृष्टिकोनातून महत्व :

प्राचीन कालखंडापासून समकालीन कालखंडापर्यंत वेगवेगळ्या राज्यकर्त्यांनी संस्थांनी संघटनांनी शासन व प्रशासन व्यवस्थांनी आपापल्या कार्याच्या अनुषंगाने वेगवेगळ्या स्वरूपाच्या अभिलेखांची निर्मिती मोठ्या प्रमाणात केली आहे. असे हे अभिलेख वेगवेगळ्या वैयक्तिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक विषयांवर संशोधन करणाऱ्या संशोधकांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरतात. कारण संशोधन कार्यासाठी आवश्यक पुरावे जमा करण्यासाठी या प्रकारच्या अभिलेखांची मदत ही संशोधकांना होत असते. हे अभिलेख पुराव्याची बाजू म्हणुन संशोधकांच्या संशोधन कार्याला पाठबळ देतात म्हणुनच संशोधन व संशोधकांच्या दृष्टिकोनातून या अभिलेखांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**८.३.९ अभिलेखांचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून महत्व :**

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक राष्ट्र वेगवेगळ्या कार्याच्या अनुषंगाने तह अथवा करार करत असतात किंवा समविचारी राष्ट्र वेगवेगळ्या परिषदांचे आयोजन करत असतात अथवा काही राष्ट्र आपल्या राष्ट्रहिताच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय घेत असतात. अशा बाबींच्या संदर्भात जी अभिलेखांची निर्मिती केली जाते अशा अभिलेखांचा समावेश ऐतिहासिक अभिलेखांमध्ये होतो. असे अभिलेख ऐतिहासिक दृष्टीकोनातून महत्वाचे असतात म्हणुनच ऐतिहासिक दृष्टिकोनातून सुद्धा अभिलेखांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

## ८.४ सारांश

सर्व साधारणपणे वैयक्तिक, सार्वजनिक, शासकीय अथवा प्रशासकीय अशा कोणत्याही प्रकारच्या कार्याच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात अभिलेखांची निर्मिती केली जाते. अभिलेख ज्या कार्याच्या अनुषंगाने निर्माण करण्यात आले आहे त्यावरून अभिलेखांचे मूल्य ठरते. आपण या प्रकरणात अभिलेखांची वैशिष्ट्ये पाहत असतांना अभिलेखांची निर्मिती स्वरूप अद्वितीयता व अभिलेखांचे सेंद्रीय स्वरूप याची माहिती पहिली व त्या नंतर अभिलेख राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, प्रशासकी, व्यक्तिगत, संशोधन व संशोधकांसाठी कसे उपयुक्त ठरतात याची माहिती पहिली तसेच ऐतिहासिक दृष्टिकोनातून सुद्धा अभिलेख उपयोगी पडतात या बाबतच्या माहितीचा आढावा घेतला. या सर्व माहितीवरून आपणास अभिलेखांचे वैशिष्ट्ये व महत्व समजण्यास मदत झाली.

## ८.५ प्रश्न

१. अभिलेखांची वैशिष्ट्ये थोडक्यात स्पष्ट करा.

२. अभिलेखांचे महत्त्व थोडक्यात विषद करा.

## ८.६ संदर्भ

१. खोबरेकर वि. गो.-महाराष्ट्रातील दफ्तरखाने, मुबंई महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती.

२. गोखले शोभना -पुराभिलेखविद्या. पुणे कँटीनेन्टल प्रकाशन.

३. धटावकर भास्कर -महाराष्ट्रातील शासकीय पुराभिलेखागाराची निर्मिती आणि कार्य, मुंबई चेतन प्रकाशन.

४. महाजन शां. ग. दफ्तरखाने आणि वस्तुसंग्रहालय, पुणे: पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन.

५. विचारे द. त. कोल्हापूर दफ्तरखाना संक्षिप्त परिचय, नाशिक ज्ञानगंगोत्री.

❖❖❖❖

# ९

# अभिलेखांचे वर्गीकरण

**घटक रचना :**

९.० उद्दिष्टे

९.१ प्रस्तावना

९.२ अभिलेखांचे वर्गीकरण

९.३ सारांश

९.४ प्रश्न

९.५ संदर्भ

## ९.० उद्दिष्टे

१. अभिलेखांचे वर्गीकरण ही संकल्पना समजून घेणे.

२. इतिहासपूर्व कालखंडातील अभिलेखांची माहिती जाणून घेणे.

३. ऐतिहासिक अभिलेखांची माहिती जाणून घेणे.

४. अप्रचलीत अभिलेखांची माहिती जाणून घेणे.

५. व्यावसायिक अभिलेखांची माहिती जाणून घेणे.

६. खाजगी स्वरूपाच्या अभिलेखांची माहिती जाणून घेणे.

७. अभिलेखांचे आंतरराष्ट्रीय मापदंडानुसार जे वर्गीकरण केले जाते त्याची माहिती जाणून घेणे.

८. अभिलेखांचे गुणवत्तेनुसार जे वर्गीकरण केले जाते त्याची माहिती जाणून घेणे.

९. अभिलेखांचे विषय अनुक्रमाला अनुसरून जे वर्गीकरण केले जाते त्याची माहिती जाणून घेणे.

१०. अभिलेखांचे कालखंडाला अनुसरून जे वर्गीकरण केले जाते त्याची माहिती जाणून घेणे.

## ९.१ प्रस्तावना

कोणत्याही अभिलेखांची निर्मिती एखाद्या कार्याचा अनुषंगाने विशिष्ट हेतूने केली जाते. सुरवातीला जेंव्हा निर्मितीची प्रक्रिया सुरू असते तेंव्हा त्याला फक्त कागदपत्राचे स्वरूप असते मात्र जेंव्हा त्या कागदपत्राचे दस्तऐवजात रूपांतर होते तेंव्हा ते कागदपत्र अभिलेख संज्ञेस पात्र ठरते. जेंव्हा ते कागदपत्र जपून ठेवण्याची प्रक्रिया सुरू होते. तेंव्हा त्याच्या वर्गीकरणाची प्रक्रिया सुरू होते. मग अशा अभिलेखांचे वर्गीकरण अभिलेखांचे स्वरूप, अभिलेखांचे प्रकार, अभिलेखांची उपयोगीता,अभलेखांचे महत्व, अभिलेखांचे कालखंड, अभिलेखांची व्याप्ती आदी घटक नजरेसमोर ठेवून केले जाते. सर्व साधारणपणे अभिलेखांचे वर्गीकरण इतिहास पूर्व कालखंडातील अभिलेख, ऐतिहासिक अभिलेख, प्रचलित अभिलेख, व्यावसायिक अभिलेख, खाजगी स्वरूपाचे अभिलेख या शीर्षकांना अनुसरून केले जाते या व्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय मापदंडानुसारचे वर्गीकरण व गुणवत्तेनुसारचे वर्गीकरण या घटकांना अनुसरून सुद्धा अभिलेखांचे वर्गीकरण केले जाते याबाबतची सर्व माहिती प्रस्तुत घटकात आपण पाहणार आहोत.

## ९.२ अभिलेखांचे वर्गीकरण

### ९.२.१.इतिहासपूर्व कालखंडातील अभिलेख :

मानवाला लेखन कला अवगत नव्हती तो कालखंड म्हणजे इतिहास पूर्व कालखंड. या कालखंडामध्ये मानवाला जरी लेखन कला अवगत नसली तरी त्यांनी गुहेत राहत असताना त्यांनी वापरलेली दगडी हत्यारे , वापरलेले अलंकार ही वस्तु स्वरुपातील साधने उपलब्ध आहेत मात्र या साधनांचे स्वरूप भौतिक स्वरूपाचे आहे.मात्र या कालखंडात लेखन कलेचा उदय होण्यापूर्वी मानवाने ओरखन करत माती,लाकुड,गुहांच्या भिंती, गुहा, झाडाची पाने, जनावरांची कातडी यावर कोरीव अथवा खुणा उंमटवण्याचे आढळून आले आहे.ही कोरीव स्वरूपाची साधने आहेत मात्र त्यांचे स्वरूप विस्कळीत स्वरूपाचे आहे. अशी साधने भरपूर स्वरुपात आहेत मात्र त्यातील थोडीफार साधने दस्तऐवज संकल्पनेस पात्र ठरतात. या कालखंडातील अभिलेखांबाबत काम करत असताना अभिलेखपालाला फार कठीण परिस्थितीतून काम करावे लागले. या बाबत श्री. एस. मुल्लर, श्री. जे.ए.फिथ आणि श्री.आर.फ्रुईन यांनी आपल्या 'मॅन्युअल फॉर द अरेजमेंट अँड डिस्क्रीशन ऑफ आर्किव्हीमध्ये' असे म्हटले आहे की ज्या प्रमाणे एखाद्या हाडाच्या तुकड्याचा अभ्यास करून त्या प्राण्याची रचना कशी असेल याचा अंदाज बांधून त्याचा सांगाडा तयार केला जातो तास अभ्यास अभिलेखपालाला करावा लागतो. असे जरी असले तरी ही सुरुवात असल्याने या प्रक्रियेला महत्व होते .

### ९.२.२ ऐतिहासिक अभिलेख :

मानवाला लेखन कला अवगत झाली तो कालखंड म्हणजे ऐतिहासिक कालखंड. या कालखंडामध्ये मानवाने आपले विचार व भावना व्यक्त करण्यासाठी लेखन कलेचा उपयोग केला. मानवाने लेखन कलेला सुरुवात केली तेंव्हा त्यांनी अभिलेख जतन करण्यासाठी खास प्रयत्न केले नाहीत मात्र त्यांनी या कालखंडात निर्माण केलेल्या साधनांनी प्राचीन इतिहासावर प्रकाश टाकण्यास महत्वपूर्ण मदत केली.

***इजिप्तमधील अभिलेख :**

इजिप्तमधील लोकांना जेंव्हा लेखन कला अवगत झाली तेंव्हा त्यांनी त्याच्या राजवटीतील नोंदी पॅपिरसच्या पानावर करण्यास सुरुवात केली. पुढे याच पॅपिरसच्या पानावर त्यांनी नाटके ,कथा व काव्य लिहिण्यास सुरवात केली. पॅपिरसच्या पानावर लिहिलेल्या या लिखानाला पुढे दस्तऐवज म्हणुन मूल्य प्राप्त झाले.

***पर्शियन अभिलेख :**

पर्शियन लोकांना जेंव्हा लेखन कला अवगत झाली तेंव्हा त्यांनी सर्वप्रथम ही कला विकसित केली व या कलेच्या माध्यमातून ऐतिहासिक नोंदीही ठेवण्यास सुरवात केली तसेच ऐतिहासिक दस्तऐवज जतन करण्यासाठी दप्तरखान्याची स्थापना केली. असे दस्तऐवज त्यांनी कमावलेल्या कातडीवर लिहून ठेवण्यास सुरवात केली. जेंव्हा अलेक्झांडरने पर्शिया जिंकला तेंव्हा त्यांनी या कातडीवर लिहिलेल्या दस्तऐवजांना रॉयल स्किन असे नाव दिले.

- **सुमेरियन अभिलेख :**

सुमेरियन लोकांनी जेंव्हा लिखान कला विकसित केली तेव्हां त्यांनी क्यूनिफॉर्म लिपीत लाकडाच्या तुकड्यावर लिखान करण्यास सुरुवात केली. या लिपीतील दस्तऐवज सुद्धा उपलब्ध आहेत.

* चीन मध्ये लागलेल्या कागदाच्या शोधाने तसेच प्रिंटीग प्रेसच्या शोधाने संपूर्ण जगात अमुलाग्र क्रांती झाली व आधुनिक दस्तऐवज निर्माण होण्याचा मार्ग मोकळे झाला.

* भारतात सिंधु संस्कृतीने स्वतःची अशी चिनहात्मक लेखन कला विकसित केली होती. पुढे भारतात ब्राम्ही, खरोष्टी, शारदा व देवनागरी या लिप्यांचा विकास झाला व या लिप्यांमध्ये लिखान उपलब्ध झाले. पुढे मध्ययुगीन कालखंडात सुलतान, मोगल व मराठ्यांच्या राजवटीत मोठ्या प्रमाणात दस्तऐवज निर्माण झाले. पुढे ईस्ट इंडिया कंपनीने व ब्रिटिश सरकारने अभिलेखांचे पद्धतशीरपणे जतन केले.

वरील सर्व प्रकारच्या अभिलेखांचा समावेश ऐतिहासिक अभिलेखांमध्ये होतो. तेंव्हा अभिलेखांच्या निर्मितीची सुरवात असल्याने या अभिलेखांना जरी शास्त्रीय स्वरूप प्राप्त झाले नसले तरी ऐतिहासिक दृष्टीने या अभिलेखांना महत्त्व होते.

### **९.२.३ अप्रचलित अभिलेख** :

जे अभिलेख एखाद्या विशिष्ट कार्याच्या अनुषंगाने निर्माण केले जातात व ते काम संपल्या नंतर त्यांची उपयोगीता संपते अशा अभिलेखांना अप्रचलित अभिलेख असे म्हटले जाते. अशा अभिलेखांच्या निर्मितीपासून अभिलेख पूर्णत्वाला जाईपर्यंतचा जो प्रवास सुरु होतो त्यास अमेरिकन अभिलेखतज्ञ फिलिप सी ब्रुक यांनी "अभिलेखांचे जीवन चक्र ", अशी संज्ञा दिली आहे. त्यांनी अशा अभिलेखांच्या जीवन चक्राचे तीन टप्पे सांगीतले आहेत.

*** प्रचलितता**: (Currency)

प्रचलितता हा अभिलेखांच्या जीवन चक्राचा पहिला टप्पा आहे. ज्या कामासाठी जे अभिलेख निर्माण केले जातात व त्या कामाच्या पूर्ततेसाठी त्यांचा दैनंदिन उपयोग होतो व ते काम संपेपर्यंत अशा अभिलेखांचा वारंवार संदर्भ साधन म्हणून उपयोग केला जातो अशा अभिलेखांच्या स्थितीला अभिलेखांची प्रचलितता असे म्हटले जाते.

***सम-प्रचलितता** :(Semi -Currency)

सम-प्रचलितता हा अभिलेखांच्या जीवन चक्राचा दुसरा टप्पा आहे. ज्या कामासाठी जे अभिलेख निर्माण केले जातात त्या कामाच्या पूर्ततेनंतर त्यांचा उपयोग संपलेला असतो. मात्र असे अभिलेख इतर कामासाठी सुद्धा उपयोगी पडू शकतात म्हणूनच ते वेगळे ठेवले जातात. अभिलेखांच्या या अवस्थेतला सम-प्रचलितता असे म्हटले जाते.

***अप्रचलीतता** : (Non -Currency)

प्रचलितता हा अभिलेखांच्या जीवन चक्राचा दुसरा टप्पा आहे. अभिलेख ज्या कार्याच्या अनुषंगाने निर्माण केले जातात त्या कामाची पूर्तता झाल्या नंतर त्या अभिलेखांची गरज संपते त्या अवस्थेतून जेंव्हा अभिलेखांना जावे लागते त्या अवस्थेला अभिलेखांची अप्रचलीतता असे म्हटले जाते. अशा अभिलेखांचे काम संपल्यानंतर हे अभिलेख निर्माते स्वत:कडे न ठेवता त्यांचे निरंतन जतन व्हावे म्हणुन अभिलेखागाराकडे अथवा पुराभिलेखागाराकडे पाठवतात. असे अप्रचलित अभिलेख जतन करण्याची जबाबदारी शासनाची पण असते. भावी पिढ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अशा अभिलेखांचे जतन केले जाते.

**९.२.४ व्यावसायिक अभिलेख** :

(Business Records)

जे अभिलेख व्यावसायिक कार्याच्या अनुषंगाने निर्माण केले जातात त्यांना व्यावसायिक अभिलेख असे म्हटले जाते. किंवा दोन अथवा अनेक व्यक्तींच्या व्यवहारातून जे अभिलेख तयार होतात त्यांना सुद्धा व्यावसायिक अभिलेख असे म्हटले जाते. व्यावसायिक अभिलेखामध्ये विविध स्वरूपाच्या अभिलेखांचा समावेश होतो. हिशेब वह्या, पगारपत्रक, हजेरीपत्रक, पासबुक,शेअर प्रमाणपत्र, बॅलन्सशीट अशा आर्थिक बाबींशी संबंधीत कागदपत्रे या प्रकारच्या अभिलेख संरचनेत मोडतात. आर्थिक बाबींच्या नोंदी ठेवणे या उद्देशाने या अभिलेखांची निर्मिती केली जाते. माहिती व पुराव्यांच्या दृष्टीने हे अभिलेख व्यक्तीगत व सार्वजनिक स्तरावर महत्वाचे ठरतात.

**९.२.५. खाजगी स्वरूपाचे अभिलेख :**(Private Records )

जे अभिलेख एखादी व्यक्ती, एखादे कुटुंब अथवा एखादी संस्था आपल्या खाजगी मालमत्ता, व्यापार अथवा उधोगच्या कार्याच्या अनुषंगाने तयार करतात अशा अभिलेखांना खाजगी अभिलेख असे म्हटले जाते. मात्र या ठिकाणी एक गोष्ट आपण लक्षात ठेवणे आवश्यक आहे ती म्हणजे जेंव्हा अशा अभिलेखांना शासनाकडून अधिकृतपणे दर्जा प्राप्त होतो तेव्हांच ते

अभिलेख खाजगी अभिलेखास पात्र ठरतात. उदाहरणार्थ न्यायालयीन अभिलेख व औद्योगिक घराण्यांचे अभिलेख, मृत्यूपत्र,वारसाहक्का संदर्भातील पत्र. खाजगी अभिलेख नागरिकांच्या आर्थिक व कायदेविषयक हक्कांवर प्रकाश टाकतात. तसेच नागरिकांच्या हक्कांचे जतन व समर्थन करतात.

### ९.२.६ आंतरराष्ट्रीय मानदंडाप्रमाणे अभिलेखांचे वर्गीकरण :

आंतरराष्ट्रीय मानदंडाप्रमाणे अभिलेखांची एकमात्रता, अभिलेखांचे आकार, अभिलेखांचे महत्व व अभिलेखांची पुढील काळासाठी असणारी उपयुक्तता या चार प्रकाराला अनुसरून अभिलेखांचे वर्गीकरण केले जाते.याची माहिती खाली नमूद करण्यात आली आहे.

***अभिलेखांची एकमात्रता :**

आंतरराष्ट्रीय मानदंडाप्रमाणे अभिलेखांची एकमात्रता लक्षात घेवूनसुध्दा अभिलेखांचे वर्गीकरण केले जाते. या वर्गीकरण प्रक्रियेमध्ये व्यवस्थापक अभिलेखांचे एकमात्र स्वरूप ओळखतो व अशा अभिलेखांचे महत्व लक्षात घेऊन तो या प्रकाराला अनुसरून वर्गीकरण करतो. असे वर्गीकरण करतांना तो शासकीय-अशासकीय, प्रसिद्ध- अप्रसिद्ध, वैयक्तिक, सार्वजनिक, असे सर्वच अभिलेख एकमात्र स्वरूप ओळखून वर्गीकृत करतो.

***अभिलेखांचा आकार :**

अभिलेखांचा आकार लक्षात घेवून सुध्दा अभिलेखांचे वर्गीकरण केले जाते. म्हणजेच या वर्गीकरण प्रक्रियेमध्ये अभिलेखांच्या भौतिक स्वरूपाच्या आकारानुसार वर्गीकरण केले जाते. आकार या प्रकाराला अनुसरून कागदपत्रांचे तीन प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाते.

१.लिखित स्वरूपाचे अभिलेख.

(पुस्तके,मासिके,इतर लिखित कागदपत्रे, दैनंदिन व वर्तमानपत्रे)

२.नकाशे व आराखडे.

३.दृक्श्राव्य अभिलेख .

(चित्र फीत, टेपरेकॉर्डर )

वरील प्रकाराला अनुसरून अभिलेखांचे आकाराला अनुसरून वर्गीकरण केले जाते.

***अभिलेखांचे महत्व** :

अभिलेखांचे महत्व लक्षात घेवून सुध्दा अभिलेखांचे वर्गीकरण केले जाते.सर्व साधारणपणे व्यवस्थापक अभिलेखांचे महत्व लक्षात घेवून अ, ब, क, ड या चार भागात अभिलेखांचे वर्गीकरण करतो.

### १. 'अ',वर्गीय अभिलेख :

जे अभिलेख सर्वात महत्त्वाच्या कामानिमित्त तयार केले जातात अशा अभिलेखांना अ वर्गीय अभिलेख असे म्हटले जाते. अ वर्गीय अभिलेख सर्वात महत्वाचे असतात. ज्या कामानिमित्त त्यांची निर्मिती झाली असते त्या कामावर ते प्रकाश टाकणारे असतात. भावी काळासाठी ते मार्गदर्शक म्हणुन उपयुक्त ठरतात. कोणत्याही परिस्थितीत ते अभिलेख जपून ठेवले जातात. शासन करार ,शासन आदेश, शासन विरुद्ध पुरावे,धोरणात्मक निर्णय,वैधानिक कायदे निर्मिती, आयोग निर्मिती, ऐतिहासिक अहवाल, केंद्र ,राज्य-आंतरराज्य सह संबंध या संदर्भातील दस्तऐवज. या स्वरूपाच्या अभिलेखांचा समावेश अ वर्गीय अभिलेखात होतो.

### २. 'ब', वर्गीय अभिलेख :

जे अभिलेख दोन ते तीन दशकापर्यंतच्या कामासाठी उपयुक्त ठरतात अशा अभिलेखांना ब वर्गीय अभिलेख असे म्हटले जाते. असे अभिलेख फक्त दोन ते तीन वर्षे जतन करून ठेवले जातात. ब वर्गीय अभिलेख अ वर्गीय अभिलेखांपेक्षा कमी दर्जाचे असतात. हे अभिलेख एखाद्या कार्यक्रमाची अथवा धोरणाची अमलबजावणी करण्याच्या उद्देशाने तयार केले जातात. तसेच हे अभिलेख राजकीय, सामाजिक, धार्मिक सांस्कृतिक तसेच तांत्रिक दिशा निश्चित करण्याच्या उद्देशाने तयार केले जातात.

### २. 'क',वर्गीय अभिलेख :

जे अभिलेख ऐतिहासिक व प्रशासकीय दृष्टीने उपयुक्त नसतात अशा अभिलेखांना क वर्गीय अभिलेख असे म्हटले जाते. सर्व साधारणपणे असे अभिलेख पाच ते दहा वर्षे जपून ठेवतात व ते नंतर नष्ट करतात. म्हणजेच या प्रकारच्या अभिलेखांची उपयोगीता जास्त नसते. म्हणुनच या अभिलेखांना क वर्गीय अभिलेख असे म्हटले जाते.

### ३. 'ड', वर्गीय अभिलेख :

तत्कालीन अथवा नैमित्तिक कारणासाठी ज्या अभिलेखांची निर्मिती केली जाते अशा अभिलेखांना ड वर्गीय अभिलेख असे म्हटले जाते.असे अभिलेख एक वर्षानंतर नष्ट केले जातात.

### ९.२.७ विषय अनुक्रमाला अनुसरून वर्गीकरण :

काही वेळेला विषय अनुक्रमाला अनुसरून अभिलेखांचे वर्गीकरण केले जाते. सर्व साधारणपणे राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, प्रशासकीय, प्रांतिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अशा विषयांना अनुरूप असे वर्गीकरण केले जाते.

### ९.२.८ कालखंडाला अनुसरून वर्गीकरण :

काही वेळेला कालखंडाला अनुसरून वर्गीकरण केले जाते या मध्ये सर्व साधारणपणे प्राचीन,मध्ययुगीन, आधुनिक व समकालीन कालखंडाचा समावेश असतो. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील व स्वातंत्र्या नंतरच्या अभिलेखांचा विचार करता कंपनी सरकारच्या

कालखंडातील अभिलेख, ब्रिटिश शासनाच्या कालखंडातील अभिलेख व नंतर स्वतंत्र भारत कालखंडातील अभिलेख असे अभिलेखांचे वर्गीकरण केले जाते.

## ९.३ सारांश

अभिलेखांचे वर्गीकरण ही एक शास्त्रीय प्रक्रिया आहे.सुरवातीला जेंव्हा या प्रक्रियेला शास्त्रीय स्वरूप नव्हते तेंव्हा अभिलेखांच्या संकलन व जतन या बाबींकडे जास्त लक्ष दिले जात होते. मात्र अभिलेख वर्गीकरणाची प्रक्रिया विकसित झाल्या नंतर आपण पाहीलेल्या वरील प्रकारच्या वर्गीकरणाच्या प्रक्रिया सुरू झाल्या व अभिलेख वर्गीकरण प्रक्रियेत अमुलाग्र क्रांती झाली. त्यामुळेच आपणांस आज अभिलेखांचे शास्त्रशुद्ध वर्गीकरण पाहण्यास मिळते.

## ९.४ प्रश्न

१. अभिलेख वर्गीकरण ही संकल्पना स्पष्ट करा.

२. अभिलेखांच्या वर्गीकरणावर भाष्य करा.

३. आंतरराष्ट्रीय मानदंडाप्रमाणे अभिलेखांचे वर्गीकरण कसे केले जाते याची माहिती नमूद करा.

४. अभिलेखांच्या महत्त्वानुसार अभिलेखांचे वर्गीकरण कसे केले जाते यावर भाष्य करा.

## ९.५ संदर्भ

१. खोबरेकर वि. गो.-महाराष्ट्रातील दफ्तरखाने, मुबंई महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती.

२. गोखले शोभना -पुराभिलेखविद्या. पुणे कँटीनेन्टल प्रकाशन.

३. धटावकर भास्कर -महाराष्ट्रातील शासकीय पुराभिलेखागाराची निर्मिती आणि कार्य, मुंबई चेतन प्रकाशन.

४. महाजन शां. ग. दफ्तरखाने आणि वस्तुसंग्रहालय, पुणे:पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन.

५. विचारे द. त. कोल्हापूर दप्तरखाना संक्षिप्त परिचय, नाशिक ज्ञानगंगोत्री.

❖❖❖❖

# १०

## अभिलेखांचे व्यवस्थापन: जतन व मूल्यमापन

**घटक रचना :**

१०.० उद्दिष्टे

१०.१ प्रस्तावना

१०.२ अभिलेखागार

१०.३ अभिलेखपाल

१०.४ अभिलेखपालाचे कर्तव्य

१०.५ अभिलेखांचे जतन

१०.६ अभिलेखांचे मूल्यमापन

१०.७ सारांश

१०.८ प्रश्न

१०.९ संदर्भ

### १०.० उद्दिष्टे

१. अभिलेखागार संकल्पनेची माहिती जाणून घेणे .

२. अभिलेखपाल व त्याच्या कर्तव्यांची माहिती अभ्यासाने.

३. अभिलेखांचे जतन का आवश्यक आहे याची माहिती जाणून घेणे.

४. अभिलेख मूल्यमापन प्रक्रिया समजून घेणे.

### १०.१ प्रस्तावना

अभिलेखांचे व्यवस्थापन ही एक कला आहे, तंत्र आहे तसेच ती एक शास्त्रीय प्रक्रिया आहे. या अगोदर आपण अभिलेख म्हणजे काय ?अभिलेखांची निर्मिती कशी होते, अभिलेखांची व्याप्ती, अभिलेखांची उद्दिष्टे, अभिलेखांचे प्रकार, अभिलेखांचे वैशिष्ट्ये, अभिलेखांचे महत्व व अभिलेखांचे वर्गीकरण आदी बाबतची माहिती जाणून घेतली. या घटकात आपण अभिलेखांच्या व्यवस्थापनाशी संबंधित घटकांची माहिती पाहणार आहोत.यां घटकामध्ये आपण अभिलेखागार व अभिलेखपाल या संकल्पना समजून घेणार आहोत. तसेच अभिलेखांचे जतन व मूल्यमापन या बाबतची माहिती अभ्यासणार आहोत.

सर्व साधारणपणे अभिलेखांच्या निर्मितीनंतर अभिलेख एकत्र केले जातात व नंतर ते फाईलमध्ये ठेवले जातात. त्या अभिलेखांच्या निर्मितीचे कार्य संपल्यानंतर अथवा गरज संपल्यानंतर त्या फाईल्स रेकॉर्डरूम म्हणजे अभिलेख कक्षात ठेवल्या जातात. जेथूनच अभिलेखांच्या अभिलेखागाराची प्रक्रिया सुरू होते. व पुढे अभिलेखपाल या अभिलेखांच्या व्यवस्थापनाचे काम सुरू करतो. नंतर तो अभिलेखांच्या जतन व मूल्यमापनाची प्रक्रिया पूर्ण करतो. या सर्व घटकांची माहिती या घटकात आपण पाहणार आहोत.

## १०.२ अभिलेखागार

"ज्या ठिकाणी ऐतिहासिक, प्रासंगिक व दुर्मिळ अभिलेखांचे जतन करून ठेवलेले जातात अशा ठिकाणाला अभिलेखागार असे म्हटले जाते". अशा अभिलेखागारांमध्ये जुनी महत्त्वाची कागदपत्रे, दप्तरे, जुने चित्रपट, जागतिक करारांचे दस्तऐवज दुर्मिळ पत्रे, प्रवासवर्णने इत्यादी जतन करून ठेवले जाते.अभिलेखागारांमुळे मूळ कागदपत्रांचे संदर्भ मिळतात. त्यामुळे अभ्यासक व संशोधकांना तत्कालीन ऐतिहासिक व्यक्ती, घटक, घटना तत्कालीन भाषा, लिपी यांचा शोध घेता येतो. कालगणना करता येते. ऐतिहासिक वारसा पुढील पिढ्यांना हस्तांतरीत करता येतो. भारतातील दिल्ली येथील राष्ट्रीय अभिलेखागार हे आशिया खंडातील सर्वात मोठे अभिलेखागार आहे. भारतातील प्रत्येक राज्याचे स्वतंत्र अभिलेखागार आहे. प्रासंगिक, ऐतिहासिक व दुर्मिळ कागदपत्रांचा संग्रह करणारे एक महत्वाचे केंद्र म्हणुन अभिलेखागारांकडे पाहीले जाते.

## १०.३ अभिलेखपाल

"अभिलेखांचे संकलन ,व्यवस्थापन व जतन करण्यासाठी ज्या व्यवस्थापकाची नियुक्ती केली जाते त्या व्यवस्थापकास अभिलेखपाल असे म्हटले जाते".

अभिलेखागाराचा प्रमुख या नात्याने अभिलेखांचे संकलन करत असतांना अभिलेखांचा कायदेशीर ताबा घेणे. प्राप्त अभिलेखांचे व्यवस्थापन करणे. व्यवस्थापन कार्यासाठी वेगवेगळ्या श्रेणीतील कर्मचाऱ्यांची मदत घेणे.गरज लागेल तेंव्हा शासनाला, अभ्यासकांना अथवा संशोधकांना अभिलेख उपलब्ध करुन देणे. अभिलेखागारातील अभिलेखांची काळजी घेणे. अभिलेखांची संरचना करणे. अभिलेखांची अनु सूची तयार करणे. वर्तमान काळाबरोबरच भविष्यात सुद्धा आपल्या बरोबरच इतरांना अभिलेखांचा उपयोग होईल अशी योजना तयार करणे. या सर्व गोष्टी अभिलेखपालाला कराव्या लागतात.

## १०.४ अभिलेखपालाचे कर्तव्य

अभिलेखागाराचा प्रमुख या नात्याने अभिलेखपालाला पुढील कर्तव्य पार पाडावी लागतात.

**१०.४.१ अभिलेखांची संरचना करणे**:

अभिलेखांची संरचना करणे हे अभिलेखपालाचे पाहिले महत्वपूर्ण कर्तव्य आहे. हे कर्तव्य निभावत असतांना तो अभिलेखांचे स्वरूप व तत्वे लक्षात घेवूनच अभिलेखांची संरचना करतो.

* अभिलेखांची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन तो अभिलेखांचे संच तयार करतो.

* अभिलेखांचे वैशिष्ट्यपूर्ण संच तयार करतांना तो हे वैशिष्ट्यपूर्ण संच एकमेकात मिसळणार नाहीत याची खबरदारी घेतो.

* अभिलेखागारात येणाऱ्या नवीन अभिलेखांना संवरचित करून उपलब्ध नवीन जागेत तो सुव्यवस्थितपणे ठेवतो.

* ज्या कारणाला अनुसरून अभिलेखांची निर्मिती झाली आहे त्या कारणाला अनुसरून तो अभिलेखांचे संच तयार करतो.

* वेगवेगळ्या संस्थांच्या अभिलेखांचे संच अभिलेखांचे स्वरूप, कार्य व समानतेला अनुसरून तो मांडतो.

* वेगवेगळ्या संस्थांचे अभिलेख त्यांच्या कलखंडाला अनुसरून मांडतो.

* वेगवेगळ्या अभिलेखांचे संच व उपसचं हे अभिलेखांचे महत्व व कार्य लक्षात घेवून बनवतो.

* अभिलेखांचे ढीग बनवताना ते जेंव्हा काढण्याची वेळ येईल तेंव्हा ते सहज कसे काढता येतील त्या हिशेबाने अभिलेखांचे तो ढीग बनवतो.

श्री. चार्लस जॉन्स यांनी,” द केअर ऑफ डॉक्युमेंटेस अँड मॅनेजमेंट ऑफ आर्काईव्हज", या पुस्तकात अभिलेखपालाने अभिलेखांची संरचना करतांना पुढील गोष्टींना अनुसरून अभिलेखांची संरचना करावी असे सांगीतले आहे.

* अभिलेखपालाने अभिलेखांच्या नैसर्गिक संचांचे जतन केले पाहिजे.

* अभिलेखपालाने अभिलेखांचे मूळ स्वरूप व काळजीपूर्वक परिक्षण करूनच अभिलेखांची संरचना केली पाहिजे.

* अभिलेखपालाने अभिलेखांचे स्वरूप व अभिलेख संरचनेची तत्त्वे लक्षात घेवूनच अभिलेखांची संरचना केली पाहिजे .

* अभिलेखपालने अभिलेखांचे संच, उपसचं व मालिका बनवूनच अभिलेखांची संरचना केली पाहिजे.

वरील प्रकारे त्यांनी अभिलेखांची संरचना केली तर तो अभिलेखांची उत्तम संरचना करण्यात यशस्वी होवू शकेल.

**१०.४.२ अभिलेखांचे संच :**

अभिलेखांचे संच तयार करणे हे अभिलेखपालाचे दुसरे महत्त्वपूर्ण कर्तव्य आहे. ही कर्तव्य निभावत असतांना त्यांनी प्रशासकी, सर्वसाधारण व सामुदायीक या शीर्षकांना अनुसरून संच बनविले पाहिजेत.

**अभिलेखांचा पहिला संच :**

अभिलेखपालाने अभिलेखांचा संच बनवत असतांना अभिलेखांचा पहिला संच हा मंत्री,मंत्र्यांची कार्यालये, महालेखापाल व राज्याचे सचिव यांच्या कार्यालयातील अभिलेखांचा बनविला पाहिजे. हे अभिलेख हे अत्यंत महत्वाचे असल्याने या अभिलेखांना अनन्य साधारण महत्व आहे म्हणुन हा संच पहिल्यांदा त्याने बनवावा.

**अभिलेखांचा दुसरा संच :**

अभिलेखपालाने अभिलेखांचा दुसरा संच बनवत असतांना अभिलेखांचा सर्वसाधारण संच बनवावा. हा संच परस्परांशी संबंधीत असलेल्या अभिलेखांचा असतो. या अभिलेखांमध्ये औद्योगिक घडामोडींशी संबंधीत कागदपत्रांचा समावेश असतो. हे अभिलेख सर्वसाधारण असल्याने या अभिलेखांना सर्वसाधारण महत्व आहे.

**अभिलेखांचा तिसरा संच :**

अभिलेखपालाने अभिलेखांचा तिसरा संच बनवत असतांना अभिलेखांचा सामुदायिक संच बनवावा. कारण या संचामध्ये विविध कार्यालयातील समान स्वरूप व वैशिष्ट्ये असणारे अभिलेख येतात. उदाहरणार्थ समान स्वरूपाच्या संस्था ज्यामध्ये शासकीय व शैक्षणिक संस्थांचा समावेश येतो. अशा संस्थांकडून आलेले अभिलेख हे जरी वेगवेगळ्या संस्थांकडून आले असले तरी यांचा त्यांनी एकच सामुदायिक संच बनवावा .वरील प्रकारे त्यांनी संच बनविण्याची प्रक्रिया योग्य पद्धतीने निभावली तर तो अभिलेखांचे उत्कृष्ट संच बनविण्यात यशस्वी होवू शकेल.

**१०.४.३ अभिलेखांचे उपसंच** :

अभिलेखांचे उपसंच तयार  करणे हे अभिलेखपालाचे तिसरे महत्त्वपूर्ण कर्तव्य आहे. अभिलेखपालाला आपले कर्तव्य निभावत असतांना संघटनात्मक बदल घडवून आणण्याचा दृष्टीने हे कार्य करावे लागते. अभिलेखागाराच्या प्रमुख केंद्राच्या उपशाखा निर्माण होतात तेंव्हा अभिलेखांचे उपसचं बनविण्याची प्रक्रिया अभिलेखपालाला सुरू करावी लागते. वेगवेगळ्या संस्थांच्या संघटनात्मक कार्य पद्धतीमध्ये बदल होणे,नवनवीन अभिलेखांची जास्त प्रमाणात निर्मिती होणे, मुख्य अभिलेखागारा व्यतिरिक्त इतर क्षेत्रीय अभिलेखागारांची निर्मिती होणे, तसेच वेगवेगळ्या अभिलेखागारांच्या काम करण्याच्या पद्धतीमध्ये बदल होणे. या सर्व बदलांना अनुसरून अभिलेखपाल

अभिलेखांचे उपसंच बनवितो. वरील मार्गदर्शक तत्वांना अनुसरून अभिलेखपालाने अभिलेखांचे उपसंच बनविण्याची प्रक्रिया योग्य पद्धतीने निभावली तर तो अभिलेखांचे उत्कृष्ट उपसंच बनविण्यात यशस्वी होवू शकेल.

**१०.४.४ अभिलेखांची मालिका** :

अभिलेखांची मालिका तयार  करणे हे अभिलेखपालाचे चौथे महत्त्वपूर्ण कर्तव्य आहे. अभिलेखांच्या संच व उपसंचा व्यतिरिक्त अभिलेखपालाला आणखी एका प्रकारात अभिलेखांची वर्गवारी करावी लागते ती वर्गवारी म्हणजे अभिलेखांची मालिका तयार करणे

होय. अभिलेखपालाला आपले हे कर्तव्य निभावत असतांना अभिलेखागारात येणाऱ्या अभिलेखांची मूळ स्वरुपाला हानी न पोहचू देता मालिका बनवावी लागते.हे कर्तव्य निभावत असतांना त्यांनी.....

*वेगवेगळ्या प्रकारच्या कागदपत्रांची वेगवेगळी रचना करावी.

*भौगोलिक स्वरूपाचे अभिलेख वेगळे करावेत.

*राजकीय स्वरूपाचे अभिलेख वेगळे करावेत.

*सामाजिक स्वरूपाचे अभिलेख वेगळे करावेत.

*धार्मिक स्वरूपाचे अभिलेख वेगळे करावेत.

*सांस्कृतिक स्वरूपाचे अभिलेख वेगळे करावेत.

*आर्थिक  स्वरूपाचे अभिलेख वेगळे करावेत.

*ऐतिहासिक स्वरूपाचे अभिलेख वेगळे करावेत.

*वेगवेगळ्या कालखंडानुसार अभिलेख वेगळे करावेत.

*या सर्व वेगवेगळ्या प्रकारच्या अभिलेखांची स्वतंत्र सूची तयार करावी .वरील मार्गदर्शक तत्वांना अनुसरून अभिलेखपालाने अभिलेखांची मालिका बनविण्याची प्रक्रिया योग्य पद्धतीने निभावली तर तो अभिलेखांची मालिका बनविण्यात यशस्वी होवू शकेल.

**१०.४.४ अभिलेखांचे फाईल्समध्ये रूपांतर :**

अभिलेखांचे फायलिंग करणे ही अभिलेखपालाची महत्त्वाची जबाबदारी असते. कारण सातत्याने अभिलेखागारात अभिलेखांची संख्या ही वाढत जाते.वाढणाऱ्या अभिलेखांच्या संख्येला वर्गीकृत करण्यासाठी व वेगवेगळ्या विषय शिर्षकला अनुसरून रचना बद्ध करण्यासाठी फायलिंग हे महत्वाचे असते म्हणुनच अभिलेखपाल हे फायलिंग करतांना खालील पद्धतींचा अवलंब करतो.

*** अनु क्रमांकाला अनुसरून फायलिंग :**

सर्व साधारणपणे अभिलेखपाल अभिलेखांचे फायलिंग करतांना अनु क्रमांकाला अनुसरून फायलिंग करतो .

उदाहरणार्थ ....

१. Communication

२. Accounts

३. Personnel

४. Finance

५. Legislation

या फायलिंग पद्धतीमध्ये एक ते पाच असे अनुक्रम आहेत. हे नमुना दाखल आहेत.असे अनुक्रम वाढवून सुद्धा तो फायलिंग पुर्ण करतो. या वरून अभिलेखपालाला कोणत्या अनुक्रमाला कोणती फाईल आहे हे समजण्यास मदत होते.

***अद्याक्षराला अनुसरून फायलिंग :**

अभिलेखपाल अद्याक्षराला अनुसरून फायलिंग करतांना इंग्रजी लिपीतील अक्षरांचा वावर करतो.

उदाहरणार्थ ....

Accounts

Audit

Address

Article

Assignment

Administration

या फायलिंग पद्धतीमध्ये इंग्रजी लिपीतील अद्याक्षर आहे. अशी अक्षरे तो A to Z पर्यंत वापरून फायलिंग पूर्ण करतो. यावरून अभिलेखपालाला कोणत्या अद्याक्षराला कोणती फाईल आहे हे सहज समजण्यास मदत होते .

***मुख्य विषयाला अनुसरून उपविषयाचे फायलिंग :**

ज्या प्रमाणे अभिलेखपाल इंग्रजी अद्याक्षराला अनुसरून फायलिंग करतो त्याच प्रमाणे तो मुख्य विषयाला अनुसरून उपविषयाचेही फायलिंग करू शकतो.

उदाहरणार्थ ....

Communication हा मुख्य विषय आहे. या मुख्य विषयाच्या शीर्षकाला अनुसरून खाली नमूद करण्यात आलेल्या विषयाला अनुसरून तो उपविषयांचे फायलिंग करू शकतो.

मुख्य विषय

Communication

उपविषय

Mail

Postage

Correspondence

Telecommunication

फायलिंग पद्धतीमध्ये अभिलेखपाल

उपविषयांचे फायलिंग अनु क्रमांकाला अनुसरून सुध्दा करू शकतो.

उदाहरणार्थ ....

1. Mail

2. Postage

3. Correspondence

4. Telecommunication

फायलिंग पद्धतीमध्ये अभिलेखपाल दुय्यम विषयाची रचना अद्याक्षराची चिन्ह देवून सुध्दा करू शकतो.

उदाहरणार्थ ....

A - Administration

Ab - Administration of buildings.

Ag - Administration general

Agl - Administration general, legislative

फायलिंग पद्धतीमध्ये अभिलेखपाल विषयाला अनुसरुन रचना करू शकतो.

उदाहरणार्थ ....

000 History

100 Geography

200 Politics

300 Economics

400 Sociology

फायलिंग पद्धतीमध्ये अभिलेखपाल फायलिंग करण्यासाठी डेवी डेसीमल पद्धतीचा सुद्धा अवलंब करतो.

उदाहरणार्थ ....

400  Mining

410 Mining Engineering

411 Working of Mines

411.1 Metal Mining

411.11 Gold Mining

अभिलेखांचे फायलिंग करणे ही एक शास्त्रीय पद्धती आहे. प्रत्येक अभिलेखपाल या शास्त्रीय पद्धतींचा वापर करत अभिलेखांचे फायलिंग करतो. हे फायलिंग केल्याने कोणते अभिलेख नेमके कोणत्या ठिकाणी आहेत हे सांगणे अभिलेखपालाला सहज शक्य होते.

## १०.५ अभिलेखांचे जतन

ज्या कारणाने अभिलेखांची निर्मिती झालेली असते त्या कारणाला अनुसरून अभिलेखांना महत्व प्राप्त होत असते. मात्र अभिलेखांच्या निर्मिती प्रक्रियेनंतर अभिलेखांना प्रचलित, सम प्रचलित व अप्रचलित अशा तीन अवस्थेतून जावे लागते. व्यक्ती ,संस्था ,संघटना ,शासन, प्रशासन,समाज,संशोधक व अभ्यासक या सर्वांच्याच दृष्टीने अभिलेख महत्वाचे असल्याने अभिलेखांचे जतन करणे अभिलेखांचे निर्माते व अभिलेखागारांच्या दृष्टीने महत्वाचे असते.

### १०.५.१ अभिलेखांचे अस्सल दस्तऐवज म्हणुन महत्व :

* एखाद्या संस्थेच्या किंवा कार्यालयाच्या कामकाजाच्या नोंदी जपून ठेवण्याच्या दृष्टीने महत्व.

* नागरिकांचे नागरी,कायदेशीर व मालमत्ता विषयक हक्क अबाधीत ठेवण्याचा दृष्टीने महत्व.

* संशोधकांना त्यांच्या संशोधन कार्याच्या उपयुक्ततेला अनुसरून महत्व.

### १०.५.२ संस्थेच्या अथवा कार्यालयाच्या दृष्टीने महत्व :

* शासन, प्रशासन व संस्थांच्या कायदेशीर बाबी पुर्ण करण्याच्या दृष्टीने अभिलेखांना महत्व आहे.

* नागरिकांचे कायदेशीर, नागरी हक्क व इतर हक्काच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्व आहे.

* संशोधन कार्याला वाव मिळावा या दृष्टीने महत्व आहे.

सर्व साधारणपणे निर्माण केलेले अभिलेख हे राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, नैतिक, तात्विक, ऐतिहासिक व प्रशासकीय दृष्टीने महत्वाचे असतात ते वर्तमान काळात जरी निर्माण झाले असले तरी त्यांची उपयोगीता भविष्यात सुद्धा सुरू राहते म्हणुनच अभिलेखांचे जतन करणे ही केवळ निर्मात्यांचीच नव्हें तर आपणा सर्वांचीच महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे.

## १०.६ अभिलेखांचे मूल्यमापन

सर्व साधारणपणे अभिलेखांच्या निर्मितीचे तत्व व अभिलेखांचे वर्तमान काळातील व भविष्यकाळातील महत्व लक्षात घेवून अभिलेखांचे मूल्यमापन केले जाते. असे मूल्यमापन वस्तुनिष्ठ स्वरूपात करणे गरजेचे असते. अभिलेखांचे मूल्यमापन करतांना खालील बाबी विचारात घेऊन मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

### १०.६.१ अभिलेखांचे उपयोगीतेला अनुसरून मूल्यमापन :

*अभिलेखांची शासन-प्रशासन या दृष्टिकोनातून प्रचलित उपयोगीता.

*अभिलेखांची कायदेशीर व आर्थिक दृष्टिकोनातून उपयोगीता.

*अभिलेखांची पुराव्यांच्या दृष्टिकोनातून उपयोगीता.

*आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्याचा दृष्टीकोनातून उपयोगीता.

*अभिलेखांची ऐतिहासिक दृष्टीकोनातून उपयोगीता.

*अभिलेखांची धार्मिक दृष्टीकोनातून उपयोगीता.

*अभिलेखांची सामाजिक दृष्टीकोनातून उपयोगीता.

*अभिलेखांची सांस्कृतिक दृष्टीकोनातून उपयोगीता.

या सर्व घटकांना अनुसरुन अभिलेखांचे मूल्यमापन केले तर ते अचूक व सुयोग्य मूल्यमापन होवू शकेल.

### १०.६.२ अभिलेखांचे महत्व, श्रेणी, स्वरूप व संबंधाला अनुसरून मूल्यमापन :

* अभिलेखांची निर्मिती का करण्यात आली व अभिलेखाला महत्त्व काय आहे या गोष्टी लक्षात घेवून मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

* अभिलेखांची निर्मिती कोणत्या श्रेणीला अनुसरून करण्यात आली ही गोष्टी लक्षात घेवून अभिलेखांचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

* अभिलेखांचे विहित कार्याचे स्वरूप लक्षात घेऊन अभिलेखांचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

* अभिलेखांचे परस्पर घटकांशी काय संबंध आहेत ते अभ्यासून अभिलेखांचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

### १०.६.३ अभिलेखांचे मूल्यमापन करतांना सुरवातीला काय करावे :

* जो अभिलेख मूल्यमापणासाठी घेतला आहे तो वर्तमान व भविष्यकाळासाठी उपयुक्त आहे का ? किंवा नाही !

* जो अभिलेख ज्या कार्याच्या अनुषंगाने निर्माण झाला आहे तशीच परिस्थिती पुन्हा निर्माण झाली तर त्याचा उपयोग निर्णय अथवा मार्गदर्शनासाठी होवू शकेल का ?

या बाबी लक्ष्यात घेवूनच अभिलेखांच्या मूल्यमापनाची सुरवात करावी.

**१०.६.४ स्थुलमानाने अभिलेखांचे मूल्यमापन :**

स्थुलमानाने अभिलेखांचे चिरंतन मूल्यमापन करण्यासाठी चार गोष्टी लक्षात ठेवल्या जातात.

अ) अभिलेखांचे कार्यालयीन दृष्टिकोनातून महत्व.

**१. कार्यालयीन रचना दर्शविणारे अभिलेख:**

*पद, पद मंजुरी, सेवक तक्ता, सेवकांची कर्तव्य, कार्यालयीन सूचना, कार्यालयीन कामकाज रूपरेषा,वरीष्ठ कार्यालयाकडून आलेल्या मार्गदर्शक सूचना आदी बाबतचे अभिलेख.

**२. कार्यालयाचे कार्य व कार्यपूर्ती संदर्भातील अभिलेख :**

*धोरणात्मक निर्णय, धोरणात्मक बदल,कार्यपूर्तीसाठी आखलेल्या दीर्घकालीन योजना, आर्थिक तरतुदी, मासिक, वार्षिक व अन्य प्रकारचे अहवाल व त्या संदर्भातील इतर कागदपत्रे आदी बाबतचे अभिलेख.

**३. कार्यपद्धती दर्शविणारे अभिलेख :**

*पत्र स्वरुपातील अभिलेख, पूर्वोदाहरण दर्शविणारे अभिलेख आदी बाबतचे अभिलेख.

ब) अभिलेखांचे कार्यात्मक दृष्टिकोनातून महत्व.

१. कार्यालयाच्या प्रशासकीय दृष्टीने उपयुक्त अभिलेख.

२. कार्यालयांच्या वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या संदर्भातील अभिलेख.

३. कार्यालयांच्या वेगवेगळ्या योजनां संदर्भातील अभिलेख.

४. कार्यालय व्यवस्थापन व पत्रव्यवहारा संदर्भातील उच्च व मध्यम टप्प्यातील अभिलेख.

५. कार्यालय प्रसिद्धी माध्यमा संदर्भातील अभिलेख.

(जाहिरात, प्रसिद्धी पुस्तिका, आराखडे,पोस्टर, ध्वनिमुद्रिका, चित्र मुद्रिका )संदर्भातील अभिलेख.

क) अभिलेखांचे व्यक्ती व नागरिकांच्या दृष्टिकोनातून महत्व.

१. जन्म,लग्न,घटस्फोट, दत्तक विधी,नागरिकत्व, मृत्यूपत्र, मृत्यु दाखला या संदर्भातील अभिलेख.

२. मृत्यूनंतर दहन व दफन या संदर्भातील नोंदवह्या.

३. व्यक्तींचे राष्ट्रीय सेवा,शिक्षण,नोकरी व आरोग्याविषयी अभिलेख.

४. व्यक्तींचे मालमत्ता, हक्क, सवलती व भत्ते या संदर्भातील अभिलेख.

**ड) अभिलेखांचे संशोधनात्मक दृष्टिकोनातून महत्व :**

१. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटनांची माहिती देणारे अभिलेख.

२. संशोधनासाठी उपयुक्त असणाऱ्या वेगवेगळ्या शाखांच्या संदर्भातील महत्त्वपूर्ण व उपयुक्त माहिती देणारे अभिलेख.

३. वेगवेगळ्या कालखंडातील व्यक्तींच्या कुटुंबातील वंशावळी संबंधीत माहिती देणारे अभिलेख.

४. वेगवेगळ्या कालखंडातील व्यक्तींची चरित्रात्मक माहिती देणारे अभिलेख.

५. वेगवेगळ्या स्थळांची माहिती पुरविणारे अभिलेख.

(स्थळ,मार्ग,भौगोलिक वैशिष्ट्ये, ऐतिहासिक पार्श्वभूमी, स्थानिक सीमा)यांची माहिती देणारे अभिलेख.

**१०.६.५ अभिलेखांचे निरंतन मूल्य ठरविण्याचे टप्पे :**

अभिलेखांचे निरंतन मूल्य ठरवताना पुढील टप्पे लक्षात घेवूनच अभिलेखांचे चिरंतन मूल्य ठरवावे.

१. अल्पकालीन महत्व असलेले अभिलेख इतर महत्वाच्या अभिलेखांपासून वेगळे करणे.

२. अभिलेखांचे चिरंतन मूल्य ठरवताना अभिलेखांचे वर्गीकरण करणे.

३. अभिलेखांच्या मूल्यांचे अवलोकन करणे.

४. अभिलेखांचे पुनरावलोकन करणे.

५. अभिलेख अभिलेखागारात जमा करणे.

**१०.६.५ अभिलेख मूल्यमापन मार्गदर्शक तत्त्वे :**

१. अभिलेखपालाने अभिलेखांचे मूल्यमापन करतांना आपल्या सदविवेक बुद्धीला अनुसरून अभिलेखांचे मूल्यमापन करावे.

२. अभिलेखपालाने अभिलेखांचे मूल्यमापन करतांना अभिलेखांच्या मूल्यमापनाच्या मार्गदर्शक तत्वांचा वापर करून लवचिक पद्धतीने अभिलेखांचे मूल्यमापन करावे.

३. अभिलेखपालाने अभिलेखांचे मूल्यमापन करतांना कोणत्याही प्रकारची अटीतटीची भूमिका घेवू नये.

४. वेगवेगळ्या प्रकारच्या अभिलेखांचे मूल्यांकन हे कधीही निरपेक्ष नसते म्हणूनच अभिलेखपालाने अभिलेखांचे मूल्यमापन करतांना सापेक्षतेने मूल्यमापन करावे.

५. अभिलेखपालाने अभिलेखांचे मूल्यमापन करतांना सखोल व तुलनात्मक अभ्यास करूनच मूल्यमापन करावे.

६. अभिलेखागारात उपलब्ध असणारे अभिलेख हे अगणित असतात तसेच वेगवेगळ्या विषयांशी संबंधित असतात. त्यामुळे अभिलेखपाल हा सर्व विषयात तज्ञ असतोच असे नाही म्हणूनच अभिलेखपालाने अभिलेखांचे मूल्यमापन करतांना आपल्याला ज्या विषयाचे ज्ञान नाही त्या विषयाशी संबंधीत अभिलेखांचे मूल्यमापन करतांना इतर तज्ञ व्यक्तींची मदत घेवूनच अभिलेखांचे मूल्यमापन करावे.

## १०.७ सारांश

अभिलेखांचे व्यवस्थापन ,जतन व मूल्यमापन या घटकाला अनुसरून सर्वप्रथम आपण ज्या ठिकाणी अभिलेखांचा संग्रह केला जातो ती अभिलेखागार ही संकल्पना समजून घेतली. नंतर आपण अभिलेखांच्या व्यवस्थापनामध्ये व कार्यामध्ये ज्या नेतृत्वाची महत्वाची भूमिका आहे त्या अभिलेखपाल या संकल्पनेची व अभिलेख व्यवस्थापनातील अभिलेखपालाच्या भूमिकेची माहिती अभ्यासली या भूमिकेतील त्यांची अभिलेख संरचना, अभिलेख संच, उपसचं अभिलेख मालिका, अभिलेख फायलिंग या घटकांना अनुसरून अभिलेखांचे व्यवस्थापन ते कसे करतात त्याची माहिती जाणून घेतली. त्यानंतर अभिलेखांचे जतन करणे का आवश्यक आहे त्याबाबतची माहिती समजून घेतली व सरतेशेवटी अभिलेखांच्या मूल्यमापणसाठी आवश्यक असणाऱ्या मूल्यमापनाच्या विविध पद्धतींची माहिती पाहीली.व नंतर अभिलेखांच्या मूल्यमापणसाठी आवश्यक असणारी मार्गदर्शन तत्त्वे समजून घेतली. या सर्व माहितीच्या आधारे आपणांस अभिलेखांचे व्यवस्थापन, जतन व मूल्यमापन या संकल्पना समजण्यास मदत झाली.

## १०.८ प्रश्न

१. अभिलेख व्यवस्थापनातील अभिलेखपालाची भूमिका स्पष्ट करा.

२. अभिलेखांच्या मूल्यमापन प्रक्रियेवर भाष्य करा.

## १०.९ संदर्भ

१. खोबरेकर वि. गो.-महाराष्ट्रातील दफ्तरखाने,मुबंई महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती.

२. गोखले शोभना -पुराभिलेखविद्या. पुणे कँटीनेन्टल प्रकाशन.

३. धाटावकर भास्कर -महाराष्ट्रातील शासकीय पुराभिलेखागाराची निर्मिती आणि कार्य,मुंबई चेतन प्रकाशन.

४. महाजन शां.ग.दफ्तरखाने आणि वस्तुसंग्रहालय, पुणे: पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन.

५. विचारे द. त. कोल्हापूर दप्तरखाना संक्षिप्त परिचय, नाशिक ज्ञानगंगोत्री.

❖❖❖❖

# ११

## अभिलेखांचे संवर्धन

**घटक रचना :**

११.० उद्दिष्टे

११.१ प्रस्तावना

११.२ अभिलेखांवर परिणाम करणारे वातावरणीय घटक व संवर्धनाचे मार्ग.

११.३ अभिलेखांवर परिणाम करणारे रासायनिक घटक व संवर्धनाच मार्ग.

११.४ अभिलेखांवर परिणाम करणारे संरचनात्मक घटक व संवर्धनाचे मार्ग.

११.५ अभिलेखांवर परिणाम करणारे जैविक घटक व संवर्धनाचे मार्ग.

११.६ अभिलेखांवर परिणाम करणारे इतर घटक व संवर्धनाचे मार्ग.

११.७ सारांश

११.८ प्रश्न

११.९ संदर्भ

### ११.० उद्दिष्टे

१. अभिलेखांवर परिणाम करणारे वातावरणीय घटक कोणते आहेत त्यांची महिती जाणून घेणे.

२. अभिलेखांवर परिणाम करणाऱ्या वातावरणीय घटकपासून संवर्धनाचे कोणते मार्ग आहेत त्याचा अभ्यास करणे.

३. अभिलेखांवर परिणाम करणारे रासायनिक घटक कोणते आहेत त्यांची माहिती जाणून घेणे.

४. अभिलेखांवर परिणाम करणाऱ्या रासायनिक घटकपासून संवर्धनाचे कोणते मार्ग आहेत त्याचा अभ्यास करणे.

५. अभिलेखांवर परिणाम करणारे संरचनात्मक घटक कोणते आहेत त्यांची माहिती जाणून घेणे.

६. अभिलेखांवर परिणाम करणाऱ्या संरचनात्मक घटकपासून संवर्धनाचे कोणते मार्ग आहेत त्याचा अभ्यास करणे.

७. अभिलेखांवर परिणाम करणारे जैविक घटक कोणते आहेत त्यांची माहिती जाणून घेणे.

८. अभिलेखांवर परिणाम करणाऱ्या जैविक घटकपासून संवर्धनाचे कोणते मार्ग आहेत त्याचा अभ्यास करणे.

९. अभिलेखांवर परिणाम करणारे इतर घटक कोणते आहेत त्यांची माहिती जाणून घेणे.

१०. अभिलेखांवर परिणाम करणाऱ्या इतर घटकपासून संवर्धनाचे कोणते मार्ग आहेत त्याचा अभ्यास करणे.

## ११.१ प्रस्तावना

अभिलेख हे सेंद्रिय स्वरूपाचे असल्याने ते नाशवंत असतात. त्यांची झीज ही अपरिहार्य आहे. मात्र त्यांचे जास्तीत जास्त आयुर्मान वाढविण्याच्या दृष्टीने तसेच त्यांची उपयुक्तता व महत्त्व व अभिलेखांनी त्या कालखंडात लिखित स्वरुपात निर्माण केलेला वारसा टिकविण्याच्या दृष्टीने अभिलेखांचे संवर्धन हे महत्वाचे असते. सर्व साधारणपणे वातावरणातील घटक, रासायनिक घटक, संरचनात्मक घटक, जैविक घटक व काही इतर घटकांपासून सर्वाधिक उपद्रव हा अभिलेखांना होत असतो. म्हणुनच अभिलेखांच्या संवर्धनाची प्रक्रिया सुरू केली जाते प्रस्तुत घटकात आपण अभिलेखांवर परिणाम करणारे घटक व या घटकांचा अभिलेखांवर परिणाम होवू नये म्हणुन कोणती खबरदारी घेणे आवश्यक आहे या बाबतची माहिती पाहणार आहोत.

## ११.२ अभिलेखांवर परिणाम करणारे वातावरणीय घटक व संवर्धनाचे मार्ग

अभिलेख हे सेंद्रिय स्वरूपाचे असतात. ते कापडाच्या चिंध्या, गवत, लाकूड इत्यादी पदार्थांचा वापर करून बनवलेले असतात. अभिलेखांची निर्मिती करत असताना पाणी, स्टार्च, सरस व तत्सम पदार्थांचा वापर केला जातो.अशातच वातावरणातील उष्णता, ओलावा, सूर्यप्रकाश, हवामान, वातावरणातील अनिष्ट आम्लता धूळ या घटकांचा परिणाम सुद्धा अभिलेखांवर होत असतो. त्यामुळेच अभिलेखांचे आयुर्मान कमी होते.या सर्वच घटकांपासून अभिलेखांचे संवर्धन होणे गरजेचे आहे. अभिलेखांवर परिणाम करणाऱ्या वातावरणीय उष्णता, ओलावा, सूर्यप्रकाश, हवामान, तसेच वातावरणातील अनिष्ट आम्लता धूळ या सर्वच घटकांपासून जर आपल्याला संवर्धन करणे आवश्यक आहे असे वाटत असेल तर आपल्याला खालील मार्गांचा अवलंब करून अभिलेखांचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

### ११.२.१ उष्णता व आद्रता :

उष्णता व आद्रता  हे दोन्ही घटक कागदरूपी अभिलेखांवर नेहमीच परिणाम करत असतात. जास्त उष्णतेमुळे ते ठिसूळ होतोत.त्याच बरोबर पिवळे पडतात, कमी अद्रतेमुळे सुध्दा कागद शुष्क व ठिसूळ बनतात. तसेच आद्रता वाढली तर अभिलेख एकमेकांना चिकटतात.अभिलेखांवर बुरशी निर्माण होते. या व्यतिरिक्त अभिलेखांवरील तंतू, खळ तसेच अभिलेख बांधणीसाठी वापरलेले चांबडे यावरही आद्रतेचा परिणाम होत असतो.

अभिलेखांना होणारे हे सर्व उपद्रव थांबवण्यासाठी खाली दिलेल्या उपाय योजना करणे आवश्यक आहे.

*अभिलेख कक्षातील उष्णता व आद्रता प्रमाणात ठेवणे.

*अभिलेख कक्षात २०० से. ते २८० से. एवढे तपमान राहिल याची खबरदारी घेणे.

*हवेतील आद्रता ४५ ते ५५ प्रतिशत एवढी संपूर्ण वर्षासाठी ठेवणे.

*अभिलेखागारात वातानुकूलित व्यवस्था निर्माण करणे.

*अभिलेखागारात वातानुकूलित व्यवस्था निर्माण करणे शक्य नसेल तर खेळती हवा निर्माण होईल अशी व्यवस्था निर्माण करणे.

अभिलेखागारात वरील नमूद केलेल्या सर्व व्यवस्था निर्माण केल्या तर अभिलेखांचे उष्णता व आद्रतेपासून संरक्षण होण्यास मदत होईल.

**११.२.२: प्रकाश :**

अभिलेख हे सेंद्रिय स्वरूपाचे असून वनस्पतींय तंतूने बनलेले असतात. त्यामुळे त्यांच्यावर नैसर्गिक असो अथवा कृत्रिम असो या दोन्ही प्रकारच्या प्रकाशाचा परिणाम होत असतो. या दोन्ही प्रकारच्या प्रकाशाने अभिलेखांची मोठ्या प्रमाणात झीज होते. अभिलेखांना होणारा हा उपद्रव थांबवण्यासाठी खाली दिलेल्या उपाय योजना करणे आवश्यक आहे.

*अभिलेखगारातीतील अभिलेखांन पर्यंत अतिनील किरण पोहचणार नाहीत याची खबरदारी घेणे.

*अभिलेखागाराला खिडक्या लाल किंवा हिरव्या रंगाच्या बसवाव्यात.

*अभिलेखागाराच्या खिडक्यांना जाड पडदे बसवावेत.

*अभिलेखागारातीतील अभिलेखांवर थेट सूर्यप्रकाश पडणार नाही याची खबरदारी घ्यावी.

*विद्युत दिवे भरपूर असले तरी गरज असेल तेंव्हाच विद्युत दिवे लावावेत.

*अभिलेखागारात इतर वेळी प्रकाश सौम्य ठेवावा.

अभिलेखागारात वरील नमूद केलेल्या सर्व व्यवस्था निर्माण केल्या तर अभिलेखांचे प्रकाशापासून होणारे नुकसान थांबेल व अभिलेखांचे संरक्षण होण्यास मदत होईल.

## ११.३ अभिलेखांवर परिणाम करणारे रासायनिक घटक व संवर्धनाचे मार्ग

सर्वाधिक अभिलेखागार हे शहरी भागात असतात.अशा भागातील अभिलेखागारातील अभिलेखांवर वातावरणातील मुलद्रव्यांच्या कणांचा मोठा परिणाम होत असतो.

**११.३.१ रासायनिक मुलद्रव्ये :**

वातावरणात मिसळलेले कार्बन, नायट्रोजन आणि गंधक या मुलद्रव्यांचे कण अभिलेखागारातील अभिलेखांच्या हणीस कारणीभूत ठरतात. विशेषतः सल्फर डाय ऑक्साईड या वायुमुळे कागदातील सेल्युलोज घटकावर व इतर सेंद्रीय घटकावर मोठा परिणाम होतो. अभिलेखांना होणारा हा उपद्रव थांबवण्यासाठी खाली दिलेली उपाय योजना करणे आवश्यक आहे.

*अभिलेखागारातील अभिलेखांसाठी

अल्कधर्मी (आम्लधर्मीय घटकांच्या विरुद्ध तत्व असलेल्या) द्रावणाचा वापर करावा.

*असे वातावरण अभिलेखागारात निर्माण होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**११.३.२ धुळ :**

अभिलेखागारात प्रदुषित वातावरणाच्या माध्यमातून निर्माण होणारी धूळ अभिलेखांवर परिणाम करते त्यामुळे अभिलेखांची झीज होते. अभिलेखांना होणारा हा उपद्रव थांबवण्यासाठी खाली दिलेली उपाय योजना करणे आवश्यक आहे.

*अभिलेखागारात निर्माण होणारी धूळ ही वारंवार झटकून स्वच्छ केली पाहिजे.

*जर धूळ झटकून स्वच्छ होत नसेल तर व्हॅक्यूम क्लिनरचा वापर करून धूळ स्वच्छ करावी.

*जेंव्हा-जेंव्हा गरज भासेल तेव्हां-तेंव्हाच अभिलेखागार स्वछतेसाठी वेगवेगळे उपक्रम राबविले पाहिजे.

## ११.४ अभिलेखांवर परिणाम करणारे संरचनात्मक घटक व संवर्धनाचे मार्ग

अभिलेखांच्या संरचनात्मक बाबीविषयी माहिती पहात असतांना आपल्याला अभिलेखांचे आतरंग, अभिलेखांची रचना व अभिलेखांवरील शाई या घटकांचा विचार करावा लागेल.सर्व साधारणपणे अभिलेखांची निर्मिती ही चिंध्यांपासून मिळणार लगदा, चर्म पत्र, लाकडापासून बनविलेला लगदा, वनस्पतीपासून बनविलेला लगदा व रासायनिक लगद्यापासून केली जाते. या व्यतिरिक्त ऍसबेटॉससारख्या खनिजांच्या धाग्यापासून व कृत्रिम रीतीने तयार केलेल्या तंतू पासून सुद्धा कागद बनविला जातो. कागद बनवत असतांना प्रथम कच्चा द्रव्य असलेला लगदा घेतला जातो. नंतर त्याच्यावर गरजेप्रमाणे प्रक्रिया केली जाते. ही प्रक्रिया करत असताना सर्वप्रथम लगदा पाण्यात मिसळला जातो. नंतर तो लगदा पाणी विराहित करून तयार कागद मळविला जातो. मात्र कागद तयार करत असताना पाणी ,स्टार्च, सरस तसेच रसायनांचा कागदावर परिणाम होत असतो. त्यामुळेच कागद तयार करत असताना कागदात आम्लता राहते या आम्लतेचा उपद्रव कागदांना होतो. तसेच कागदावर लिहिलेली शाई सुद्धा कालांतराने खराब होते. त्यामुळे अशा अभिलेखांचे अस्तित्व धोक्यात येत या गोष्टीं पासून बचाव करण्यासाठी

*गरजेनुसार अभिलेखांची पाहणी करणे.

*गरजेनुसार अभिलेखांची स्वच्छता करणे.

*गरजेनुसार अभिलेखांसाठी वातावरणात बदल करणे.

*अभिलेखांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे .

आदी उपाय योजना अवलंबिल्या तर अभिलेखांचे रक्षण होण्यास मदत होईल.

## ११.५ अभिलेखांवर परिणाम करणारे जैविक घटक व संवर्धनाचे मार्ग

अभिलेखांवर सर्वाधिक परिणाम हा जैविक घटकांचा होतो. उष्ण कटिबंधातील प्रदेशात जैविक घटकांमुळे अभिलेखांची हानी फार मोठ्या प्रमाणात होते मात्र शीत कटिबंधातील प्रदेशात अभिलेखांची हानी कमी प्रमाणात होते.

अभिलेखांची हानी करणारे जैविक घटक..

### ११.५.१ बुरशी :

बुरशी हा अभिलेखांना उपद्रव करणारा एक मोठा घटक. वातावरणातील उष्णता, आद्रता, प्रकाश व स्टारर्चयुक्त खळ या सर्वच गोष्टींमुळे बुरशी वाढीस पोषक वातावरण निर्माण होते. व त्यापासून अभिलेखांना उपद्रव निर्माण होतो.

अशा परिस्थितीत अभिलेखांचा बचाव करण्यासाठी खालील गोष्टीची अमलबजावणी होणे आवश्यक आहे.

- बांधणी केलेले अभिलेख थोडे सैल सोडणे.
- अभिलेखांवरील बुरशी अथवा धुळ वारंवार स्वच्छ करणे.
- अभिलेखगारातील सापेक्ष आद्रता ७० प्रतिशतपेक्षा कमी ठेवणे.
- अभिलेखागारात वातानुकूलित योजना तयार करणे व गरजेनुसार त्याची अमलबजावणी करणे.
- अभिलेखागारात औषधांच्या उपाय योजना करणे.
- मेथॉनिलमध्ये १० % थायमॉल वापरून अभिलेखागारातील अभिलेखांवर बुरशी नाशक फवारा फवारणे.
- अभिलेखागारातील अभिलेखांच्या बांधणी व दुरुस्तीकडे लक्ष देणे.

आदी उपाय योजना अवलंबिल्या तर अभिलेखांचे रक्षण होण्यास मदत होईल.

### ११.५.२ कीटक :

वाळवी, सिल्व्हर-फिश ,पुस्तकी किडे व झुरळे हे अभिलेखागारातील अभिलेखांचे मुख्य शत्रू आहेत. या सर्वच कीटकांपासून अभिलेखांची मोठ्या प्रमाणात हानी होत असते. असे हे कीटक अभिलेखांना भोके पाडून शेवटच्या अभिलेखांन पर्यंत पोहचतात व उलट प्रवास करून पूर्ण अभिलेख नष्ट करतात हा उपद्रव टाळण्यासाठी पुढील गोष्टींची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

- अभिलेखागारात नवीन अभिलेख घेण्या अगोदर त्यांची तपासणी करणे.
- अभिलेखागारातील अभिलेखांना डांबराच्या विटा, सोडियम फ्लोराईड तसेच D.D.T वा इतर कीटक नाशकांची फवारणी करणे.
- अभिलेखागार वाळवी विरहित होण्यासाठी गरजेनुसार उपाय योजना करणे.
- अभिलेखांना झुरळांपासून उपद्रव होत असेल तर त्यांचा शोध घेवून त्यांना नष्ट करण्यासाठी उपाय योजना करणे.
- अभिलेखागारातील वाळवी नष्ट करण्यासाठी १ % सोडियम व २ % झिंक क्लोराईड मिसळून मिश्रणाच्या साहाय्याने वाळवीचा नाश करणे.
- घासलेटमध्ये ५ % D.D.T. चे मिश्रण करून वाळवी प्रतिबंधक उपाय योजना करणे. आदी उपाय योजना अवलंबिल्या तर अभिलेखांचे रक्षण होण्यास मदत होईल.

### ११.५.३ धुरी देण्याच्या पद्धती :

बुरशी वाळवी व कसर यांपासून अभिलेखांना उपद्रव होवू नये म्हणून धुरी देण्याच्या पद्धती प्रचलीत आहेत. धुरी देण्याच्या या पद्धतीस धुमीकरण असेही म्हटले जाते.

धुरी देण्यासाठी अलमारी, कपाट किंवा पेटी लागते. हवा बंद पेटीत अभिलेख ठेवून पेटीच्या खालच्या कप्प्यात कीटक नाशक वाफ तयार केली जाते. धुरी देण्याची ही एक पद्धती आहे. धुरी देण्याची जी दुसरी पद्धती आहे या पद्धतीमध्ये कार्बनडाय ऑक्साईड व इथिलीनं ऑक्साईड याचे ९:१ मिश्रण प्रमाण घेवून त्यापासून निर्माण होणाऱ्या वायुपासून धुरीकरण केले जाते. दुसरी पद्धती ही अधिक परिणामकारक आहे. या पद्धतीत धुरीकरण करण्यासाठी हवाबंद मोठी लोखंडी पेटी, गॅस सोडणारी नळकांडी,धुरीकरण करत असताना जो वायु सोडला जातो त्याचे मापन करणारी यंत्रणा व धुरीकरण पुर्ण झाल्यानंतर नको असलेला गॅस मोकळा करण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रणा या बाबींची आवश्यकता असते. धुरीकरणासाठी सर्वसाधारण खालील रसायने व वायूंचा वापर केला जातो.(बुरशीसाठी) थायनॉल, पॅराडीक्लोरोबेंझिन (कीटकांसाठी) हायड्रोसायनिक ॲसिड गॅस कार्बन डायऑक्साईड, इथिलीनं क्लोराईड कार्बन हाट्राक्लोराईड यांचे मिश्रण. या सर्व रसायनांचा वापर करतांना ही सर्व रसायने स्फोटक असल्याने यांचा वापर अत्यंत

काळजीपूर्वक करावा. तसेच या रसायनांपासून अभिलेखांना धोका पोहचणार नाही याची खबरदारी घ्यावी.

## ११.६ अभिलेखांवर परिणाम करणारे इतर घटक व संवर्धनाचे मार्ग

अभिलेखांना हानी पोहोचविणारे जसे जैविक, भौतिक, रासायनिक व संरचनात्मक घटक आहेत तसेच मानवनिर्मित घटक सुद्धा आहेत. जर मानवाने अभिलेखांची हाताळणी अयोग्य पद्धतीने केली तर अभिलेखांची बांधणी सैल होते, अभिलेखांचे कोपरे सैल होतात, अभिलेख गढूल होतात, अभिलेखांना डाग लागतात तसेच  अभिलेखांची शाई खराब झाल्याने अभिलेखांचे नुकसान होते. यापासून खबरदारी घेण्यासाठी पुढील मार्गाचा अवलंब केला जातो.

- वापरकर्त्यांनी अभिलेखांची हाताळणी योग्य पद्धतीने करावी.
- वापरकर्त्यांनी अभिलेखांचा वापर काळजीपूर्वक करावा.
- अभिलेख एका जागेवरून दुसऱ्या जागेवर नेताना सुरक्षितता व खबरदारी या दोन गोष्टी लक्षात घेवूनच

एका जागेवरून दुसऱ्या जागेवर अभिलेख न्यावेत.

- गरजेनुसार अभिलेखांची स्वच्छता मोहीम हाती घ्यावी.
- अभिलेखांची पुनर्ररचना व पुनर्बांधणीकडे लक्ष द्यावे.

आदी उपाय योजना अवलंबिल्या तर अभिलेखांचे रक्षण होण्यास मदत होईल.

### ११.६ .१ अभिलेखगारातील अभिलेखांचे जतन करण्याच्या योग्य पद्धती :

- अभिलेख कक्ष हे स्वतंत्र असावे.
- अभिलेख कक्षात पावसाचे पाणी येणार नाही अशी यंत्रणा तयार असायला पाहिजे.
- अभिलेख कक्षात सूर्य किरण सरळ येणार नाहीत अशी व्यवस्था असायला पाहिजे.
- अभिलेख कक्षात प्रवेश हा मर्यादीत स्वरुपाचा असायला पाहिजे.
- अभिलेख कक्षात अभिलेखांची ने-आण करण्यासाठी हातगाडी अथवा ट्रॉलीचा वापर करावा.
- अभिलेख कक्षाच्या कोणत्याही बाजूने पाणी वाहून नेणारी जल वाहिनी नसावी.
- अभिलेख कक्ष वातानुकूलित असावे.

- वातानुकूलित सुविधा शक्य नसेल तर हवा खेळती ठेवणारे यंत्र अथवा पंखे असतील तर त्यांचा वापर करावा.
- अभिलेखागारातील अभिलेख हे कागद, दस्तऐवज, फाईल, नकाशे, तक्ते, आराखडे अशा वेगवेगळ्या प्रकारचे असतात या सर्व प्रकारच्या अभिलेखांची मांडणी त्यांच्या प्रकार, स्वरूप व आकाराला अनुसरून करावी.
- अभिलेख मांडणीवर ठेवताना भिंतीपासून किमान ६ इंच म्हणजे (१५ से.मी.) दूर ठेवावेत.
- अभिलेख सुटे असतील व त्यांचे गठ्ठे  बांधणे आवश्यक असेल तर ते गठ्ठे सैल बांधून मांडणीवर ठवावेत. अभिलेखांचे घट्ट गठ्ठे बांधू नयेत.
- सुटे अभिलेख सुरक्षित ठेवण्यासाठी दोन जाड पुठ्यात सहज सुटणारी गाठ मारून बांधावे.

## ११.७ सारांश

प्रत्येक अभिलेखागाराच्या दृष्टीने  अभिलेखांचे जतन ही एक महत्त्वाची बाब असते. अभिलेखांच्या या जतन प्रक्रियेत अभिलेखपालाची व त्याला साह्य करणाऱ्या त्यांच्या सहकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची असते त्याच बरोबर अभिलेखागाराला भेट देण्यासाठी येणारे अभ्यासक व संशोधक यांची भूमिकाही महत्त्वाची असते. कारण अभिलेख हे सेंद्रिय असल्याने त्यांची झीज ही अपरिहार्य असते. ही झीज नैसर्गिक व मानवनिर्मित घटकांपासून होत असते.ही झीज ज्या घटकांपासून होत असते ते घटक म्हणजे उष्णता, आद्रता, प्रकाश,कार्बन,नायट्रोजन, गंधक,धुळ, कागद निर्मितीसाठी वापरण्यात आलेले द्रावण व प्रक्रिया, बुरशी, वाळवी,झुरळे,पुस्तकी किडे, सिल्व्हर- फिश व मानवनिर्मित उपद्रव करणारे घटक. हे सर्वच घटक अभिलेखांचे शत्रू आहेत. म्हणुनच अभिलेखांचे जतन करणे आवश्यक आहे. या जतन प्रक्रियेत उष्णता व अद्रतेचा समतोल कसा ठेवावे. प्रकाश योजना कशी ठेवावी. रासायनिक प्रक्रिया कशा पद्धतीने कराव्यात, बुरशी व वाळवी पासून कोणत्या रासायनिक प्रक्रिया करून अभिलेखांचे आयुर्मान वाढवावे व धुरीकरण पद्धतींचा वापर कसा करावा व अभिलेखांचे जतन करण्यासाठी अभिलेखागारात कोणत्या अभिलेख जतन पद्धतींचा वापर करावा याची माहिती आपण या घटकात पहिली. या सर्व माहितीवरून आपणांस अभिलेखांचे उपद्रव व जतन करण्याचे मार्ग याची माहिती या घटकातून समजण्यास मदत झाली.

## ११.८ प्रश्न

१. अभिलेखांवर परिणाम करणारे वातावरणीय घटक कोणते ते सांगून या घटकांवरील उपाय स्पष्ट करा.

२. अभिलेखांवर परिणाम करणारे रासायनिक घटक कोणते ते सांगून या घटकांवरील उपायांची माहिती सांगा.

३. अभिलेखांवर परिणाम करणारे संरचनात्मक घटक कोणते ते सांगून या घटकांवरील उपायांची माहिती सविस्तर लिहा.

४. अभिलेखांवर परिणाम करणारे जैविक घटक कोणते ते सांगून या घटकांवरील उपायांवर सविस्तर माहिती लिहा.

५. अभिलेखांवर परिणाम करणारे मानवनिर्मित घटक कोणते ते सांगून या घटकांवरील उपायांवर भाष्य करा.

## ११.९ संदर्भ

१. खोबरेकर वि. गो.-महाराष्ट्रातील दफ्तरखाने, मुबंई महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती.

२. गोखले शोभना -पुराभिलेखविद्या. पुणे कँटीनेन्टल प्रकाशन.

३. धाटावकर भास्कर -महाराष्ट्रातील शासकीय पुराभिलेखागाराची निर्मिती आणि कार्य, मुंबई चेतन प्रकाशन.

४. महाजन शां. ग. दफ्तरखाने आणि वस्तुसंग्रहालय, पुणे: पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन.

५. विचारे द. त. कोल्हापूर दफ्तरखाना संक्षिप्त परिचय, नाशिक ज्ञानगंगोत्री.

❖❖❖❖

# १२

# अभिलेखांचे पुनरुज्जीवन व डिजिटल अभिलेखागार

**घटक रचना :**

१२.० उद्दिष्टे

१२.१ प्रस्तावना

१२.२ अभिलेखपालाचे गुण

१२.२ अभिलेखांचे पुनरुज्जीवन

१२.३ डिजिटल अभिलेखागार

१२.४ सारांश

१२.५ प्रश्न

१२.६ संदर्भ

## ११.० उद्दिष्टे

१. अभिलेखपालाचे गुण समजून घेणे.

२. अभिलेखांचे पुनरुज्जीवन कसे केले जाते त्याचा अभ्यास करणे.

३. डिजिटल अभिलेखागार विषयक माहिती जाणून घेणे.

## १२.१ प्रस्तवना

अभिलेखांचे जतन जसे महत्वाचे असते तसेच अभिलेखांचे पुनरुज्जीवन सुद्धा महत्वाचे असते. कारण अभिलेख हे सेंद्रिय स्वरूपाचे असल्याने त्यांचा नाश हा अटळ असतो म्हणूनच ते जास्तीत जास्त कालखंडासाठी कसे टिकतील या साठी प्रयत्न करणे आवश्यक असते. यांतूनच अभिलेखांच्या पुनरुज्जीवन प्रक्रियेची सुरुवात होते.या घटकात आपण अभिलेख व्यवस्थापनात महत्त्वपूर्ण भूमिका निभावणाऱ्या अभिलेखपालाचे गुण, अभिलेखांचे पुनरुज्जीवन व अभिलेखांना उपद्रव होवून अभिलेखांचे अस्तित्व नष्ट होत असेल तर त्या अगोदर एक खबरदारीचा उपाय म्हणून अभिलेख डिजिटल स्वरूप उपलब्ध कसे केले जातात या  सर्वांची माहिती आपण या  घटकात पाहणार आहोत.

## १२.२ अभिलेखपालाचे गुण

अभिलेखपाल हा अभिलेखागाराचा प्रमुख असतो. केंद्रबिंदु असतो. आत्मा असतो. त्याच्या अंगी खालील नमूद केलेले गुण असणे आवश्यक आहेत.

- *अभिलेखपालाला विविध विषयाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
- *अभिलेखपालाला अभिलेखांची संरचना करण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
- *अभिलेखपालाला अभिलेखांचे व्यवस्थापन करण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
- *अभिलेखपालाला अभिलेखांचे मूल्यमापन करण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
- *अभिलेखपालाला अभिलेख व्यवस्थापनातील विविध बारकावे माहीत असणे आवश्यक आहे.
- *अभिलेखपालाला अभिलेख जतन करण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
- *अभिलेखपालाला अभिलेख संवर्धन करण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
- *अभिलेखपालाला अभिलेख पुनरुज्जीवन करण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
- *अभिलेखपालाला अभिलेखांचे डिजिटल सादरीकरणाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
- *अभिलेखपालाला अभिलेखांच्या उपयोगीतेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
- *अभिलेखपालाला अभिलेखांच्या महत्वाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
- *अभिलेखपालाला अभिलेखांच्या संशोधन विषयक उपयोगीतेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
- *अभिलेखपालाला अभिलेखागारातील स्वच्छता, वातावरण निर्मिती व रासायनिक प्रक्रिया इत्यादी घटकांचे शास्त्रशुद्ध ज्ञान असणे आवश्यक आहे. आदी गुण जर त्याच्याकडे असतील तर तो उत्तम व अष्टपैलू अभिलेखपाल होवू शकतो.

## १२.२ अभिलेखांचे पुनरुज्जीवन

अभिलेख हे सेंद्रिय असल्याने नाशवंत असतात.त्यामुळे त्यांचे अस्तित्व टिकविण्याचा दृष्टीने अभिलेखांचे पुनरुज्जीवनाचे काम हाती घेतले जाते. प्रचलित अभिलेखांना कोणत्या प्रकारची हानी झाली आहे हे लक्षात घेवूनच अभिलेखांचे पुनरुज्जीवन केले जाते.

सर्व साधारणपणे खालील नमूद केलेल्या घटकांना अनुसरून अभिलेखांना उपद्रव झाल्यानंतर अभिलेखांच्या पुनरुज्जीवनाचे काम हाती घेतले जाते.

- *अभिलेख वारंवार हाताळण्याने खराब झाल्यानंतर .
- *अभिलेखांची बांधणी सैल झाल्यानंतर.
- *अभिलेखांच्या पृष्ठांची हानी झाल्यानंतर .
- *अभिलेखांचे वारंवार वापराणे व दुमडल्याने कोपरे खराब झाल्यानंतर .
- *हवा वातावरण व प्रदूषण परिणामाने अभिलेख ठिसूळ झाल्यानंतर.
- *वारंवार केल्या जाणाऱ्या हस्त स्पर्शाने
- अभिलेखांचे तुकडे झाल्यानंतर.
- *अभिलेखांच्या मजकूरावरील शाई फिकट झाल्यानंतर.
- *अभिलेखांवरील मजकूर वाचण्यास अडथळा निर्माण झाल्यानंतर .

**अभिलेखांचे पुनरुज्जीवन प्रक्रिया**

### १२.२.१ अभिलेखांची प्राथमिक पाहणी :

जे अभिलेख कार्यालयीन कामकाजाच्या उद्देश तयार केले जातात ते अभिलेख प्रामुख्याने कागद व शाईचा वापर करून तयार केले जातात. अशा अभिलेखांचे पुनरुज्जीवन करतांना प्रामुख्याने कागद व शाई या दोन बाबींचा विचार करून अभिलेखांच्या पुनरुज्जीवनाचे काम हाती घेतले जाते. त्याच बरोबर अशा अभिलेखांचे किती नुकसान झाले आहे. अशा अभिलेखांच्या दुरुस्तीस कोणती पद्धती वापरण्यात यावी. अशा अभिलेखांची शाई कोणत्या प्रकारची आहे. शाईची पाण्यातील विद्राव्यता किती आहे. या सर्व बाबींचा विचार करूनच

अभिलेखांच्या पाहणीचे काम पुर्ण झाल्या नंतर अभिलेखांच्या पुनरुज्जीवनाचे काम हाती घेतले जाते.

### १२.२.२ अभिलेखांच्या दुरुस्तीची पूर्व तयारी :

अभिलेखांची प्राथमिक पाहणी पुर्ण झाल्यानंतर अभिलेखांच्या दुरुस्तीच्या पूर्वतायरीचे काम हाती घेतले जाते. दुरुस्तीच्या पूर्वतायरीमध्ये अभिलेखाचा कोणता भाग खराब झाला आहे, तो दुरुस्त करण्यायोग्य आहे काय, की अभिलेख पूर्णपणे खराब झाला आहे याचा अभ्यास करूनच अभिलेखांच्या दुरूस्तीचे काम हाती घेतले जाते.

### १२.२.३ अभिलेख स्वच्छ करणे :

अभिलेखाच्या दुरुस्तीच्या पूर्वतायरीचे काम पुर्ण झाल्यानंतर अभिलेखाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात होत. सुरुवातीला अभिलेखावरील धुळ झटकली जाते. नंतर नरम फडक्याने अभिलेख पुसला जातो. अभिलेख पुसल्यानंतर अभिलेखाला पडलेल्या घड्या

सरळ केल्या जातात. घड्या सरळ केल्यानंतर  इस्त्रीचा वापर करून घड्या सरळ केल्या जातात. नंतर अभिलेख दोन कार्ड पेपरामध्ये कमीत कमी चार ते जास्तीत जास्त बारा तास ठेवून अभिलेखाच्या घड्या काढल्या जातात. या पद्धतीने अभिलेख स्वच्छ करण्याची प्रक्रिया पुर्ण केली जाते.

**१२.२.३ अभिलेखाच्या शाई बाबत प्रक्रिया :**

अभिलेख स्वच्छ केल्यानंतर अभिलेखाच्या शाई बाबत प्रक्रिया करण्यास सुरुवात केली जाते. मात्र अभिलेख  जर विद्राव्य नसेल तरच त्याच्या अशा प्रकारच्या प्रक्रियेचे काम हाती घेतले जाते. ही प्रक्रिया करतांना सुरवातीला पसरट ट्रे मध्ये स्वच्छ पाणी घेतले जाते. नंतर अभिलेखाच्या दोन्ही बाजूस प्लास्टिक जाळी अथवा ऑइल पेपर लावली जाते व नंतर तो अभिलेख पाच ते दहा मिनिटे पाण्यात ठेवला जातो नंतर अभिलेख स्वच्छ करतांना फाटला जाणार नाही याची काळजी घेतली जाते. भिजलेला अभिलेख कोरडा करण्यासाठी प्रथम ब्लॉटिंग पेपरचा वापर केला जातो नंतर हलक्या हाताने स्वच्छ केलेल्या अभिलेखाला इस्त्री केली जाते. इस्त्री केल्याने अभिलेखाच्या सर्व घड्या नाहीशा होण्यास मदत होते व अभिलेख पूर्ववत होण्यास मदत होते.

**१२.२.४ :अभिलेखांवरील डाग काढण्याची प्रक्रीया :**

वेगवेगळ्या कारणास्तव अभिलेखांवर डाग हे पडत असतात. हे अभिलेखांवरील डाग घालविण्यासाठी रासायनिक प्रक्रिया कराव्या लागतात.

- *जर अभिलेखांवर तेल व डांबराचे डाग पडले असतील तर Phyridine  चा वापर करून तेल व डांबराचे डाग काढावेत.

- *जर अभिलेखांवर चहा अथवा कॉफीचे डाग पडले असतील तर Potassium Perborate (2% solution) चा वापर करून  चहा अथवा कॉफीचे डाग काढावेत.

- *जर अभिलेखांवर मेणाचे डाग पडले असतील तर Petrol चा वापर करून अभिलेखांवरील मेणाचे डाग काढावेत.

- *जर अभिलेखांवर लोखंडाच्या गंजाचे डाग पडले असतील तर 2% Chloramine-T &  5% Oxalic Acid & 10 % Citric Acid चा वापर करून लोखंडाच्या गंजाचे डाग काढावेत.

- *जर अभिलेखांवर शाईचे डाग पडले असतील तर Sodium Formald Chyed Sulphoxylate चा वापर करून अभिलेखांवरील शाईचे डाग काढावेत.

- *जर अभिलेखांवर फंगस इ. किटकांमुळे डाग पडले असतील तर  Bleching Powder Sodium Chlorite & Sodium Hypochlorite चा वापार करून फंगस इ. किटकांमुळे पडलेले डाग काढावेत.

### १२.२.५ : अभिलेखांवरील आम्लता दूर करण्याची प्रक्रिया :

अभिलेखांवरील आम्लता दूर करण्यासाठी कॅल्शिअम हायड्रोकसाईड  व कॅल्शियम बायकार्बोनेटचे द्रावण तसेच मॅग्नेशियम बायकार्बोनेटचे द्रावण तसेच अमोनिया वायूचा वापार करून  अभिलेखांची आम्लता काढता येते.

### १२.२.५ : अभिलेख दुरूस्तीसाठी वापरावयाची खळ :

अभिलेखांची वारंवार दुरूस्ती करणे हितावह नसते कारण अभिलेख पाण्यात भिजवल्याने फुगणे अथवा आकुंचन पावणे असे उपद्रव अभिलेखांना होतात म्हणुनच वेगवेगळ्या प्रकारच्या अभिलेखांच्या दुरूस्तीसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या पेस्ट वापरल्या जातात अशा पेस्टची निर्मिती खालील प्रक्रिया करून केली जाते.

स्टार्च किंवा एक किलो मैदा, पाच लिटर पाणी, कॉपर सल्फेट १० ग्रॅ म ग्लिसरीन १० ते २० सी सी  तसेच टिश्यू पेपरच्या साह्याने अभिलेखांची दुरूस्ती करावयाची असेल तर डेक्सट्रिन पेस्टचा वापर करून पुस्तकांच्या बांधणीसाठी किंवा अभिलेख चिकटविण्यासाठी या प्रकारच्या खळीचा वापार केला जातो. डेक्सट्रिन पाच किलो, पाणी पाच लिटर, लवंग तेल ४० ग्रॅम, बेरियम  कार्बोनेट ८० ग्रॅ म आदींचा वापर करून खळ तयार केली जाते. याव्यतिरिक्त गुजरातमधील विलीमोर येथे मेसर्स गुजकेम डीसटीलर्स  ही कंपनी 'सरसेल' पेस्ट तयार करते. ही पेस्ट पावडर स्वरूपात उपलब्ध आहे. एक लिटर पाण्यात २५ ग्रॅ म सरसेल मिसळून ८०० ते ९०० से. तपमानावर गरम करून नंतर ती थंड करून पेस्ट तयार केली जाते. अभिलेखांना बुरशीपासून जो उपद्रव होतो ती नष्ट करण्यासाठी या पेस्टची उपयोग होतो.

### १२.२.५ :अभिलेखांची किरकोळ दुरुस्ती :

ज्या ठिकाणी अभिलेखांचा सातत्याने वापर होत असतो त्या ठिकाणी अभिलेखांना घड्या अथवा चुण्या पडण्याचे प्रमाण जास्त असते. अशा किरकोळ दुरुस्तीसाठी ...

- *सरसेल MV अथवा डेक्सट्रिन पेस्ट अथवा मैदा पेस्टचा वापर करून टिश्यू पेपरच्या साह्याने अभिलेखांची दुरुस्ती करावी.
- *अभिलेखांची निष्काळजीपणाने हाताळणी होवून जर अभिलेखांचे जर काही भाग गहाळ झाले असतील अथवा तुटले असतील तर अशा गहाळ झालेल्या भागाला रॅगपेपर व्यवस्थित लावावा.
- *अभिलेखांची निष्काळजीपणाने हाताळणी होवून जर अभिलेखांचे जर काही भाग गहाळ झाले असतील तर टिश्यू फायबरच्या लगद्याच्या साह्याने गहाळ झालेले अभिलेखांचे भाग भरून काढावेत.
- *अभिलेखांच्या दुरुस्तीसाठी काचेच्या पृष्ठभागाच्या टेबलचा वापर करावा.
- *अशा टेबलला फ्लूरोसंट ट्यूबलाईटची व्यवस्था करावी.

- *ही दुरुस्ती सिफॉन दुरुस्ती , लॅमिनेशन दुरुस्ती व टिश्यूपेपरयुक्त दुरुस्ती या तीन पद्धतींचा वापर करून करावी.

### १२.२.६ :अभिलेखांची पुर्ण दुरुस्ती :

जे अभिलेख फक्त एकाच बाजूने लिहिलेले असतात अशा अभिलेखांची दुरुस्ती अभिलेखांच्या पूर्ण आकाराला अनुसरून केली जाते. सर्वप्रथम अशी दुरुस्ती करतांना अभिलेखाच्या पूर्ण आकाराला मोकळ्या बाजूने मैद्याची अथवा CMC पेस्ट लावली जाते. या साठी अभिलेखाच्या दुरूस्तीच्या आकारापेक्षा मोठा कागद घेतला जातो.अशी दुरुस्ती टेबलच्या काचेवर पृष्ठभागावर वॅक्स पेपर पसरून केली जाते. सर्वप्रथम दुरुस्ती पेपर पसरून पाण्याने थोडा दमट केला जातो. नंतर त्याच्यावर मैदा अथवा CMC पेस्ट लावली जाते व नंतर अभिलेख पृष्ठ व्यवस्थितपणे चिकटविला जातो. अभिलेखांवरील पेस्ट पसरवण्यासाठी शक्यतो ब्रशचा वापर केला जातो व ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली जाते.

### १२.२.७ टिश्यू पेपरयुक्त अभिलेख  दुरुस्ती प्रक्रिया :

टिश्यू पेपरयुक्त अभिलेख  दुरुस्ती प्रक्रिया ही एक अभिलेख दुरुस्तीची महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. या प्रक्रियेसाठी सर्वप्रथम पातळ तसेच तेल व  मेणयुक्त घटक असलेला एक चांगल्या प्रतीचा टिश्यू पेपर घेतला जातो. हा टिश्यू पेपर जो अभिलेख दुरुस्त करावयाचा आहे त्या पेक्षा थोड्या मोठ्या आकाराचा असतो. हा टिश्यू पेपर घेवून त्याची एक कडा जो अभिलेख दुरुस्त करावयाचा आहे त्याच्या एका टोकाला ठेवून दुसऱ्या टोकापर्यंत हलक्या हाताने पसरवायचा असतो.ही प्रक्रिया करतांना टिश्यू पेपर कुठे फाटणार नाही  तसेच टिश्यू पेपरच्या घड्या पडणार नाहीत याची खबरदारी घेतली जाते. व ही टिश्यू पेपरयुक्त अभिलेख दुरुस्ती प्रक्रिया पुर्ण केली जाते.

### १२.२.७ सिफॉन अभिलेख  दुरुस्ती प्रक्रिया :

दोन्ही बाजूने लिहिलेल्या अभिलेखांच्या दुरुस्तीसाठी सिफॉन अभिलेख  दुरुस्ती प्रक्रियेचा अवलंब केला जातो.अशा प्रकारच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे सिफॉन भारतातील जम्मू-काश्मीर मधील कारखान्यांमध्ये उपलब्ध आहे. सिफॉन हे मलमलीसारखे अति तलम कापड आहे. सिफॉन  तलम कापडाचे संरक्षण मिळाल्याने अभिलेखांचे कायमस्वरूपी रक्षण होण्यास मदत होते. या पद्धतीचा वापर केल्याने अभिलेखांना बुरशीपासून होणार जो उपद्रव आहे तो टाळता येतो.

### १२.२.७ अभिलेखांसाठी पटलीकरण प्रक्रिया :

अभिलेखांना प्लॅस्टिक सदृश पातळ किंवा पारदर्शक कागदाचा थर देणे म्हणजे पटलीकरण होय. त्यालाच लॅमिनेशन असे सुद्धा म्हटले जाते. जे अभिलेख अति जीर्ण झालेले असतात त्यांना पातळ किंवा पारदर्शक कागदाचा थर दिला जातो. अभिलेख संरक्षणाची ही एक सुधारीत पद्धत असून या पद्धतीचा वापर आज मोठ्या प्रमाणात केला जातो. अभिलेखांच्या सुलभ वाचनाची प्रक्रिया यामुळे  सहज पुर्ण होते. अभिलेखांना बळकटी येत. अभिलेखांचे घाण, धुळ, बुरशीपासून संरक्षण होते. हे पटलीकरण हॅंड लॅमिनेशन व मशीन लॅमिनेशन अशा दोन पद्धतीने करता येते.

### १२.२.८ सील शिक्क्यांची दुरुस्ती :

ऐतिहासिक उपयोगीतेचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणुन सील शिक्क्यांकडे पाहिले जाते. सततच्या वापराने हे सील व शिक्के खराब होतात. असे सील व शिक्के व त्यांचे तुटलेले भाग शुद्ध मेण व रेझिन यांचे मिश्रण करून चिकटविता येतात. या पद्धतीने हा प्रश्न सोडविणे शक्य होते.

## १२.३ डिजिटल अभिलेखागार

डिजिटल अभिलेखागार या संग्रहात सामान्यतः एक सूचना प्रणाली असते जिचा उद्देश विविध डिजिटल साधने संग्रहित करणे आणि या साधनांचा उपयोग वापर कर्त्यांसाठी उपलब्ध करुन देणे हा असतो. सामुग्री आणि तंत्रज्ञान संदर्भातील डिजिटल अभिलेख, डिजिटल पुस्तकालये आणि डिजिटल म्युझिक महत्त्वपूर्ण बाबींना अनुसरून आता डिजिटल अभिलेखागाराचा विकास चालू आहे.

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असल्याने या युगात शिक्षण क्षेत्रात सर्वांगीण प्रगती झाल्याने सर्व दूर माहिती मोठ्या प्रमाणात निर्माण होते.या माहितीमध्ये ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते व वेगवेगळ्या प्रकारचे दस्ताऐवज यांचा समावेश मोठ्या प्रमाणात असतो.ही सर्वच अभिलेख अभिलेखागारात ठेवणे शक्य नसते. तसेच काही महत्त्वाचे अभिलेख महत्त्वपूर्ण व दुर्मिळ असल्याने ते वाचक, अभ्यासक अथवा संशोधकांना देणेही शक्य नसते. तसेच वातावरण बदल व अभिलेखांची चुकीची हाताळणी यामुळे सुद्धा असे अभिलेख खराब होत असतात. म्हणुनच अशा या अभिलेखांचा भविष्यात वापर करण्यासाठी डिजिटल अभिलेखागार ही संकल्पना विकसित झाली. डिजिटल अभिलेखागारामुळे भाषा,वेळ,श्रम व पैसा या बाबींमुळे जे अडथळे निर्माण होतात ते अडथळे दुर होतात. डिजिटल अभिलेखागारात सर्व अभिलेख इलेक्ट्रॉनिक स्वरूपात साठवून ठेवले जातात. या इलेक्ट्रॉनिक स्वरूपात साठविलेल्या संग्रहावर लक्ष केंद्रीत केले जाते.

- *अभिलेखगारातील डिजिटल साहित्य शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापीत केला जातो.
- *अभिलेखगारातील डिजिटल साहित्य निर्माण करतांना तांत्रिक तसेच शास्त्रीय तत्वे वापरली जातात.
- *अभिलेखागारातील डिजिटल साहित्य सुलभतेने वापरण्यासाठी योग्य ती तांत्रिक व्यवस्था निर्माण केली जाते.

डिजिटल अभिलेखागार म्हणजे माहिती आणि ज्ञानाच्या संघटीत विशाल संग्रहातून सुसंगत पद्धतीने माहिती शोध सुविधा उपलब्ध करणारी प्रणाली एक महत्त्वपूर्ण प्रणाली आहे. डिजिटल अभिलेखागाराच्या माहिती स्रोतामध्ये सी. डी रोम, डेटाबेस, इंटरनेट, अर्कहीव संग्रह, ऑनलाइन डाटाबेस, इलेक्ट्रॉनिक प्रकाशाने, इंटरनेट स्रोत, प्रकाशकांचे डाटाबेस, दृक श्राव्य साधने संगणक प्रोग्रामस मल्टीमिडिया इत्यादींचा समावेश असतो.

**१२.३.१ डिजिटल अभिलेखागाराचा उद्देश :**

- *डिजिटल माहितीचे संग्रहण, संघटन व पुन: प्राप्ती करणे.
- *अभिलेखागारातील माहितीचे जतन करण्यासाठी डिजिटलायझेशन करणे.
- *अभिलेखागाराच्या खर्चाची परिणामकारकता सुधारणे.
- *अभिलेखागारासाठी लागणाऱ्या अधिक प्रमाणातील जागेची समस्या कमी करणे.
- *वाचक, अभ्यासक, संशोधक व सर्वसामान्य लोकांचा वेळ वाचविणे.
- *वाचक, अभ्यासक, संशोधक व सर्वसामान्य लोकांना नवीन सेवा सुविधा उपलब्ध करून देणे.
- *अभिलेखागारातील इलेक्ट्रॉनिक अभिलेखांचा वापर वाढविणे.
- *सीडीच्या स्वरूपात डेटाबेसचा संग्रह करणे.

**१२.३.२ डिजिटल अभिलेखागाराची आवश्यकता :**

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असल्याने या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल अभिलेखागारामध्ये वाचकांना सेवा जलद, अद्ययावत व अचूक पुरविण्यासाठी डिजिटल अभिलेखागाराची आवशकता ही निर्माण झाली व त्यातूनच या प्रणालीचा विकास झाला.

**१२.३.३ डिजिटल अभिलेखागाराद्वारे देण्यात येणाऱ्या सेवा.**

पारंपारिक अभिलेखागारापेक्षा डिजिटल अभिलेखागाराद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा अचूक व जलद गतीने दिल्या जातात.

***शेअर्ड कॅटलॉगिंग सेवा :***

शेअर्ड कॅटलॉगिंग सेवेमुळे अभिलेखागारातील असणाऱ्या अभिलेखांच्या तालिकेची माहिती नेटवर्कचा वापर करून बघता येते किंवा डाऊनलोड करता येते.

***संघ तालिका सेवा :***

अभिलेखागारात संघ तालिका सेवा उपलब्ध करतांना अभिलेखगारातील अभिलेखांव्यतिरिक्त माहिती नोंदवली जाते.

*__वेब ओपेक :__

अभिलेखागारात या सेवेचा उपयोग करून अभिलेखागाराची यंत्र रूप तालिका इंटरनेट वेबच्या साह्याने उपलब्ध केली जाते.

***रेफरल सेवा :**

अभिलेखागारामध्ये उपलब्ध नसणारे अभिलेख अथवा इतर साहित्य इतर कोणत्या अभिलेखागारामध्ये उपलब्ध आहे याचा संदर्भ देणे म्हणजे रेफरल सेवा होय.

***जागरूकता सेवा :**

अभिलेखागारातील नवीन अभिलेख, पेटंट, दृकश्राव्य साधनांची यादी वाचकांच्या निदर्शनासाठी अंतर्गत वेबसाईटवर प्रकाशित करणे.

***निवडक माहिती प्रसारण सेवा :**

अभिलेखागारातील माहितीचे एकत्रीकरण करून तसेच त्या माहितीचे पृथ:करण करून गरजू वाचकांना ईमेलच्या माध्यमातून निवडक माहितीची सेवा पुरवणे.

***बुलेटीन बोर्ड सेवा :**

बुलेटीन बोर्ड सेवेमध्ये अभिलेखागारातील विविध प्रकारच्या बातम्यांची माहिती प्रसिद्ध केली जाते.

### १२.३.४ डिजिटल अभिलेखागाराची उपयोगीता :

बदल्या तंत्रज्ञानाचा एक प्रभावी परिणाम म्हणजे डिजिटल अभिलेखागार होय. एक समृद्ध ज्ञानाचा भांडार म्हणुन डिजिटल अभिलेखागार होय. डिजिटल अभिलेखागाराच्या माध्यमातून आज समाजातील सर्वच स्तरातील समूहाला आवश्यक असणारी माहिती डिजिटल अभिलेखागाराच्या माध्यमातून उपलब्ध होत असल्याने ही माहिती प्राप्त करण्यासाठी समाजातील सर्वच स्तरातील प्रयत्न करत आहेत. ही माहिती डाऊनलोड करता येते ,या माहितीचा वापर अभ्यास उपयोगीता, संशोधन उपयोगीता व पुराव्यासाठी सुद्धा करता येतो .एकंदरीत या सर्व बाबींचा विचार करता डिजिटल अभिलेखागार हे एक मानवी समूहाच्या दृष्टीने एक वरदान ठरले आहे.

## १२.४ सारांश

अभिलेखांचे पुनरुज्जीवन व डिजिटल अभिलेखागार या दोन महत्त्वाच्या घटकांची माहिती पाहत असतांना सुरवातीला आपण अभिलेखपाल , अभिलेखपाल पात्रात, अभिलेखपालाचे गुण याबाबतची माहिती पाहीली. तद्नंतर अभिलेखांचे पुनरुज्जीवन करणे का आवश्यक आहेत.तसेच अभिलेख दुरुस्ती करतांना त्या अभिलेखांची प्राथमिक पाहणी कशी केली जाते, त्याची पूर्व तयारी कशी केली जाते, अभिलेख स्वच्छ करण्याचा कोणत्या पद्धती आहेत, अभिलेखांच्या शाईवर जर परिणाम झाला असेल तर कोणत्या पद्धतीचा अवलंब केला जातो, अभिलेखांवरील आम्लता नष्ट करण्यासाठी कोणत्या माध्यमाचा अवलंब केला जातो, अभिलेखांच्या दुरुस्तीसाठी कोणती खळ वापरली जाते, अभिलेखांची किरकोळ दुरुस्ती व पुर्ण दुरुस्ती कशी केली जाते, अभिलेखांच्या दुरुस्तीसाठी शिफॉन, पटलीकरण प्रक्रिया कशा राबवल्या जातात त्याची माहिती पाहीली तसेच अभिलेखागारातील सील शिक्क्यांची दुरुस्ती बाबतीत माहिती जाणून घेतली.

डिजिटल अभिलेखागार ही गरज व बदलत्या काळाची गरज. या गरजेतून निर्माण झालेली डिजिटल अभिलेखागार ही संकल्पना समजून घेत असतांना डिजिटल अभिलेखागार म्हणजे काय, डिजिटल अभिलेखागाराचा उद्देश, डिजिटल अभिलेखागाराद्वारे देण्यात येणाऱ्या सुविधा, डिजिटल अभिलेखागाराची उपयोगीता आदी घटकांची माहिती पाहिली.या माहितीवरून बदलत्या काळानुसार डिजिटल अभिलेखागार किती महत्वाचे आहे हे या माहितीच्या आधारे समजले. अभिलेख संग्रह, साठा, जतन व अभिलेखांचे पुनरुज्जीवन या सर्वांपासून बचावासाठी तसेच वाचक, अभ्यासक, संशोधक,शासन,प्रशासन व समस्त लोक समूहासाठी डिजिटल अभिलेखागार हे एक महत्त्वपूर्ण माध्यम आहे हे वरील माहितीच्या आधारे स्पष्ट झाले.

## १२.५. प्रश्न

१. अभिलेखांच्या पुनरुज्जीवन प्रक्रियेवर भाष्य करा.

२. डिजिटल अभिलेखागारावर सविस्तर माहिती लिहा.

## १२.६ संदर्भ

१. खोबरेकर वि. गो.-महाराष्ट्रातील दफ्तरखाने,मुबंई महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती.

२. गोखले शोभना -पुराभिलेखविद्या. पुणे कँटीनेन्टल प्रकाशन.

३. धाटावकर भास्कर -महाराष्ट्रातील शासकीय पुराभिलेखागाराची निर्मिती आणि कार्य, मुंबई चेतन प्रकाशन.

४. महाजन शां.ग.दफ्तरखाने आणि वस्तुसंग्रहालय, पुणे: पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन.

५. विचारे द. त. कोल्हापूर दप्तरखाना संक्षिप्त परिचय, नाशिक ज्ञानगंगोत्री.

❖❖❖❖